ग. वि. तुळपुळे

REFBK-0011583
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र.

# संतांच्या सहवासांत

[ ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, तुकाराम, रामदास व गुरुदेव रानडे ]

गणेश विष्णु तुळपुळे, एम्. ए.



REFBK-0011583

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस पुणे २

१९६१.]

[ मूल्य ५ रु.

प्रकाशक :
**श्री. सुशीला गो. पाटणकर**
कॉन्टिनेन्टल बुक सर्व्हिस,
अप्पा बळवंत चौक, पुणें २.

**प्रथमावृत्ति, जानेवारी १९६१**

मुद्रक :
**न. वा. लिमये,**
महाराष्ट्र मुद्रणालय,
४६१/१, सदाशिव पेठ,
पुणें २.

# अनुक्रम

| | | |
|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वरी : स्थितप्रज्ञता आणि आत्मानंद ... | १ |
| २. | साक्षात्कारी स्त्रीसंत मुक्ताबाई ... ... | १९ |
| ३. | शेवटचा दिवस गोड व्हावा ! ... ... | ३८ |
| ४. | दासबोध : भक्ति हा सद्‌गुणांचा मुकुटमणि ... | ५० |
| ५. | समर्थांचा सद्‌गुणविचार ... ... | ८६ |
| ६. | समर्थांचें स्वरूपानुसंधान ... ... | ९८ |
| ७. | समर्थांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान ... ... | १०४ |
| ८. | समर्थांचा आदर्श पुरुष ... ... | १२८ |
| ९. | गुरुदेव रानडे ... ... | १४७ |
| १०. | गुरुदेव रानडे यांचा बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद ... | १६५ |
| ११. | गुरुदेव रानडे यांचा सद्‌गुरुविचार ... ... | १८२ |
| १२. | गुरुदेव रानडे यांचा साध्य–साधन विचार ... | १९२ |

# प्रस्तावना

मासिकांसाठीं वेळोवेळीं लिहिलेले कांहीं लेख आज "संतांच्या सहवासांत" या पुस्तकाच्या रूपानें वाचकांना सादर करीत आहें. गुरुदेव रानडे यांच्या साक्षात्कार-शास्त्राच्या पार्श्वभूमिकेवर या सर्व लेखांतील विचार मांडलेले आहेत, हें सूज्ञ वाचकांच्या सहज लक्षांत येईल. "संतांच्या सहवासांत" केलेलें साक्षात्कार-शास्त्राचें हें अल्प विवेचन परमार्थप्रेमी जनांना उपयुक्त वाटेल अशी आशा आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील बहुतेक लेख, अध्यात्मासारख्या गंभीर विषयाला वाहिलेल्या, नागपूर येथील श्रीरामकृष्ण आश्रमाच्या विद्यमानें प्रसिद्ध होणाऱ्या "जीवन विकासां"त प्रकाशित झालेले आहेत. त्याच्या संपादकांनीं आपुलकीनें लेख लिहिण्याची वरचेवर सूचना केली नसती तर हे लेख लिहिले गेले नसते. तेव्हां या पुस्तक-प्रकाशनाचें बरेंच श्रेय त्या संपादकांना देणें अवश्य आहे.

सर्व लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याच्या कामीं सर्व श्रम माझे पुतणे चि. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीं घेतले. प्रकाशनाचें श्रेय मुख्यत्वेंकरून त्यांना आहे. कॉंटिनेंटल बुक सर्व्हिसनें ही जबाबदारी स्वीकारली व महाराष्ट्र मुद्रणालयानें छपाईचें काम त्वरित व चांगल्या रीतीनें केलें याबद्दल या दोन्हीं संस्थांचा मी आभारी आहें.

लेखांच्या मूळ प्रकाशनाचा स्थल-काल लेखांखालीं दिला आहे.

१४५ शिवाजीनगर, सांगली,
श्रीभाऊसाहेब महाराज पुण्यतिथि,
ता. १९ जानेवारी, १९६१

ग. वि. तुळपुळे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६३११ वि: चरित्र
क्रमांक ............ नों: दि: ............

# १. ज्ञानेश्वरी : स्थितप्रज्ञता आणि आत्मानंद

" ऐसा आत्मबोधें तोषला । जो परमानंदें पोखला ।
तोचि स्थितप्रज्ञु भला । वोळख तूं ॥ " ज्ञा. २.३६६

## प्रास्ताविक

भगवद्गीतेच्या अ. २ च्या शेवटीं आलेलीं स्थितप्रज्ञाचीं लक्षणें अत्यंत भव्योदात्त आहेत आणि सर्वांनाच, विशेषत: नैतिक जीवन हेंच ध्येय मानणाऱ्या पुरुषांना, तीं अत्यंत आकर्षक वाटतात. त्यांत नैतिक पूर्णतेचा अत्युच्च बिंदु दृष्टीस पडतो. म्हणून, स्थितप्रज्ञता या विषयावर पुष्कळ चर्चा झालेली आहे, उत्कृष्ट ग्रंथ लिहिले गेले आहेत. परंतु अशा चर्चेंत त्या लक्षणांचा केवळ नैतिक दृष्टीनेंच विचार केला गेला आहे. तीं लक्षणें प्राप्त करून घेण्याचा मार्ग गीतेंत कोणत्या प्रकारचा सांगितला आहे, याचें विवरण होणें अवश्य आहे. गुरुदेव रानडे यांनीं ' भगवद्गीता : साक्षात्कार-दर्शन ' या आपल्या ग्रंथाच्या १७ व्या प्रकरणांत आत्मानंद हें स्थित-प्रज्ञाचें मुख्य लक्षण आहे, असें सांगितलें आहे. प्रस्तुत लेखांत, ज्ञानेश्वरींत आत्मानंद व स्थितप्रज्ञाचीं इतर लक्षणें यांचा कशा प्रकारचा संबंध दाख-विला आहे तें पाहून, त्यावरून स्थितप्रज्ञतेच्या प्राप्तीचा मार्ग शोधावयाचा आहे. असा मार्ग ज्ञानेश्वरींत निश्चित सांपडतो.

" समाधिसुखीं केवळ । जैं बुद्धि होईल निश्चळ । तैं पावसी तूं सकळ । योगफळ ॥ " ( २.२८४ ) असें सांगून श्रीकृष्णांनीं स्थितप्रज्ञाचीं लक्षणें जाणण्याची अर्जुनाची जिज्ञासा जागृत केली व या ओवींतच त्या मार्गाचें दिग्दर्शन केलें. अर्जुनानें, " आणि स्थिरबुद्धि जो म्हणिजे । तो कैसा चिन्हीं जाणिजे । जो समाधिसुख भुंजे । अखंडित ॥ " ( २.२८८ ) असा प्रश्न विचारल्यावर, पहिल्याच श्लोकांत श्रीकृष्ण सांगतात :

" प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदुच्यते ॥ "

या श्लोकावरील भाष्यांत ज्ञानेश्वर म्हणतात, " आत्मसुखप्राप्तीच्या मार्गांत अभिलाषा किंवा वासना हें फार मोठें विघ्न आहे. या वासनेनें, नित्यतृप्त असा जो परमात्मा, त्यालाहि विषयांत ढकललें. ज्याची वासना नष्ट झाली, ज्याचें मन आत्मसंतोषांत मग्न झालें, तोच स्थितप्रज्ञ. "

" म्हणे अर्जुना परियेसीं । जो हा अभिलाष पूर्ण मानसीं । तो अंतराय स्वसुखेंसी । करीत असे ॥ जो सर्वदा नित्यतृप्त । अंतःकरणभरित । परी विषयांमाजीं पतित । जेणें कीजे ॥ तो कामु सर्वथा जाये । जया आत्म-संतोषीं मन राहे । तोचि स्थितप्रज्ञु होये । पुरुष जाणा ॥"(२.२९१-९३)

## आत्मानंद व वासनाक्षय यांत परस्पर-उपकारिता

येथें आत्मानंदानें वासनाक्षय का वासनाक्षयानें आत्मानंद असा प्रश्न उद्भवतो. या प्रश्नाची चर्चा गुरुदेव रानडे यांनीं आपल्या ग्रंथांत अनेक वेळां केली आहे. वासनाक्षय आणि आत्मानंद यांत परस्परउपकारिता (Reciprocal Causation) हा संबंध आहे. वासनाक्षयानें आत्मानंद वाढतो व आत्मानंदानें वासना क्षीण होत जातात; याप्रमाणें परस्परांच्या साहाय्यानें एकाची वाढ व एकाचा क्षय होत होत, शेवटीं आत्मानंद पूर्णत्वाला पोहोंचतो व नंतरच वासनांचा पूर्ण क्षय होतो, असें त्यांचें सांगणें आहे. नैतिक पूर्णता हा साक्षात्काराच्या, म्हणजेच आत्मानंदाच्या पूर्णतेचा परिणाम आहे. " आत्मन्येवात्मना तुष्टः" म्हणून " प्रजहाति यदा कामान्. " तो आपण आपल्यामध्येंच तृप्त असतो, म्हणून त्याचे सर्व काम नष्ट होतात; असा पुरुषच स्थितप्रज्ञ होय.

## आत्मदर्शनाचें सुख

" आत्मन्येवात्मना तृप्तः" या श्लोकावरचें भाष्यच जणुं कांहीं गीतें-तील खालील श्लोकांत आपल्याला सांपडतें. योगाचें फळ म्हणजे आत्यंतिक सुख असें गीता सांगते :

" यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगासेवया ।
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥

सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ।
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥

(६-२०-२२)

या सुखाच्या भव्य उत्कटतेचें वर्णन ज्ञानेश्वर करतात :

"एरव्हीं तरी येणें योगें । जैं इंद्रिया विंदाण लागें । तैं चित्त भेटों रिगे । आपणपेया ॥ परतोनि पाठिमोरें ठाकें । आणि आपणयातें आपण देखें । देखतखेवों ओळखे । म्हणे तत्त्व तें मी ॥ तये वोळखीसरसें । सुखाच्या साम्राज्यीं बैसें । चित्तपण समरसें । विरोनि जाय ॥...मग मेरूपासोनि थोरें । देहदुःखाचेनि डोंगरें । दाटिजो पां पडिभरें । चित्त न दाटे ॥ कां शस्त्र-वरी तोडलिया । देह अग्नीमाजीं पडलिया । चित्त महासुखीं पहुडलियां । चेवोंचि नये ॥ ऐसें आपणपां रिगोनि ठाये । मग देहाची वास न पाहे । आणिकाचि सुख होऊनि जाये । म्हणूनि विसरे ॥ जया सुखाचिया गोडी । मन आर्तीची सेचि सोडी ।...जें योगाची बरव । संतोषाची राणीव । ज्ञानाची जाणीव । जयालागी ॥ तें अभ्यासलेनि योगें । सावेव होवावें लागे । मग देखिलें तरी आंगें । होइजेल गा ॥" (६.३६५–७४)

योगसाधनानें चित्त अंतर्मुख होऊन त्याला आत्मदर्शन झालें म्हणजे " मीच आत्मतत्त्व " अशी ओळख त्याला पटते. या अनुभवानें साधक सुखाच्या साम्राज्यीं बसतो. तें सुख इतकें महान् असतें, कीं त्यांत मन बुडाल्यावर प्राणांतिक दुःखांनीं देखील तें जागृतीवर येत नाहीं; अशा दुःखांची जाणीवच त्याला होत नाहीं. साधकाला देहाचा विसर पडतो; तो ' सुखरूप ' होतो, स्वतः सुखच बनतो. परंतु, योगाभ्यासानें हें सुख प्रथम साकार होऊन दृष्टीला दिसलें पाहिजे; तें एकदां दृष्टीस पडलें, कीं साधक ' सुखरूप ' होतो. सारांश, आत्यंतिक सुखानें देहाचा विसर पडतो.

## आत्मानंदानें देहाचा विसर; त्यांतूनच स्थितप्रज्ञतेचीं इतर लक्षणें

आत्मानंदानें देहाचा विसर पडल्यावर स्थितप्रज्ञतेचीं इतर लक्षणें आपोआप प्रकट होतात. सुखदुःख सम वाटणें, राग-भय-क्रोध यांचा त्याग, शुभ-अशुभ सारखें लेखणें, अद्वेष, अनभिस्नेह, विषयत्याग, रसनिवर्तन, इंद्रियसंयम, इंद्रियें आत्मवश्य करून व्यवहार, परमार्थीं जागृति, प्रपंचांत निद्रा, समुद्राप्रमाणें विषयांनीं अविचलित राहणें, हीं स्थितप्रज्ञाचीं प्रमुख लक्षणें आहेत. यांचा विचार केला तर सहज लक्षांत येईल, कीं हीं अभावात्मक, दोषत्यागाच्या स्वरूपाचीं आहेत. सुखदुःख, शुभाशुभ यांनीं व्यथित होणें, राग-भय-क्रोध वाटणें, मत्सर करणें, विषयासक्ति इत्यादि दोषांचा त्याग म्हणजेच स्थितप्रज्ञता. या दोषांचा संबंध देहाशीं आहे. झोपेंत देहाचा विसर पडतो तेव्हां यांतील कोणत्याच दोषांची जाणीव नसते; पण जागृत झाल्यावर सर्व दोष प्रकट होतात. आत्मसाक्षात्कारी पुरुषाचा देहाशीं संबंध कायमचाच तुटलेला असतो; म्हणून हे दोष जाऊन त्याच्या ठिकाणीं स्थितप्रज्ञाचीं लक्षणें सहजच दिसूं लागतात.

" येरवीं तरी सहजें । सुखदुःख तैंचि सेविजे । देहजळीं होइजे । मासोळी जै ।। आतां तें तंव तेणें सांडिलें । आहे स्वरूपेसींच मांडिलें ।... तेवि आपणपांचि जया । वस्ती जाली गा धनंजया । तया देहीं आपैसया । सुख तैसें दुःख ।। ( १४·३५१-५४ )

विषयासक्ति, विषयांतील रस इत्यादि दुर्गुण कां व कसे दूर होतात, याचेंहि विवरण ज्ञानेश्वरांनीं उत्कृष्ट रीतीनें केलें आहे :

" जया आपणपें सांडूनि कांहीं । इंद्रियग्रामावरी येणेंचि नाहीं । तो विषय न सेवी हें कांहीं । विचित्र येथें ।। सहजे स्वसुखाचेंनि आधारें । सुरवाडलेनि अंतरें । रचिला म्हणऊनि बाहेरे । पाऊल न घाली ।। सांगें कुमुददळाचेनि ताटें । जो जेविला चंद्रकिरणें चोखटे । तो चकोर काय वाळुवंटें । चुंबीतु असे ।। तैसें आत्मसुख उपाइलें । जयासि आपणपेंचि फावलें । तया विषय सहज सांडवले । म्हणों काई ।। ( ५·१०५-८ )

उच्चतम सुख मिळालें म्हणजे इतर सर्व सुखांचा कंटाळा येतो, त्यांचा मोह होणेंच अशक्य होतें. मग त्यांचा त्याग सहजच घडून येतो यांत आश्चर्य तें काय ?

## नैष्कर्म्य–निस्त्रैगुण्य

स्थितप्रज्ञता हा नैतिक उन्नतीचा उच्चतम बिंदु आहे. त्याचप्रमाणें नैष्कर्म्य व निस्त्रैगुण्य हे दोन गीतेंत प्रतिपादिलेले अत्युच्च नैतिक बिंदु आहेत. म्हणून त्यांचा व आत्मानंदाचा संबंध कशा प्रकारचा आहे, हेंहि पाहणें उपयुक्त होईल. या सर्व विवेचनावरून भक्ति, साक्षात्कार, त्याचा आनंद व नीति यांचा परस्परसंबंध समजून येईल. नैकर्म्य हेंहि आत्मानंदांतून प्रकट होतें. तो आत्मानंदाचा परिणाम आहे, असें ज्ञानेश्वरांनीं निःसंदिग्धपणें सांगितलें आहे :

"जो अंतरीं दृढु । आत्मस्वरूपीं गूढु । बाह्य तरी रूढु । लौकिका ऐसा ॥ (३.६८) देखें असतेनि देहधर्में । तेथ तोचि एकु न लिंपे कर्में । जो अखंडित रमे । आपणपेंचि ॥ जे तो आत्मबोधें तोषला । तरी कृतकार्य झाला । म्हणिजे सहजें सांडवला । कर्मसंगु ॥ (३.१४६-४७). जो शरीरीं उदासु । फळभोगीं निराशु । नित्यता उल्हासु । होऊनि असे ॥ जो संतोषाचा गाभारा । आत्मबोधाचिया वोगरा । पुरें न म्हणे धनुर्धरा । आरोगितां ॥ कैसी अधिकाधिक आवडी । घेत महासुखाची गोडी । सांडोनि आशाकुरोंडी । अहंभावेसी ॥ (४.१०६-८). हें असों विश्व पाही । जया आपणपेंवाचूनि नाहीं । आतां कवण तें कर्म काइ । बाधी तयाते ॥" (४.११२).

अंतरीं आत्मसुख भरून राहिलें म्हणजे मनुष्य गुणातीत होतो, असें निस्त्रैगुण्यासंबंधीहि विवेचन केलेलें आहे :

"तूं गुणत्रयातें अव्हेरी । मी माझें न करी । एक आत्मसुख अंतरीं । न विसंब झणीं ॥" (२.२५९)

## आत्मानंदाचें स्वरूप

आत्मानंदाची प्राप्ति झाली म्हणजे स्थितप्रज्ञता, नैष्कर्म्य आणि निस्त्रैगुण्य अंगीं येतात, हें वर पाहिलें. आतां या आत्मानंदाचें स्वरूप काय हें

गुरुदेव रानडे यांच्या विचारांचा मागोवा घेत स्पष्ट करावयाचें आहे. आपल्या गीताग्रंथाच्या १७ व्या प्रकरणांत त्यांनीं योगाचें फल म्हणून प्राप्त होणाऱ्या या सुखाचीं तीन लक्षणें सांगितलीं आहेत. (भगवद्गीता : साक्षात्कारदर्शन, पृ. २०८-२०९). गुरुदेवांनीं आपले विचार सूत्रमय भाषेंत सांगितलें आहेत. त्यांची येथें विस्तारानें चर्चा करणें अवश्य आहे. आत्मसुखाचीं तीन लक्षणें अशीं:—

(१) "सुखेन ब्रह्मसंस्पर्शं अत्यन्तं सुखमश्नुते ॥ (गी. ६.२८.)

ईश्वराचा स्पर्श, ईश्वराशीं संबंध हें पहिलें लक्षण पातंजलयोगांत "प्रातिभश्रावणवेदनादर्शास्वादवार्ता जायन्ते ॥ असे पांच प्रकारचे अतींद्रिय अनुभव वर्णिले आहेत. श्रवण, स्पर्श, दर्शन, आस्वाद व गंध हे अनुभव वस्तुतः अतींद्रिय असून ते ईश्वराचे आविष्कार आहेत; ते ब्रह्मसंस्पर्शानें येणारे आहेत व त्या अनुभवांपासून होणारें सुख तें आत्मसुख. या सुखाविषयीं ज्ञानेश्वर लिहितात :

"ते सुखाचेनि सांगातें । आले परब्रह्मा आंतौते । तेथ लवण जैसें जळातें । सांडूं नेणें ॥ तैसें होय तियें मेळीं । मग सामरस्याचिया राउळीं । महासुखाची दिवाळी । जगेंसीं दिसे ॥" (६.३८८-८९).

येथें मीठ व पाणी या सुंदर दृष्टान्तानें, जीवाला ब्रह्माचा स्पर्श, त्यापासून आनंद, आनंदयुक्त होऊन ब्रह्मांत वाढता प्रवेश व शेवटीं ब्रह्माशीं ऐक्य या सर्व पायऱ्या अगदीं स्पष्टपणें दाखविल्या आहेत :

( २ ) जीवाचें व ब्रह्माचें, भक्ताचें व देवाचें ऐक्य हें आत्मानंदाचें दुसरें लक्षण. त्या आनंदानें भक्त ईश्वरस्वरूपांत मिळून जातो :

"योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव यः ।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥" (गी. ५. २४)

अंत उच्चतम आनंद भोगल्यावर व ब्रह्माशीं एकरूप झाल्यावर, असा योगी निर्वाणाला, परमानंदाच्या अवस्थेला पोहोंचतो.

( ३ ) आनंदमय अवस्था म्हणजेच ब्रह्म. आनंदमय अवस्था व ब्रह्म हीं एकच आहेत, एकरूप आहेत; हें आत्मानंदाचें तिसरें लक्षण :

"प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।
उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥" (गी. ६. २७)

देहलीदीपन्यानें, ‘ब्रह्मभूतं’ हें पद ‘योगिनं’ व ‘सुखं’ या दोहींनाहि गुरुदेव रानडे यांनीं लाविलें आहे. सुखच ब्रह्म आहे असा ‘ब्रह्मभूतं सुखं’ याचा अर्थ होतो. आंत ब्रह्मानंद भोगणें म्हणजेच ब्रह्म होणें. योगी असा ब्रह्मानंद भोगतो व म्हणून तो ब्रह्म होतो. ‘आनंदं ब्रह्म’ हा सिद्धान्त वेदशास्त्राला मान्य आहेच. तेव्हां, योगी ज्या सुखाचा उपभोग घेतो तें सुख म्हणजेच ब्रह्म, ही चमत्कृतिपूर्ण कल्पना तात्त्विक सिद्धान्ताच्याहि आड येत नाहीं. आत्मानंदाच्या दुसऱ्या व तिसऱ्या लक्षणावरील ज्ञानेश्वरींतील भाष्य अत्यंत चिंतनीय आहे :

“भोगीं अवस्था एक उठी। जे अहंकाराचा अंचळ लोटी। मग सुखेंसी घे आटी। गाढेपणें ॥ तिये आलिंगनमेळीं। होय आपेआप कवळी।...ऐसी द्वैताची भाष जाय। मग म्हणों जरि एकचि होय। तरी तेथ साक्षी कवण आहे। जाणते जे ॥ जे ऐसेनि सुखें मातले। आपण-पांचि आपण गुंतले। ते मी जाणें निखळ वोतले। सामरस्याचे ॥” (५.१३२-३७).

वाढता ब्रह्मसंस्पर्श-आनंद भोगीत असतां, अशी एक अवस्था येते, कीं त्या वेळीं उत्कट आनंदांत चित्त विरून जातें, ‘मी हा आनंद भोगीत आहें’ हें स्मरण, हें वृत्तिज्ञान नाहींसें होतें व साधक त्या आनंदांत समरस होतो, विलीन होतो, अशी आनंदांत विरून ईश्वराशीं एकरूप होण्याची प्रक्रिया वरील ओव्यांत दिसून येतें. ‘अहं ब्रह्मास्मि’ ही ब्रह्मांत मिळून जाण्याची अवस्था येण्याला ब्रह्मसंस्पर्श-आनंदांत विरून जाणें, हा एकमेव मार्ग आहे. सोनें तेजाबाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि रसायनांत विरत नाहीं, त्याप्रमाणें जीवभाव ब्रह्मस्पर्श-आनंदाशिवाय दुसऱ्या कशांतहि विलीन होऊं शकत नाहीं.

एवं पार्था जें निज। स्वरूप माझें ॥...जें आनंदाचें केवळ। चैतन्य गा ॥ तें अनिर्वाच्य महासुख। पै आपणचि जाहले ते पुरुष। जयांचें का निष्कर्ष। प्रातीवेरी ॥ (६.२२, २३, २५)

वरील ओव्यांवरून, आत्मानंदच ब्रह्म आणि तें भोगीत असतां तें उत्कटतेला पोहोंचल्यावर योगी त्यांत लीन होतो, म्हणजेच ब्रह्मरूप होतो, हाच सिद्धान्त ज्ञानेश्वरांनींहि प्रतिपादिलेला दिसतो.

# ज्ञानेश्वरकृत आरती

ज्ञानेश्वरांच्या एका आरतींत आत्मानंदाचें तेज, नाद इत्यादि प्रकार, त्यामुळें होणारा आनंद व त्यांत बुडी दिल्यानें देहभावाचा लोप इत्यादि सर्व अनुभवांचें एकत्र वर्णन सांपडतें. ते म्हणतात : “ भाग्यानें सद्गुरूंची भेट झाली; त्यांनीं दाखविलेल्या मार्गानें गेल्यावर त्रिकुटावर पंढरी पाहिली. तेथील देवळांत जातांच देहभाव मावळून मन उन्मन झालें, इच्छा नष्ट झाल्या. निजरूपाचें दर्शन झाल्यानें शब्द कुंठित झाला. अविनाशी ज्योतीचें दर्शन घेतांना डोळ्याच्यीं पातीं अनिमिषपणें निश्चल राहिलीं; त्या अवस्थेंत दिवस व रात्र यांतलि भेदच कळेना; कारण अखंड प्रकाश दिसूं लागला. अशी विठ्ठलाची आरती अंतःकरणांत उजळल्यावर जो प्रकाश झाला, त्यांत चंद्र-सूर्यहि लोपून गेले, अनाहताच्या दिव्य वाद्यांचा गजर सतत दुमदुमून गेला. मीं आनंदसागरांत बुडी दिली; त्या आनंदाचें शब्दांनीं वर्णन करणेंच शक्य नाहीं. या आनंदांत वृत्तीचा लय झाला. सद्गुरूंच्या बरोबर अशी आरती मीं केली. ”

“ फळलें भाग्य माझें धन्य झालों संसारीं । सद्गुरु भेटले हो, त्यांनीं धरियेलें करीं । पश्चिमें चालवीलें आत्मा तेथें निर्धारी । त्रिकुटावरी नांदे, देखियेली पंढरी ॥१॥ तें सुख काय सांगों, वाचे बोलतां नये। आरती-च्येनि योगें गेलें मीपण माये ॥ ध्रु०॥ राउळामाजीं जातां राहे देह-अवस्था। मन हें उन्मन झालें, नसे बद्धतेची वार्ता । हेतु हा मावळला शब्दा आली निःशब्दता । तटस्थ होउनि ठेले, निजरूप पाहतां ॥२॥ त्रिगुण गुण, बाई, पूर्ण उजळल्या वाती । नवलाव, अविनाश न जाये स्वयंज्योति । लावितां लक्ष तेथें हालूं विसरलीं पातीं । नातुडे मन माझें, न कळे दिवस-राती ॥३॥ आरती विठ्ठलाची पूर्ण उजळली अंतरीं । प्रकाश थोर झाला सांठवेना अंबरीं । रविशशी मावळले तया तेजा माझारीं । वाजती दिव्य वाद्यें अनुहत गजरीं ॥४॥ आनंदसागरांत प्रेमें बुडी दिधली । लाधलें सौख्य मोठें नये बोलतां बोलीं । सद्गुरूचेनि संगें ऐसी आरती केली । निवृत्ति आनंदांत तेथें वृत्ति निमाली ॥५॥

## आनंदवाद

याप्रमाणें, परमार्थांत आत्मदर्शनाचा किंवा ब्रह्मस्पर्शाचा आनंद हा अत्यंत महत्त्वाचा अनुभव आहे. 'हिंदी संतांचा ईश्वर-प्राप्तीचा मार्ग' या आपल्या ग्रंथांत गुरुदेव रानडे लिहितात, "उघड्या डोळ्यांनीं देवाला पहा, त्याला ओळख आणि आनंदानें हसत राहा; कबीरांच्या मतें, सहज-समाधीचा उपभोग म्हणजे ही अवस्था. पुढें कबीर सांगतात, कीं अनाहत नादाच्या प्रभावानें, या नादाच्या आध्यात्मिक अनुभवानें, सर्व मलिन वासना नष्ट झाल्याच पाहिजेत : "खुले नैन पहिचानौं हँसि हँसि । सुंदर रूप निहारौ ॥ सबद निरंतरसे मन लागा । मलिन वासना त्यागी ॥" या अवस्थेंत "सुखदु:खसे कोइ परे परम पद । तेहि पद रहा समाई ॥' साधक सुखदु:खातीत अशा परम पदाला जाऊन पोहोंचतो आणि ईश्वराशीं एकरूप होऊन राहतो" (पृ. २४४). त्याच ग्रंथांत, "आनन्द नहाया, बंदा खुदा दोनो विसराया । बे नाम का नाम होकर रहटाना राहा ॥" या चरणाचें स्पष्टीकरण करतांना गुरुदेव रानडे म्हणतात : "आत्मानुभवाच्या आनंदानें देव व भक्त हा भेद नाहींसा होतो, त्यांमध्यें ऐक्य होतें, दोन नांवांचें एक नांव होतें आणि जन्म-मरणाचें चक्र थांबतें." (पृ. २४९). आत्मानुभवाच्या आनंदानें आध्यात्मिक व नैतिक असे दोन परिणाम होतात. त्याचा आध्यात्मिक परिणाम म्हणजे जीवब्रह्मैक्य, सायुज्यमुक्ति; नैतिक परिणाम म्हणजे स्थितप्रज्ञता, नैष्कर्म्य, निस्त्रैगुण्य. पारमार्थिक जीवनांत आत्मानंदाला असें अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे. यामुळेंच गुरुदेव रानडे यांच्या तत्त्वज्ञानाला 'बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद' या नांवाबरोबरच 'आनंदवाद' असें पर्याय नांव कांहीं लेखकांनीं दिलें आहे. आपल्या उपनिषद्–रहस्याच्या प्रस्तावनेंत, उपनिषदांतील तत्त्वज्ञान निराशावादी आहे या पाश्चात्य टीकाकारांच्या विधानाला उत्तर देतांना, ते लिहितात, "टागोरांचें आनंदाचें तत्त्वज्ञान हीं उपनिषदांत दिसून येणाऱ्या आनंदमय जीवनाच्या महासागरावरील अत्युच्च लाट आहे. प्रस्तुत ग्रंथांत जर एखादें नैतिक तत्त्व सांगितलें असेल, तर साक्षात्कारी पुरुषाला आत्मदर्शनाचें आनंदमय जीवन लाभतें, आत्मदर्शनानें त्याचें सर्व जीवनच आनंदमय होतें, हें तें तत्त्व होय" (उ. र., प्र. १२).

## ब्राह्मी स्थिति

या आनंदमय अवस्थेला गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील शेवटच्या श्लोकांत ब्राह्मी स्थिति या नांवानें संबोधून, ही अवस्था प्राप्त झाल्यावर पुन्हां मनुष्याला कधींहि मोह होत नाहीं, या अवस्थेंत स्थित झाल्यावर अंतकाळींहि तो ब्रह्मानंदाला पोहोंचतो, असें त्या अवस्थेचें वर्णन केलें आहे. ही अवस्था म्हणजे जीवन्मुक्तिच होय. मृत्युसमयींचें दुःख देखील अशा जीवन्मुक्ताच्या परमानंदांत खंड पाडूं शकत नाहीं, हें या अवस्थेचें वैशिष्ट्य ज्ञानेश्वरांनीं सांगितलें आहे. जीवन्मुक्तीमध्यें विदेह मुक्ति—अंतकालीं मुक्ति—सामावलेली आहे आणि जीवन्मुक्तच अंतकालीं मुक्त होतो, असा हा सिद्धान्त आहे. 'जीवन्मुक्ति म्हणजेच मुक्ति' असें एक थोर सत्पुरुष नेहमीं सांगत असत. उपान्त्य श्लोकावरील भाष्यांत आत्मबोध व आत्मानंद हीं जीवन्मुक्ताचीं लक्षणें होत व तो विश्व होऊन विश्वांत फिरतो, त्याच्या ठिकाणीं सर्वात्मभाव उत्पन्न होतो, असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे :

" ऐसा आत्मबोधें तोषला । जो परमानंदें पोखला । तोचि स्थितप्रज्ञु भला । वोळख तूं ॥ तो अहंकारातें दंडुनी । सकळ काम सांडुनी । विचरे विश्व होऊनि । विश्वाचि माजीं ॥" (२·३६६–६७).

असा पुरुष जीवन्मुक्त होय. त्याच्या जीवन्मुक्त अवस्थेचें वर्णन करतांना ज्ञानेश्वर सांगतात,

" हे ब्रह्मस्थिति निःसीम । जे अनुभवितां निष्काम । पातले परब्रह्म । अनायासें ॥ जे चिद्रूपीं मिळतां । देहांतींची व्याकुळता । आड ठाकों न शके चित्ता । प्राज्ञा जया ॥" २·३६८–६९. अशा रीतीनें स्थितप्रज्ञ–लक्षणांच्या सुरुवातीला व शेवटीं आत्मानंद—आत्मानुभवाचा आनंद—हेंच स्थितप्रज्ञतेचें मुख्य लक्षण सांगितलें आहे. आध्यात्मिक पूर्णतेंत नैतिक पूर्णता सामावलेली आहे, आध्यात्मिक पूर्णतेंतून नैतिक पूर्णता प्रकट होते हा ज्ञानेश्वरांचा सिद्धान्त आहे.

## परमार्थ-साधन व नैतिक विकास

वर सांगितलेला सिद्धान्त केवळ तत्त्वज्ञानाच्या वैचारिक दृष्टीनें महत्त्वाचा आहे असें नसून, त्याला व्यावहारिक दृष्टीनेंहि अत्यंत महत्त्व आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २६३११

या लेखाच्या सुरुवातीला सांगितल्याप्रमाणें स्थितप्रज्ञतेचीं लक्षणें अंगीं आणण्याचा मार्ग कोणता हा मुख्य व्यावहारिक प्रश्न आहे आणि त्यासाठींच स्थितप्रज्ञतेविषयीं गीतेंत आलेल्या विचारांचें महत्त्व आहे. त्या अवस्थेचें नुसतें तात्त्विक विवरण काय उपयोगाचें ? व्यक्ति व समाज यांत नीतीची वाढ झाली तरच मानव सुखी होईल, हें सर्वांना मान्य आहे. नीतीची वाढ व्हावी यासाठीं अनेक प्रकारचे प्रयत्नहि होत आहेत. ज्ञानेश्वरींत त्या दृष्टीनें काय मार्गदर्शन सांपडतें हें पाहावयाचें आहे. पूर्ण साक्षात्कार व त्याचा परमानंद यांतून स्थितप्रज्ञतेचा, नैतिक पूर्णतेचा जन्म होतो या सिद्धान्तावरून एक उपसिद्धांत सहजच सुचतो. साक्षात्काराची क्रमाक्रमानें वाढ होत जाते, त्याबरोबर दुर्गुण कमी होऊन सद्‌गुण वाढूं लागतात. नैतिक प्रगति होऊं लागते. साक्षात्कार व आनंद या दोन अगदीं भिन्न गोष्टी नसून, एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू आहेत. साक्षात्काराच्या प्रमाणांत आनंद असतोच. तेव्हां, साक्षात्काराच्या प्रमाणांत नैतिक प्रगति होते असें म्हटलें म्हणजे त्यांत ती आनंदामुळें होते हा विचार अंतर्भूत आहेच. साक्षात्कार व आनंद हे दोन्ही शब्द पुनः पुनः योजण्याचें कारण नाहीं. ईशचिंतनाचा थोडा थोडा अभ्यास रोज केला तर देवाच्या सुखाची गोडी लागून, त्या प्रमाणांत चित्त विषयाबाहेर निघेल आणि असें होतां होतां तें पूर्णपणें विषयांतून दूर होऊन माझ्यांत मिसळून जाईल, असें श्रीकृष्णांनीं अर्जुनाला निश्चित आश्वासन दिलें आहे. त्यांत आनंदानें होणाऱ्या नैतिक विकासाची हीच प्रक्रिया दिसून येते :

"मग जें जें कां निमिख। देखेल माझें सुख। तेतुलें अरोचक। विषयीं घेईल ॥...तैसें भोगाआंतूनि निघतां। चित्त मजमाजीं रिगतां। हळुं हळुं पांडुसुता। मीचि होसील ॥" ज्ञा. १२-१०६-१०९.

क्रमशः देहात्मभावाचा, जीवभावाचा त्याग आणि ब्रह्मात्मभावाचा स्वीकार हाच परमार्थसाधनाचा गाभा आहे आणि यांतच नैतिक विकास अंतर्भूत आहे. गीता अ. २ श्लो. ६२-६३ मध्यें विषयांचें ध्यान, विषयसंग, काम, क्रोध, संमोह, स्मृतिभ्रंश, बुद्धिनाश हे क्रमानें एकापासून दुसरा असे निर्माण होऊन, शेवटीं बुद्धिनाशानें पूर्ण विनाश होतो, अशी विषयध्यानापासून विनाशाला पोहोंचविणारी अनर्थपरंपरा सांगितली आहे. या सांखळीचा

अगदीं पहिला दुवा शोधूं लागलें तर तो देहात्मभाव—मी देह आहें ही भावना—हा होय असें दिसून येईल. मी देह आहें; म्हणून देहाच्या सुखासाठीं विषयांचें ध्यान. म्हणून देहात्मवाद हा पहिला दुवा तोडला, म्हणजे मनुष्य या दुष्ट सांखळींतून मुक्त होईल. ब्रह्मात्मभाव—मी ब्रह्म आहें हा अनुभव—प्राप्त झाल्यावांचून दुवा तुटत नाहीं असा परमार्थ-साधनाचा व नैतिक विकासाचा अत्यंत निकट संबंध आहे.

## कांहीं सद्‌गुणांच्या व्याख्या

ज्ञानेश्वरींत आलेल्या कांहीं सद्‌गुणांच्या व्याख्या या दृष्टीनें चिंतनीय आहेत. तप, सत्त्वशुद्धि, शांति, तेज व अद्रोह या दैवी-संपत्तीच्या गुणांवर भाष्य करतांना ज्ञानेश्वर म्हणतात :

**तप** : स्वरूपाच्या, साक्षात्काराच्या, वाढीसाठीं प्राण, इंद्रियें व शरीर यांचा संकोच करणें याचें नाव तप, हें ज्यामुळें घडेल तें सर्व तप होय. “ तैसा स्वरूपाचिया प्रसरा—। लागीं प्राणेंद्रियशरीरा। आटणी करणें जे वीरा। या नांव तप ॥ ” १६·१०८

**सत्त्वशुद्धि** : सत्यस्वरूप आनंददायक वाटल्यामुळें बुद्धि त्याच्याशीं अनन्य होते, स्वरूपाला सोडून विषयाकडे जात नाहीं; असें होणें म्हणजेच सत्त्वशुद्धि : “तेवि सत्स्वरूप रुचलेपणें। बुद्धि जे ऐसें अनन्य होणें। ते सत्त्वशुद्धि म्हणे। केशिहंता ॥” १६·८०

**शांति** : त्रिपुटीचा लय म्हणजे शांति, ‘ सर्वं खलु इदं ब्रह्म ’ हा अनुभव म्हणजे शांति. “तरी गिळोनि ज्ञेयातें। ज्ञाता-ज्ञानहि मावौतें। हारपें निरुतें। ते शांति पै गा ॥” १६·१३७

**तेज** : विधिनिषेध व ऋद्धिसिद्धि यांची चाड न धरतां, धैर्यानें अंतःकरण सदा ईश्वराकडे ओढलें जाणें याचें नांव तेज. “ न ठाके निषेध आड। न पडे विधीची भीड। नुपजे जीवीं कोड। महासिद्धीचें ॥ ऐसें ईश्वराकडे निज। धांवें आपैसया सहज। तया नांव तेज। आध्यात्मिक तें ॥” १६·१८८-८९.

**अद्रोह** : दुसऱ्यांचें सुख वाढवीत वाढवीत आपल्या पारमार्थिक ध्येयाकडे जाणें म्हणजे अद्रोह. “कां फेडीत पापताप। पोखीत तीरींचे

पादप । समुद्रा जाय आप । गंगेचें जैसें ॥...तैसीं बांधिलीं सोडीत । बुडालीं काढीत । साकडीं फेडीत । आर्तांचिया ॥ किंबहुना दिवसराती । पुढिलांचें सुख उन्नती । आणित आणित स्वार्थीं । प्रवेशिजे ॥"

१६·१९९-२०२.

या सर्व व्याख्यांत परमार्थ, ईश्वराची भक्ति व सद्‌गुणसंपादन यांचा परस्पर संबंध स्पष्ट दिसतो. परमार्थाचें साधन म्हणून सद्‌गुण संपादावयाचे आहेत. आपल्या 'उपनिषद्-रहस्यां' त गुरुदेव रानडे यांनीं म्हटल्याप्रमाणें, केवळ सद्‌गुणासाठीं प्रयत्न करणारा पुरुष उपनिषदांत दाखविलेला नाहीं. तेथें नीति ईश्वराधिष्ठित, ईश्वरसापेक्ष आहे, निधर्मी नाहीं; त्याचप्रमाणें, परमार्थाशीं हातमिळवणी केल्यावांचून नीतीला पूर्णताहि येऊं शकत नाहीं. ज्ञानेश्वरांचे शिष्य विसोबा खेचर यांनीं नामदेवांना उपदेश केला त्या वेळीं खरें सुख म्हणजे काय हें विस्तृतपणें त्यांना समजावून सांगितलें. ते विचार नामदेवांनीं एका अभंगांत ग्रथित केले आहेत. गीतेंत अमानित्वादि सद्‌गुण ज्ञानाचीं लक्षणें म्हणून वर्णिले आहेत, त्याचप्रमाणें विसोबांनीं क्षमा-दया-शांति हीं आत्मसुखाचीं लक्षणें सांगितलीं आहेत :

"सुख ते शांति, सुख ते क्षमा दया । सुख ते उपदेश मी निर्विकारी॥ सुख तें नैराश्य, सुख तें हरिदास्य । सुख ते विश्वास सदा वसे ॥ सुख ते सत्संगति, सुख ते नामीं प्रीती । सुख ते विकृति विषयभोगीं ॥ सुख तें एकान्तवास, सुख ते लौकिकत्रास । सुख तें सौरस स्वस्वरूपीं ॥

## परमार्थसाधनांतच सद्‌गुणसंवर्धनाची प्रक्रिया

आध्यात्मिक व नैतिक विकास परस्परोपकारितेच्या पद्धतीनें होतो. आत्मानुभूतीच्या आनंदामुळें मन विषयांतून बाहेर निघतें व सद्‌गुण वाढतात, पूर्ण साक्षात्कारानंतर स्थितप्रज्ञतेचीं लक्षणें प्रकट होतात, असा आध्यात्मिक विकास, आत्मानंद व नैतिक प्रगति यांचा संबंध आहे, हें वर पाहिलें. आत्मानुभूति व आत्मानंद एकरूप आहेत, एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, हें विवेचनहि झालें. आतां, ध्यानादि आध्यात्मिक साधनांचा व दुर्गुण–त्यागाचा आणि सद्‌गुण–संपादनाचा काय संबंध आहे, याची चर्चा करावयाची आहे. चित्त शुद्ध झालें म्हणजे ईश्वरदर्शन होतें, असें सांगितलें

जातें. पण तें अंशतःच खरें आहे. शम–दम, व्रत–वैकल्यें, तप इत्यादि साधनांनीं चित्त शुद्ध केलें, तरी ईश्वरदर्शन होणार नाहीं, पूर्ण चित्तशुद्धिहि होणार नाहीं. गीतेंत म्हटल्याप्रमाणें, अनन्यभक्तीवांचून ईश्वराचें ज्ञान व दर्शन होणें शक्य नाहीं :

" भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥" ११.५४

भक्तियुक्त ध्यान, चिंतन हेंच परमेश्वराच्या साक्षात्काराचें एकमेव साधन आहे आणि साक्षात्कारानंतरच विषयांचा रस नष्ट होईल, पूर्ण चित्तशुद्धि होईल. पराचें–परमेश्वराचें–दर्शन झाल्याशिवाय विषयांचा रस जाणार नाहीं; कांहीं प्रमाणांत विषयनिवृत्ति होईल, पण ती पूर्ण निवृत्ति नव्हे.

" विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं, रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥" २.५९

ध्यान—अनन्य भक्तियुक्त एकाग्रतेनें ध्यान—हें ईश्वरसाक्षात्काराचें स्वतंत्र साधन आहे; शम–दम–तप यांनीं होणारी चित्तशुद्धि ध्यानाला उपकारक आहे, इतकेंच. ध्यानाचें कार्य शम–दम–तप करूं शकत नाहींत. चित्तशुद्धि म्हणजे शेताची निगा, साफसफाई होय. तेवढ्यानें पीक येणार नाहीं. साक्षात्कारी सद्गुरूंच्या कृपेनें मिळालेलें नामबीज त्या शेतांत पेरून, त्याला स्मरणाचें, ध्यानाचें पाणी दिलें पाहिजे, तेव्हांच साक्षात्काराचें पीक येईल. याप्रमाणें ध्यान हें साक्षात्काराचें स्वतंत्र साधन आहे. त्याचा व नैतिक विकासाचा संबंध ज्ञानेश्वरींतील विचारांच्या अनुरोधानें शोधावयाचा आहे.

गीता अ. १८ श्लोक ५२–५३ यांवरील भाष्यांत ज्ञानेश्वरांनीं राजयोगतुरंगावर आरूढ होऊन मोक्षश्रियेला वरण्यासाठीं निघालेल्या योगी-वीराचें अत्यंत उदात्त व उद्बोधक वर्णन केलें आहे. त्यांत संपूर्ण साधनमार्गाचें दर्शन घडतें. मानसशास्त्र, नीतिशास्त्र व साक्षात्कारशास्त्र या सर्वच दृष्टींनीं तें अत्यंत चिंतनीय आहे. वीराचें रूपक दृष्टीआड करून,

मानसशास्त्राच्या दृष्टीनें त्याचा खोल विचार केला पाहिजे. योगी अंगांत वैराग्याचें चिलखत घालून राजयोग–तुरंगावर आरूढ होतो; म्हणजे, कांहीं प्रमाणांत वैराग्य प्राप्त करून घेऊन ध्यानाच्या साधनाला सुरुवात करतो. थोडेंफार वैराग्य, मनाचा व इंद्रियांचा संयम नसेल, मन–इंद्रियें अखंड विषयांत रंगलेलीं असतील, तर ध्यानाचा प्रयत्न देखील करतां येणार नाहीं यासाठीं साधनाच्या सुरुवातीपासूनच संयमाची आवश्यकता आहे. प्रत्यक्ष साधन म्हणजे विवेकाच्या मुठींत ध्यानाचें खड्ग घट्ट धरून त्यांनें षड्रिपूंचा—सर्व कल्पनांचा—निःपात करणें, हाच साधनांतील अत्यंत महत्त्वाचा भाग होय. मनांत एक परमेश्वरच सांठवून ठेवणें, दुसरा विचारहि न येणें, याचें नांव उत्कृष्ट ध्यान. विवेक जागृत असल्या-वांचून असें एकाग्रतेनें ध्यान होऊं शकत नाहीं. एक ईश्वरच सत्य, शाश्वत, आनंदस्वरूप, निश्चल; इतर सर्व कांहीं असत्य, अशाश्वत, दुःखरूप, चंचल. म्हणून ईश्वरप्राप्ति हेंच जीवनसाफल्य, हें विवेकाचें सामान्य स्वरूप. असा विवेक जागृत असला म्हणजे ध्यान चांगलें होतें. एकाग्र ध्यानाला भक्तिप्रेमाची अत्यंत आवश्यकता आहे. भक्तिप्रेम, त्याचा आनंद, हीं असलीं म्हणजे ध्यान सहजच एकाग्रतेनें होतें. मातेला आपल्या एकुलत्या एका मुलाचें ध्यान प्रयत्नाविना एकाग्रतेनें करतां येतें. प्रेम असलें म्हणजे प्रेमविषयाशिवाय दुसरे विचार मनांत येतच नाहींत. एका दोह्यांत म्हटल्याप्रमाणें प्रियाची प्रतिमा नयनांत दृढ झाल्यावर इतर प्रतिमांना तेथें जागा कशी मिळणार ?

> “ प्रीतम छबि नैनन बसी, पर छबि कहाँ समाय ।
> भरी सराय रहीम लखि, पथिक आय और जाय ॥”

याप्रमाणें भक्तिभावयुक्त ध्यानानें अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध, व परिग्रह हे मुख्य शत्रुच मारले जातात असें नव्हे; तर देहभावाच्या सर्व कल्पनाच नष्ट होतात. यापेक्षां उच्चतर नैतिक उन्नति ती कोणती ? ध्यानाच्या आध्यात्मिक साधनांतच नैतिक उन्नतीची प्रक्रिया उत्तम प्रकारें घडत असते साधनांतहि अध्यात्म व नीति यांचा संगम आहे. ध्वनिमुद्रितें घेण्याच्या ‘ टेप रेकॉर्डर ’ या यंत्रांत अशी योजना असते, कीं नवें

गाणें त्यावर घेतांना जुनें आपोआप पुसलें जातें व नवें तेथें उमटतें. तसेंच ध्यानाचें आहे. देहभावाचे—विषयांचे—संस्कार पुसणें व ईश्वराचे स्थापणें, या दोन्ही क्रिया ध्यानानें एकदम होतात. त्यामुळें, अहंकारादि वैरी कितीहि प्रबल असले तरी ध्यानापुढें टिकत नाहींत, ध्यानानें त्यांचा नाश होतोच. इतकें ध्यान-साधन प्रभावी आहे.

" ऐसीं वैराग्याची अंगी । बाणूनिया वज्रांगी । राजयोग–तुरंगीं । आरूढला ॥ वरी आड पडले दिठी । सानेथोरहि निवटी । ते बळीं विवेकमुठी । ध्यानाचें खड्ग ॥...तेथ आडवावया आले । दोषवैरी जे घोपटिले ।...तो ( बल ) विषयविषाचा अथावो । आघविया दोषांचा रावो । परी ध्यानखड्गाचा घावो । साहेल कैचा ॥ "

ज्ञा. १८·१०४७,४८,५४

असे सर्व दुर्गुण नष्ट झाल्यावर त्यांच्या विरोधी अमानित्व, अदंभित्व इत्यादि अ. १३ मध्यें ज्ञानाचीं लक्षणें म्हणून सांगितलेले सद्गुण प्रकट होऊं लागतात. दुर्गुणत्याग व सद्गुणसंपादन हे एकाच क्रियेचे भाग आहेत. अहिंसा म्हणजे भूतदया असें म. गांधी म्हणत. अहंकार, बल, दर्प हे नष्ट झाले म्हणजे तेथें अमानित्व, शांति, नम्रता, भूतदया हे सद्गुण दिसूं लागतात. या सद्गुणांचा साक्षात्काराला उपयोग होतो आणि साक्षात्कार झाल्यावर ते सहजतेनें, साधूचा स्वभाव म्हणून, त्याच्या ठिकाणीं वसतात. सद्गुणांच्या अपूर्ण अवस्थेंत ते परमार्थप्राप्तीचें साधन, पूर्णावस्थेंत साक्षात्काराचे परिणाम, हें एका सुंदर दृष्टान्तानें ज्ञानेश्वरांनीं दाखविलें आहे. अमानित्वादि राजे येऊन योग्याला सत्यज्ञानाचें राज्य अर्पण करतात व मग आपण त्याचे मांडलिक होऊन राहतात.

" भवविजयाचा उत्साहो । भोगीतसे तो ॥ तेथ अमानित्वादि आघवे । ज्ञानगुणांचे जे मेळावे । ते कैवल्यदेशींचे आघवे । रावो जैसे आले ॥ तेव्हां सम्यक्ज्ञानाचिया । राणिवा उगाणूनि तया । परिवारु होऊनिया । राहत आंगें ॥ " ज्ञा. १८·१०६७–६८

शेवटीं, सर्व शत्रु मारल्यावर या साधनानें विश्वात्मभाव प्राप्त होतो. ' मीच ब्रह्म, विश्वहि ब्रह्म ' असा अनुभव आल्यावर ' मीच विश्व ' हा विश्वात्मभावाचा अनुभव क्रमप्राप्त आहे.

" ऐसा जिंतालिया रिपुवर्ग । आपु मानालिया जग । आपैसा योगतुरंग । स्थिर जाला ॥ " ज्ञा. १८.१०७६.

## ईश्वरोन्मुखता व बंधुभाव

विश्वबंधुत्व, एक मानवता, हें ध्येय आज जोरानें प्रतिपादिलें जात आहे. सुखसाधनांच्या पर्वतप्राय राशी तयार होत आहेत; पण मानव सुखी नाहीं. कारण परस्पराबद्दल प्रेम नाहीं, बंधुभाव नाहीं. हें विचारी पुरुषांना कळून चुकलें आहे. परंतु बंधुभाव निर्माण होण्याचा उपाय काय यासंबंधीं मात्र मुळींच एकमत नाहीं. गुरुदेव रानडे सांगत असत, कीं एक ईश्वर, एक धर्म, तरच एक मानवता. ईश्वरप्राप्ति या ध्येयाच्या भूमिकेवरच मानवता एक होऊं शकेल,इतर सर्व ध्येयें संघर्ष निर्माण करणारीं आहेत. व्यक्ति व समाज ईश्वरोन्मुख झालीं तर भक्तीच्या वाढीबरोबर सद्गुणांचा व बंधुभावाचाहि विकास होईल. वैयक्तिक व सामाजिक सद्गुणांच्या वाढीचा हा एकच शास्त्रशुद्ध उपाय आहे. परमार्थ व सद्गुण यांची ताटातूट केली तर या दोहोंचीहि हानि होईल. परमार्थमार्ग आक्रमून ईश्वरप्राप्ति करून घेणें, यांतच जीवनसाफल्य आहे. तें मिळविण्याच्या प्रक्रियेंत सद्गुणहि वाढतील व समाजाला सुखानें नांदतां येईल. ईश्वर हें उच्चतम मूल्य आहे; त्याच्या प्राप्तींत इतर सर्व मूल्यांचा अंतर्भाव आहे. सत्य, शिव आणि सुंदर या तीनहि मूल्यांचा ईश्वरप्राप्तींत समावेश आहे; तेथें तीं सर्व एकत्र व एकदमच मिळतात. यांपैकीं एकेक मूल्य वेगळें वेगळें पूर्णतः साध्य करणें अशक्य आहे, असें ज्ञानेश्वरांच्या वरील विवेचनावरून दिसतें. तेव्हां भक्ति, परमार्थ, हाच उच्चतम धर्म व त्याचा प्रसार संतांच्याकडून होऊं शकेल हें जाणून विश्वकल्याणाचें पसायदान ज्ञानेश्वरीच्या शेवटीं मागतांना ते देवाला विनवितात,

" वर्षत सकळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तया भूतां ॥...किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ " ज्ञा. १८.१७९७,९९.

अनन्य भक्तांच्या उपदेशानें, उदाहरणानें, प्रेरणेनें समाज ईश्वरोन्मुख झाला व आदिपुरुषाची भक्ति करूं लागला म्हणजे पसायदानांत मागितलेले इतर सर्व वर आपोआप प्राप्त होतील, या विश्वासानें ज्ञानेश्वरांनीं वरील दोन ओव्या लिहिल्या असाव्यात. आपणाला दुसरें काय मागावयाचें आहे ! प्रातःकालीं पूर्वाभिमुख झाल्यावर सर्वत्र आल्हाददायक तेज व प्रकाश दिसतात; त्याचप्रमाणें ईश्वरोन्मुख झाल्यावर अंतःकरणांत पावित्र्य व मांगल्य यांचा उदय होईल.

—( जीवन—विकास, मार्च १९६० )

# २. साक्षात्कारी स्त्रीसंत मुक्ताबाई

" मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पाहाट फुटे ।
सूर्यापुढें प्रगटे । प्रकाशु जैसा ॥
तैशी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां ।
बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ॥
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे ।
मग सकळशास्त्रें स्वयंभें । निघतीं मुखें ॥"

—ज्ञानेश्वरी, ६·४५२–५४

## प्रास्ताविक

ज्ञानेश्वरींतील वरील वचनें ज्ञानदेवांसंबंधीं सत्य आहेतच; परंतु त्यांच्या भावंडांना, अर्थात् मुक्ताबाईनाहि, तीं पूर्णपणें लागू पडतात. मुक्ताबाईचे फारच थोडे अभंग उपलब्ध आहेत; मला असे ७५ अभंगहि मिळाले नाहींत. तरी त्यांतील विचारांची आध्यात्मिक पातळी अत्युच्च आहे. "सर्वं खलु इदं ब्रह्म "— सर्व कांहीं ब्रह्मच आहे—या साक्षात्काराच्या शिखरावरूनच त्या बोलतांना दिसतात; अर्थात् त्या अवस्थेंतच त्या नेहमीं राहतांना दिसतात. मुमुक्षु, साधक या अवस्था मुक्ताबाईच्या इतर भावंडांत दिसत नाहींत, त्याप्रमाणें त्यांच्या स्वतःमध्येंहि दिसत नाहींत. त्यांच्या उपलब्ध झालेल्या लिखाणावरून व नामदेव आणि चांगदेव यांच्या अभंगांत त्यांच्यासंबंधीं जे उल्लेख आले आहेत त्यांच्या आधारें, मुक्ताबाईचें आध्यात्मिक जीवन, त्यांची शिकवण व त्यांचें व्यक्तिमत्त्व यासंबंधीं कांहीं विचार या लेखांत मांडावयाचे आहेत.

## मुक्ताबाईचें लौकिक चरित्र

तें अगदीच अल्प आहे, सर्वांना माहीतहि आहेच. त्यांचा जन्म शके १२०१ मध्यें आपेगांवचे विठ्ठलपंत व रखुमाई यांच्या पोटीं झाला. या कुलांत नाथपंथाची दीक्षा चालत आलेली होती. विठ्ठलपंतांचे आजोबा त्रिंबकपंत हे गोरक्षनाथांचे व त्यांचे वडील गोविंदपंत हे गहिनीनाथांचे अनुग्रहीत होते. विठ्ठलपंतांनीं काशीस जाऊन तेथील प्रसिद्ध स्वामी रामानंद यांच्याकडून संन्यासदीक्षा घेतली. परंतु, अशी दीक्षा घेण्याला त्यांच्या पत्नींची अंतःकरणपूर्वक अनुज्ञा मिळालेली नव्हती, हें रामानंद तीर्थयात्रेस निघाले असतां आळंदीस रखुमाबाई व त्यांचे वडील यांच्याकडून त्यांना समजलें. तेव्हां त्यांनीं विठ्ठलपंतांना पुनः प्रपंचांत पडण्यास सांगितलें. गुरूंच्या आज्ञेप्रमाणें ते आळंदीस येऊन प्रपंच करूं लागले; यानंतर त्यांच्या पोटीं निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई हीं लोकोत्तर अपत्यें जन्माला आलीं. संन्यासग्रहणानंतर पुन्हां संसारांत पडल्यामुळें ग्रामस्थ ब्राह्मणांकडून विठ्ठलपंत व त्यांची पत्नी यांना फार त्रास झाला; संन्याशाचीं मुलें म्हणून या दिव्य भावंडांनाहि तसाच त्रास झाला. तरी त्यांचें अद्वितीय आध्यात्मिक तेज जगांत पसरतच गेलें आणि ज्ञानेश्वरीच्या रूपानें तें दीर्घकाल तळपत राहून मानवतेला साक्षात्काराच्या दिव्य ध्येयाचा संदेश देत राहील. या भावंडांपैकीं मुक्ताबाई सर्वांत धाकट्या. निवृत्तिनाथ दहा वर्षांचे असतांनाच त्यांचे मातापिता त्यांना सोडून गेले व लोकांचा छळ सोशीत, सर्व आपत्ति सहन करीत आपल्या तीन भावंडांसह त्यांना जीवन कंठावें लागलें. त्या परिस्थितीचें अत्यंत हृदय-स्पर्शी वर्णन खालील नामदेवांच्या अभंगांत मुक्ताबाईच्या तोंडीं घातलें आहे. समाधीच्या प्रसंगीं आपलें मागील जीवन आठवून मुक्ताबाई म्हणतात :—

> तात आणि माता गेलीसे येथून । तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा ॥
> निवृत्ति ज्ञानेश्वर कोरान्नाचें अन्न । सांभाळी सोपान मजलागीं ॥

वयाच्या १० व्या वर्षापासून निवृत्तिनाथ व ज्ञानदेव आपलें व आपल्या अगदीं लहान अशा दोन भावंडांचें भिक्षान्नानें पोषण करीत होते. जगानें

उपेक्षिलेलीं व छळलेलीं, पण आपल्या आध्यात्मिक साधनेनें व तेजानें ब्रह्मांत मिळून गेलेलीं हीं अलौकिक भावंडें आज अनुक्रमें त्र्यंबकेश्वर, आळंदी, सासवड आणि मेहुण या ठिकाणीं मंदिरांत सगुण ईश्वर होऊन बसलीं आहेत. साडेसहाशें वर्षें भारतीयांचीं मस्तकें प्रेमादरानें व कृतज्ञतेनें त्यांच्या समाधीसमोर नम्र होत आहेत. ईश्वराची लीला खरोखर अगाध आहे ! मुक्ताबाईनीं वैशाख व॥ १२ शके १२१९ मध्यें मेहुण येथें समाधि घेतली.

## आध्यात्मिक जीवन

आतां मुक्ताबाईच्या आध्यात्मिक जीवनाकडे वळूं. हेंच संतांचें खरें जीवन. मुक्ताबाईनीं आपल्या अभंगांत त्याचा उल्लेख केला आहे. त्याच्या आधारें त्यांच्या परमार्थसाधनाचें दर्शन घ्यावयाचें आहे त्या सांगतात, " कोळ्याच्या गळ्याला दोरी बांधलेली दिसते; तो बध त्याच्या देहांतूनच निघालेला असतो व त्या तंतूच्या जाळ्यांत तो बद्ध होतो; तंतु त्यानें परत घेतले, कीं तो एकटाच मुक्त असा उरतो. द्वैत आहे तोंपर्यंत मनुष्य अज्ञानीच, अंधच होय. अशी मी अंध असून वायां जात होतें, ब्रह्मानंदाला मुकलें होतें; पण सद्गुरु निवृत्तींनीं मला सावध केलें व अद्वैत तत्त्व जाणण्याचा भक्तीचा मार्ग दाखविला. आमचें प्रारब्ध, संचित चांगलें, आचारहि चांगला म्हणून निवृत्ति गुरुनाथांनीं दाखविलेल्या मार्गानें आम्ही निघालों आणि आमचा आत्मा परमात्मस्वरूपीं मिळाला; संसार नाहींसा होऊन हृदयांत हरि भरून राहिला; सर्व विश्वच वैकुंठ झालें."

" ऊर्णाचिये गळां बांधियेली दोरी । पाहूं जाय घरीं तंव तंतु नाहीं ॥
तैसें झालें बाई जंव एकत्व नाहीं । दुजी जंव साई तंव हें अंध ॥
ऐसी मी वो अंध जात होतें वाया । प्रकृति सावया पावली तेथें ॥
मुक्ताई सावध करी निवृत्तिराज । हरिप्रेम उमज एक तत्त्वें ॥"

" प्रारब्ध संचित आचार गोमटे । निवृत्ति तटाकें निघालों आम्ही ॥
मुळींचा पदार्थ मुळींचि पैं गेला । परतोनि अबोला संसारासी ॥
सत्यमिथ्या भाव सत्वर फळला । हृदयीं सामावला हरिराज ॥
मुक्तलग मुक्त मुक्ताईचा तट । अवघेंचि वैकुंठ निघोट रया ॥"

" सर्वत्र सुखच भरलें आहे; पण अहंतेमुळें दुःख होतें. म्हणून मीं अहंता सोडली आणि विवेकानें परमार्थ-मार्ग शोधला. त्यामुळें दुधाळ गाईसारखा किंवा चातकाकडे मेघ वळावा तसा हरि मला पावला. वेदश्रुतींच्या शब्दज्ञानापासून तो दूर जातो, शब्दज्ञानानें त्याची प्राप्ति होत नाहीं. आतां देवानें माझा देह भरून टाकला आहे आणि त्यांत " सोऽहम् " (मीच देव) असा अनुभव आला आहे. सदा नामाचा जप हेंच माझें अनुष्ठान; हेंच माझें स्नान. याप्रकारें मीं मन शांत ठेवून नामस्मरण केलें; मग यमाचें भयच उरलें नाहीं. नारायण हें रोकडें धन माझ्या हातीं आलें; मला ईश्वरप्राप्ति झाली. "

" सर्वी सर्व सुख अहंतेचें दुःख । मोहममता विष त्यजियेलें ॥
साधक बाधक करूनी विवेक । मतिमार्ग तर्क धरियेला ॥
सर्व तीर्थ हरि दुधाळु धेनु वा । वोळला कणवा चातकाचा ॥
वेद जंव वाणी, श्रुति तुपें काहणी । ऐकों जाय कर्णीं तंव परता होय ॥
मुक्ताई सोहंभावें तन भरलेसें देवें । मूर्तामूर्त सोहंभावें हरि घोटी ॥"
" विश्रांति मनाची निज शांति साची । मग त्या यमाची भेट नाहीं ॥
अधिकारी मन मग करी स्नान । रोकडें साधन आलें हातां ॥
साधिलें साधन नित्य पै अनुमान । चित्तीं नारायण मंत्रजपें ॥
मुक्ताई प्रवीण नारायण धन । नित्य मंत्र-स्नान करी वोजा ॥"

" हरीचे गुण अवीट आहेत; त्याचें रूप सनातन, शाश्वत आहे. त्या रूपाच्या ध्यानानें व रामकृष्ण नामाच्या स्मरणानें आम्ही मुक्त झालों. अनासक्तीचें भूषण घेऊन आम्ही नटलों आहों. मला पूर्ण मुक्ति लाभली आहे. हरिनामाच्या छंदाची गोडी अशी श्रेष्ठ आहे, कीं त्यांत रंगल्यावर बंध व मोक्ष या दोन्ही गोष्टी विसरतात, या द्वंद्वापलीकडे मी जातें. नामस्मरणाला विशिष्ट काळवेळ लागत नाहीं, त्याला विघ्नांचें भय नाहीं; अशा नामस्मरणानें मला अखंड मुक्तावस्था भोगतां येतें. "

" अवीट न विटे हरीचे हे गुण । सर्व सनातन ध्यातें रूप ॥
साध्य हें साधन हरिरूपें ध्यान । रामकृष्ण नामें मुक्त आम्ही ॥
असंगेंचि नटूं नटलों पै साचें । नाहीं त्या यमाचें भय आम्हां ॥"

" मुक्तामुक्त दोन्हीं नायकितों कर्णीं । हरिनाम पर्वणी सर्वकाळ ॥
नाहीं काळ तेथें आम्हां वेळ कैंची । हरिनाम छंदाची गोडी थोर ॥
नामा विघ्नबाधा नाइकों आम्ही कदा । निरंतर धंदा रामकृष्ण ॥
मुक्तपणें मुक्त मुक्ताई पैं रत । हरिनाम स्मरत सर्व काळ ॥ "

याप्रमाणें, सद्‌गुरुकृपेनें आपण परमार्थमार्गाकडे वळलों व त्यांनीं सांगितलेल्या नामस्मरणाच्या साधनानें पूर्णतः मुक्त झालों, असें कांहीं अभंगांत मुक्ताबाईंनीं सांगितलें आहे. त्याचप्रमाणें, या मार्गांत आपल्याला कोणते आत्मानुभव आले, त्याचाहि थोडाफार उल्लेख त्यांच्या अभंगांत दिसतो. त्या म्हणतात : " माझे गुरुदेव धन्य धन्य आहेत. माझ्या देहांतच त्यांनीं मला देव दाखविला. त्रिगुण जाळून आत्मज्योति–निर्गुण ज्योति–प्रकाशित केली. "

" धन्य धन्य गुरुराव । माझे देहीं दाविला देव ॥
देहाचें देऊळ केलें । आत्मलिंग प्रकटलें ॥
त्रिगुणाच्या करुनी वाती । सत्रावीच्या लाविल्या ज्योति ॥
पंचप्राण पंचारति । मुक्ताबाई ओवाळिती ॥ "

" मुंगीप्रमाणें बिंदुलें दिसलें; त्यानें सूर्याला झाकून टाकिलें; विंचू व शेष यांचें दर्शन झालें; माशीसारख्या लहान आकारांतून घारीसारखा मोठा आकार उत्पन्न झाला; निर्गुणाची संगति लाभल्यानें, उगवता सूर्य व आरशांत दिसणारें ज्योतीचें प्रतिबिंब अशीं दर्शनें झालीं. सुषुम्ना मार्गानें जात असतांना, मीं भ्रूमध्याच्या मागें मेंदूतील त्रिवेणी संगमावर स्नान केलें. त्या वेळीं अनाहत नाद ऐकूं आले आणि सहस्रदलकमलांत अढळ पुरुषाचें दर्शन झालें. ते दिव्य स्फटिकमंदिरांत बसलेले दिसले;" असें आपलें भव्योदात्त आत्मानुभव मुक्ताबाईंनीं वर्णिले आहेत. असे अनुभव अनेक संतांना आलेले आहेत. स्थलसंकोचास्तव त्यांचें अधिक विवेचन करणें शक्य नाहीं. हे सर्व ईश्वराचे, आत्मतत्त्वाचे आविष्कार होत.

" मुंगी उडाली आकाशीं । तिनें गिळिलें सूर्यासी ॥
विंचू पाताळासी जाय । सर्प वंदी त्याचे पाय ॥
माशी व्याली घार झाली । पाहुनि मुक्ताई हासली ॥"

“ निर्गुणाचा संग मला आजि लाभला ।
पूर्व दिशे भानु जसा आंत उगवला ॥
दर्पणांत दीप जसें तेज देखिलें ।...
सूत्र धरुनि मध्यभागीं वरि चाललें ॥
त्रिवेणीचा ओघ तिथें अंग धुतलें ।
अनुहात झणझणाट नाद ऐकिले ॥
सहस्रदळीं अढळ पदीं पुरुष देखिले ।
दिव्य स्फटिकमंदिरांत त्यांस भेटलें ॥”

एका अभंगांत दिवसां चांदणें व रात्रीं ऊन, या अनुभवाचा उल्लेख आहे. तेथेंच “ कैसेनि कठीण तत्त्व झालें ” या वचनांत स्पर्शाचा अनुभव अभिप्रेत असावा. मागें ज्योति, तेज, रूप, अनाहत नाद, इत्यादि अनुभव मुक्ताबाईनीं सांगितले आहेत, तरी त्यांचा भर ‘ केवलाद्वैता ’च्या, ‘ सर्व खलु इदं ब्रह्म ’ या, अनुभवावर आहे. वरील सर्व अनुभव या एक तत्त्वाचेच, ब्रह्माचेच आहेत, असें त्यांचें म्हणणें आहे, तें अर्थात् योग्यच आहे. मुक्ताबाई सांगतात, “ दिवसां चांदणें, रात्रीं ऊन, कठीण झालें हें तत्त्व,” म्हणजे ज्याच्या धनुष्यानें कळिकाळ कांपतो, असा ईश्वरच आहे. वस्तुतः तो सर्वत्र भरलेला, एकटा एकच आहे, सर्वदा मुक्तच आहे. असा तो सदा प्रकट असून लोक उगाच आडवाटेला शिरतात. तो आत्मरूपानें मेंदूंतील सहस्रदलकमलांत आहे, पण अलिप्त आहे; देहाच्या पापपुण्याचा किंवा सुखदुःखाचा लेप त्याला लागत नाहीं. त्याचें दर्शन झालें कीं, चंदनाच्या सान्निध्यांत अन्य वनस्पतिहि चंदन होतात, त्याप्रमाणें जीवच देव होतो, पूर्णकाम होतो. वस्तुतः तें तत्त्व निराकार असून सर्वत्र भरलेलें आहे. भक्तांनीं आपल्या प्रेमानें त्याला आकार दिला आहे. तें अंतर्बाह्य पूर्णतः व्यापून आहे. वृत्तींचा उच्छेद होऊन सर्वत्र एकच एक तत्त्व अनुभवाला येतें, हीच खरी निवृत्ति.

“ देउळाच्या कळसीं नांदे एक ऋषि । तया घातली पुशी योगीश्वरीं ॥
दिवसां चांदणें रात्रीं पडे उष्ण । कैसेनि कठिण तत्त्व झालें ॥
ऋषि म्हणे चापें कळिकाळ कापें । प्रकाश दीपें निघोनि जाय ॥

एकट एकलें वायांचि पै गुंपलें। मुक्त पै वहिलें सहज असें ॥
वैकुंठ अवीट असोनी प्रकट। वायांचि आडवाट मुक्ताई म्हणे ॥"
" सहस्रदळीं हरि आत्मा हा कुसरी। नांदे हा भीतरीं अलिप्त सदा ॥...
अलिप्त श्रीहरि सेवी पा झडकरी। सेवितां लवकरी हरिच होवाल॥...
मुक्ताई चिंतित चिंतामणी चित्तीं। इच्छिलें पावती भक्त सदा ॥ "
" सर्वरूपीं निर्गुण संचलें सर्वदा। आकार संपदा नाहीं तया ॥
आकारती भक्त मायामय काम। सर्व निःसीम अंतरीं राहे ॥
वृत्तीचा उच्छेदु निवृत्ति तत्त्वतां। सर्वहि समता सांगितली ॥ "

सर्व व्यक्त पदार्थांचें अति सुंदर, मोहक असें प्रकाशमय रूप माझ्या हृदयांत नांदत आहे. निवृत्तिनाथांनी तें मला दिलें; तेंच चांगदेवाला आवडलें व त्यानेंहि घेतलें. सर्वत्र तें एकच एक प्रकाशत आहे. त्यामुळें दिवस-रात्र असा भेद नष्ट झाला. सर्वांचा आदि व अंत असें ब्रह्म मला मिळालें, त्यामुळें माझ्या चित्ताला सर्वच ब्रह्म या अनुभवाची पूर्णता आली. सर्वांचें बीज असें, सर्व इंद्रियांना आनंद देणारें, ब्रह्म अंतर्बाह्य भरलें आहे. तें अनादि, अनंत, अवीट रूप पाहा. तें रूप निर्गुण आहे, त्यापासूनच प्रपंचाचा सगुण आकार निर्माण झाला आहे; प्रपंचाची संजीवनी म्हणजे तें निर्गुण रूपच होय सारांश, आत्मा एकदेशी नसून सर्वत्र भरलेला आहे. इच्छा, बोलणें सर्व कांहीं आत्माच आहे. देहांचें परस्पराबद्दल सौजन्य असतें, याचें कारणहि सर्वांमध्यें एकच आत्मा आहे, हेंच होय; ('आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति'।). ही आत्म्याची प्रमाणभूत, खरी खरी खूण मी सांगतें."

" अव्यक्त व्यक्तीचें रूपस मोहाचें। एक तत्त्व दीपाचें हृदयीं नांदे ॥
चांगया फावलें फावोनी घेतलें। निवृत्तीनें दिधलें आमुच्या करीं ॥
आदि मध्य यासी सर्वत्र निवासी। एकरूपें निशी दवडी तूं ॥
मुक्ताई पूर्णता एकरूपें चित्तां। आदि अंतु कथा साधियेली ॥ "

" अंतर्बाह्य निकें सर्व इंद्रियांचें चोज। निजीं निज बीज एक तत्त्व ॥
आदि नाहीं अनादि नाहीं। तें रूप पाहीं अवीट बाइये ॥
मुक्ताई संजीवन तत्त्वतां निर्गुण। आकार सगुण प्रपंचाचा ॥ "

" जेथें जें पाहें तेथें तें आहे । उभारोनी बाहे वेद सांगे ॥
हेतु,मातु आत्मा अवघाचि परमात्मा । सोहंभावें सर्व आत्मा असें ॥
मुक्तालय खूण मुक्ताई प्रमाण । देहीं देहो सौजन्य निजरूपें ॥ "

मुक्ताबाई केवलाद्वैताच्या उच्चतन अवस्थेला पोहोंचल्या होत्या, हें वरील विवेचनावरून दिसून येईल. सर्वत्र आनंदमय ब्रह्म आहे, दुसरें कांहींच नाहीं. परंतु अहंकारानें मनुष्य दुःखी होतो; सद्‌गुरुकृपेनें त्या अहंकारांतून मुक्त होऊन, त्यांनीं सांगितल्याप्रमाणें नामस्मरण व भक्ति केली म्हणजे ईश्वरदर्शन होऊन भक्त स्वतःच ईश्वर होतो व सर्वात्मभावहि त्याच्या ठिकाणीं येतो. ईश्वर निर्गुण असला तरी भक्तासाठीं तो सगुणरूप घेतो आणि सगुणाची भक्ति करूनच निर्गुणाच्या, केवलाद्वैताच्या अवस्थेला पोहोंचावयाचें असतें, असा आपला अनुभव मुक्ताबाईनीं सांगितला आहे.

## शिकवण

आधीं केलें, अनुभविलें, मग सांगितलें, हा सर्व संतांचा बाणा आहे. मुक्ताबाईनींहि आपण जें अनुभवलें त्याचाच लोकोद्धारासाठीं जगाला उपदेश केला. त्या उपदेशाकडे आता वळूं. मुक्ताबाई सांगतात, " मनुष्य मुळांत मुक्तच आहे, परंतु वासनेच्या जाळ्यांत सांपडल्यामुळें तो बद्ध होऊन, सुखदुःखांच्या आणि जन्ममृत्यूच्या चक्रांत सांपडला आहे. म्हणून वासनेचा त्याग केला पाहिजे. आणि हरिनामस्मरण हा एकच वासना-त्यागाचा उपाय आहे. त्यानें पापराशी जळून जातात. म्हणून सर्व काबाड-कष्ट सोडून एक हरिनाम दृढ धरावें. "

" आधीं तूं मुक्तचि होतासी प्राणिया ।
परि वासना पापिणिया नाडलासि ॥...
" एक तत्त्व धरी हरिनाम गोड । येर ते काबाड विषयओढी ॥
नाम ते सांडी वासना पापिणी । एक नारायण चाड धरी ॥"
" नामाचेनि घोटें जळती पापराशी । न ये गर्भवासीं अरे जना ॥"

ज्ञानेश्वरी अ. ७, ६८–९७ मधील मायानदीच्या वर्णनासारखें भवनदीचें रूपक करून मुक्ताई कळवळ्यानें म्हणतात, " बाबा, वासनां-बरोबर वाहून जाऊं नको, उलटा फीर. भवनदीच्या पाण्याला फार ओढ

आहे. भल्याभल्यांना तें उलथून पाडतें. तेव्हां सद्‌गुरूचे पाय धर; ते तुला भवपार करतील.

“ उलट उलट माघारा प्राण्या फिर गोते खाशी ।
भरला पूर मायेचा लोंढा वाहुनिया जाशी ॥
भवनदीचें पाणी सखया भारी ओढीतें ।
भल्या भल्या पोहोणाऱ्यांना उचलुनि पाडितें ॥
क्षणभंगुर संसार याचा भरंवसा नाहीं ।
दुर्लभ नरतनु गेल्या मग तूं पडशिल पस्ताई ॥
म्हणे मुक्ताबाई चांग्या अंतरिंची खूण ।
धरि सद्‌गुरुचे पाय तुजला नेतिल उद्धरुन ॥”

“ अहंकार आणि अज्ञान हें घोंगडें टाकून दे. त्यांत कामक्रोध, मत्सर निंदा, हिंसा, चिंता हे सर्व दुर्गुण भरलेले आहेत. म्हणून तें घोंगडें टाकून, ईश्वराला शरण जा, त्याचें ध्यान कर. ”

“ अहंकार अविद्या हेंचि पै घोंगडें । पांघुरतां गोडी नाहीं मज ॥...
आशा तृष्णा दोघी बहिणी । लोळती धरणीं घोंगडिया ॥
हिंसा, निंदा, चिंता या तिघीजणी । घोंगडिया आटणी होतसे ॥
घोंगडें माझें फाटलें पोरी । कामक्रोध दोघीं सहोदरीं ॥
मुक्ताई म्हणे घोंगडें सांडी । वटेश्वरीं मांडी ठाण आतां ॥”

हा नामस्मरणाचा, अनन्य भक्तीचा मार्ग सोडून, भ्रमानें दुसरीं, म्हणजे कर्म, बुद्धीचें शब्दज्ञान, हठयोग किंवा भावरहित भक्तीचा आचार, हीं साधनें करून ईश्वरप्राप्ति होणार नाहीं, ब्रह्मपदाला पोहोंचतां येणार नाहीं, असा स्पष्ट इशारा मुक्ताबाईनीं दिला आहे. “ कर्मांमध्यें प्रत्यक्ष द्वैत आहे. मोक्षासाठीं कर्मयोगानें जाऊं लागलास, तर कदाचित् त्या साधनानें पतन होईल. खरें साधन न समजतां, हठयोगानें तटस्थ होऊन जड झालास तर ती खरी समाधि नव्हे. चालतां बोलतां ढळत नाहीं अशी स्वरूप-समाधि साधून घे. कोणी शब्दज्ञानानें भुलून आम्ही मुक्त झालों असें सांगतात; परंतु ज्याच्या कृपेनें मुक्ति मिळेल त्या हरीच्या सेवेंत, ध्यान—स्मरणांत, मग्न होत नाहींत. एक हरीच्या नामस्मरणानेंच मुक्ति मिळूं शकेल. कोणी देवळांतल्या देवावर भाव आहे, असें

म्हणतात, पण प्रेमभावानें त्याला भजत नाहींत; त्यांची भक्ति म्हणजे केवळ सोंग होय. सर्व लोक ' कोहं ' (मी कोण) असेंच म्हणतात; या संशयांतच राहतात. ' सोहं ' (मीच ब्रह्म) असा अनुभव कोणीच सांगत नाहीं. मी सहस्रदलकमलांतील सतराव्या अमीकलेचें दूध काढतें; (ब्रह्मरंध्राला पोहोंचल्यावर या सतराव्या अमृतकलेंतून स्रवणाऱ्या अमृताचा आस्वाद मी घेतें); मग, सर्वत्र भरलेल्या एका देवाशिवाय कांहींच सत्य नाहीं, असा अनुभव येतो. हाच मोक्ष, हेंच ब्रह्मस्वरूप होणें."

"करणें जंव जाय करूं जाये शेवट । तंव पडे आडवाट द्वैतभावें ॥...
मोक्षालागीं उपाय करितोसी नाना । तंव साधनीं पतना पडों पाहे ॥"
"झालासी तटस्थ नव्हे ते समाधि । उपायाची शुद्धि नेणोनियां ॥
बोलतां चालतां देखतां ऐकतां । ढळेना सर्वथा तेंचि साधीं ॥"
"मुक्तपणें ब्रीद बांधोनिया द्विज । नेणती तें बीज केशव हरि ॥...
ज्याचेनि मुक्तता सर्वहि पैं.मुक्त । करूनियां रत न सेविती ॥
मुक्ताबाई मुक्त हरिनाम सेवित । अवघेंचि मुक्त सेवितां हरि ॥"
"देऊळींचा देव घरभरीं भाव । कळसेंविण वाव जातु सदा ॥
जाताति वाउगे नटनाट्य सोंगें । चित्त अनुरागें भजती ना ॥...
रावो रंको कोहं, न म्हणोचि सोहं । साकारलें अहं न कळे तया ॥...
मुक्ताई परेसी दुमते चहूंसी । सत्रावी सर्वरसीं एक देव ॥"

आडवाटेला जाण्यांतील धोका दाखवून, मुक्ताबाईनीं सर्व संतांप्रमाणें नामचिंतन, अनन्य भक्तिभावानें ईश्वराचें स्मरण, या साधनाचें माहात्म्य मुक्त कंठानें, उल्हासानें, उत्सुकतेनें वर्णिलें आहे. तें निश्चित उद्बोधक व स्फूर्तिदायक आहे. " नामस्मरणानें देहांत असूनहि भक्त मुक्त होतो; या भजनानें शांतिक्षमा लाभतात. भूतमात्राबद्दल दया व करुणा चित्तांत धरा व सदा हरिरूपीं वासना ठेवा. हरिनामाचें स्मरण हेंच खरें धन. त्यामुळें सर्व संसारच मोक्षमय होतो. केवळ नामस्मरणानें देव कृपा करतो, भक्ताला आत्मानंद प्राप्त करून देतो, उघडें वैकुंठ भक्तापुढें प्रकट होतें. सर्वत्र हरिच दिसूं लागल्यानें संसारच मोक्षमय झाला. सदा अंत:करणांत ईश्वर असणें हा ज्याचा धंदा त्याला गर्भवास नाहीं. अव्यक्त ब्रह्म व्यक्त

होऊन सर्वत्र भरलेलें त्याला दिसेल. त्याचें चित्त तसेंच ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान, हीं सर्व ईश्वररूपच होतात. हेंच उन्मनी विज्ञान. याप्रमाणें आदिअंतीं ईश्वरच भरून गेल्यावर प्रपंचाशीं संबंध उरत नाहीं. सर्वत्र हरीचें रूप भरलेलें दिसतें. ज्ञाता व ज्ञेय यांचें दर्शन ईश्वरांतच होतें. याप्रमाणें द्वैताच्या पलीकडे जा, बंध व मोक्ष यांच्या अतीत हो. मी द्वैतांत असतांनाच द्वैत व अद्वैत यांच्या पलीकडे गेलें. देहांत एक अनंतच भरलेला दिसूं लागला. सर्वांभूतीं, आदिअंतीं हरि भरलेला पाहून संतांचें अंतःकरण प्रेमानें ओसंडूं लागतें; अत्यंत भक्तिभावानें ते रामनाम गातात, सदा त्या आनंदानें तृप्त असतात. चित्तांत शांति, क्षमा, दया नांदत असून, ईशचिंतनांत ते सदा जागृत असल्यानें, आनंदांत डोलत राहतात," असें हें संतांचें भाग्य-वैभव आहे.

"नामबळें देहीं असोनि मुक्त । शांति क्षमा चित्त हरिभजनें ॥
दया धरा चित्तीं सर्वांभूतीं करुणा । निरंतर वासना हरिरूपीं ॥
मुक्ताईचें धन हरिनाम उच्चारु । अवघाचि संसारु मुक्त केला ॥"
"नाममंत्रें हरि निजदासा पावे । ऐकोनि ध्यावें झडकरी ॥
निजानंद दावी, उघडें पै वैकुंठ । नामेंचि प्रगट आम्हांलागीं ॥
मुक्ताई जीवन्मुख हा संसार । हरि पारावार केला आम्ही ॥"
"परब्रह्मीं चित्त निरंतर धंदा । तया नाहीं कदा गर्भवास ॥
अव्यक्त पैं व्यक्ति चित्तासी अनुभव । सर्व सर्वीं देव भरला दिसे ॥
ज्ञेयज्ञाताज्ञान उन्मनी विज्ञान । चित्त नारायण झाला त्याचें ॥
आदिअंतीं हरि सर्व त्याचा झाला । परतोनि अबोला प्रपंचेंसी ॥"
"सर्वत्र रूपडें क्षरलेसें दिसें । ज्ञाता ज्ञेय भास हरीमाजीं ॥"
"मुक्तामुक्त दोन्ही करी वो शिराणी । द्वैताची काहाणी नाहीं तुज ॥
मुक्ताई अद्वैत द्वैतीं द्वैतातीत । अवघाचि अनंत दिसे देहीं ॥"
"आदि अंतु हरि सर्वां घटीं पूर्ण । जाणोनि संतजन प्रेमभरित ॥
रामनाम चित्तें प्रेमें वोसंडत । नित्यानित्य तृप्त हरिभक्त ॥
शांति क्षमा दया सावध पै चित्त । आनंदें डुल्लत सनकादिक ॥"

या अद्वैतावस्थेचें, ब्रह्मभावाचें, निद्रेच्या रूपकांनीं मुक्ताबाईनीं सुंदर वर्णन केलें आहे. त्या चांगदेवाला म्हणतात, "मी—माझें मारून माझ्या

भेटीला ये; मग तुला गोल्हाटांत सांठवीन, (तूं ब्रह्मरंध्राला पोहोंचशील). तेथें मीच ब्रह्म या अनुभवांत राहा; म्हणजे निद्राजागृति, आठव-विसर या द्वंद्वांच्या पलीकडे जाऊन, तूं आपल्या चिदानंद स्वरूपांत राहशील, ('तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्'). हाच गुणातीत डाहळीला लावलेला पाळणा; तेथें चांगया निजला आहे आणि अनाहत नाद ऐकत आहे. हीच उन्मनी अवस्था, चिन्मय निद्रा."

" आपुलिया मारुनी येईं कां भेटी । मग गोल्हाटीं सांठवीन ॥
सोहं सोहं सोहं हाचि धरी छंदु । सुखें निद्रा करी अद्वैतीं रे ॥
तेथें जाग पां जाग, नीज पां नीज । मग तुज चेवों कैचा ॥
तेथें ओळखी नाहीं विसरु नाहीं । चिदानंदीं पाहीं रूप तुझें ॥"
" गुणातीत डाहाळीं पाळणा लाविला । तेथें सुत पहुडला मुक्ताईचा ॥
निज निज बाळा न करी पै आळी । अनुहात टाळी वाजवीतें ॥...
निद्रा ना जागृति भोगी पै उन्मनी । लक्ष तें भेदुनी नीज पाटी ॥"

हे विचार वाचून शंकराचार्यांच्या योगतारावलींतील खालील श्लोकाची आठवण होते :

" विश्रांतिमासाद्य तुरीयतल्पे । विश्वाद्यवस्थात्रितयोपरिस्थे ॥
संविन्मयीं कामपि सर्वकालं । निद्रां सखे निर्विश निर्विकल्पाम् ॥ "

भावार्थः—हे मित्रा, आत्म्याच्या विश्व–तैजस–प्राज्ञ या, जागृति–स्वप्न-सुषुप्ति या अवस्थांच्या पलीकडे असलेल्या, चवथ्या अवस्थेच्या पलंगावर विश्रांति घेऊन त्या अवर्णनीय, विकल्परहित अशा चिन्मय निद्रावस्थेंत प्रवेश कर.

## व्यक्तिमत्त्व

मुक्ताबाईच्या जीवनांतील घटनांची विशेष माहिती उपलब्ध नाहीं; तरी कांहीं प्रसंगांवरून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे कांहीं पैलू दृष्टीस पडतात. हे सर्व त्यांच्या साक्षात्काराच्या व ब्रह्मरूपतेच्या प्रकाशाचे विविध किरण आहेत, ही महत्त्वाची गोष्ट विसरतां कामा नये. हें व्यक्तिमत्त्वाचें दर्शन नामदेव, चांगदेव व स्वतः मुक्ताबाई यांच्या कांहीं वचनांतून घडतें.

(१) पांडुरंग आपणांशीं बोलतो, आपण दिलेलें दूध पितों, आपण खरे थोर भक्त, या भ्रमांत असतांना नामदेव ज्ञानदेवादि संतांना भेटावयास गेले आणि तेथें त्यांचा भ्रम–निरास करण्यासाठीं गोरोबांच्या हस्तें त्यांना 'कच्चें मडकें' असें संतांनीं ठरविलें आणि ते अपमानित होऊन पांडुरंगाकडे गेले व त्यांच्या सांगण्याप्रमाणें त्यांनीं खेचरांकडून गुरुकृपा संपादन केली, ही कथा सुप्रसिद्ध आहे. या प्रसंगाचें हृदयंगम वर्णन नामदेवांनीं आपल्या चरित्रपर अभंगांत केलें आहे. त्यांत मुक्ताबाईंच्या व्यक्तित्वाचे तेजस्विता, निःस्पृहता, निर्भीडपणा, अगाध आत्मज्ञान, आणि तसेंच करुणा व वात्सल्य, हे सर्व पैलू ठसठशीतपणें दिसतात. निवृत्तिनाथ–ज्ञानदेव यांनीं नामदेवांना आदरानें नमस्कार केला; परंतु आपण श्रेष्ठ भक्त या अभिमानानें नामदेवांनीं परत नमस्कार केला नाहीं. हें पाहून मुक्ताबाई संतप्त झाल्या आणि त्यांनीं नामदेवांची चांगलीच शोभा केली :

" अखंड जयाला देवाचा शेजार । कां रे अहंकार नाहीं गेला ॥
मान अपमान वाढविसी हेवा । दिवस असतां दिवा हातीं घेसी ॥
परब्रह्मासंगें नित्य तुझा खेळ । आंधळ्या डोळे डोहळे कां बा झाले ॥
कल्पतरूतळवटीं इच्छिली ते गोष्टी । अझुनी नरोटी राहिली कां ॥
मुक्ताबाई म्हणे जाई ना दर्शना । आधीं अभिमान दूर करा ॥ "

" मी नामदेवांना नमस्कार करणार नाहीं, तुम्ही वाटलें तर त्याला दंडवत घाला, " असें निवृत्तिनाथांना त्यांनीं बजावलें. त्याच वेळीं, नामदेव असे अभिमानी, आंधळे कां राहिले, त्यांची भक्ति खऱ्या साक्षात्कारांत परिणत कां झाली नाहीं, याचें कारणहि त्यांनीं त्यांना स्पष्टपणें सांगितलें.

" झालासी हरिदास तरी आम्हां काय । आंतील सोय न ठाउकीं ॥
घेउनी टाळदिंडी हरिकथा करिसी । हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणें ॥
गुरुविण तुज नव्हेचि बा मोक्ष । होशील मुमुक्षु साधक तूं ॥ "

" आत्मतत्त्वीं दृष्टि नाहींच पै गेली । तंववरी ब्रह्मबोली बोलुनि काय ॥
तुझें रूप तुवां नाहीं ओळखिलें । अहंते धरिलें कासयासी ॥ "

" बोलोनिया येणें वाढविला डांगोरा। अंतरींचा कोरा गुरुविण ॥
संतांचा सन्मान कळेना जयासी। राहुनि देवापाशीं काय केलें ॥ "
" म्हणे मुक्ताबाई घाला लोटांगण। आम्हांसी दर्शन नलगे त्याचें ॥"

केवळ सगुणांत भ्रमलेल्या नामदेवांना 'अव्यक्ताला शरण जाऊं द्या' म्हणून थापटण्यानें त्यांच्या घटाची परीक्षा करण्याला मुक्ताबाईनींच गोरोबांना बोलाविलें व नामदेवांना कच्चा घट ठरविलें. मुक्ताबाईच्या डोक्यावर थापटणें हाणलें, तेव्हां " अमृतसंजीवनी उतों आलीं " असें त्यांच्या पराशांतीचें वर्णन केलें आहे. हा कच्चा घट भाजून काढा असेंहि अलंकारिक भाषेंत त्या म्हणाल्या, तेव्हां ही कैकाड मंडळी आपल्याला जाळतील या भीतीनें ते पळून जाऊं लागले. त्या वेळीं म्हटलेल्या अभंगांत मुक्ताबाईचें अगाध ज्ञान, करुणा व वात्सल्य दिसून येतात. नामदेव पांडुरंगाला खरा खरा आवडावा म्हणून त्यांनीं हा खोटाच कडक लक्ष्मीचा अवतार धरला होता; आणि तो पाहून " लहानशी मुक्ताबाई जैसी सनकांडी। केलें देशधडी महान संता ॥ " हें नामदेवांनीं त्यांचें केलेलें वर्णन योग्यच वाटतें. पण वर कांटे असलेल्या या फणसाच्या अंतरंगीं मधुर गरेच होते.

" मुक्ताबाई म्हणे चैतन्याचा केर। ब्रह्मअग्नीवर चेतवावा ॥"
" अंतरीं बाहेरी भाजूं आम्ही कुंभ। भरूं निरालंब सगळेचि ॥
अहं सोहं दोन्ही ऊर्ध्व लावूं फुंकणी। नवद्वारें फुंकोनी जाळ करूं ॥
जीवत्व काढुनी शिव घडूं अंगा। प्रिय पांडुरंगा आवडेल ॥ "

(२) दुसरा प्रसंग म्हणजे ताटीचे अभंग. लोकांकडून फार त्रास झाल्यामुळें रागावून ज्ञानदेव एकदां झोपडीची ताटी लावून बसले. तेव्हां विश्वोद्धाराचें कार्य ज्यांना करावयाचें आहे त्या ज्ञानराजांनीं असें वागणें योग्य नव्हे म्हणून ताटी उघडण्याची विनंति करण्याच्या मिषानें मुक्ताबाईनीं त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव या अभंगांनीं करून दिली, अशी आख्यायिका आहे. ती खरी वा खोटी असो, या सुंदर काव्यमय अभंगांत त्यांचें आत्मज्ञान, ब्रह्मरूपता, निःस्पृहता आणि त्याबरोबर नम्रता व बाल्यसुलभ लडिवाळपणा पाहावयास सांपडतात. यांत अनुषंगानें संतांचीं लक्षणेंहि सांगितलीं आहेत. " सर्वात्मभावाचा साक्षात्कार झाल्यावर दुसरें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत २३ 28311 दि:

कांहीं उरलेंच नाहीं. मग संतांना राग, द्वेष, अभिमान, वासना कोणाबद्दल व कशाबद्दल वाटणार ? या दुर्गुणांपासून पूर्णतः मुक्त होऊन संतांनीं दया, क्षमा, शांति हीं धरलीं पाहिजेत. कारण ' सर्व भूतें म्हणजे मीच ' हा त्यांचा अनुभव आहे. हीं सर्व लक्षणें नसतील तर भगवा वेष व वनीं वास हीं विटंबनाच होय. माया नष्ट झाली, कीं सर्वच मुक्त; मग मुक्तपणाचा अभिमान कां धरावा ? ब्रह्मापासून सर्व झालें; म्हणून सर्वांवर प्रेम करून त्यांना ज्ञान द्यावें. आपण तरून विश्वहि तारलें पाहिजे. तेव्हां लोकांच्या अपराधाची क्षमा करा, त्यांच्यावर रागावूं नका, प्रेम करा आणि ' ताटी उघडा ज्ञानेश्वरा ' असें लडिवाळ मुक्ताबाईनीं ज्ञानराजांना विनविलें आहे.

" योगी पावन मनाचा । साही अपराध जनाचा ॥
विश्व रागें झालें वन्हि । संतें सुखें व्हावें पाणी ॥...
विश्वपट ब्रह्मदोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥ १ ॥
सुखसागरीं वास ज्याला । उंच नीच काय त्याला ॥...
एकापासुनी एक झालें । त्यासी पाहिजे सांभाळिलें ॥...
एकें उंचपण केलें । एक अभिमानें गेलें ॥
इतकें टाकुनि शांति धरा । ताटी० ॥ २॥
वरी भगवा झाला नामें । आंत वश्य केला कामें ॥
त्यासी म्हणों नये साधू । जगीं विटंबना बाधू ॥
आपआपणा शोधुनि घ्यावें । विवेक नांदे त्याच्या सवें ॥
आशा दंभ अवघें आवरा । ताटी० ॥ ३ ॥
संत तोचि जाणा जगीं । दया क्षमा ज्याचे अंगीं ॥...
मिथ्या कल्पना मागें सारा । ताटी० ॥ ४ ॥
एक आपण साधू झाले । येर कोण वायां गेले ॥...
माया समूळ नुरेल जेव्हां । विश्व ब्रह्म होईल तेव्हां ॥
चिंता क्रोध मागें सारा । ताटी० ॥ ५ ॥
ब्रह्म जैसें तैशापरी । आम्हां वडील भूतें सारीं ॥...
जीभ दातांनीं चाविली । कोणें बत्तीशी पाडिली ॥...

चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्मपदीं नाचे ॥
मन मारूनि उन्मन करा । ताटी० ॥ ६ ॥
सुखसागर आपण व्हावें । जग बोधें निववावें ॥
जीव जीवाशीं पै घ्यावा । मग करूं नये हेवा ॥
रणोपाय चित्तीं धरा । ताटी० ॥ ७ ॥
अहो क्रोधें यावें कोठें । अवघें आपण निघोटें ॥
ऐसें कळलें उत्तम । जन तोचि जनार्दन ॥...
ऐसी थोर दृष्टि धरा । ताटी० ॥ ८ ॥
सांडी कल्पना उपाधी । तीच साधूला समाधि ॥
एक मन चेष्टा करी । भूतें बापुडीं शेजारीं ॥
अवघी ईश्वराची करणी । तेथें काय केलें कोणीं ॥
पुन्हां शुद्ध मार्ग धरा । ताटी० ॥ ९ ॥
ऐसा नसावा संन्यासी । जो कां परमार्थाचा द्वेषी ॥
घर बांधिलें डोंगरीं । विषया फिरे दारोदारीं ॥
काय केला योग धर्म । नाहीं अंतरीं निष्काम ॥
गंगाजळ हृदय करा । ताटी० ॥ १० ॥
शुद्ध भाव ज्याचा झाला । दुरी नाहीं देव त्याला ॥..-
अहो आपण तैसें व्हावें । अवघें अनुमानून घ्यावें ॥
तेथें कोणें शिकवावें । सार साधूनिया घ्यावें ॥
लडिवाळ मुक्ताबाई । जीव मुद्दल ठायींच्या ठायीं ॥
तुम्ही तरूनि विश्व तारा । ताटी० ॥

(३) या अद्वितीय भावंडांचा विनोद किती उच्च आध्यात्मिक पातळीवरचा असेल, याचें उदाहरण त्यांच्या एका प्रश्नोत्तरपर अभंगांत दिसतें. चांदणी, पक्षी, ज्योति, चार रंग हे अनुभव आणि त्यांपासून होणारा आनंद यासंबंधीं प्रश्न मुक्ताबाईंनीं ज्ञानदेवांना योगाच्या परिभाषेत विचारला. ज्ञानेश्वरांनीं उत्तर दिलें आणि शेवटच्या चरणांत मुक्ताबाईंना मोठ्या चतुरपणानें सुचविलें कीं, या प्रश्नांचीं उत्तरें माहीत असून तूं हे प्रश्न मला विचारलेस, ही गोष्ट मीं ओळखली.

**प्रश्न**

“ मकाराचे माथां काय वस्तु असे। पक्षी देहीं वसे कोण्या ठायीं ॥
अर्धी मात्रा बापा कोण्या ठायीं राहे। तिच्या पुढें आहे काय सांगा ॥
ऐसें सुख कोणीं लुटिलें आपण। पुसावें जाऊनी कोणापाशीं ॥
रंगाची हो खूण कोणें दाखविली। म्हणे मुक्ताबाई ज्ञानदेवा ॥ ”

**उत्तर**

“ मकाराचे माथां झळकेचि चांदणी। पक्षी हो नयनीं तटस्थले ॥
अर्धी मात्रा स्थान महा तें कारण। तयामाजीं जाण ज्योतिरूप ॥
तें सुख आपण आपुलें लुटावें। जाऊनी पुसावें गुरूपाशीं ॥
चौरंगाची खूण मुक्ताई बोलली। सर्वकाळ झाली ब्रह्मरूप ॥ ”

(४) चांगदेवांच्या अभंगांत मुक्ताईच्या संबंधानें फार प्रेमादराचे विचार आले आहेत. त्यावरूनहि त्यांच्या व्यक्तित्वाची कल्पना येते. त्यांनींच चांगदेवांवर कृपा केली व त्यांना अनुग्रह दिला. तेव्हां त्यांची पुढील पारमार्थिक जबाबदारी मुक्ताईच्यावरच पडली. मुक्ताईचे आपल्यावर किती पारमार्थिक उपकार झाले, हें चांगदेवांनीं सांगितलें आहे. ते सांगतात, “ मी शांतीशीं लग्न लावलें, तेव्हां मुक्ताई या करवलीनें हळदी वाटल्या. मुक्ताईनें माझ्या डोळ्यांत अंजन घातलें आणि मला दिव्य निधान दाखविलें. मला मुक्ताईनें पोसणा घेतला, ती माझी धर्माची माता झाली. मला साकारातीत करून अविनाश पाळण्यांत अनाहताची टाळी वाजवून उन्मनी निद्रेंत निजविलें. ” आपल्या समाधीच्या वेळीं, मुक्ताईचें उपकार आठवून, चांगदेव म्हणतात :—

“ कृपावंत झाली जेव्हां मुक्ताबाई। स्वरूप दिशा दाहीं दाखविलें ॥
पाठीं पोटीं स्वरूप केलें सद्‌गुरूनें। तंव अभिमान गेला माझा ॥
यांच्या उपकाराची काय वानूं थोरी। ज्यांच्या संगें हरि जोडियेला ॥ ”

मुक्ताबाईच्या आध्यात्मिक अधिकाराचें आणि शिष्यवत्सलतेचें आणखी वर्णन तें काय करावयाचें ?

(५) ज्ञानेश्वरांच्या व स्वतः मुक्ताईच्या समाधीच्या प्रसंगीं नामदेवाच्या अभंगांत मुक्ताईचें जें स्वभावचित्र दृष्टीस पडतें तें कारुण्य, प्रेम, कृतज्ञता,

व त्याबरोबरच गांभीर्य, आत्मस्थिति आणि शांति यांनीं भरलेलें आहे. या वेळीं, सर्व भावंडांबरोबर मुक्ताईहि फार कष्टी झाल्या.

“ निवृत्ति सोपान मुक्ताई धाकुटी । धरियेलें कंठीं पांडुरंगें ॥
कळवळलीं मनीं, करितीं दीर्घ ध्वनि । आठवितीं मनीं ज्ञानदेव ॥ ”

“ फार आठवतें निवृत्तीचे चित्ती । सोपान स्फुंदती मुक्ताबाई ॥
आम्हां मातापिता ज्ञानेश्वर । नाहीं आतां थार विश्रांतीसी ॥ ”

“ सोपान मुक्ताबाई सांडिती शरीरा । म्हणती धरा धरा निवृत्तीसी॥ ”

बंधुप्रेमानें आणि तेंहि ज्ञानेश्वरासारख्या परम आत्मज्ञानी बंधूच्या समाधीनें थोडा वेळ त्यांचें चित्त अतिशोकाकुल झालें, तरी शेवटीं विवेक हाच त्यांचा स्थायीभाव होता. श्रीरामकृष्णांनीं म्हटल्याप्रमाणें, स्वजनांच्या विरहानें संतहि व्याकुळ होतातच, पण अल्पकाल; पुन्हां ते विवेकावर येतात. प्रापंचिक जन मात्र त्या शोकांत बुडून जातात. म्हणून,

“ निवृत्ति मुक्ताबाई करिती विवेक । आपपर लोक दुजें नाहीं ॥ ”

ज्ञानेश्वरांच्या मागून सोपानदेवांनीं समाधि घेतली. उरलीं निवृत्तिनाथ आणि मुक्ताबाई.मुक्ताबाई मेहुणला समाधि घेणार हें ठरलेंच होतें. तेव्हां, “ मायभूमि पाहूं यांची आम्ही डोळां ” म्हणून सर्व संत त्या दोघांबरोबर आपेगांवीं आले. तेथें मागील सर्व गोष्टींचें स्मरण होऊन निवृत्ति-मुक्ताबाईंचें अंतःकरण भरून आलें :

“ निवृत्ति मुक्ताईनें पाहुनी स्थळ डोळा । आलासे उमाळा ओसंडोनी ॥
तात आणि माता गेलींसे येथून । तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा ॥
निवृत्ति ज्ञानेश्वर कोरान्नाचें अन्न । सांभाळी सोपान मजलागी ॥
तुझ्या योगें हरि क्रमियेलें काळा । फुटलासे मेळा तापसांचा ॥ ”

आतां मुक्ताईच्या समाधीचा दिवस आला. त्याबरोबर या मानवी भावनांचें मार्दव संपलें. त्या ब्रह्मस्वरूपीं अधिष्ठित झाल्या. “ केव्हां जाण्याचा दिवस ठरविलास ? ” असें निवृत्तिनाथांनीं या सदामुक्त भगिनीला विचारल्यावर त्यांनीं दिलेल्या उत्तरांतील अगाध आत्मज्ञान व अनुभूति पाहून मन आनंदाश्चर्यानें स्तिमित होतें, आदरानें विनम्र होतें. मुक्ताबाई सांगतात :

"मुक्ताबाई म्हणे जावें यावें कोठें । अवघें निघोट स्वरूप स्वामी ॥
गर्जतां गगन कडाडली वीज । स्वरूपीं सहज मिळयेली ॥
मावळला दीप ज्योत कोठें होती । सहज सामावली निरंजनीं ॥"
"आमुच्या स्वस्थानीं नाहीं बा अंधार । अवघीं चराचर प्रकाशलें ॥
उदय आणि अस्तु नाहीं स्वरूपासी । ऐसें मुनिऋषि जाणताती ॥
आम्ही कधीं आलों स्वरूप सोडोनी । जावें पालटोनी जेथील तेथें ॥
अंतर बाहेर स्वामीचें स्वरूप । स्वयें नंदादीप उजळला ॥"

खरोखर, विजेप्रमाणें आत्मज्ञानानें चमकून अवघ्या १८ व्या वर्षी मुक्ताबाई स्वरूपीं मिळाल्या. अशा अलौकिक ऋषितुल्य भगिनीच्या विरहानें सदा स्वरूपावस्थेंत राहणारे निवृत्तिनाथहि थोडा काळ कळवळले, कष्टी झाले.

"निवृत्तिराज म्हणे प्रळयींचा वारा । सुटला शारंगधरा ऐसें वाटें ॥
हालतें गगन डोलतीं विमानें । गेलें देहभान अवघियांचें ॥"
"निवृत्तिराजातें कळवळा वाटे भारी । आम्हां आतां हरि आज्ञा द्यावी॥
सकळांचे चित्तीं येतो कळवळा । मुक्ताई डोळां पाहिली नाहीं ॥"
"ऐकावा हा अर्थ मुक्ताईच्या मुखीं । आतां ऐसी सखी होणें नाहीं॥"
"कांहीं कोणावरी नाहीं पडलें ओझें । कष्टी निवृत्तिराज होत असे ॥
आली गेली कैसी आम्हां कळलें नाहीं । कोठें मुक्ताबाई विसर्जिली॥"

जिला असे धन्यवाद देऊन जीवन्मुक्त निवृत्तिनाथहि शोकविह्वल झाले, जिच्या समाधीच्या वेळीं,

कडाडली वीज निरंजनीं जेव्हां । मुक्ताबाई तेव्हां गुप्त झाली ॥
वैकुंठीं लक्ष घंटा वाजती एक घाई । झाली मुक्ताबाई स्वरूपाकार ॥
एक प्रहर झाला प्रकाश त्रिभुवनीं । जेव्हां निरंजनीं गुप्त झाली ॥

असा अनुभव नामदेवांना आला, त्या लोकोत्तर स्त्री-संतांना बालिका, योगिनी, देवी, काय म्हणावें ? कांहींच न म्हणतां, त्यांच्या चरणीं भक्ति-भावानें सादर मस्तक ठेवावें, म्हणजे पुरे.

—(जीवन–विकास, मार्च १९५९)

# ३. शेवटचा दिवस गोड व्हावा !

जीवनांतील सार्थकता आपण मिळविली याचें अत्यंत स्फूर्तिदायक निवेदन तुकारामांनीं एका अभंगांत केलें आहे. तो अभंग असा :

याजसाठीं केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥
आतां निश्चिंतीनें पावलों विसांवा । खुंटालिया धावा तृष्णेचिया ॥
कवतुक वाटे झालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आतां दिस चारी खेळीमेळी॥

तुकारामांना विश्रांति मिळाली, ते निश्चिंत झाले, तृष्णेच्या धांवा खुंटल्या, त्यांचें मुक्तीशीं लग्न लागलें. त्यानंतर संतजनांत उरलेले दिवस आनंदानें घालवीत ते राहिले. येवढेंच आपल्या कृतार्थतेचें वर्णन त्यांनीं केलें आहे. परंतु, येवढेंहि वर्णन अत्यंत अर्थपूर्ण आहे. त्यांत त्यांचें आध्यात्मिक जीवन सांठविलेलें आहे. म्हणून त्याचा विचार 'माउली'च्या वाचकांपुढें मांडण्याचें योजिलें आहे.

अंतःकरणांतील महत्त्वाच्या आकांक्षांची पूर्तता म्हणजे कृतार्थता. घर बांधावें, वडिलांचें कर्ज फेडावें, समाजसेवा करावी, सत्य–अहिंसेचें व्रत पाळावें, हरद्वाराची यात्रा करावी, अशा सांसारिक, सामाजिक, नैतिक, धार्मिक अपेक्षा उत्कटतेनें मनुष्य अंतःकरणांत बाळगतो व ती ती अपेक्षा पूर्ण झाली म्हणजे स्वतःला कृतकृत्य, धन्य मानतो. पण ही क्षणिक धन्यता आहे. त्या अपेक्षेच्या पूर्णतेचा दिवस तेवढा गोड होतो; 'शेवटचा दिवस' गोड होत नाहीं, विसांवा मिळत नाहीं; कारण तृष्णेच्या धांवा खुंटत नाहींत, त्या क्वचित् वाढतात देखील. महाराजांच्या अपेक्षा यांपैकीं नव्हत्या, असणें शक्य नाहीं. कारण, त्यांच्या पूर्ततेनें शेवटचा दिवस गोड होत नाहीं. मग महाराजांच्या अपेक्षा काय होत्या ? त्या अत्युच्च,

आध्यात्मिक पातळीवरच्या होत्या असें त्यांच्या अभंगावरून दिसून येतें. आपलें हृद्गत कळवळ्यानें देवाला निवेदन करतांना ते म्हणतात :

" ऐसें भाग्य कई लाहता होईन । अवघे देखें जन ब्रह्मरूप ॥
क्षमादयाशांति मूर्तिमंत अंगीं । परावृत्त संगीं कामादिका ॥
मग तया सुखा अंत नाहीं पार । आनंदें सागर हेलावती ॥
विवेकासहित वैराग्याचें बळ । धगधगतो ज्वाळ अग्नि जैसा ॥
भक्तिभाव शुद्ध नवविधावरी । अलंकारावरी मुगुटमणी ॥
तुका म्हणे माझी पुरवी वासना । कोण नारायणा तुजविण ॥

सर्व लोकांना ब्रह्म म्हणून पाहावें, त्यामुळें शांति, क्षमा, दया इत्यादि सद्‌गुण मूर्तिमंत, पूर्णतेनें, अंगीं वसावे, कामक्रोधादि शत्रूंचा नाश व्हावा, धगधगणाऱ्या अग्नीच्या ज्वालेप्रमाणें प्रखर वैराग्य व विवेक प्रकट व्हावे, व या सर्वांचा मुकुटमणि जी भावशुद्ध नवविधा भक्ति, तिनें अंतःकरण भरून जावें, ही महाराजांची महत्त्वाकांक्षा होती. ती विठ्ठलावांचून कोण पुरविणार ?

अशी महत्त्वाकांक्षा बाळगणारा मनुष्य विरळा. ती पुरविणाराहि एकच, भगवान पांडुरंग. जीवनांतील सर्व अपेक्षा किंवा ध्येयें वरील अभंगांत सामावलेलीं आहेत. सर्वत्र ब्रह्मदर्शनाच्या आनंदानें त्रिविधतापांचा निरास, दुर्गुणांचा नाश व सद्‌गुणांची पूर्ण वाढ हीं नैतिक ध्येयें प्राप्त होतात, त्यानेंच सर्वात्मभाव व विश्वबंधुत्व हें सामाजिक ध्येय पूर्णतेला जातें व मी कोण, विश्व काय आहे व ईश्वर कोण या कोड्याचा उलगडा होऊन बुद्धीची सत्य तत्त्व जाणण्याची भूक शांत होते. बुद्धि, भावना व क्रिया-शक्ति (Reason, Emotion and Will) या मनुष्याच्या तिन्ही शक्तींचें पूर्ण समाधान सर्वत्र ब्रह्मदर्शनानें व त्याच्या वर सांगितलेल्या परिणामांनीं होतें. त्यामुळें तृष्णेच्या धांवा खुंटतात व जीव विश्रांति पावतो. मात्र ईश्वरदर्शन, आत्मसाक्षात्कार, झाल्यावरच या सर्व गोष्टी घडून येतात व देवभक्तांचें परस्परांवर नितान्त प्रेम वाढल्यावांचून आत्मसाक्षात्कार होत नाहीं. म्हणून "प्रेमदान दे, तुझें दर्शन दे" असें महाराजांनीं काकुळतीनें देवाला विनविलें आहे. ही तळमळ त्यांच्या अभंगांत दिसून येते.

" प्रेम नाहीं अंगीं । भलें म्हणविलें जगीं ।।"
" गातों नाचतों हें दाखवितों जना । प्रेम नारायणा नाहीं जगीं ।।"
" भक्ति भाग्यसीमा । द्यावा जोडोनियां प्रेमा ।।"
" अमृताची दृष्टी घालोनिया वरी । शीतळ हा करी जीव माझा ।।"
" करावा वर्षाव । तृषाकान्त झाला जीव ।।"
" पाहे मजकडे भरोनिया दृष्टि । बहुत हिंपुटी झालों देवा ।।"
" करावेंसें वाटे जीवस्तनपान । नव्हें हें वचन शृंगारिक ।।"
" धांव घाली आई । आंता पाहतेसी काई ।।"
" करावें शीतल ।...बहु झाली हळहळ ।।"

मायबाळांमध्यें जसें उत्कट प्रेम असतें तसें तुझ्यामाझ्यामध्यें उत्पन्न होऊं दे, त्यावांचून माझ्या जीवाची तळमळ शांत होणार नाहीं, मला सुख व समाधान मिळणें शक्य नाहीं, असें महाराजांनीं परोपरीनें देवाला विनविलें आहे. त्या अभंगांतून वात्सल्य व करुणा ओसंडत आहे. त्यांतील अगदीं थोडीं वचनें वर उद्धृत केलीं आहेत. ईश्वराचें दर्शन झाल्याशिवाय इतकें उत्कट प्रेम तरी कसें उद्भवणार ? तेव्हां " देवा, मला दर्शन दे," असा ध्यास महाराजांनीं घेतला.

" सकळांचें समाधान । नव्हे देखिल्यावांचून ।। "
" रूप दाखवी रे आतां । सहस्र भुजांच्या मंडिता ।। "
" शंख चक्र पद्म गदा । इतुक्यासहित ये गोविंदा ।। "
" तुका म्हणे कान्हा । भूक लागली नयना ।। "
" ऐसें पुण्य होईल गाठीं । घालीन पायीं देवाचे मिठी ।। "
" तरी मी पाहेन पाहेन । तुझे श्रीमुख चरण ।। "
" झालीया दर्शन करीन मी सेवा । आणीकहि देवा नलगे दुजें ।।"
" आइकलें कानीं तें रूप लोचन । देखावया सीण करिताती ।। "

महाराजांच्या भव्य, विशाल आकांक्षांचें, ध्येयाचें स्वरूप वर आपण थोडक्यांत पाहिलें. त्यांची पूर्तता झाल्याचें वर्णन आतां त्यांच्याच अमृत-मय अभंगवाणींतून ऐकूं. मागील अभंगांत वात्सल्य व करुणा तर पुढील अभंगांत प्रेम, आनंद, कृतज्ञता यांचें उत्कटतेनें दर्शन होईल. जीवनांत मिळालेल्या धन्यतेचा तो आविष्कार आहे. यांत सर्वांत महत्त्वाची गोष्ट

म्हणजे ईश्वराचें दर्शन, साक्षात्कार. त्यापासून इतर सर्व फळें प्राप्त होतात. आपल्याला झालेल्या साक्षात्काराचें व त्याच्या परिणामांचें कधीं एकत्र, कधीं पृथक् वर्णन महाराजांनीं केलें आहे.

"न कळे दिवस राती । अखंड लागलीसे ज्योति ॥
आनंदलहरीची गति । वर्णूं किती तया सुखा ॥"
"तिळा येवढें बिंदुलें । तेणें त्रिभुवन कोंदाटलें ॥
हरीहरांच्या मूर्ति । बिंदुल्यांत येती जाती ॥"
"सुखाचें ओतलें । दिसें श्रीमुख चांगलें ॥
मनें धरिला अभिलाष । मिठी घातली पायांस ॥
होतां दृष्टादृष्टी । ताप गेला उठाउठीं ॥"
"हिरा शोभला कोंदणीं । जडित माणकांची खाणी ॥
तैसा शोभे नारायण । मुख सुखाचें मंडण ॥
कोटी चंद्रलीळा । पौर्णिमेची पूर्ण कला ॥
तुका म्हणे दृष्टि धाये । परतोनी माघारीं ते नये ॥"
"तुज पाहतां सामोरी । दृष्टि न फिरे माघारी ॥
माझ्या चित्ता तुझ्या पाया । मिठी पडली पंढरीराया ॥
नव्हे सारितां निराळें । कवण मेळविती जळें ॥"

"पाहतां श्रीमुख सुखावलें सुख । डोळ्यांची भूक न वजे माझ्या ॥"
"अंतरीची ज्योती प्रकाशली दीप्ति । मूळींची जी होती आच्छादिली ॥"
तेथींचा आनंद ब्रह्मांडीं न समाये । उपदेशी काय देऊं सुखा ॥"

"ईश्वराचें दर्शन झालें, अनेक प्रकारांनीं झालें, ईश्वराचें मुख परम सुंदर, अति तेजस्वी, तें पाहून मन तेथेंच जडून गेलें, परमानंद झाला; अतिशय आनंद होऊन त्रिविध ताप तात्काळ पळून गेले व पाण्यांत मीठ विरावें व मिळून जावें तसा मी ईश्वरस्वरूपीं मिळून गेलों, आतां निराळा केला तरी निराळा होऊं शकणार नाहीं; हें दर्शन अखंड होत राहिलें आहे; त्या अखंड तेजांत रात्र व दिवस हा भेदहि समजत नाहीं;" असें महाराजांनीं आपल्या साक्षात्काराचें व त्याच्या परिणामांचें एकत्र निवेदन केलें आहे.

सच्चिदानंद ईश्वराचें दर्शन झालें म्हणजे परमानंद झालाच पाहिजे, नाहीं तर तो आनंदमय स्वरूपाचा साक्षात्कारच नव्हे. त्याचप्रमाणें "ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति" (ब्रह्म जाणतो– अर्थात् प्रत्यक्ष अनुभवानें जाणतो–तो ब्रह्मच होतो) या वचनाप्रमाणें, ज्याला आनंदस्वरूपाचा साक्षात्कार झाला तो पुरुष आनंदमय झालाच पाहिजे. अशा आपल्या आनंदमय स्थितीचें सर्व साक्षात्कारी पुरुषांनीं प्रेमभरानें व उत्साहानें वर्णन केलें आहे. तसेंच महाराजांनींहि केलें आहे.

"आनंदाच्या कोटी। सांठविल्या आम्हां पोटीं ॥"
"झरा लागला सुखाचा। ऐसा मापारी कईचा ॥
जो हें माप तोंडें धरी। सळे झाली ते आवरी ॥"
"आनंदाचे डोहीं आनंदतरंग। आनंदचि अंग आनंदाचें ॥"
"सुखाचे व्यवहारीं सुखलाभ झाला। आनंद कोंदला मागें पुढें॥"
"आतां कोठें धावे मन। तुझे चरण देखिल्या ॥
भाग गेला शीण गेला। अवघा झाला आनंद ॥"

इतका अखंड आनंद प्राप्त झाल्यावर मन विषयाकडे कशाला धांवेल, काम कशाला उरेल व त्याचा पुत्र क्रोध तरी कशाला तोंड दाखवील? अर्थात् काम-क्रोधादि विकारांचा नाश व शांति, दया, क्षमा या सद्गुणांची प्राप्ति या आनंदांत सामावलेली आहे. दुःख व ताप तर अर्थात् नष्ट होतीलच. याप्रमाणें आपलें दुःख, दुर्गुण, विकार व वासना सर्व नष्ट झालीं असें महाराजांनीं निश्चितपणें सांगितलें आहे.

"धांवोनियां आलों पहावया श्रीमुख। गेलें माझें दुःख जन्मांतरिचें॥
ऐकलेंहि होतें तैसेंचि पाहिलें। मन स्थिरावलें तुझे पायीं ॥
तुम्हा आम्ही झालों अग्निरूप। न शिवें ते पापपुण्य आम्हां ॥"
"तुका म्हणे माझी इच्छा पूर्ण झाली। कांहीं न राहिली वासना हे॥"
"दैन्य दुःख आम्हां न येती जवळी। दहन हे होळी होती दोष॥"
"पापपुण्य गेलें। एका स्नानेंचि खुंटलें ॥"
"विषयीं विसर पडला निःशेष। अंगीं ब्रह्मरस ठसावला ॥"
"ठाव तुझ्या पाशीं। आतां झाला हृषीकेशी ॥"
"न लगे जागावें सतत। येथें स्वभावेंचि नीत ॥"

या आनंदानेंच महाराजांचें देवावर परम प्रेम जडलें व देवाचें आपल्यावर असेंच प्रेम आहे, हेंही प्रत्ययाला आलें. गोवत्साच्या रूपकानें ते सांगतात :

" शीतळ साउली आमुची माउली। विठाई वोळली प्रेमपान्हा॥
जाऊनी ओसरा रिघेन ओसंगे। लागेल ते इच्छे पिईन वरी॥
कृपातनू माझी सांभाळी दुभोनि । अमृतसंजीवनी लोटतसे ॥ "
" मागति याचे दोनचि कर । अमित भांडार दातयाचें ॥ "
" काय करूं आतां कासयांत भरूं। हा मज विचार पडला देवा॥ "
" एक साठवण प्रेमें ओसंडिली। जिव्हा हे भागली करितां माप॥ "
" आवडीची न पुरे धणी । प्रीति मनीं बैसली ॥ "

महाराजांच्या आकांक्षा कोणत्या होत्या हें दाखविणारे अभंग वर दिले आहेत. त्यांतील ईश्वरदर्शन, परमानंदानें त्रिविध तापांचा व दुर्गुणांचा निरास, सर्व सद्गुणांची प्राप्ति, देवभक्तांचें परस्परांवर गाढ प्रेम व त्यामुळें नवविधा भक्ति, या आकांक्षा पूर्ण झाल्या हें वरील अभंगावरून पाहिलें.

आतां, " अवघें देखें जन ब्रह्मरूप " या अनुभवाचें विवेचन करावयाचें आहे. " मी ब्रह्म " या अनुभवानंतर " सर्व ब्रह्म " हा अनुभव येतो असें साक्षात्कारी पुरुष सांगतात :—

" आदौ ब्रह्माहमस्मीत्यनुभव उदिते खल्विदं ब्रह्म पश्चात् ।"

( प्रथम ' मी ब्रह्म आहें ' हा अनुभव आल्यावर नंतर हें सर्व विश्व ब्रह्म आहे हा अनुभव येतो. )

" तुका म्हणे मी तों अवघाचि विरालों। विठ्ठलचि झालों दर्शनानें ॥ "
" अज्ञान हा देह स्वरूपीं मीनला । सर्व ओसावला देहभाव ॥ "
" तुकयास्वामी स्थापी निजपदीं दासा । करूनि उल्हासा सप्रेमता ॥ '
" तुज मज नाहीं भेद । केला सहज विनोद ॥ "
" लवण मेळवितां जळें । काय उरलें निराळें ॥ "
" जीवशिवा शेज रचिली आनंदें ॥ "

विठ्ठलदर्शनानें महाराज विठ्ठल झाले, अज्ञानाचा देह स्वरूपीं मिळाला, ईश्वरानें त्यांना निजपदीं स्थापिलें, ईश्वर केलें, असा आपला अनुभव त्यांनीं वरील वचनांत वर्णिला आहे. आतां—

" सर्व खलु इदं ब्रह्म " हा विचार पहा.

" रामराज्य राम प्रजालोकपोळ । एकाचि सकळ दुजें नाहीं ॥ "
" विवेकाची वीट आत्मा पंढरिराव । जेथें तेथें देव ठसावला॥"

कारण उघडच आहे; महाराज सांगतात. " होईल झाला अंगें देव जो आपण । तयासी हे जन अवघें देव ॥ " महाराज स्वतः देव झाले; साहजिक सर्व जनही त्यांना देवरूपच दिसूं लागलें. " देव झालें अवघें जन । दोष गुण हारपलें ॥ " आतां महाराजांना स्वतःसाठीं कांहींच मिळवावयाचें उरलें नव्हतें. खरी नैष्कर्म्यसिद्धि ती हीच.

" काम नाहीं, काम नाहीं । झालों पाही रिकामा ॥"
" एकएकी एकाएकी । तुका लोकीं निराळा ॥ "

त्यांनीं आपलें मरण आपल्या डोळ्यांनीं पाहिलें, त्या वेळीं तिन्हीं भुवनें आनंदानें दाटलीं. " आपुलें मरण पाहिलें म्या डोळां । तो झाला सोहळा अनुपम्य ॥ आनंदें दाटलें तिन्हीं त्रिभुवनें ।। " यापेक्षां श्रेष्ठ गुणातीतता ती काय उरली? महाराज कर्मधर्मातीत, तसेंच गुणातीतही झाले. तरी देवाचा निरोप, भूतदयेची प्रेरणा व विश्वबंधुत्वाचा सहज परिणाम म्हणून, एक कार्य तें करीत राहिले.

" सेवितों हा रस वांटितों आणिकां ॥ "
" अनुभवें आलें आंगा । तें या जगा देतसें "
" अनुभवाचे रस देऊं आर्तभूतां ॥ "
" तुका म्हणे मज धाडिलें निरोपा । मारग हा सोपा सुखरूप ॥ "
" बुडतां हें जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणोनियां ॥ "
" दयेसाठीं केला उपाधि पसारा ॥ "
" माझ्या मुखें मज बोलवितो हरी ॥ "

महाराजांच्या कृतार्थतेचें स्वरूप, त्यांच्या धन्यतेची उंची किती भव्य, थोर व स्फूर्तिदायक आहे, हें वरील संक्षिप्त विवेचनावरून दिसून येईल. ही कृतार्थता व धन्यता प्राप्त झाल्यानें त्यांचा " शेवटचा दिवस गोड झाला ". कोणाच्याही ध्येयवादाच्या निकषावर घांसून पाहिली तरी ही कृतार्थता व धन्यता उच्चतम ठरलीच पाहिजे; " सा काष्ठा सा परागतिः । " उच्चतम प्रीति व पावित्र्य, त्याची परिसीमा अशी स्थितप्रज्ञता, द्वंद्वातीतता,

निस्त्रैगुण्य व गुणातीतता, विश्वबंधुत्वाच्या भावनेनें सहज घडणार. परोपकार किंवा मानवतेची सेवा, विश्वाचें ज्ञान, म्हणजे विश्व हें ब्रह्मच आहे, दुसरें कांहीं नाहीं हा अनुभव, परमानंद, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी महाराज पूर्णतेच्या शिखराला पोंहोचलेले दिसतात. हाच त्यांचा शेवटचा गोड दिवस. यापेक्षां गोड काय असणार? "शेवटचा दिवस" हे शब्दहि अर्थपूर्ण आहेत. तुमचा आमचा शेवटचा दिवस म्हणजे मृत्यूचा; महाराजांचा शेवटचा दिवस म्हणजे कालातीत होण्याचा. आधीं कांहीं पुण्याई करून ठेवून मृत्यूचा दिवस गोड केला, मृत्यूनंतर सद्गति मिळेल अशी कमाई केली; असा "शेवटचा दिवस" या शब्दांचा अर्थ खास नव्हे. "मेल्यावरी मोक्ष", हा अज्ञ जनांचा विश्वास. "याचि देहीं याचि डोळां," मुक्तीचा सोहळा महाराजांना पहावयाचा होता व तो त्यांनीं पाहिला. स्वतः विठ्ठल-स्वरूप होऊन, सर्व जन विठ्ठलस्वरूप आहेत असा अनुभव घेऊन, ते दिक्कालातीत झाले. हा अनुभव आला तोच त्यांचा शेवटचा दिवस. पुढें ते केवळ "उपकाराकरितां उरले" होते. आनंदमय अवस्थेंत, लोकांना अत्यानंदाचा रस वांटीत, आत्मानंदाच्या प्राप्तीचा मार्ग सांगत, प्रारब्धानें राहिलेलें आयुष्य ते घालवीत होते; किंबहुना, तसें तें आयुष्य जात होतें असें म्हटलें तर अधिक योग्य होईल. हाच विचार प्रतिपाद्य अभंगांतील "तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी। आता दिवस चारी खेळीमेळीं ॥ या चरणांत सांगितला आहे.

यापमाणें "शेवटचा दिवस गोड व्हावा" म्हणून महाराजांनीं कशा प्रकारचा अट्टाहास केला हें सांगून हा लेख संपवावयाचा आहे. सद्गुरु बाबाजी चैतन्य यांच्या कृपेनें मिळालेल्या नामाचें स्मरण हेंच त्यांचें मुख्य साधन होतें. त्याचें अखंड, प्रेमयुक्त, दीर्घकाल स्मरण राहण्यासाठीं त्यांनीं केलेले भगीरथ प्रयत्न, सोसलेले नानाप्रकारचे शारीरिक व मानसिक कष्ट, आशानिराशेच्या हिंदोळ्यावर खाल्लेले झोंके, मनाशीं व जनाशीं केलेलें युद्ध हाच त्यांचा अट्टाहास; त्याचेंहि फार हृदयस्पर्शी व प्रांजल निवेदन त्यांच्या अभंगांत सांपडतें. परंतु आपल्याला त्याचा विचार करण्याला सवड नाहीं; त्याचें केवळ ओझरतें दर्शन घ्यावयाचें आहे.

नामस्मरणाचें साधन करून इश्वरप्राप्ति होण्याला दीर्घकाल लागतो. त्या कालांत अनेक आपत्ति येण्याचा संभव असतो; श्रद्धा ढळते, मन चंचल होतें, धीर खचतो. यासाठीं धैर्य पाहिजे. संकटांना न भितां, दुःखांना न डगमगतां, साधन करीत राहिलें पाहिजे. तर शेवट गांठतां येईल. भक्ति कठीण, सुळावरची पोळी आहे. म्हणून त्यांनीं मनाला उपदेश केला:–

"स्नेहवादें दुःख जडतसें अंगीं । निष्ठुर हें जगीं प्रेमसुख ॥"
"निंदास्तुति कोणी करी दयामाया । न धरी चाड या सुखदुःखा ॥"
"तुका म्हणे मना पाहे विचारूनि । होई रे कठिण वज्राऐसा ॥"

देवाच्या नांवाला दोष लागेल असें कांहीं प्राणांतींही न करण्याची त्यांनीं देवाला ग्वाही दिली व ती पाळली.

"लागों नेदी बोल पाया तुझ्या हरी । जीव जावो परी न करी आण ॥
परनारी मज रखुमाई समान । वमनाहुनी धन नीच मानी ॥"

दंभ व ताठा यांचा मळ लागूं नये म्हणून अज्ञानच भूषण मानिलें व ईश्वराची भावना करून सर्व भूतांना वंदन केलें. याप्रमाणें अभिमानाचा नायनाट केला.

"विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ॥
सेवा चुकती संताची । हेचि नागवण फुकाची ॥
गर्व होतो ताठा । जातों यमपंथ वाटा ॥"
"वंदीन मी भूतें । आतां अवघींच समस्तें ।
तुमची करीन भावना । पदोपदीं नारायणा ॥"

लाज, आळस, निद्रा यांचीच काय पण देहाचीच उपेक्षा केली व "मी माझें" टाकून देवाचें चिंतन केलें :

"आतां लाजे येथें नाहीं तुझें काम । जाई मज राम आठवों दे॥"
"आपुला तो देह आम्हां उपेक्षित । नाही या धरीत जीविताची चाड॥"
"तुका म्हणे असों चिंतोनियां देवा । मी माझें हा हेवा सोडोनिया ॥"
"वाहियलें देह देवा एकसरें । होईल तें बरें तेणें द्वारें ॥

याप्रमाणें, नैतिक तयारी करून, कठोर वैराग्य धरून, देहाची व प्राणांचीही उपेक्षा करून, त्यांनीं भक्तिमार्ग आक्रमावयास सुरुवात केली; त्याला

अत्यंत अवश्य, पोषक व उपकारक असलेली संतसंगति विनम्र भावानें धरली. संतांसंबंधीं त्यांचा प्रेमादर व त्यांची नम्रता निरुपम आहे. "मी पतित, तुमची कीर्ति कशी वानूं ! मस्तक चरणीं ठेवितों; हेंच कीर्तीचें गान. तुमच्या चरणीं सदा राहीन; तुमचे चरणरज लाभले तर स्वतःला धन्य मानीन. नामरूपीं चित्त जडलेल्या संतांचा मी अंकित दास आहें. तुम्हीच माझे मायबाप, सगेसोयरे. तुमच्या गांवीं प्रेमाचा सुकाळ, विठ्ठल हेंच भांडवल, हरिकथेचें भोजन, उपदेशाची पेठ; तेथें प्रेमसुखच देतां व घेतां; दुसरा पदार्थच तुमच्या जवळ नाहीं. म्हणून मी तुमच्या दारीं याचक, भिकारी झालों."असा संतांचा गौरव करून त्यांनीं आत्महितासाठीं त्यांच्या संगतीचा पूर्ण लाभ घेतला. "निष्ठावंत भाव भक्तांचा स्वधर्म" हा महाराजांचा सिद्धान्त;अशा भावाच्या बळानें त्यांनीं देवाची प्राप्ति करून घेतली. म्हणून भावाचा थोडा विचार करूं. जगांत ईश्वराशिवाय गोमटें कांहीं नाहीं, म्हणून आपलें सर्वस्व देवाला अर्पण करणें, देवाच्या प्राप्तीसाठीं नितांत तळमळ, उत्कंठा, व्याकुळता, स्वतःला उखतें देवाच्या हातीं देणें, प्राणपणानें त्याच्या दर्शनासाठीं प्रयत्न, दर्शनाला उशीर लागल्यामुळें हळहळ खंती, भेटीसाठीं मन उतावीळ, भक्तिप्रेमावांचून जिणें लाजिरवाणें वाटणें, "देवा धांव धाल, तुझ्यावांचून मला कोणी नाहीं," अशा करुण वाणीनें धाय मोकलणें, हीं भावाचीं कांहीं लक्षणें होत. एकविध भावाचें चित्रण करणारीं महाराजांचीं कांहीं वचनें खालीं देत आहें; त्यावरून 'भाव' या शब्दाची बरीच कल्पना येईल.

"कृष्ण माझी माता, कृष्ण माझा पिता ।
तुका म्हणे माझा श्रीकृष्ण विसांवा ॥
"आतां सर्व भावें हा माझा निर्धार । न करी विचार आणिकासी ॥
सर्वभावें नाम गाईन आवडी । सर्व माझी जोडी पाय तुझे ॥
लोटांगण तुझ्या घालीन आंगणीं । पाहिन भरोनि डोळे मुख ॥
निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं । येवों नेदी मना शंका कांहीं ॥
अंकित आंकिला दास तुझा देवा । संकल्प हा जीवा तुका म्हणे ॥
"देहभाव आम्ही राहिलों ठेवोनी । निवांत चरणीं विठोबाच्या ॥"
"देह तुझ्या पायीं । ठेवोनी झालों उतराई ॥"

" आतां तुझी सत्ता । येथें सकल अनंता ।। "
" क्षणक्षणा जीवा वाटतसे खंती । आठविती चित्तीं पाय देवा।।"
" तुका म्हणे माझ्या जीवींच्या जीवना । घाला नारायणा उडी वेगें ।।
" तुका म्हणे देह देईन सांडणें । सहित अभिमानें ओंवाळोनी ।। "
" तुझीया पाळणा ओढतसे मन । गेलों विसरोनि आपणासी ।। "
" समर्पूनी ठेलों देह हा सकळ । "
" माझें मन पाहें कसून । चित्त न ढळें तुजपासून ।
" कापुनि देईन शिर । पाहे कृपण कीं उदार ।। "
" वाट्ली पाहतां शिणले डोळुले । दाविसी पाउलें कै वो डोळां ।।"
" करावा वर्षाव । तृषाक्रांत झाला जीव ।।"
" तळमळें चित्त दर्शनाची आशा । बहु जगदीशा करुणा केली ।।"
" तुजलागीं माझा जीव झाला पिसा । अवलोकी दिशा पांडुरंगा।।"
" तुका म्हणे माझी कळवळ्याची कींव । भागलासे जीव कर्तव्यानें।।"
" विठ्ठला विठ्ठला । कंठ अळवीतां फुटला ।।"

अंतःकरणाच्या तळमळीचें हें सर्व दुःख महाराजांनीं भोगलें, सोसलें; देवाशीं निकराचें भांडण केलें, त्याला अनेक प्रकारें दोष दिला; शेवटीं " माझे लेखीं देव मेला । असेल त्याला असों दे । " व " करितों जीवा नाश तुझ्यासाठीं " असें देवाला निष्ठुरपणें सांगण्यापर्यंत त्यांची मजल गेली. इतकें झाल्यावर अहंकार कोठें राहिला? महाराजांचा अहंप्रत्यय याप्रमाणें पूर्णपणें अस्त पावला व देवानें त्यांना दर्शन दिलें. तेव्हां अत्यंत आनंदानें, प्रेमभावानें व कृतज्ञतेनें ते म्हणतातः—

" कोण पुण्य फळा आलें । आजि देखिलीं पाउलें ।।
ऐसें नेणों नारायणा । संतीं सांभाळिले दीना ।।
कोण लाभ काळ । दिन आजीचा मंगळ ।।
तुका म्हणे झाला । येवढा लाभ कां विठ्ठला ।। "

महाराजांनीं ईश्वरप्राप्तीसाठीं केलेला अट्टाहास व त्यानें गोड झालेला शेवटचा दिवस यांचें यथामति विवेचन केलें. महाराजांचें आम्हां सर्वांना असें आश्वासन आहे, कीं " याच मार्गानें गेलांत तर तुम्हीहि आपला शेवट दिवस गोड करूं शकाल; इतकेंच नव्हे, तर इतरांनाही आपला

शेवटचा दिवस गोड करण्याला साहाय्य व्हाल. " देव आला, देव आला। खरें कीं पहा खोटें तें ॥ " व " देव होसी तरी आणिकांतें करिसी। संशय ये विषीं करणें न लगे ॥ " या दोन वचनांत महाराजांनीं सर्वांना हेंच अभिवचन दिलें नाहीं का? त्यांच्याप्रमाणें अट्टाहास मात्र केला पाहिजे. आपण सेविलेला रस आम्हां सर्वांना ते वांटीत आहेत. मग आम्हीं तो सेवन करणार कां रानभरी होऊन त्याचा त्याग करणार? या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाचें उत्तर प्रत्येकानें आपापल्या अंत:करणाला द्यावयाचें आहे.

—( माउली )

---

# ४. दासबोध : भक्ति हा सद्‌गुणांचा मुकुटमणि

शांति, क्षमा, दया, सत्य, अहिंसा इत्यादि अनेक सद्‌गुण आपल्या सहज लक्षांत येतात व त्यांची आवश्यकताहि समजते. त्यांच्या विरोधी दुर्गुणांचेंहि ज्ञान असतें. दुर्गुणत्याग व सद्‌गुणसंपादन हीं सुसंस्कृत, सुखी जीवनाला अत्यंत आवश्यक आहेत, हा सिद्धान्त सर्वांना मान्य आहे. याच्या उलट वर्तन करतात ते या सिद्धान्ताच्या अज्ञानामुळें नव्हे, तर सुखलोलुपतेमुळें, विषयासक्तीमुळें. "Hypocracy is the homage which vice pays to virtue." हें मोठें सूचक वचन आहे. व्यसनी लोकहि निर्व्यसनतेचा, सद्‌गुणांचा आव आणतात; हा त्यांचा दंभ म्हणजे दुर्गुणांनीं सद्‌गुणांची थोरवी मान्य करणेंच होय. परंतु संग्रथन-पद्धतीनें (Synthetic method) सद्‌गुणांचा विचार करतांना महत्त्वाची गोष्ट ही असते, कीं सर्व सद्‌गुणांमध्यें एकसूत्रतेचा कांहीं धागा आहे का, त्यांचें परस्परांशीं कांहीं नातें आहे का, तें शोधणें. गुरुदेव रानडे यांनीं आपल्या ग्रंथांत सद्‌गुणांतील नातें स्पष्ट करून दाखविलें आहे. त्या दृष्टीनें दासबोधांतील सद्‌गुणांचा विचार करावयाचा आहे. गुरुदेव रानडे सांगतात, कीं सद्‌गुण-दुर्गुणांची नुसती यादी करणें याला नीति-शास्त्राच्या दृष्टीनें महत्त्व नाहीं. त्यांमधील एखादा सद्‌गुण मुख्य किंवा केंद्रीय असून, इतर सद्‌गुण त्या केंद्रीय सद्‌गुणाचेच पैलू, आविष्कार, साधनें किंवा परिणाम आहेत हें दाखविलें पाहिजे. असे प्रयत्न प्लेटोच्या कालापासून पाश्चात्त्य नीतिशास्त्रज्ञांनीं केले आहेत. प्रत्येक तत्त्वज्ञानें आपापल्या मतें एकेका सद्‌गुणाला मुख्य स्थान दिलें आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल, पायथॅगोरस, सेंट ऑगस्टाइन, स्पायनोझा, सिजविक, बेंथाम, लो. टिळक आणि म. गांधी यांनीं अनुक्रमें न्यायबुद्धि, सुवर्णमध्य, सुसंवादिता, ईशभक्ति, ईश्वराविषयीं बौद्धिक प्रेम, न्यायशीलता, परोपकर, निष्काम कर्म व सत्य-अहिंसा या सद्‌गुणांना

११५

मुख्य, केंद्रीय मानलें आहे. गुरुदेव रानडे यांच्या मतें भक्ति हा सद्गुणांचा मुकुटमणि होय. भगवद्गीता व हिंदी संत यांनीहि भक्ति हाच मुख्य सद्गुण म्हणून प्रतिपादिला आहे, असें त्यांनीं म्हटलें आहे.

समर्थांच्या मतेंहि भक्ति हीच सद्गुणांची सम्राज्ञी होय. याचें कारण उघडच आहे. ईश्वरप्राप्ति हेंच मनुष्यमात्राचें ध्येय आहे, त्यावांचून जीवनाची सार्थकता होणार नाहीं, हेंसमर्थांचें निश्चित मत, स्वानुभवानें जाणलेला हा त्यांचा महान् सिद्धान्त होता, यांत कांहींच शंका नाहीं. 'आधीं केलें मग सांगितलें', या आपल्या नियमाप्रमाणें, त्यांनीं स्वतः थोर भक्ति–साधन करून ईश्वर मिळविला व ते स्वरूपाकार होऊन धन्य झाले, आनंदरूप झाले; आणि नंतरच हें भाग्य संपादन करून घेण्याचा त्यांनीं जगाला उपदेश केला. "भक्तीचेनि योगें देव । निश्चयें पावती मानव ।" हाच दासबोधाचा अभिप्राय आहे; अर्थात् ईश्वरप्राप्ति हें ध्येय व भक्ति हा तें संपादन करण्याचा मार्ग, हेंसांगण्याकरतां दासबोध लिहिला आहे. दासबोधच नव्हे तर समर्थांचें सर्वच लिखाण भक्तीच्या वैभवानें नटलेलें आहे. परमार्थ हा त्याचा विषय आहे. परंतु प्रकृति–स्वभावानुरूप त्यांच्या हातून मोठें राजकारण व समाजकारणहि घडलें. राजकारण व समाजकारण सद्यः फलदायी असतें. त्यांतील कामगिरी लोकांच्या डोळ्यांत चटकन भरते. परमार्थाचें कार्य कालातीत असतें; त्याचे परिणाम सहज दिसत नाहींत. आजकाल तर समाजकारणाशिवाय दुसरें ध्येयच पुष्कळांना दिसत नाहीं. अर्थात् समाजकारण याचा अर्थ लोकांना शारीरिक सुखसोयी देणें, थोडेंफार शिक्षण देणें एवढाच ते करतात. "Man does not live by bread alone." (मनुष्य नुसत्या भाकरीवर, आहारनिद्रादि शारीरिक गरजांच्या पूर्ततेनें, सुखानें जगूं शकत नाहीं,) हें बहुधा ध्यानांत येत नाहीं. अन्नवस्त्र, करमणूक, कांहीं बौद्धिक सुख एवढेंच मानवाला हवें आहे व तें प्राप्त करून देणें म्हणजे समाजकारण असें मानलें जातें. यामुळें समर्थांच्या राजकारणाकडे पुष्कळांचें इतकें लक्ष वेधलें गेलें, कीं ते केवळ राजकारणी पुरुष होते, परमार्थ हा त्यांनीं राजकारणाला पोषक, लोकांचें मन राजकारणाकडे वळविण्याचें साधन म्हणून प्रतिपादिला असें सांगणारा एक मोठा संप्रदाय निर्माण

झाला. समर्थ व ज्ञानदेव–तुकारामादि इतर संत असे दोन गट या संप्रदायानें केले व इतर संत समाजाला पारखे झालेले, टाळकुटे असल्याचा उपहासहि त्यानें केला. म्हणून हें मत चुकीचें कसें आहे, तें दाखविण्यासाठीं ईश्वरप्राप्ति हेंच समर्थांनीं प्रतिपादिलेलें ध्येय होय व भक्ति हें त्याचें साधन होय, हें स्पष्ट करणारे दासबोधांतील उतारे पुढें दिले आहेत :—

या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तम पदें ।
अहंता सांडूनि स्वानंदें । सुखी झाले ॥ १।१०,१९
देह परमार्थी लावलें । तरीच त्याचें सार्थक झालें ।
नाहीं तरी हें वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्युपंथें ॥१।१०,६१
असो ऐसे सर्वहि ( मृत्युपंथें ) गेले । परंतु येकचि राहिले ।
जे स्वरूपाकार झाले । आत्मज्ञानी ॥ ३।९,५९
जे अंकित ईश्वराचे । तयासी सोहळे निजसुखाचे ।
धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ॥ ३।१०:१२
धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं ।
तेहींच येक जन्म जनीं । सार्थक केला ॥ ३।१०,२३
आयुष्य हेंचि रत्नपेटी । माजीं भजन रत्नें गोमटीं ।
ईश्वरीं अर्पूनिया लुटी । आनंदाची करावी ॥३।१०,२७
हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिका वरिष्ठ ।
सदासर्वदा संतुष्ट । नैराशबोधें ॥ ३।१०,२८

अशा शेंकडों ओव्या देतां येतील; परंतु आपला मुद्दा सिद्ध करण्याला या पुरेशा आहेत.

आतां यापेक्षां थोडें खोल जाऊन समर्थांच्या तत्त्वज्ञानाचा विचार केला तरीहि त्यांचा कर्मयोग ईश्वराधिष्ठित होता हें सहज ध्यानांत येईल. आत्माच परमेश्वर, तोच सर्व करतो, सर्व कर्तृत्व त्याच्याकडे आहे आणि थोर पुरुष त्याचे अंश म्हणून त्यांच्यामध्येंहि कर्तृत्व दिसून येतें असा त्यांचा सिद्धान्त आहे :

अगाध गुण भगवंताचे । वेद वर्णू न शके वाचे ।
वेदविधि तेहि कांचे । देवेंविण ॥

आत्माराम सकळां पाळी । अवघें त्रैलोक्य सांभाळी ।
तया येकेंवीण धुळी । होये सर्वत्रांची ॥
जेथें आत्माराम नाहीं । तेथें उरों न शके कांहीं ॥
समजणें हें विवेकाचें । तेंहि आत्म्यावीण कैचें ।
कोणीं येकें जगदीशाचें । भजन करावें ॥
उपासना प्रगट जाली । तरी हे विचारणा कळली ।
या कारणें पाहिजे केली । विचारणा देवाची ॥
उपासनेचा मोठा आश्रयो । उपासनेवीण निराश्रयो ।
उदंड केलें तरी जयो । होणार नाहीं ॥
समर्थाची नाहीं पाठी । तयासी भलताचि कुटी ।
याकारणें उठाउठीं । भजन करावें ॥
भजन साधन अभ्यास । येणें पाविजे परलोकास ।
दास म्हणे विश्वास । धरिला पाहिजे ॥ १६-१०-२३.३१
जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश ।
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥ १७।१,२९
त्या तिहीं देवासी ज्याची सत्ता । तो अंतरात्माचि पाहतां ॥
कर्ता भोक्ता तत्त्वता । प्रत्यक्ष आहे ॥

आत्मा सर्व कांहीं करतो; त्याचें भजन केलें म्हणजे साधकाच्या अंतःकरणांत तो आत्मा अधिकाधिक जाग्रत होतो आणि त्यामुळें आत्म्याचा अंश म्हणून अनेक सद्‌गुण, कर्तृत्व, यश-कीर्ति-प्रताप साधकाच्या ठिकाणीं दिसूं लागतात, हेंच तत्त्व वरील ओव्यांत आणि अशाच अर्थाच्या अनेक ओव्यांत समर्थांनीं सांगितलें आहे. धर्मसंस्थापनेचा हव्यास, भक्ति वाढविणें, सर्व लोकांना भक्तिमार्गाला लावणें हें त्यांच्या महापुरुषाचें मुख्य कार्य होय. हेंच कार्य स्वतः समर्थांनीं केलें. त्यांचें राजकारण व समाजकारण म्हणजे या कार्याचाच एक भाग होता.

सत्ता पृथ्वीमध्यें वांटली । जेथें तेथें विभागली ।
कळेनें सृष्टी चालली । भगवंताचे ॥
प्रगट रामाचें निशाण । आत्माराम ज्ञानघन ।
विश्वंभर विद्यमान । भाग्यें कळे ॥

उपासना धुंडून पाहिली । तों ते लांबतचि गेली ।
महिमा न कळे बोलिली । यथार्थ आहे ॥
सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें ।
परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥
कर्ता जगदीश हें तों खरें । परि भाग आला पृथगाकारें ।
तेथें अहंतेचें काविरें । बाधिजेना ॥
सकळ कर्ता परमेश्वरु । आपुला मायिक विचारु ।
२०।४,६,१४,१५,२६,२७,२९
जितुके कांहीं उत्तम गुण । तितुकें आत्मयाचें लक्षण ।
शुद्ध आत्मा उत्तम गुणी । शबळ आत्मा अवलक्षणी । २०।७,८-९

कर्ता अंतरात्मा, आपण त्याचे पृथक् अंश असलों तरी आपल्या देहांतून तो कार्य करतो, त्याचा अभिमान धरतां कामा नये, हें वरील ओव्यांत समर्थांनीं सांगितलें आहे. मात्र आत्म्याचे उत्तम गुण आपल्या देहांतून प्रगट होण्यासाठीं तो शुद्ध केला पाहिजे आणि भक्तीनें तो शुद्ध होतो. अर्थात्, सर्व सद्गुणांचें व कर्तृत्वाचें मूळ भक्तिच होय, असेंहि समर्थांनीं अनेक ठिकाणीं प्रतिपादिलें आहे.

नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ।
महापापी तेचि झाले । परम पवित्र ॥
महादोषांचे गिरिवर । रामनामें नासती ॥
नाम स्मरतां पुण्यश्लोक । होइजे स्वयें ॥ ४।३,१८,२०,२२
अरे या आत्मयाची चळवळ पाहे । ऐसा भूमंडळीं कोण आहे ।
अगाध पुण्यें अनुसंधान राहे । कांहीं येक ॥
त्या अनुसंधानासरिसें । जळोनि जाइजे किल्मिषें ॥
अंतर्निष्ठ तितुके तरले । अंतर्भ्रष्ट तितुके बुडाले । १९।१,२२ते२४

स्वतः भक्ति करून साक्षात्कार झाल्यावर समर्थांनीं भक्तीचा प्रसार केला व सर्वांना भक्तीचा प्रसार करण्याचाच उपदेश केला. मानवतेचें कल्याण ज्या ज्या कार्यांत आहे असें थोर पुरुषांना वाटतें त्या त्या कार्याची परंपरा सतत चालू राहावी यासाठीं ते कटाक्षानें प्रयत्न करतात. शास्त्रीय संशोधन, शिक्षण, आरोग्यरक्षण, नीति-शिक्षण, कलानिर्मिति यांचें सातत्य

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम क्रमांक दि:

राखण्यासाठीं अगणित द्रव्य व अनेक संस्था यांच्या साहाय्यें कार्य होत असतें. मानवतेचें कल्याण भक्तींत सामावलेलें आहे, हें इतर संत-महात्म्यांप्रमाणें समर्थांना निश्चितपणें माहीत होतें; म्हणून त्यांनीं भक्तीचा प्रसार करण्याचा सर्वांना आदेश दिला.

अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग । ११।१०,१९
महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे । ११।१०,२५
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ।। १२।९,२६
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनासी सांगावें ।
तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ।। १२।१०,२
ऐसा उत्तम गुणी पुरुष । तयास म्हणावें पुरुष ।
ज्याच्या भजनें जगदीश । प्रसन्न होय ।। १२।१०,१५
ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव ।
भक्तियोगें देवाधिदेव । आपला करावा ।।
आपण अवचिता मरोनी जावें । मग भजन कोणें करावें ।
या कारणें भजनासी लावावे । बहुत जन ।।
आपणामागें जगदीशासी । भजत जावें । १२।१०, ३२, ३४
उपासनेचें उत्तीर्ण व्हावें । भजन देवाचें वाढवावें ।। १५।१०,३३
उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती जाली ।।१५।९,२६
ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमाना ।।
नेऊनि घाली निरंजना । पैलीकडे ।। १५।९,२९

व्यक्तीच्या दृष्टीनें 'परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।' व मानवतेच्या दृष्टीनें उपासना विश्वपाळिती आहे, ती मानवाला निरंजनापलीकडे नेऊन घालते, म्हणून भक्ति हेंच समर्थांच्या मतें उच्चतम मूल्य, केंद्रीय सद्गुण होय. मानवाच्या कल्याणासाठीं सत्य, अहिंसा, कर्मयोग, परोपकार, भूतदया, न्याय इत्यादि अनेक मूल्यें आपापल्या मताप्रमाणें थोर पुरुषांनीं रक्षणीय म्हणून सांगितलीं, प्रत्येकानें यांपैकीं एकेका मूल्याला, सद्गुणाला उच्चतम स्थान दिलें. समार्थांनीं तें स्थान भक्तीला दिलें. इतर सर्व थोर मूल्यें, सर्व सद्गुण, भक्तींत सामावलेलीं आहेत, असें त्यांचें सांगणें आहे. सर्व सद्गुण भक्तीचीं साधनें, पैलू किंवा

परिणाम आहेत, हा सिद्धान्त त्यांनीं गुरुदेव रानडे यांच्याप्रमाणें स्पष्टपणें तपशीलवार मांडलेला नाहीं, हें खरें. तरी तो त्यांच्या शिकवणींत अनुस्यूत आहे. तो गुरुदेवांच्या सिद्धान्ताच्या अनुरोधानें मांडावयाचा आहे. या सिद्धान्ताविषयीं विवेचन करण्याची स्फूर्ति गुरुदेवांना सेंट ऑगस्टाईनच्या विचारांवरून मिळाली. सेंट पॉल, सेंट ऑगस्टाईन व सामान्यतः ख्रिस्ती धर्म हे श्रद्धा, आशा व ईश्वर-प्रेम यांना साधकाचे मुख्य गुण मानतात. यासंबंधीं सेंट ऑगस्टाईनचे खालील विचार गुरुदेवांच्या Pathway to God in Hindi Literature या ग्रंथांत उद्धृत केले आहेत.

" श्रद्धा व ईशप्रेम एकमेकांत मिसळलेलीं आहेत; त्यांना वेगळे काढतां येत नाहीं. ईश्वरकृपेनें प्राप्त झालेल्या ईशप्रेमाच्या बीजापासून श्रद्धा उत्पन्न होते; मग श्रद्धा प्रेम दृढ करते; आणि श्रद्धा व प्रेम या दोहींपासून आशा उत्पन्न होते. ईशप्रेमाची शेवटीं पूर्ण सफलता होईल या आशेनें त्या सफलतेची उत्कट ओढ लागते. आतां देवासाठीं भक्ति अव्यभिचारी राखणें याचेंच नांव संयम, ईश्वरासाठीं पाहिजे तें दुःख सोसण्याची सिद्धता म्हणजे धैर्य, प्रेमानें एक ईश्वराचीच सेवा करणें व त्यासाठीं सरळपणानें वागणें हेंच न्यायाचें स्वरूप आणि भक्तीला पोषक तें शहाणपणानें स्वीकारणें व बाधक तें त्यागणें याचेंच नांव विवेक. " (पृ. ९३)

वर सेंट ऑगस्टाइननें भक्तीचा इतर कांहीं सद्‌गुणांशीं संबंध दाखविला आहे, तसाच दासबोधांतील सद्‌गुणांचा भक्तीशीं कसा संबंध येतो, तें आतां पहावयाचें आहे. शिष्य व साधक यांचें ध्येय ईश्वरप्राप्ति; अर्थात् त्यांचा मुख्य गुण भक्ति. या दोघांचीं व सत्त्वगुण इत्यादींचीं लक्षणें सांगणाऱ्या समासांत भक्तीबरोबर इतरहि अनेक सद्‌गुणांची आवश्यकता प्रतिपादिली आहे. अर्थात् हे इतर सद्‌गुण भक्तीला पोषक व भक्तीचे आविष्कार आहेत, हें उघड आहे. म्हणून त्यांचें भक्तीशीं काय नातें आहे तें पाहूं. सर्व सद्‌गुणांचा विचार करणें शक्य नाहीं, आवश्यकहि नाहीं; तेव्हां पुढील सद्‌गुणांचा विचार करूं. त्यावरून इतर सद्‌गुणांचें भक्तीशीं असलेलें नातें लक्षांत येईल.

( १ ) **वैराग्य** किंवा **अनासक्ति** : विषयाबद्दल आसक्ति असेल तर देवाकडे चित्त लागणार नाहीं, मन विषयांतून बाहेर पडणार नाहीं. म्हणून वैराग्य किंवा अनासक्ति भक्तीला अत्यंत आवश्यक आहे. देवाबद्दल आसक्ति म्हणजे विषयाबद्दल अनासक्ति. " ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लौकिक । " ही भक्तिमार्गाच्या वाटचालींची दिशा आहे. हेंच ज्ञानेश्वर–तुकाराम यांनींहि म्हटलें आहे. " स्वरूपाचिया प्रसरा । लागीं प्राणेंद्रियशरीरा । आटणी करणें जे वीरा । या नांव तप ॥ " असें वचन ज्ञानेश्वरींत आहे. ' प्रपंच वोसरो । चित्त तुझें पायीं मुरो ॥ " असें तुकारामांनीं देवाला विनविलें आहे.

( २ ) **धैर्य** : भक्तीचें साक्षात्काररूपी फळ मिळविण्याला दीर्घकाल लागतो. या दीर्घकालांत अनेक संकटें येतात, विकल्प व संशयहि उत्पन्न होतात. धैर्य नसेल तर हीं संकटें सोशीत भक्तिमार्गावर अचल राहतां येणार नाहीं. एका गुजराती कवीनें म्हटल्याप्रमाणें, ' हरिनो मारग छे शूरानो । न हि कायरनो काम, जोने । ' तुकाराम म्हणतात, " धीरचि कारण । साह्य होतो नारायण ॥ "

( ३ ) **विवेक** : भक्तीला पोषक तें स्वीकारून घातक तें टाकणें भक्तीच्या वाढीला आवश्यक आहे. विवेकावांचून हें करतां येणार नाहीं; भक्तीला पोषक काय व घातक काय तेंच कळणार नाहीं. समर्थ म्हणतात, "जितुका भोळा भाव । तितुका अज्ञानाचा उपाव।अज्ञानें तरी देवाधिदेव । पावेल कैचा ॥ "

( ४ ) **दया** : सर्वभूतीं ईश्वर आहे, अशी भक्ताची श्रद्धा पाहिजे. अशी श्रद्धा असल्यावर भूतमात्राबद्दल दया वाटेलच. त्याचप्रमाणें, ईश्वर दीनदयाळु आहे, त्यानें सर्व भूतें उत्पन्न केलीं आहेत व तोच परमकारुणिक त्यांचें पालन करतो, हें तत्त्व मान्य असलेला भक्त कारुणिकच असला पाहिजे. दया नसलेला भक्त दयासागराची कृपा कशी संपादन करूं शकेल ? दयेमध्यें अहिंसेचा सहजच अंतर्भाव होतो.

( ५ ) **क्षमा** : अनासक्ति व दया हे दोन गुण असल्यावर क्षमा आपोआप उत्पन्न होते. क्षमा नसेल तर मनांत वैरभाव राहून द्वेषाचे विचार उत्पन्न होतील व देवाचें चिंतन करणें अशक्य होईल.

( ६ ) **परोपकार :** दयेचें क्रियात्मक स्वरूप म्हणजे परोपकार. दयेची परिणति परोपकारांत झाली नाहीं तर, दया वाढलीच नाहीं असें म्हटलें पाहिजे.

( ७ ) **जगमित्रता** किंवा **विश्वबंधुत्व** : "आत्मवत् परावे ते । मानीत जावे," हें भक्ताचें महत्त्वाचें लक्षण आहे. मी – माझें ही वृत्ति आहे तोंपर्यंत भक्ति करतां येणार नाहीं. देहभावाच्या चिंतनांतच मनुष्य गुंतून राहील. देहभाव कमी होण्याला विश्वबंधुत्वासारखा दुसरा उपाय नाहीं. कर्नाटकांतील एका थोर पुरुषानें म्हटल्याप्रमाणें, " दुसऱ्याच्या सुखसंतोषाकडे लक्ष असलें म्हणजे स्वतःच्या लाभतोट्याकडे लक्ष जात नाहीं. "

( ८ ) **गुरुभक्ति** व **श्रद्धा :** वर सांगितल्याप्रमाणें भक्तीचें फळ मिळण्याला म्हणजेच ईश्वरप्राप्ति होण्याला दीर्घकाल लागतो. या दीर्घकालांत गुरुभक्ति व श्रद्धा यांचाच भक्ताला आधार असतो.

( ९ ) **शुचिता :** मन शुद्ध नसेल, वासनांनीं भरलेलें असेल तर ईश्वराचें ध्यानच करतां येणार नाहीं. तें सदा प्रक्षुब्ध राहील. शुचितेवांचून शांति नाहीं आणि शांतीशिवाय भक्ति नाहीं. म्हणून शुचिता व शांति भक्तीला अत्यंत आवश्यक आहेत.

( १० ) **अभय :** कर्ता ईश्वर आहे, तो सर्वशक्तिमान व परमदयाळू आहे. तेव्हां तो करतो तें योग्यच असलें पाहिजे या श्रद्धेतून अभय उत्पन्न होतें. त्याचप्रमाणें, ईश्वराची कृपा व आनंद यांचा अनुभव आला म्हणजे भयाचें कारणच उरत नाहीं. " आनंदं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन. न बिभेति कुतश्चन " असें उपनिषदांत म्हटलें आहे.

( ११ ) **आचारशीलता :** भक्ति व सद्गुण वाढविणारे आचार सतत करीत गेल्यावांचून भक्ति व सद्गुण दृढमूल होत नाहींत. " आचारप्रभवो धर्मः " म्हणूनच " आचारः प्रथमो धर्मः " म्हणून आचारशीलता हा भक्ताचा महत्त्वाचा गुण आहे.

( १२ ) **शरणागति :** " सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज " ही भक्तिभावाची पराकोटी आहे. सर्वज्ञ, सर्वशक्ति, परमकारुणिक ईश्वर हा एकच कर्ता आहे. त्याच्या इच्छेशिवाय कांहींहि हालत नाहीं, अशी श्रद्धा वाढली म्हणजे भक्त स्वतःची इच्छाच शिल्लक ठेवीत नाहीं. " देवाच्या

इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।'' हीच त्याची वृत्ति राहते. कारण ईश्वर करील तें योग्यच असलें पाहिजे, आपलें कल्याणच त्यांत सामावलेलें असतें याबद्दल त्याला शंका रहात नाहीं. आज आपल्याला एखादी घटना दुःखद वाटली तरी ती शेवटीं कल्याणकारकच ठरेल; ईश्वर "दयाळूपणें अल्पधारिष्ट" पाहत आहे. मनुष्य अदूरदृष्टि असतो, स्वतःचें अंतिम हित, श्रेयस्, त्याला समजत नाहीं; त्याची सद्यःसुखाकडे, 'प्रेयस्'कडे, दृष्टि असते, म्हणून त्याला दुःख होतें. भक्ति करीत असतां, ईश्वराच्या कृपेचा, त्याच्या भक्तवत्सलतेचा व दीनदयाळुत्वाचा प्रत्यक्ष अनुभव आला म्हणजे शरणागति वाढतच जाते, 'Thy will be done.' तुझ्या इच्छेला येईल तें होवो, असेंच भक्त म्हणूं लागतो. मी – माझें या जीवभावाचा पूर्ण नाश होऊन भक्तानें देवाशीं एकरूप होणें, ईश्वरस्वरूप होणें, हें पूर्ण शरणागती-वांचून घडत नाहीं. स्वतःची अशी थोडी जरी इच्छा राहिली तरी ती ईश्वराशीं एकरूप होण्याच्या मार्गांत विघ्न करील. शरणागतीची परमोच्च अवस्था ज्ञानेश्वरांनीं वर्णिली आहे. "सुवर्णमणि सोनेया । कां कल्लोळ पाणिया । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ।। मजहि शरण रिघिजे । आणि जीवित्वेंचि असिजे । धिक्बोली इया नलजे । प्रज्ञा केविं ।।'' (ज्ञानेश्वरी) "देवाचें जें उचित । तेंचि आपलें मनोगत । इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ।।'' (दा. ४।८, २२) याप्रमाणें शरणागतीवाचून भक्ति शक्यच नाहीं. अंतीं ईश्वराला "अद्वयत्वें शरण" गेलें पाहिजे

सर्व सद्‌गुणांचा भक्तीशीं कसा संबंध येतो, हें दाखविणें स्थलसंकोचा-स्तव शक्य नाहीं, आवश्यकहि नाहीं. वरील विवेचनावरून इतर सद्‌गुणांचे भक्तीशीं असलेले संबंध ध्यानांत येतील. या विवेचनावरून आणखीहि एक गोष्ट दिसून येईल. ती म्हणजे भक्तीची महती. अनेक सद्‌गुणांच्या पायावर भक्तीची इमारत उभारावी लागते. हा पाया जितका खोल व मजबूत तितकी भक्तीची इमारत भव्य व विशाल होईल. तशा पायाच्या अभावीं ती इमारतहि दुर्बलच राहील. भक्ति सोपी नाहीं, साळीभोळी नाहीं. बऱ्याच वेळीं ज्ञानमार्ग व कर्ममार्ग थोर पुरुषांचा, भक्तिमार्ग साळ्याभोळ्यांचा असें सांगण्यांत येतें. तें खरें नव्हे. ज्ञान व कर्म हीं देखील भक्तीशिवाय ईश्वरप्राप्ति करून देऊं शकणार नाहींत;

ज्ञान व कर्म ईश्वराधिष्ठित असलीं पाहिजेत, हें खरेंच; परंतु कठोर वैराग्य, तीव्र विवेक, सद्‌गुणसंवर्धनाविषयीं व दुर्गुणत्यागाविषयीं दक्षतेचे प्रयत्न, नित्य सावधानता, अचल धैर्य इत्यादि अनेक गुण असल्यावांचून भक्ति उज्ज्वल होणार नाहीं आणि साळ्याभोळ्यांना हे सद्‌गुण अशा प्रकारें वाढविणें कठीण आहे. म्हणून भक्तिमार्गानें जाण्यासाठीं लागणारा अधिकार फार थोर आहे. ज्याला कांहींच करतां येत नाहीं, अशा "बुद्धिपौरुषहीनांचा" हा मार्ग नाहीं आणि असा गैरसमज कोणी करून घेऊं नये. "जीव द्यावा, देव घ्यावा" हें भक्ताचें ब्रीद आहे.

अनेक सद्‌गुण भक्तीच्या वाढीला आवश्यक आहेत, त्याचप्रमाणें ते भक्तीचे परिणामहि आहेत. ईश्वरावर प्रेम वाढत गेलें म्हणजे देहावरील, मी-माझें यावरील प्रेम कमी होतें; अर्थात् भक्तीच्या वाढीबरोबर वैराग्य वाढतें, वैराग्याच्या वाढीनें भक्ति वाढते. या संबंधाला गुरुदेव रानडे यांनीं 'Reciprocal Causation' (परस्परोपकारिता) हें नांव दिलें आहे. अनेक सद्‌गुणांचा भक्तीशीं असा परस्परोपकारितेचा संबंध आहे. भक्तीनें सद्‌गुण वाढतात आणि सद्‌गुण भक्तीला उपकारक व पोषक असल्यानें सद्‌गुणांच्या वाढीनें भक्तीचा परिपोष होतो. याप्रमाणें भक्ति व सद्‌गुण अनेक पायऱ्यांनीं वाढत वाढत जाऊन, शेवटीं भक्तीच्या पूर्णतेनें सद्‌गुणांना पूर्णता येते. भक्तीची पूर्णता म्हणजे पूर्ण साक्षात्कार. अर्थात् साक्षात्कार पूर्णतेला पोहोंचल्यावर मनुष्याला उच्चतम नैतिक अवस्था प्राप्त होते. भक्ति व सद्‌गुण परस्परांना पोषक असले तरी भक्तीच्या– साक्षात्काराच्या– पूर्णतेवांचून सद्‌गुणांची पूर्णता अशक्य आहे, हें विसरतां कामा नये. अर्थात् केवळ नीति हेंच ज्यांचें ध्येय, त्यांनाहि ती पूर्णतेला नेण्यासाठीं भक्तीची, परमार्थाची कास धरावीच लागेल. गुरुदेव रानडे यांनीं आपल्या 'उपनिषद्रहस्यांत' सांगितल्याप्रमाणें, "For its consummation morality must end in the mystic attitude, which alone is the goal and end of the life of man" (पृ. २८८) (नीतीच्या पूर्णतेसाठीं तिची परिणति पारमार्थिक वृत्तींत झाली पाहिजे; कारण परमार्थ – ईश्वरसाक्षात्कार – हेंच मानवी जीवनाचें ध्येय आहे. त्यांतच त्यांची सफलता आहे.) "Just as there can be no

true mysticism unless it is based on the sure foundation of morality, so morality to be perfect must end in the mystical attitude. In the Upanishads there is no mere moral agent, whose morality does not consummate in the mystical attitude." ज्याला नीतीचा भक्कम पाया नाहीं त्याला परमार्थच म्हणतां येत नाहीं. त्याचप्रमाणें, नीतीला पूर्णता येण्यासाठीं तिची परिणति परमार्थांत झाली पाहिजे. ज्याच्या नीतीची परिणति ईश्वरसाक्षात्कारांत होत नाहीं, असा केवळ नीतिनिष्ठ पुरुष, निधर्मी नीति हेंच ध्येय मानणारा पुरुष, उपनिषदांत सांपडत नाहीं. साक्षात्कारविरहित नीति असें कांहीं ध्येय उपनिषदांना मान्य नाहीं. ) साक्षात्कारानें नैतिक पूर्णता कशी प्राप्त होते यासंबंधीं त्याच ग्रंथांत गुरुदेव लिहितात :" In this way according to the Chhandogya Upanishad, the ethical Summum Bonum consists in the mystical realisation of the triune unity as the goal of the aspirant's one-pointed endeavour " ( पृ. ३०५ ) ( याप्रमाणें, छांदोग्य उपनिषदाच्या मतें, आपल्या एकविध साधनाचें फळ म्हणून साधकाला ब्रह्म, अहं व आत्मा या तिहींच्या ऐक्यतेचा–सर्वं खलु इदं ब्रह्म हा—साक्षात्कार होणें हेंच नीतीचेंहि उच्चतम फल, अर्थात् परमोच्च सुख होय. ) " सर्वं खलु इदं ब्रह्म " या साक्षात्कारानें परमानंदाची प्राप्ति होते. हा परमानंद म्हणजेच उच्चतम नैतिक अवस्था; कारण हा आनंदच सर्व सद्गुणांची जन्मभूमि आहे.

या अभेद साक्षात्कारानें, ही अंतर-स्थिति बाणल्यावर, संतांच्या ठिकाणीं सर्व सद्गुण पूर्णतेला गेलेले कसे व कां दृष्टीस पडतात याचें अत्यंत उद्बोधक व स्फूर्तिदायक विवेचन समर्थांनीं दासबोध ८.९ ( सिद्धलक्षण ) या समासांत केलें आहे. नीतिशास्त्र, मानसशास्त्र व साक्षात्कारशास्त्र या सर्वांच्या दृष्टीनें तें अनुपम आहे. दासबोध ८.८ मध्यें प्रथम त्यांनीं आत्मनिवेदनानें अभेदभक्ति, सायुज्यमुक्ति कशी प्राप्त होते याचें विवरण केलें आहे:—

आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण ।
मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा ॥
देवभक्तांचें शोधन । करितां होतें आत्मनिवेदन ।
देव आहे पुरातन । भक्त पाहे ॥
देवास वोळखों जातां । तेथें झाली तद्रूपता ।
देवभक्त विभक्तता । मुळींच नाहीं ॥
आत्मनिवेदनाचे अंतीं । जे का घडली अभेद भक्ति ।
तिये नांव सायुज्य मुक्ति । सत्य जाणावी ॥...
आतां असो हें बोलणें । देव पाहावा भक्तपणें ।
तेणें त्याचें ऐश्वर्य बाणें । तात्काळ अंगीं ॥...
ऐसें ऐश्वर्य तत्त्वतां । बाणे देहबुद्धि सोडितां ।
देह मी ऐसें भावितां । अधोगति ॥

दा. ८.८.१३-१५.१९.२४.३०.

जीवभाव अधोगतीचें कारण, शिवभाव नैतिक व इतरहि ऐश्वर्यांचें मूळ, असें सांगून समर्थ म्हणतात, कीं असें ज्ञान, सायुज्यमुक्ति करून देणारा साक्षात्कार ज्या पुरुषाला झाला, ही अंतरस्थिति ज्याला बाणली, त्या सिद्धाचीं लक्षणें पुढील समासांत वर्णिलीं आहेत :

ऐसें जयासि झालें ज्ञान । तया पुरुषाचें लक्षण ।
पुढिले समासीं निरूपण । बोलिलें असें ॥ दा. ८.८,७०

अंतर-स्थिति प्राप्त झाली, साधक ईश्वराशीं एकरूप होऊन जीवन्मुक्त झाला, सायुज्यपदाचा अधिकारी झाला, हें ओळखण्याचीं लक्षणें म्हणून त्याच्या ठायीं दृष्टीस पडणाऱ्या सद्गुणांचें कांहीं विवेचन समर्थांनीं केलें आहे. वस्तुतः स्वरूपाचें किंवा ब्रह्माचें जें लक्षण तेंच जीवन्मुक्ताचें लक्षण; त्याचें वर्णन करणेंच अशक्य. तरी साधकाला कांहीं मार्गदर्शन व्हावें म्हणून त्याची चर्चा समर्थांनीं केली आहे :

ऐक सिद्धाचें लक्षण । सिद्ध म्हणजे स्वरूप जाण ।
तेथें पाहतां वेगळेपण । मुळींच नाहीं ॥
तथापि बोलों कांहीं येक । साधकां कळावया विवेक ।

तथापि सिद्धांचें लक्षण । कांहीं करूं निरूपण ।
जेणें बाणे अंतर्खूण । परमार्थाची ॥ दा. ८.९,३-६-८.

समर्थांनीं सिद्धांच्या सर्व लक्षणांचा विचार केला आहे, त्यांना प्राप्त होणारें ऐश्वर्य, जीवनसाफल्य वर्णिलें आहे. तरी आपल्याला त्यांतील नैतिक कृतार्थतेचाच तेवढा विचार करावयाचा आहे. समर्थ सांगतात : ‘ या सर्व सद्‌गुणांचा उगम अंतरस्थितींत आहे; अंतर भगवंताकडे, स्वरूपाकडे लागलें म्हणजे हीं लक्षणें बाणतात. ज्याचा भगवंतीं जिव्हाळा लागला तोच साधु, एरव्हीं अभ्यास करून हीं लक्षणें अंगीं बाणत नाहींत.

येथें कारण अंतरस्थिति । अंतरींच पाहिजे निवृत्ति ।
अंतर लागलें भगवंतीं । तोचि साधु ॥
बाह्य भलतैसें असावें । परि अंतर स्वरूपीं लागावें ।
लक्षणें दिसतीं स्वभावें । साधुअंगीं ॥
राज्यीं बैसतां अवलीळा । आंगीं बाणे राजकळा ।
स्वरूपीं लागतां जिव्हाळा । लक्षणें बाणतीं ॥
येरव्हीं अभ्यास करितां । हातां न चढतीं तत्त्वतां ॥...
अभ्यासाचा मुगुटमणि । वृत्ति राहावी निर्गुणीं ।
संतसंगें निरूपणीं । स्थिति बाणे ॥ ८.९,१७-२१

याप्रमाणें भक्तीची वाढ होईल तेव्हांच सद्‌गुण वाढतील, सद्‌गुणांच्या वाढीसाठीं केलेले इतर प्रयत्न विशेष उपयुक्त होणार नाहींत, हा महत्त्वाचा सिद्धान्त मांडून, भक्तीमुळें सद्‌गुण कां व कसे वाढतात याची सविस्तर चर्चा समर्थांनीं केली आहे. स्वरूपदर्शन आनंददायक आहे, त्या दर्शनांत परमानंद आहे. सच्चिदानंद हीं स्वरूपाचीं लक्षणें; मग त्याचें दर्शन परमानंदमय असलेंच पाहिजे. ‘आपला आपण स्वानंद हें सिद्धाचें अत्यंत महत्त्वाचें लक्षण होय. स्वरूपाच्या सतत, अखंड अनुसंधानानें येणारी अखंड आनंदमय अवस्था हीच समर्थांनीं वर्णिलेली अंतरस्थिति, हा आनंदच सर्व सद्‌गुणांची जन्मभूमि आहे. समर्थ सांगतात, “ या आनंदमय स्वरूपाकडे कल्पना ( मन ) खेचली गेली म्हणजे काम किंवा वासना उत्पन्न कोठें होतील ? वासना उत्पन्न होण्याला मनांत जागाच उरत नाहीं; तें आनंदानें भरून गेलेलें असतें; म्हणून साधुजनांच्या ठिकाणीं कामच नाहीं.

त्याचप्रमाणें साधूंना क्रोधाची बाधाहि होऊं शकत नाहीं. एखादी गोष्ट हवीशी वाटली व ती मिळाली नाहीं, किंवा जवळ असलेली आवडती गोष्ट कोणी हरण केली, तर क्रोध येतो. पण साधुजनांना प्राप्त झालेला स्वरूप हा ठेवा व त्याचा आनंद अक्षय, अविनाशी आहे; दुसरें कांहीं मिळावें ही कामना नाहींच; मग क्रोध येण्याचें कारण काय ? या स्वरूप-दर्शनानें 'अहं ब्रह्मास्मि' व 'सर्वं खलु इदं ब्रह्म' या अनुभवाच्या अवस्थेला साधु पोहोंचतो. दुसरें असें कांहीं उरतच नाहीं मग क्रोध, मद, मत्सर हे विकार कोणाविषयीं उत्पन्न होणार ? म्हणून, या षड्रिपूंचें साधूला दर्शनहि होणें अशक्य. स्वरूपाशिवाय त्याला कांहींच दिसत नाहीं आणि स्वरूप निर्विकार असतें. कोणामध्यें कांहीं दुष्ट विकार पाहिला म्हणजे तिरस्कार उत्पन्न होतो असा विकार त्याच्या दृष्टीसच पडत नाहीं; म्हणून साधूला तिरस्कार येत नाहीं. तो स्वानंदांत रंगलेला असतो; कोणावर गर्व करून त्याला वादांत जिंकावें, अशी त्याला कल्पनाहि येत नाहीं. वादांत दुसऱ्याला जिंकण्याच्या क्षुद्र सुखाची त्याला आठवणहि नसते. म्हणून साधु वादविवाद करीत नाहीं. सर्व विश्वच ज्याचें घर झालें, त्यानें लोभ कशाचा धरावयाचा ? म्हणून साधूला लोभ नसतो. नाशवंत अशा दृश्याचें प्रेम जो धरतो, त्याला दुःखाचा प्रसंग येईल; कारण नाशवंत वस्तु नाश पावणारच. परंतु, अविनाशी अशा स्व-स्वरूपाचें सेवन साधु करतो; म्हणून त्याला शोकाचा प्रसंग येणें अशक्य. स्वरूपानंदानें तो वृत्तिरहित झाला, उन्मनी अवस्थेला पोहोंचला; तेव्हां वृत्ति किंवा मनच नाहींसें झाल्यावर दुःखाचा उदय होणार कोठें ? म्हणून साधु सदा शोकरहित असतो. हीच गोष्ट मोहाची. दुसरा असला तर भयाची शक्यता : 'द्वितीयाद्वै भयं भवति।' साधु तर अद्वय, एकटाच असतो, दुसरें कांहीं नाहींच. मग त्याला भीति कशाची वाटणार ? पुनः स्वस्वरूप अविनाशी आहे व तें स्वरूप म्हणजे मी असा साधूचा अनुभव; म्हणून साधुहि अविनाशी, अमर असतो. अमरत्व प्राप्त झाल्यावर भय कशाचें राहणार ? भय नाहीं म्हणजे चिंताहि नाहीं. सूक्ष्म अशा दृश्य वस्तूकडे लक्ष लावावयाचें असलें तरीहि मनुष्य दक्ष असावा लागतो. साधु तर सदा अलक्ष्य-चर्मचक्षूंना व मनबुद्धीला अलक्ष्य-अशा स्वरूपाकडे

सदां लक्ष लावतो, मग तो किती दक्ष असला पाहिजे? मनांत **थोडाहि** विकार उत्पन्न झाला तरी तो स्वरूपाला सहन होत नाहीं, स्वरूप **दुरावतें;** म्हणून साधु अत्यंत निर्मळ असतात. स्वरूप त्यांच्यापासून कधींच **दूर** होत नाहीं. असे अनेक दुर्गुण नष्ट होऊन, त्यांच्या विरोधी **सद्गुण** साधूंच्या ठिकाणीं पूर्णत्वानें दृष्टीस पडतात. हे सर्व त्यांच्या स्वरूपानंदाचे, अंतरस्थितीचे परिणाम होत. म्हणून साधूचें मुख्य लक्षण, त्याचा परमश्रेष्ठ धर्म, म्हणजे 'स्वरूपीं राहणें,' सदा स्वरूपानंदांत लीन, मग्न होऊन असणें हा होय. "हा धर्म आचरला म्हणजे त्यांत सर्व धर्म, सर्व सदाचार, सर्व सद्गुण आपोआपच येतात." अशी समर्थांची साक्षात्काराधिष्ठित सद्गुणमीमांसा आहे. अपूर्ण अवस्थेतील सद्गुण हे साक्षात्काराच्या साधनाचा पाया व पूर्ण सद्गुण हे साक्षात्काराचे परिणाम, हा त्यांचा सिद्धान्त आहे. ईश्वराचा विचार ज्यांत येत नाहीं, असें नीतिशास्त्र त्यांना संमत नाहीं. वर दिलेले त्यांचे विचार सांगणाऱ्या कांहीं महत्त्वाच्या ओंव्या मुळांतच देत आहों :

स्वरूपीं करतां कल्पना । तेथें कैची उरेल कामना ।
म्हणोनिया साधुजना । **कामचि** नाहीं ॥
कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा ।
साधुजनाचा अक्षै ठेवा । जाणार नाहीं ।
म्हणोनि ते **क्रोधरहित** । जाणती स्वरूप संत ।...॥
जेथें नाहीं दुसरी परी । **क्रोध** यावा कोणावरी ।...॥
आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा **मद** ।
याकारणें **वादवेवाद** । तुटोनि गेला ॥
साधु स्वरूप निर्विकार । तेथें कैचा **तिरस्कार** ।...॥
आपुला आपण **मत्सर** । कोणावरी करावा ।...॥
साधु वस्तु अनायासें । या कारणें **मत्सर** नसे ।...॥
साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैचा असेल **दंभ** ।...॥
अवघें ब्रह्मांड ज्याचें घर । पंचभूतिक हा जोजार ।
मिथ्या जाणोनि सत्वर । त्याग केला ॥

या कारणें **लोभ** नसे । साधु सदा **निर्लोभ** असे ।
जयासी वासना समरसे । शुद्धस्वरूपीं ॥
दृश्य सांडूनि नाशवंत । स्वरूप सेविलें शाश्वत ।
याकारणें **शोकरहित** । साधु जाणावा ॥
शोकें दुखवावी वृत्ति । तरी **ते** जाहली निवृत्ति ।
म्हणोनि साधु आदिअंतीं । **शोकरहित** ॥
मोहें झळंबावें मन । तरी तें जाहालें उन्मन ।
याकारणें साधुजन । **मोहातीत** ॥
साधु वस्तु अद्वये । तेथें कैंचें वाटेल **भये** ।
परब्रह्म तें **निर्भय** । तोचि साधु ॥
सत्यस्वरूपें अमर झाला । **भय कैंचें** असेल त्याला ।...॥
स्वरूपाचा संयोगी । स्वरूपचि जाला योगी ।
या कारणें **वीतरागी** । निरंतर ॥
स्थिति बाणतां स्वरूपाची । **चिंता** सोडिली देहाची ।
याकारणें होणाराची । **चिंता** नाहीं ॥
अलक्ष्यासी लावी लक्ष । म्हणोनि साधु परम **दक्ष** । ..॥
स्वरूपीं न साहे मळ । म्हणोनि साधु **तो निर्मळ** ।...॥
**सकळ धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म** ॥
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ॥ ८. १०. २४ ते ५४

केवळ सद्‌गुण, विशेषतः भूतदया, परोपकार इत्यादि सामाजिक सद्‌गुण, हेंच ध्येय मानणाऱ्या पुरुषांनीं समर्थांच्या या नीतिमीमांसेचा विचार करणें उपयुक्त होईल ज्याला सद्‌गुणांची, चित्तशुद्धीची, उत्कट ओढ आहे त्याला लवकरच कळून येईल, कीं केवळ नैतिक उन्नतीचे प्रयत्न या कार्याला अपुरे पडतात. त्यासाठीं ईश्वरचरणीं धांव घ्यावी लागते. त्रिगुणातीत होणें, कर्मातीत होणें, स्थितप्रज्ञता, ही नीतीची उच्चतम अवस्था आणि ती भक्ति, साक्षात्कार व आत्मानंद यांच्यामुळेंच प्राप्त होते, असें गीताहि सांगते :

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥ (गी. १४।२६ )

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदव्ययम् ॥ (गी. १८।५६)
प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ (गी. २।५५)

'आत्मन्येवात्मना तुष्टः' याचेंच स्पष्टीकरण 'यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति' (गी. ६।२०) या श्लोकांत आहे. ईश्वराचें सेवन व आश्रय यांनीं निस्त्रैगुण्य व नैष्कर्म्य, स्वतःला स्वतःमध्यें पाहून संतुष्ट झाल्यावर वासनांचा नाश आणि स्थितप्रज्ञता, अशी ईश्वराधिष्ठित नीति-मीमांसा गीतेंतहि दृष्टीस पडते. तेव्हां कोणत्याहि दृष्टीनें जीवनाच्या कृतार्थतेचा विचार केला तरी भक्ति हेंच मुख्य साधन ठरतें. म्हणून भक्ति हाच सर्व सद्गुणांचा मुकुटमणि होय, असें समर्थांनीं प्रतिपादिलें आहे.

— (जीवन-विकास, डिसेंबर, १९५९)

# ५. समर्थांचा सद्‌गुण–विचार

सद्‌गुण-विचार किंवा नीतिशास्त्र याची चर्चा समर्थ रामदासांनीं स्वतंत्र विषय म्हणून केलेली नाहीं. परंतु दासबोधांत किंवा त्यांच्या इतर संकीर्ण प्रकरणांत नीतिशास्त्राचें विवेचन फार मोठ्या प्रमाणांत केलेलें आहे. सद्-गुण-दुर्गुणासंबंधीं इतकें विस्तृत व व्यावहारिक विवेचन दुसऱ्या फार थोड्या ग्रंथांत सांपडेल. तरी, हें सर्व विवेचन नीति हा परमार्थाचा पाया, ईश्वर-प्राप्तीला अत्यंत आवश्यक अशी पूर्वतयारी, या दृष्टीनें केलेलें आहे; स्वतंत्र शास्त्र म्हणून नव्हे. भारतांत नीतिशास्त्र हें परमार्थाचें साधन म्हणूनच चर्चिलें गेलें आहे; स्वतंत्र शास्त्र हें स्थान त्याला नाहीं. मानवी जीवनाच्या उच्चतम ध्येयाच्या दृष्टीनें विचार केला तर हें योग्यच आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञांनीं मात्र नीतीचें स्वतंत्र शास्त्र बनविलें आहे व त्याच्या अनुरोधानें भारतांतहि स्वतंत्र शास्त्र म्हणून नीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिले जात आहेत.

परमार्थसाधनाचें अंग म्हणून समर्थांनीं सद्‌गुणसंपादन व दुर्गुणत्याग या दृष्टीनें नीतीचा पुष्कळ विचार केला आहे. दुर्गुण कोणते, सद्‌गुण कोणते, विशिष्ट दुर्गुणांचें व सद्‌गुणांचें स्वरूप काय, याचें उदाहरणें देऊन त्यांनीं विवेचन केलें आहे. मूर्ख, पढतमूर्ख, कुविद्या, तमोगुण, रजोगुण, बद्ध, करंटा यांचीं लक्षणें सांगतांना अनेक समासांत दुर्गुणांचें, व उत्तमगुण, सद्विद्या, सत्त्वगुण, साधक, शिष्य, उत्तम पुरुष, शिकवण, चातुर्य इत्यादि विषयांवरील समासांत सद्‌गुणांचें फार विस्तृत व उद्‌बोधक विवेचन दृष्टीस पडेल. मनुष्याला आपली नैतिक उन्नति करून घेण्याला उपयोगी व्हावें, या दृष्टीनें हें सर्व विवरण समर्थांनीं केलें आहे. परंतु नीतिशास्त्रासंबंधीं तात्त्विक चर्चा तेथें साहजिकच झालेली नाहीं. नैतिक मूल्यें म्हणजे काय, उच्चतम नैतिक मूल्य कोणतें, असें एकच उच्चतम नैतिक मूल्य सांपडूं शकेल काय, किंवा मूल्यांच्या अनेक जाति असून प्रत्येक जातीचें स्वतंत्र उच्चतम नैतिक मूल्य शोधावें

लागेल, त्याचप्रमाणें अमुक आचरण नैतिक याला प्रमाण काय किंवा कोणता गुण त्यांत असल्यावर त्याला नैतिक म्हणावें, इत्यादि अनेक प्रश्नांची चर्चा समर्थांच्या ग्रंथांत सांपडणार नाहीं, हें साहजिकच आहे. तरी, या प्रश्नांवर थोडा फार प्रकाश टाकतां येईल, असे विचार तेथें आपल्याला दिसतील. ईश्वरप्राप्ति हेंच मानवाचें एकमेव ध्येय व तें प्राप्त करून घेण्याचें एकमेव साधन म्हणजे भक्ति; म्हणून भक्ति हें उच्चतम नैतिक मूल्य, भक्ति हा सर्व सद्गुणांचा मुकुटमणि, हा समर्थांचा निःसंदिग्ध सिद्धान्त आहे आणि या पायावर त्यांच्या सद्गुणविचाराची उभारणी आहे, हें सहज लक्षांत येईल. त्याचप्रमाणें, शास्त्र हेंच नीतीचें प्रमाण, शास्त्रानें प्रतिपादिलेले विधिनिषेध नीतीसंबंधीं मार्गदर्शक होत, असेंहि त्यांनीं सांगितलें आहे : "तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ." त्याबरोबरच देवाच्या, आत्म्याच्या जवळ नेईल तो सद्गुण; देवापासून, आत्म्यापासून दूर नेईल तो दुर्गुण, असा नियमहि त्यांनीं सुचविला आहे. सर्व संतांचा सद्गुण-दुर्गुण ठरविण्याचा हाच निकष आहे. एकनाथांनीं ईश्वराला सर्व सद्गुणांची जन्मभूमि असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणें सर्व सद्गुणांचें आगर आणि उगमस्थान अंतरात्मा असून तो ज्या प्रमाणांत मनुष्यामध्यें प्रकट झाला असेल, त्या प्रमाणांत सद्गुण त्याच्या अंगीं दिसतात, हा महत्त्वाचा सिद्धान्त समर्थांनीं सांगितला आहे. परमार्थ व नीति यांना सांधणारा दुवा म्हणजे हा सिद्धान्त होय. "सर्व विभूतिमत्, श्रीमत्, ऊर्जित तत्त्वें हीं माझ्या तेजाच्या अंशापासून झालीं आहेत," असें गीतेंत भगवान् श्रीकृष्ण सांगतात. "सर्वां वडिल अंतरात्मा । जेथें चेतला तेथें महिमा" आणि "अल्प चेतनेला अल्प भाग्य" असें समर्थांचें वचन आहे. दोहींचा अर्थ एकच

या प्रास्ताविक चर्चेनंतर समर्थांच्या सद्गुण-दुर्गुण विचाराकडे वळूं. दुर्गुणत्यागाशिवाय सद्गुण अंगीं येणार नाहींत; किंबहुना, दुर्गुणत्याग आणि सद्गुणसंपादन या दोन भिन्न प्रक्रिया नसून, एकच सलग प्रक्रिया आहे. दुर्गुण कमी होत चालला, कीं तेथें त्याच्या विरोधी सद्गुणाची लक्षणें उमटूं लागतात व शेवटीं या सद्गुणाची पूर्णता झाली म्हणजेच विरोधी दुर्गुण पूर्णतया नष्ट झाला असें म्हणतां येईल. म्हणून अमानित्वाचें लक्षण सांगतांना ज्ञानेश्वरांनीं अमानित्व म्हणजे केवळ अभिमानाचा अभाव

नव्हे, तर पराकाष्ठेची नम्रता, असें सुचविलें आहे आणि अमानित्व, अदंभित्व, अहिंसा यांना दुर्गुणत्याग न म्हणतां, सद्गुण, ज्ञानाचें लक्षण असें म्हटलें आहे. महात्मा गांधीहि अहिंसा म्हणजे हिंसेचा अभाव नव्हे, तर भूतमात्रावर प्रेम असें सांगत. या दृष्टीनें प्रथम दुर्गुणांचें विवेचन करूं. नंतर, ( १ ) दोषत्यागाच्या स्वरूपाचे–अभावात्मक–सद्गुण, ( २ ) शील-विषयक, ( ३ ) आचारविषयक, ( ४ ) सामाजिक व ( ५ ) पारमार्थिक असे सद्गुणांचे पांच वर्ग करून त्यांचा विचार करावयाचा आहे. हें वर्गीकरण अगदीं कांटेकोरपणें शास्त्रीय नाहीं, कांहींसें स्थूलच आहे; पण विचाराला त्याचा उपयोग होईल.

**दुर्गुण**:- काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सुप्रसिद्ध व सुपरिचित षड्रिपु अर्थात् समर्थांनीं सांगितले आहेतच. याशिवाय इतर कांहीं स्वतंत्र दुर्गुण किंवा वरील सहांचे पोटविभागहि त्यागार्थ वर्णिले आहेत. देहाभिमान, तिरस्कार, आशा, वासना, निंदा हे सर्व मद, मत्सर व काम यांचेच प्रकार असून हिंसा, निर्दयता हे क्रोधाचे व दुर्वृत्ति आणि दुश्चितपणा हे मोहाचे प्रकार आहेत. साधारणतः ज्यांना विशेष मानण्यांत येत नाहीं, अशा कांहीं दोषांनाहि समर्थांनीं निश्चितपणें घातक दुर्गुण या सदरांत घातलें आहे, आणि तें सर्वथा योग्य आहे. त्यांची उपेक्षा करणें खरोखरच घातक ठरेल. ते दोष म्हणजे चिंता, आळस, बहुनिद्रा, भय, हठ, विषाद, क्रियेवीण वाचाळता व सुखलोलुपता. अत्यंत मार्मिकपणें समर्थांनीं सर्व दुर्गुणांच्या राजाचें लक्षण सांगितलें आहे : "सकळ अवगुणांमध्यें अवगुण । आपुले अवगुण वाटती गुण ॥" हा अवगुण असलेला मनुष्य सुधारणें शक्यच नाहीं; म्हणून याला अवगुणांचा राजा म्हटलें आहे. आपल्या दोषांची जाणीव व ते घालविण्याची उत्कट इच्छा असल्याशिवाय ते दूर होणार नाहींत. मग दोषांची जाणीव तर नाहींच, पण उलट ते सद्गुणच आहेत असें वाटणारा सुधारणार कसा ?

समर्थांनीं कांहीं दोषांचीं लक्षणें किंवा उदाहरणें सांगितलीं आहेत, तीं फार उद्बोधक व विचारप्रक्षोभक आहेत. त्यांनीं त्या त्या विशिष्ट दुर्गुणांचीं लक्षणें म्हणून ते विचार दिले नसले तरी त्यांत तीं लक्षणेंच आहेत हें सहज ध्यानांत येईल. अशीं दासबोधांतील कांहीं उदाहरणें पुढें दिलीं

आहेत. नुसत्या दोषांचीं नांवें परिणामकारक होत नाहींत; त्यांच्या लक्षणांचा मनावर परिणाम होतो व मनुष्य जागृतीवर येऊन, त्याला दोषांची तीव्र जाणीव अस्वस्थ करूं लागते.

(१) **मत्सर :**

'परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख' २:१।४६
'दुसऱ्याचें सर्व जावें । माझेंच बरें व्हावें ॥' २:५।१६

(२) **विषाद :**

'गेले वस्तूचा करी शोक ।' २:१।४५
'जिवलगांची खंती ।...वाटे चित्तीं ॥' २:५।१९
'संसाराचे बहुत कष्ट । कैसा होईल शेवट ॥' २:५।२०
कां जें मागें भोगिलें । तें तें मनीं आठवलें ।
दुःख अत्यंत वाटलें ।......'२:५।२१
'संसारीं दुःखसंबंध । प्राप्त होतां उठे खेद' २:६।२

(३) **अहंकार :**

'मी तरुण मी सुंदर । मी बलाढ्य मी चतुर ।
मी सकळांमध्यें थोर ॥......' २:५।१४
माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाव ।
ऐसी मनीं धरी हाव ॥...२:५।१५

(४) **आशा-आसक्ति :**

'वैभव देखोनि दृष्टीं । आवडी उपजली पोटीं ।' २:५।२२
'जें जें दृष्टी पडलें । तें तें मनें मागितलें ।' २:५।२३

(५) **आळस :**

'आळस उठे प्रबळ । कर्मणुकीचे नाना खेळ । २:५।२६
'आळसाचें फळ रोकडें । जांभया देऊनि निद्रा पडे
सुख म्हणोनि आवडे । आळसी लोका ।' ११:३।९

(६) **मोह :**

'प्रीतिपात्र गेलें मरणें । तया लागीं जीव देणें ।' २:६।१०
'उगेचि खावें उगेचि असावें । स्तब्ध होऊनि बैसावें ।
कांहीं न स्मरें स्वभावें ।...' २:६।२७

**(७) अविवेकी वैराग्य किंवा हठ :**

केले गळाचे नवस । राडिबेडीचे हव्यास ।...
मस्तकीं भदें जाळावें । पोतें अंग हुरुपळावें ।
देवास सिर वाहावें । किंवा अंग समर्पावें ।' २:६।२९-३१

या नमुन्यावरून समर्थांचें मानवी स्वभावाचें निरीक्षण किती सूक्ष्म होतें, हें दिसून येतें. त्यांनीं दुर्गुणांच्या कांहीं घातक जोड्या वर्णिल्या आहेत, त्याहि चिंतनीय आहेत. असे दोन दुर्गुण एकत्र आले म्हणजे, एका प्रसिद्ध हिंदी दोह्यांत म्हटल्याप्रमाणें, भांगेंत धोतऱ्याचें बीं घालावें तशी अवस्था होणें अपरिहार्य आहे :

" दुर्जन को दुर्जन मिले, भंग में धत्तूर ।"

समर्थ कुविद्येचीं लक्षणें सांगतात :

कुरूप आणि कुलक्षण । अशक्त आणि दुर्जन ।
आळसी आणि खादाड । दुर्बळ आणि लाताड ।
नेणें आणि नायके । न ये आणि न सिके ।
हीन देह आणी ताठा ।...
लंडी आणि उन्मत्त । निकामी आणि डुल्लत ।
कनिष्ठ आणि गर्विष्ठ ।...
अल्पमती आणि वादक ।... २:३।९ ते २०

मागें सुचविल्याप्रमाणें, समर्थांचें नीतिशास्त्र ईश्वराधिष्ठित आहे. म्हणून भक्ति हा सद्गुणांचा मुकुटमणि, त्याचप्रमाणें अभक्ति हा दुर्गुणांचा मुकुटमणि असें दासबोधावरून स्पष्ट होतें. मूर्खलक्षणासंबंधीं समर्थ म्हणतात, ' जे प्रपंचिक जन । जयासी नाहीं आत्मज्ञान । जे केवळ अज्ञान । त्यांचीं लक्षणें ।' २:१।७. त्यांत व पढतमूर्खलक्षणांत भक्तीच्या अभावाचा विशेष उल्लेख आहे.

सांडूनिया जगदीशा । मनुष्याचा मानी भरंवसा । २:१।५४
संसार–दुःखाचेनि गुणें । देवासी गाळी देणें । २:१।५५
देवद्रोही गुरुद्रोही ।... २ : १।४४
विसरोनि गेला ईश्वरा ।... २ : १।४०

मुक्तक्रिया प्रतिपादी । सगुण भजन उच्छेदी ।
स्वधर्म आणि साधन निंदी । ... २: १०।४
देवा विसरे जो मानव । २ : १०।१९
नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य नाहीं भजन । २ : १०।२३
सांडूनिया श्रीपति । जो करी नरस्तुति । २ : १०।१८.

समर्थांनीं दुर्गुणांच्या उभ्या केलेल्या या प्रतिमा पाहून यांत माझेंच चित्र तर दिसत नाहीं ना, अशी अस्वस्थ करणारी जाणीव बरेच वेळां उत्पन्न होते. या जाणिवेंतच आत्मोन्नतीचें बीज आहे.

आतां सद्गुणविचाराकडे वळूं. येथेंहि सद्गुणांचीं नांवें देऊन त्यांच्या लक्षणांचें किंवा उदाहरणांचें समर्थांनीं केलेलें वर्णनहि पाहावयाचें आहे. कारण, नुसत्या नांवापेक्षां लक्षणें व उदाहरणें अधिक उद्बोधक असतात व त्यांत सद्गुणांच्या प्रतिमा अधिक स्पष्टपणें दिसतात. लेखाच्या प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें, विवेचनासाठीं सद्गुणांचे पांच वर्ग केले आहेत :

( १ ) **दोषत्यागाच्या स्वरूपाचे, अभावात्मक सद्गुण:**—अहिंसा, निरभिमान, अनासक्ति, निर्मत्सर, निःस्पृहता, विरक्ति, अपरिग्रह. समर्थांच्या वर्णनांत निर्मत्सर व अहिंसा हे सहानुभूतीच्या व दयेच्या स्वरूपाला पोहोंचलेले दिसतात. ते सांगतात,

**निर्मत्सर :**

परपीडेचें वाहे दुःख । परसंतोषाचें सुख । २ : ७।८४
परभूषणें भूषण । परदूषणें दूषण । २ : ७।८५

**अहिंसा :**

जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखरी । १२ : १०।२५
परांतरासी न लावावा ढका । कदापि वर्म चुकों नका ।१२:१०।२०
आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।
परी कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ।। १२ : १०।२७
आत्मवत् परावें तें । मानीत जावें ।। १२ : १०।२२

अनासक्ति व वैराग्य म्हणजे विषयांचा वीट आणि ईश्वरासाठीं देहासकट सर्वस्वाचा त्याग असें समर्थ म्हणतात; नुसतें विषयापासून दूर होणें नव्हे.

**अनासक्ति-विरक्ति :**

सर्व काळ उदासीन । नाना भोगीं विटें मन । २ : ७।४७
सकळांचा आला वीट । परमार्थी जो निकट । २ : ७।४६
येका भगवंताकारणें । सर्व सुख सोडिलें जेणें ।
केलें देहाचें सांडणें । ...।। २ : ७।५८

मुमुक्षूला जगाचा वीट आला पाहिजे, 'ब्राह्मणो निर्वेदमायात्' असें उपनिषदांतहि सांगितलें आहे.

( २ ) **शीलविषयक सद्‌गुण** :— शांति, दक्षता, शुचिता, धैर्य, दया, तितिक्षा, दम, संतोष, तृप्ति, मार्दव, स्वदोषदर्शन, जगमित्रता, निष्ठा, श्रद्धा, धारिष्ट, संयम, भाव, विवेक, अनुताप, सत्य, उत्कटाचें प्रेम, इत्यादि. यांपैकीं कांहीं गुणांसंबंधीं दासबोधांत फार चिंतनीय विवेचन आलें आहे. उदा०,

**दया :**

तडी तापडी दैन्यवाणें । आले आश्रमाचेनि गुणें...।।
आश्रमीं अन्नाची आपदा । परि विमुख नव्हे कदा ।
शक्तिनुसार दे सर्वदा ।...।। २ : ७।५४,५५

**तितिक्षा :**

देह आपदेनें पीडिला । क्षुधेतृषेनें वोसावला ।
तरी निश्चयो राहिला ।...।। २ : ७।६०
नीच उत्तर साहणें । प्रत्योत्तर न देणें...।।
अन्यायेंवीण गांजिती । नानापरी पीडा करिती ।
तितुकेंहि साठवी चित्तीं ।...।। २ : ७।६७,६८

**जगमित्रता :**

मित्रपणें परहितकारी । वाङ्माधुर्यें परशोकहारी ।
सामर्थ्यपणें वेत्रधारी । पुरुषार्थें जगमित्र ।।२:८।२०
आडलें जाकसलें जाणावें । यथानशक्ति कामास यावें । १२:१०।६
नाना उत्तम गुण सत्पात्र । तेंचि मनुष्य जगमित्र । १९:४।६
नम्रपणें पुसों जाणें । नेमस्त अर्थ सांगों जाणें ।
बोला ऐसें वर्तो जाणें । उत्तम क्रिया ।। १९:४।८

उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी ।
तैसी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष ।। १९:४।२८

जगमित्रता हें महापुरुषाचें लक्षण आहे; अनेक थोर गुण, मातृतुल्य प्रेम व त्याग यावांचून हा गुण अंगी येणार नाहीं, लोकसंग्रहाला या गुणाची अत्यंत आवश्यकता, असा या सद्गुणाचा उचित गौरव समर्थांनीं केला आहे.

सत्याचा जो अभिमान । तो जाणावा निरभिमान ।
न्याय अन्याय समान । कदापि नव्हे ।।
न्याय म्हणजे तो शाश्वत । अन्याय म्हणजे तो अशाश्वत ।।
१५:१।२१,२२

येथें न्यायांतील दिव्यत्व दाखविलें आहे.

**विवेक :**

विवेकावर समर्थांनीं किती भर दिला आहे, हें दासबोध वरवर वाचणारालाहि सहज दिसून येईल. त्यांचा विवेक हा केवळ बुद्धीचा गुण नसून जीवनव्यापी तत्त्व आहे. सर्वांगीण अनुभूतीवर तो आधारलेला आहे. भोंवतालचें जग पाहून त्याची अशाश्वतता ओळखावी, मग शाश्वत काय आहे याचा विचार करावा, तें बुद्धीनें निश्चित करून त्याच्या प्राप्तीचा मार्ग शोधावा, संतजनांकडून तो मार्ग समजून घ्यावा आणि त्या मार्गानें जाऊन त्या शाश्वताची प्राप्ति करून घ्यावी, त्याच्यांत एकरूप होऊन मिळून जावें, एवढा त्यांच्या विवेकाचा विशाल, भव्योदात्त व्याप आहे. आत्मज्ञानासाठीं वेदान्तांत साधनचतुष्टय सांगितलें आहे. १.नित्यानित्यवस्तुविवेक, २.इहामुत्रफलभोगविराग, ३.शमदमादि षट्संपत्, ४. मुमुक्षत्व. यांतील पहिला नित्यानित्यविवेक हाच समर्थांचा विवेक. तो इतका उत्कट व प्रभावी झाला पाहिजे, कीं अनित्याबद्दल वैराग्य व नित्याबद्दल ओढ यांतून उत्पन्न झाली पाहिजे; वरीलपैकीं विराग हें दुसरें व मुमुक्षत्व हें चौथें साधन यांतून सहजच निर्माण झालें पाहिजे. नंतर बुद्धीला विवेकानें वैराग्य प्राप्त झालें तरी मन व इंद्रियें विषयोन्मुखता सोडीत नाहींत, म्हणून शमदमादि साधनांनीं त्यांना निवृत्त केलें पाहिजे. हें चौथें साधन. शेवटीं, सदा स्वरूपानुसंधानानें स्वरूपच होऊन जावयाचें व जीवनसाफल्य मिळवावयाचें. विवेकाच्या कार्याचा

व्याप एवढा मोठा आहे. अर्थात्, प्रापंचिक व्यवहारांत व लोकसंग्रहासाठीं विवेक उपयोगी पडेलच; पण समर्थांचा भर त्याच्या परमार्थिक महत्त्वावर आहे. विवेकासंबंधीं त्यांचीं कांहीं वचनें उद्धृत करूं. अक्कल, बुद्धि हे शब्दहि विवेक या अर्थी आले आहेत.

कर्तयासी ओळखावें। त्यास **विवेक** म्हणावें ॥
घालोनि **अकलेचा** पवाड। व्हावें ब्रह्मांडाहूनि वाड ॥ १२:९।२९
तयास परब्रह्म म्हणावें। जें उपाधीवेगळें स्वभावें।
जेथें दृश्यमायेच्या नांवें। शून्याकार ॥
दृष्टीचें देखणें दृश्य। मनाचें देखणें भास।
मनातीत निराभास। **विवेकें** जाणावें ॥
दृश्यभास अवघा विघडे। **विवेक** तेथें पवाडे ॥ १७:१०।८ ते १०
आत्मा आत्मपणें असतो। देहसंगें विकारतो।
साभिमानें भरीं भरतो। भलतीकडे ॥
त्यामध्यें कोणीं भले। ते संतसंगें निघाले।
देहाभिमान सांडून गेले। **विवेकबळें** ॥
आत्मा **विवेकें** (देहाबाहेर) निघतो। ऐसा आहे प्रत्यय तो।
**विवेकें** पाहा ॥ १७:७।२,५,६
**विवेकें** बहुत पैसावले। म्हणोनि अवतारी बोलिले।
मनु चक्रवर्ती झाले। येणेंचि न्यायें ॥
जेथें उदंड **जाणीव**। तेचि तितुके सदैव।...॥
थोर लहान **बुद्धी**पासी। सगट कळेना लोकासी।...॥
तस्मात् वडिल अंतरात्मा। जेथें चेतला तेथें महिमा ॥
१५:३।५,६,९,१९

चिन्मय अंतरात्मा हाच सर्वांत वडील, ज्ञानमय; त्याची ज्या प्रमाणांत जाग्रति झाली असेल त्या प्रमाणांत मनुष्य विवेकी व म्हणूनच थोर होतो, हा अति महत्त्वाचा सिद्धान्त समर्थांनीं येथें सांगितला आहे. हा साक्षात्कार व सद्गुण यांना जोडणारा दुवा आहे.

जीव जीवांत घालावा। आत्मा आत्म्यांत मिसळावा।
राहों राहों शोध घ्यावा। परांतराचा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 28311 ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...


तैसेंचि हें मनास मन । विवेकें आधें मिळोन ।
जगदीश आहे जगदांतरीं । चेटकें करावीं कोणावरी ।...॥
१५ : १४, ६, १०

जगमित्रता व लोकसंग्रह हीं विवेकावांचून घडत नाहींत.

**विवेकलक्षण** : द. १९, स. १० यांत आदर्श विवेकी पुरुषाचा धर्म सांगितला आहे. विवेकाचीं पारमार्थिक पार्श्वभूमि तेथें अगदी स्पष्ट दिसून येते. समर्थ म्हणतात, " अंतर्यामीं भक्ति, उपासना आणि आत्मज्ञान हीं प्राप्त करून घ्यावीं व तीं सर्व लोकांना शिकवावीं. स्वतः उपासना करणें हें पुरें होत नाहीं. ' उपासना करूनियां पुढें । पुरविलें पाहिजे चहूंकडे । ' १९।१०।८. योग्य तें सांगून लोकांचीं अंतःकरणें निववावीं. अखंड विवेक पाहून सर्वांना निःसंदिग्ध करावें. ' भगवद्भजन राहावें हा धर्म नव्हे '. कांहीं अडचणी आल्या तरी भगवद्भजन बंद पडूं देऊं नये. ' आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ॥' याप्रमाणें भक्तीचा प्रसार करणें ही उपाधिच होय; परंतु या उपाधीस कंटाळू नये '. मात्र ' उपाधींत सापडों नये', 'आनंदरूप फिरावें । कोठें तरी ॥' १९:१०।२४ साक्षात्कार होऊन आनंदरूप, निरुपाधिक झाल्यावरच ही उपाधि करावी. म्हणजे ती बंधक होणार नाहीं. सारांश, ' संसार मुळींच नासका । **विवेकें** करावा नेटका । नेटका करितां फिका । होत जातो ॥' १९:१०।२८. ही शेवटची ओवी फार अर्थपूर्ण आहे. संसार सुखदायक होणें शक्यच नाहीं. तो मुळांतच नासका, सुखदुःखरूप आहे. तो विवेकानें नेटका करावा; अर्थात्, या नरदेहांत ईश्वरप्राप्ति करून घेतां येते हें विवेकानें जाणून त्या मार्गाला लागावें म्हणजे संसार खऱ्या अर्थानें नेटका झाला. ऐहिक ऐश्वर्य मिळविणें म्हणजे संसार नेटका करणें नव्हे. नरदेह धन्य आहे; कारण,

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पाहा हो ।
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥...
नरदेहाचेनि लागवेगें । एक लागले भक्तिसंगें ।...
एक अखंड नामस्मरणें । निष्ठावंत झाले ॥...
येकीं देव ठायीं पाडिला । भावार्थबळें ॥...

सलोकता समीपता । सारूप्यता सायुज्यता ।
या चत्वारमुक्ति तत्त्वता । इच्छा सेवूनि राहिले ॥
१:१०।१,२,३,५,१६

ईश्वरप्राप्ति करून घेण्याला आवश्यक तितका व त्या प्रकारें संसार करणें म्हणजे नेटका संसार. त्याची खूण ही, कीं तो फिका होत गेला पाहिजे, त्याची ऐहिक गोडी कमी कमी होत जाऊन शेवटीं निर्वेद आला पाहिजे. सारांश, स्वतः ईश्वरप्राप्ति करून घेऊन इतरांना तो मार्ग दाखविणें हें—सर्व संतांनीं सदां आचरिलेलें व्रत—विवेकी पुरुषानें आचरिलें पाहिजे. विवेकाबद्दल बऱ्याच विस्तारानें चर्चा झाली. पण भक्तीच्या खालोखाल समर्थांनीं विवेकाला महत्त्व दिलें आहे; म्हणून अशी चर्चा करणें इष्ट वाटलें.

**उत्कटाचें प्रेम :** हा सद्गुण म्हणून विशेषतः सांगितला जात नाहीं. परंतु पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञांनीं Love of the extraordinary (असामान्याविषयीं प्रेम) हें एक सद्गुणाचें लक्षण म्हणून सांगितलें आहे. तेंच समर्थांचें उत्कटाचें प्रेम :

उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मिळमिळीत अवघेंचि टाकावें ।...॥
उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य उत्कट भजन ।
उत्कट योग अनुष्ठान । ठायीं ठायीं ॥
उत्कट निःस्पृहता धरिली । त्याची कीर्ति उदंड झाली ।
उत्कट भक्तीनें निवाली । भक्तमंडळीं ॥ १९:६।१५,२२,२३

**भाव :** दासबोध द. १, स. १ मध्यें त्या ग्रंथाच्या वाचनानें 'क्रिया पालटे तात्काळ । तुटे संशयाचें मूळ ।...मार्ग सांपडे सुगम ।...सायोज्य-मुक्तीचें वर्म ठायीं पडे ।' इत्यादि फळें मिळतील असें सांगून, समर्थांनीं शेवटच्या ओवींत एक महत्त्वाचा इशारा दिला आहे. "जयाचा भावार्थ जैसा । तयासी लाभ तैसा । मत्सर धरी जो पुंसा । तयासी तेंचि प्राप्त ॥" १:१।३८. पाश्चात्य नीतिशास्त्रज्ञांचें असें सांगणें आहे, कीं चांगलें काय, वाईट काय यासंबंधीं अनेक मतभेद असले तरी, चांगले होण्याची उत्कट इच्छा (Will to be good) असल्यावांचून मनुष्याला सद्गुणी होतां येणार नाहीं. हा सिद्धान्त सहज पटण्यासारखा आहे आणि वरील ओवींत समर्थांनीं तोच सांगितला आहे.

**सत्य :** सत्याचें व्यावहारिक स्वरूप समर्थांना मान्य आहेच; व्यावहारिक सत्य सोडतां कामा नये, यांत शंकाच नाहीं. परंतु समर्थांनीं सत्याला फार उच्च पद दिलें आहे. ‘ सत्यायेवढें सुकृत नाहीं । असत्यायेवढें पाप नाहीं । ’ १०:१०।५४ असें सांगून ते सत्याची व्याख्या करतात, ‘ सत्य म्हणजे स्वरूप जाण । असत्य माया हें प्रमाण । ’ १०:१०।५०. सत्य म्हणजे ब्रह्म आणि तेंच पुण्य. ज्ञानी ब्रह्मस्वरूप झाला म्हणजे त्यानें पुण्य जोडलें; त्या अवस्थेला पोहोंचेपर्यंत तो असत्य व पाप यांपासून सुटणें अशक्य; ‘ येरवीं ब्रह्मज्ञानेंवीण । जें जें साधन तो तो शीण । नाना दोषांचें क्षाळण । होईल कैचें ।। पापाचें वळलें शरीर । पापाचि घडे निरंतर । ’ १०:१०।५८,५९: ‘ आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यासि नाहीं मर्यादा । ...वेदशास्त्रीं सत्यस्वरूप । तेंचि ज्ञानियाचें रूप । पुण्य झालें अमूप । सुकृतें सीमा सांडिली ।। ’ १०:१०।६५,६६.

( ३ ) **आचारप्रधान सद्‌गुण :—** आचारशीलता, नेमस्तपणा, कष्टाळूपणा, प्रयत्न, बोले तैसा चाले, सुवर्णमध्य, परोपकार.

**आचारशीलता :** ‘ सत्त्वगुणलक्षणांत ( दा. २, ७ ) आचारशीलतेला फार महत्त्व दिलें आहे. स्वधर्माचार, तप, श्रवण, कीर्तन, दान, अन्नसंतर्पण, शरीरकष्ट घेऊन सेवा, हीं सत्त्वगुणाचीं लक्षणें म्हणून सांगितलीं आहेत. Habit is character ( चांगल्या सवयींनीं शील बनतें, सवय म्हणजेच शील ), असें ॲरिस्टॉटलनें म्हटलें आहे. ज्या क्रियांनीं शीलविषयक सद्‌गुणांचा विकास होतो त्या नेहमीं कराव्या, म्हणजे शील बनतें, असें तो सांगतो. यासाठींच समर्थांनीं आचारशीलतेवर भर दिला आहे.

**शरीरकष्ट :**

सुखा अंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सोडूं नये ।
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ।। २:२।१४
आळसें सुख मानों नये । २:२।१३

**सुवर्णमध्य :**

कोणत्याहि गोष्टीचा अतिरेक झाला तर सद्‌गुणाचा दुर्गुण बनतो. यालाच ॲरिस्टॉटलनें सुवर्ण-मध्य ( Golden mean ) असें म्हटलें आहे. समर्थांनींहि याचा कटाक्षानें उपदेश केला आहे.

बहु नेम धरूं नये । बाष्कळ खोटें ।।
बहु देह पाळूं नये । आत्महत्या खोटी ।।
बहु प्रीति कामा नये । निष्ठुरता खोटी ।।
देह लोभ धरूं नये । बहु त्रास खोटा ।।
कर्मठपण कामा नये । अनाचार खोटा ।।  १४:१।६५ते६८,७०

**यत्न :**

समर्थ हे अद्वितीय कर्मयोगी; तेव्हा त्यांनीं यत्नाला महत्त्व दिलें असलें तर तें योग्यच आहे. " अंतरीं नाहीं सावधानता । यत्न ठाकेना पुरता । सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ।।" 'म्हणोन आळस सोडावा । यत्न साक्षेपें करावा ।' असें सांगून प्रयत्नाचें स्वरूप पारमार्थिक आहे हेंहि त्यांनीं स्पष्ट केलें आहे. 'भक्ति, ज्ञान, वैराग्य, योग । नाना साधनांचे प्रयोग । जेणें तुटे भवरोग । मननमात्रें ।...हृदयीं चिंतावें समर्था । रघुनाथासी ।। '

सारांश, सर्व प्रयत्नांचा हेतु हा, कीं " रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ।। " असें ते ' यत्नशिकवण निरूपणांत ' सांगतात.

१२:९।७,८ २२ ते २६

( ४ ) **सामाजिक गुण** : आर्जव, लीनता, दया, क्षमा, औदार्य, परोपकार, सहिष्णुता, लोकसंग्रह, सर्वांभूतीं आत्मभाव, विवादरहित संवाद, इत्यादि.

**परोपकार :**

'परोपकार करीताचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।। बहुत जन वास पाहे । वेळेस तात्काळ उभा राहे । उणें कोणाचें न साहे । तया पुरुषासी ।। आपुल्या कार्यासी तत्पर । लोक असती लहान थोर । तैसाचि करी परोपकार । मनापासुनी ।।' १९:४।१०, ११, २२

सामान्यतः सर्व प्रकारचा परोपकार श्रेष्ठच आहे. परंतु सन्मार्ग दाखविणें हा सर्वश्रेष्ठ परोपकार; कारण त्यानें शाश्वतसुख मिळतें.

तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनांस सांगावें । तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ।। उत्तम गुण स्वयें घ्यावें । ते बहुतास सांगावें ।।

१२:१०।२, ३

**लोकसंग्रह :**

परोपकाराशीं निगडित असा लोकसंग्रह हा सद्गुण आहे. परोपकाराशिवाय लोकसंग्रह होत नाहीं आणि लोकसंग्रह झाल्यावांचून सामाजिक परोपकार मोठ्या प्रमाणावर होणें शक्य नाहीं. महाराष्ट्राचे उद्धारकर्ते म्हणून समर्थांचा या गुणावर विशेष भर आहेच; पण भक्तिप्रसार हा त्यांच्या लोकसंग्रहाचा मुख्य हेतु आहे.

बहुतांचें मुखीं उरावें। बहुतांचें अंतरीं भरावें।
उत्तमगुणीं विवरावें। प्राणिमात्रासी ॥
शाहाणें करावें जन। पतित करावे पावन।
सृष्टीमध्यें भगवद्भजन। वाढवावें ॥ १४ : ६ । ३२, ३३
कोणास कांहीं न मागावें। भगवद्भजन वाढवावें।
विवेकबळें जन लावावें। भजनाकडे ॥
ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या। भक्तमंडळ्या मानाव्या।
संतमंडळ्या शोधाव्या। भूमंडळीं ॥ १९ : ६ । ११, १४

**क्षमा :**

उदंड धिक्कारोनि बोलती। तरी चळों न द्यावी वृत्ति।
दुर्जनासी मिळोनि जाती। धन्य ते साधु ॥ १२ : १० । १६

**सर्वाभूतीं आत्मभाव :**

आपल्या परीस व्हावे। पारखे जन ॥ १२ : १० । ८
आत्मवत् परावे ते। मानीत जावें ॥ १२ : १० । २२

( ५ ) **पारमार्थिक सद्गुण** :—आतांपर्यंत ज्यांचा विचार झाला ते सर्व सद्गुण आस्तिक–नास्तिक सर्वांनाच आवश्यक आहेत. मनःस्वास्थ्य, कुटुंबस्वास्थ्य, समाजस्वास्थ्य, नैतिक भावनांचें समाधान, एवढेंच ज्यांना हवें आहे, ज्यांचा ईश्वरावर किंवा भक्तीवर विश्वास नाहीं, अशांनींहि हे गुण संपादन केले पाहिजेत. परंतु पारमार्थिक सद्गुणांची मात्र त्यांना जरूर नाहीं. ईश्वरप्राप्ति हेंच ज्यांचें ध्येय आहे, त्या दृष्टीनें ज्यांचे प्रयत्न आहेत, अशा साधकांनींच या सद्गुणांची जोपासना केली पाहिजे. साधकांत इतर सद्गुण नसले तरी चालतील, असा मात्र

याचा अर्थ नाहीं. इतर सर्व सद्‌गुण उत्कटतेनें वाढवून, शिवाय पारमार्थिक गुण त्यांनीं अंगीं आणिले पाहिजेत. समर्थांनीं पहिल्या चार वर्गांतील सद्‌गुणांचेंहि परमार्थाच्या दृष्टीनेंच विवेचन केलें आहे, हें वर कांहीं ठिकाणीं दाखविलें आहे. तरी त्यांना केवळ व्यावहारिक असेंहि स्वरूप आहे. यापुढें सांगितलेल्या गुणांना मात्र निधर्मी स्वरूप मुळींच नाहीं. त्यांचा आतां विचार करूं. ईश्वरभक्ति, गुरुभक्ति, सत्संग, अनन्य भाव, तत्त्वचिंतन, एकान्त, श्रवण–मनन–निदिध्यास, मरणाचें स्मरण, देह-दुःख सुख मानणें, भक्तीचा प्रसार, हे पारमार्थिक गुणांपैकीं कांहीं महत्त्वाचे सद्‌गुण आहेत. " विशद भक्तिमार्ग " सांगण्यासाठीं समर्थांनीं दासबोस लिहिला. तेव्हां भक्ति किंवा परमार्थ हा विषय एवढा विशाल आहे, कीं या लेखाच्या एका भागांत त्याला नीट स्पर्शहि करतां येणार नाहीं. म्हणून त्याचा विस्तारानें विचार न करितां, इतर सद्‌गुणांची थोडक्यांत माहिती दिली तशीच या पारमार्थिक गुणांची सांगून हा भाग संपवावयाचा आहे.

**भक्ति :**

भगवद्भक्ति हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम ।...॥
प्रेमप्रीतीचा सद्भाव । आणि भक्तांचा समुदाव ।
हरिकथा महोत्साव । तेणें प्रेमा दुणावे ॥...
पुण्या सामग्री पुरती । तयासीच घडे भक्ति ॥ २:४।३,४,२७
नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्य शरीर ।...॥
अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला ।...॥
म्हणौनि नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें ॥
४:३।२२,२३,२५
ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लौकिक ॥
ही परमार्थाच्या वाटचालीची दिशा आहे.

**गुरुभक्ति :**

मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्‌गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।
अनन्यभावें शरण । या नांव शिष्य ॥
अहो सद्‌गुरुकृपा जयापासीं । सामर्थ्य न चले तयापासीं ।
ज्ञानबळें वैभवासी । तृणतुल्य केलें ॥

ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढ भाव ।
तेणें गुणें देवाधिदेव । स्वयें होती ॥५:३।१५,४७,४९

**सत्संग :**

जे वस्तु परम दुर्लभ । जयेचा अलभ्य लाभ ।
तेचि होय सुलभ । संतसंगें करोनी ॥
संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ ।
मोक्षश्रिया अलंकृत । ते हे संत श्रीमंत ।
जीव दरिद्री असंख्यात । नृपति केले ॥ १:५।२,१६,२१

**अनन्य भाव :**

देवाच्या सख्यत्वाकारणें । आपुलें सौख्य सोडून देणें ।
अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंहि वेचावें ॥
देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोहि वेचावा ॥
देव म्हणजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण ।
परमप्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें ॥ ४:८।६,८,१०

सद्गुणांचीं लक्षणें किंवा उदाहरणें म्हणून या लेखांत ज्या ओव्या उद्धृत केल्या आहेत, त्या दासबोधांत सत्त्वगुण, उत्तम पुरुष, निःस्पृह, सद्विद्या इत्यादि निरूपणांत आल्या आहेत; त्या त्या विशिष्ट सद्गुणांचीं लक्षणें म्हणून त्या दिलेल्या नाहींत. परंतु त्यांत विशिष्ट सद्गुणांचीं प्रतिबिंबें दिसतात, म्हणून त्या उद्धृत केल्या आहेत. यांत क्वचित् चुकाहि झाल्या असतील. कारण सद्गुणांचे प्रान्त एकमेकांत इतके मिसळलेले असतात, कीं एकापासून दुसरा स्पष्टपणें वेगळा काढणें कठिण पडतें. अशा चुका झाल्या असल्या तरी, त्या त्या ओव्यांतील विचार नीतिशास्त्राच्या दृष्टीनें उद्बोधक वाटतील अशी आशा आहे.

**दुर्लभ द्वंद्वें** : मागें दुर्गुणांच्या ‘ भंग में धत्तूर ’ अशा दुष्ट युति सांगितल्या. त्याच्या उलट ‘ चंदन में कपूर ’ अशा सद्गुणांच्या दुर्लभ पण मंगल युतिहि समर्थांनीं वर्णिल्या आहेत.

परम सबळ आणि धीर । परम संपन्न आणि उदार ।...॥
परम ज्ञाता आणि भक्त । महापंडित आणि विरक्त ॥
महातपस्वी आणि शांत । अतिशयेंसीं ॥...
सर्वज्ञ आणि सादरता । श्रेष्ठ आणि नम्रता ॥...
शूर आणि विवेक । तारुण्य आणि नेमक ॥...
कार्यकर्ता निरभिमानी । वैभव आणि भगवद्भजनी ॥ २:८।४ ते ९
सिद्ध असोनी साधक । साधन रक्षी ॥ २:८।२४

**भक्ति वाढविणें :** भक्तीचा प्रसार करणें हा थोर पुरुषांचा महत्त्वाचा गुण म्हणून समर्थांनीं कटाक्षानें प्रतिपादिला आहे. भक्तिमार्गानें जाण्यांतच मानवतेचें खरें कल्याण आहे, त्याशिवाय जीवन कृतार्थ होणार नाहीं, असें स्वानुभवानें जाणून इतर संतांप्रमाणें समर्थांनींहि भक्तीचा उपदेश केला व मानवतेच्या मंगलासाठीं त्याची परंपरा चालू राहिली पाहिजे असें बजाविलें.

रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥ १२:९।२६
ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव ।
भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ॥
आपण अवचितें मरोनि जावें । मग भजन कोणें करावें ।
या कारणें भजनास लावावें । बहुत जन ॥
आमची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यांसी ।
आपणामागें जगदीशासी । भजत जावें ।
या कारणें समुदाव । झाला पाहिजे महोत्साव ।
हातोहातीं देवाधिदेव । वोळेसा करावा ॥ १२ : १०।३२–३५
भगवद्भक्तीनें भरावें । भूमंडळ ॥ १९ : ६।२६

सकल मंगलांचा वर्षाव करणारी संतांची परंपरा जगांत सतत अवतरावी व त्यांच्या संगतींत मानवता भक्तिमार्गाला लागावी, हेंच पसायदान ज्ञानेश्वरांनींहि मागितलें आहे; कारण यांतच मानवतेचें कल्याण आहे, हें त्यांना निश्चितपणें माहीत होतें.

वर्षत सगळमंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटोतु भूतां ॥...

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ज्ञा. १८ : १७९६-९९

विश्लेषणात्मक पद्धतीनें ( Analytical Method ) समर्थांच्या नीतिशास्त्राचें विवेचन वर झालें. निरनिराळ्या सद्गुणांचा स्वतंत्रपणें विचार ही विश्लेषणपद्धति. नीतिशास्त्राचा संग्रथनपद्धतीनेंहि (Synthetical Method) विचार केला पाहिजे. सर्व सद्गुणांत एकसूत्रतेचा कांहीं धागा आहे का, त्यामध्यें एक मुख्य केंद्रीय सद्गुण व इतर त्याचे आविष्कार, साधनें किंवा परिणाम आहेत असें दाखवून, सर्व सद्गुण हे एका केंद्रीय सद्गुणाशीं संग्रथित करतां येतील का, हें पाहणें ही संग्रथनपद्धति. गुरुदेव रानडे यांनीं गीता आणि हिंदी संतांचे ग्रंथ यांतील सद्गुणांचा अशा रीतीनें विचार करून या दोहींतहि भक्ति हा सद्गुणांचा मुकुटमणि, केंद्रीय सद्गुण, म्हणून प्रतिपादिला असून इतर सर्व सदगुण भक्तीचे पैलू, साधनें किंवा परिणाम म्हणून सांगितले आहेत असें उत्कृष्टपणें दाखविलें आहे. त्याच पद्धतीनें दासबोधांतील सद्गुणांचा विचार करणें उद्बोधक होईल. भक्ति व इतर सद्गुण यांचा संबंध, त्यांमधील परस्परोपकारिता ( Reciprocal Causation) आणि भक्तीच्या पूर्णतेनेंच सर्व सद्गुणांना पूर्णता, या सर्व गोष्टींचा विचार या लेखांत करणें शक्य नाहीं. पुढें केव्हां तरी त्याचें विवेचन करूं.

( जीवन–विकास, सप्टेंबर १९५९)

# ६. समर्थांचें ‘ स्वरूपानुसंधान ’

“ सकळ धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ” दा. ८ : ९।५४

**प्रास्ताविकः**—वरील ओवींत समर्थांनीं साधूचें, म्हणजे साक्षात्कारी पुरुषाचें मुख्य लक्षण ‘ स्वरूपीं राहणें ’ हें होय असें सांगितलें आहे आणि ‘ स्वरूपीं राहणें ’ हाच मुख्य धर्म, असेंहि म्हटलें आहे. मोक्षप्राप्तीचें साधन म्हणजे धर्म, त्या साधनाचा सारभूत भाग हाच मुख्य धर्म. तेव्हां ‘ स्वरूपीं राहणें ’ हाच मोक्षप्राप्तीच्या साधनाचा सारभूत भाग, साधनाचा मुकुटमणि असा समर्थांचा सिद्धान्त दिसतो. त्याचा या लेखांत विचार करावयाचा आहे. ‘ स्वरूपीं राहणें ’ आणि ‘ स्वरूपानुसंधान ’ या दोहींचा अर्थ एकच आहे. ‘ ऐसे उपदेश अनेक । परि ज्ञानेंवीण निरर्थक । ’ दा. (५।४।३१) असा आत्मज्ञानाचा महिमा सांगून, ज्या आत्मज्ञानावांचून तळमळ जाणार नाहीं, त्याचें लक्षण समर्थांनीं दा. ५।६।३१ मध्यें दिलें आहे.

**ज्ञान म्हणजे साक्षात्कारः**—‘ ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पाहावें आपणासी आपण । या नांव ज्ञान ॥ ’ आपलें सत्य स्वरूप ओळखणें, स्वतःचें स्वरूप पाहणें याचें नांव आत्म ज्ञान, अर्थात् आत्मसाक्षात्कार. ज्ञान शब्दाचा बौद्धिक ज्ञान किंवा शब्दज्ञान असा अर्थ येथें घेतां येणार नाहीं. ‘ आपणासि आपण पाहावें ’ या अनुभवाला समर्थांनीं ज्ञान म्हटलें आहे; केवळ शब्दज्ञानानें आपण आपणाला पाहूं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें या ज्ञानानें कोणकोण मुक्त झाले हेंहि समर्थांनीं सांगितलें आहे :

असो पूर्वीं थोर थोर । जेणें ज्ञानें पैल पार ।
पावले ते साचार । ऐक आतां ॥

व्यास वसिष्ठ महामुनी । शुक नारद समाधानी ।
जनकादिक महाज्ञानी । येणेंचि ज्ञानें ।।
सिद्ध मुनि महानुभाव । सकळांचा जो अंतर्भाव ।
जेणें सुखें महादेव । डुल्लत असे ।। ५।६।२२, २३, २६.

यावरून हें ज्ञान म्हणजे साक्षात्कार हें उघड आहे. ' ज्ञानादेव तु कैवल्यम् ' या वचनांतील ज्ञान व वरील समर्थांच्या वचनांतील ज्ञान एकच, म्हणजे आत्मसाक्षात्कार होय. विमल, शुद्ध, स्वरूप–ज्ञान, ' आपला आपणासी लाभ ', असें त्या ज्ञानाचें वर्णन याच समासांत केलेलें आढळतें. हें स्वरूपच चराचराचें मूळ असून, आपल्या सत्यस्वरूपाचें ज्ञान झालें म्हणजे अंगीं सर्वज्ञता बाणते, हा सिद्धान्त समर्थांनीं सांगितला आहे :

जेथूनि हें सर्वेहि प्रगटे । आणि सकळहि जेथें आटे ।
तें ज्ञान जालियां फिटे । भ्रांति बंधनाची ।।
जें या चराचराचें मूळ । शुद्ध स्वरूप निर्मळ ।
या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ।।
आपणासी वोळखों जातां । अंगीं बाणे सर्वज्ञता ।
(दा. ५।६, १८, २०)

जें विश्वाचें मूळ, विश्वाच्या उत्पत्ति–स्थिति–लयाचें कारण, उपनिषदांतील ' तज्जलान् ', तेंच जीवाचें सत्यस्वरूप व त्याचें दर्शन, त्याचा साक्षात्कार हेंच मोक्षदायी ज्ञान असा समर्थांचा सिद्धान्त येथें दिसून येतो व वेदान्तशास्त्राला संमत असाच तो आहे. देहाभिमान सोडून हें स्वरूप पाहून साधकानें तेथें विश्रांति घ्यावी असा त्यांचा उपदेश आहे :

शिष्या येकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीस जावें ।
तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ।। दा. ५।६।५४

**स्वरूपानुसंधान हें साधकाचें साधन** : स्वरूपानुसंधान ही सिद्धाची सहजावस्था आहे आणि साधकाचें साधन आहे, असें त्याचें द्विविध स्वरूप आहे. साध्य नेहमींच साधनांत बीजरूपानें सामावलेलें असतें, कारणांत कार्य सामावलेलें असतें. वृक्ष हा बीजांत सूक्ष्मरूपानें असतो, हें वरील सिद्धान्ताचें उदाहरण म्हणून देतात. सिद्ध ज्याचें सहजतेनें अनुसंधान करतो, तें वृक्षरूप, पूर्णतेला पोहोंचलेलें स्वरूप; साधक बीजरूप स्वरूपाचें

अनुसंधान करतो व हळूहळू तें वृक्षत्वाला पोहोंचतें. स्वरूपांत पूर्ण व अपूर्ण असे भेद कसे करतां येतील, असा प्रश्न येथें उद्‌भवतो. त्याला उत्तर असें, कीं स्वरूप पूर्ण आहे; परंतु ज्ञाता किंवा साधक अपूर्ण असल्यानें तें त्याला अपूर्ण, हळूहळू विकास पावणारें असें दिसतें. साधकाच्या दृष्टीनें, गुरुदेव रानडे यांनीं म्हटल्याप्रमाणें, साक्षात्कार ही घटना नसून प्रक्रिया आहे ( Illumination is a process and not an event ). साधकाचीं लक्षणें सांगतांना स्वरूपानुसंधानाच्या या प्रक्रियेवर समर्थांनीं फार भर दिला आहे; कारण हाच " सकल धर्मांमध्यें धर्म ", साक्षात्कार प्राप्त करून देणारा मुख्य उपाय आहे, हीच मुख्य भक्ति आहे, भक्तीचे इतर प्रकार या भक्तीला पोषक व उपकारक आहेत. साधकानें स्वरूपानुसंधान प्रयत्नपूर्वक केलें पाहिजे; म्हणजे त्याची स्वरूपस्थिति बळावेल. सदाचार, सद्‌गुणसंपादन व दुर्गुण-त्याग हीं स्वरूपस्थिति बळावण्याला आवश्यक आहेत.

> बळेंचि स्वरूपाकार होणें । या नांव साधक ॥
> असत्क्रिया ते सोडिली । आणि सत्क्रिया ते वाढविली ।
> स्वरूपस्थिति बळावली । या नांव साधक ॥
> अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणांचा अभ्यास ।
> स्वरूपीं लावी निजध्यास । या नांव साधक... ॥
> दृढनिश्चयाचेनि बळें । दृश्य असतांच नाडळे ।
> सदा स्वरूपीं मिसळें । या नांव साधक...॥
> स्वरूपीं करी दृढबुद्धि । या नांव साधक ॥
>
> ( दा. ५ : ९ : १२-१५-२३ )

यप्रमाणें स्वरूपानुसंधान करतां करतां साधक स्वरूपाकार होतो, सिद्ध होतो :

> पुढें उन्मनीच्या सेवटीं । आपुली आपणा अखंड भेटी ॥...
> देवभक्तांचें मूळ । शोधून पाहे सकळ ।
> साध्याचि होये तात्काळ । या नांव साधक ॥
> देहीं असोनि विदेह झाला । या नांव साधक ॥

जयास अखंड स्वरूप-स्थिति । नाहीं देहाचीं अहंकृति ।
(दा. ५.९.२४-२९)

**स्वरूपानुसंधान ही सिद्धाची सहजावस्था :** दा. ८-९ मध्यें साधुलक्षणें किंवा सिद्धलक्षणें वर्णिलीं आहेत. तेथें सिद्ध हा स्वरूपानुसंधानानें स्वरूपाकार होतो, स्वरूपच्च होतो व हेंच त्याचें मुख्य लक्षण, इतर सर्व सद्‌गुण या स्वरूपाकारतेपासून निर्माण होतात, असें अत्यंत मार्मिक व भव्योदात्त विवेचन समर्थांनीं केलें आहे. हा सर्व समासच्च फार उद्‌बोधक आहे. परंतु, त्यांतील स्वरूपाकारिता व स्वरूपानुसंधान यांवरील वचनेंच खालीं उद्धृत करीत आहों.

ऐक सिद्धाचें लक्षण । सिद्ध म्हणजे स्वरूप जाण ।...॥
स्वरूप होऊन राहिजे । या नांव सिद्ध बोलिजे ।
सिद्ध स्वरूपींच बोलिजे । सिद्धपण ॥...
अंतरस्थिति स्वरूप झाली । पुढें काया कैसी वर्तली ।
जैसी स्वप्नींची नाथिली । स्वप्नरचना ॥...
सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण ।...॥
स्वरूपीं दृष्टि पडतां । तुटोनि गेली संसारचिंता ।...॥
बाह्य साधकाचे परी । परी स्वरूपाकार अंतरीं ।...॥
संदेहरहित साधन । हेंचि सिद्धाचें लक्षण ।...॥
स्वरूपीं लागली वृत्ति । स्वरूपचि झाली ॥...॥
स्वरूपीं स्वरूपचि झाला । मग तो पडोनीच राहिला ।
अथवा उठोनि पळाला । तरी तो चळे ना ॥
बाह्य भलतैसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें ।
लक्षणें दिसती स्वभावें । साधुआंगीं ॥...
स्वरूपीं लागतां जिव्हाळा । लक्षणें बाणती ॥
येरव्हीं अभ्यास करतां । हातां न चढती सर्वथा ।
स्वरूपीं राहावें तत्त्वता । स्वरूप होऊनि ॥
स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैसी असेल कामना ।
म्हणोनियां साधुजना । कामचि नाहीं ॥...

याकारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे ।
जयाची वासना समरसे । शुद्ध स्वरूपीं ॥
सत्य स्वरूपें अमर झाला । भय कैसें असेल त्याला...॥
स्वरूपीं लागतां बुद्धि । तुटे अवघी उपाधि ।...॥
सकळ धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ॥ (दा. ८-९-१३-५४)

येथें स्वरूपीं राहून स्वरूपाकार झाल्यानें साधूच्या अंगीं सर्व सद्गुण येतात, सर्व दोषांचा नाश होतो, इतर प्रयत्न करून हीं थोर लक्षणें हातीं चढत नाहींत, हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धान्त समर्थांनीं अगदीं स्पष्टपणें प्रतिपादिला आहे. स्वरूपानुसंधान हा याप्रमाणें मुख्य धर्म आहे.

**ज्योति-नाद इत्यादि अनुभव व स्वरूपः**—स्वरूप म्हणजे आत्मा, ईश्वर, ब्रह्म, असें स्थूलमानानें म्हणतां येईल. कारण हीं तीनहि तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें शेवटीं एकच आहेत. समर्थांनींहि हेंच सांगितलें आहे. आतां स्वरूपाचें अनुसंधान म्हणजे कशाचें अनुसंधान हा प्रश्न येतो. साधारणपणें बुद्धीला समजण्यासाठीं आत्म्याचे किंवा ईश्वराचे जे गुण वेदान्तांत सांगितले आहेत, त्यांचें अनुसंधान, असा स्वरूपानुसंधानाचा अर्थ केला जातो. सर्वज्ञ, सर्वसाक्षी, अंतर्यामी, चारी देहांच्या पलीकडचा, सर्वव्यापक, त्रिगुणातीत अशीं आत्म्याचीं अनेक लक्षणें सांगितलेलीं आहेत. ‘ मी देह नव्हे, वरील लक्षणांनीं युक्त असा आत्मा आहे,’ या कल्पनेचें चिंतन म्हणजे स्वरूपानुसंधान किंवा आत्मचिंतन असें मानलें जातें. परंतु पदार्थांच्या गुणांचें ज्ञान म्हणजे पदार्थाचा अनुभव नव्हे. पदार्थाचा अनुभव व त्याच्या गुणांचें बौद्धिक ज्ञान यांत महदंतर आहे ‘ गोडी कळाया गूळ देणें, ’ हा एकच अनुभवाचा प्रकार आहे. आत्म्याच्या वरील अनेक गुणांच्या चिंतनानें आत्मानुभवाची मुळींच कल्पना येणार नाहीं. अनुभव आल्यावर त्याचे गुण सांगतां येतील, त्याची थोडीफार बौद्धिक कल्पना देतां येईल; पण कल्पनेंतून अनुभव निर्माण करतां येणार नाहीं. समर्थांनीं दासबोध ७.३.४७ व १६.८.८ मध्यें आत्म्याचें ‘ नादरूप, ज्योतिरूप, सस्वरूप ’ असें वर्णन केलें आहे या. ज्योतिरूपाचा किंवा नादरूपाचा (अनाहत नादाचा) अनुभव येऊं लागला म्हणजे त्याचें अनुसंधान करावें

असा स्वरूपानुसंधानाचा अर्थ आहे. शंकराचार्यांनीं अशाच स्वरूपानु-संधानाचा व नादानुसंधानाचा आदेश दिला आहे, व तेंच मुक्तीचें साधन म्हणून प्रतिपादिलें आहे. त्याचा विचार पुढें करूं. त्यापूर्वीं, ‘ दासबोधाचा सोलीव अर्थ ’ या प्रकरणांत समर्थांनीं दिलेलें स्वरूपाचें वर्णन मुळांतच उद्धृत करीत आहों :

धैर्याचें आसन बळकट । आणि इंद्रियें वोढूनि सघट ।
धरे उर्ध्वपंथें वाट नीट । अढळपदीं लक्ष लावी ॥
तें मार्गाची करूं नवाळी । प्रथम घंटानादाची नवाळी ।
दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहात कोल्हाळ ॥
आतां अग्रीं लक्ष लावी । काय दिसें तें न्याहाळीं ।
चंद्रज्योति प्रकाशली । त्रिभु बांधिला बळकट ॥
तें सुख अंतरीं घेउनी । पुढें चाल करी संगमीं ।
तेथें विजू ऐशा कामिनी । चमकताती सुवर्णरंग ॥
तेंहि जाणोनि मागें सारी । पुढें सूर्यबिंब अवधारी ।
ज्वाळा निघती परोपरी । दंडळूं नको कल्पांतीं ॥
अनंत भानु तेज अद्‌भुत । खदिरांगार ज्वाळा उसळत ।
धारिष्ट तेथें न निभत । दुर्घट त्रिभु तेथींचा ॥
तेथें हुशारीचें काम । अग्रीं लक्ष घालूनि नेम ॥
तीर लावूनि सुगम । मागें सारी सूर्यातें ॥
पुढें दिसेल जें नवल । तें पाही हंसमेळ ।
चंद्रकिरण शीतळ । पाहसी तूं मम वत्सा ॥
चंद्राची प्रभा सुढाळ । फडफडित चांदणें ॥
तोचि डोळियाचा डोळा पाही । देहातीत वर्म विदेही ।
चिन्मय सुखाची नवाई । भोगी आपुले कीं गा ॥
अनुभवाची शीग भरली । अग्रापरी उसळली ।
भूमडळीं प्रभा पडली । कर्पूरमय नभ झालें ॥
तया मध्यभागीं सघन । अढळपद दैदीप्यमान ।
उर्वरित ब्रह्म जाण । ध्रुव बैसला अढळ तें ॥

तें तुझें स्वरूप नेटेंबोटें । जेथें समस्त जाणणें आटे ।
ऐके झालासि धिटे । बळकटपणें बलाढ्य ॥
ऐसें सुख योगियां लाधलें । तेव्हां देहाचें मरण गेलें ।
सांगणें ऐकणें मुरालें । एकत्वपणें एकाचि ॥

—सोलीव अर्थ, १५।३०

या प्रकरणांत अनाहत नाद, तेज, रूप, रंग यांचें क्रमाक्रमानें वाढणारे अनुभव वर्णिले असून, शेवटीं तेजाच्या मध्यभागीं जें स्थिर स्वरूप आहे तें तुझें स्वरूप, असें शिष्याला सांगितलें आहे. याचें दर्शन झालें म्हणजे साधक देहातीत झाला, मुक्त झाला, ब्रह्मस्वरूप पावला; हाच 'एकमेवाद्वितीयम्'चा अनुभव, अद्वितीयत्वाची, एकत्वाची स्थिति. स्वरूपानुसंधानानें प्राप्त होणाऱ्या सिद्धावस्थेच्या प्रक्रियेचें संपूर्ण वर्णन येथें दृष्टीस पडतें. वर 'स्वरूप' हा शब्द शेवटच्या अनुभवाला लावलेला आहे. परंतु अगदी प्राथमिक नाद–तेजापासून येणारे सर्व अनुभव स्वरूपाचेच होत, त्यांत फरक नाहीं, असें गुरुदेव रानडे यांनीं आपल्या गीतेवरील ग्रंथांत म्हटलें आहे. "सर्व थोर साक्षात्कारी पुरुष नेहमींच असें सांगत आले आहेत, कीं साधकाला आत्मानुभवांत जीं जीं रूपें दिसतात, तीं वस्तुतः त्या साधकांचींच स्वरूपें असतात...या रूपांमध्यें आध्यात्मिक मूल्यांच्या दृष्टीनें कांहीं गुणानुक्रमहि असतो. साक्षात्कारी पुरुष असेंहि सांगतात, कीं परमार्थपथ आक्रमून जात असलेल्या साधकाला, 'आत्मानुभवांत दिसणारी वस्तु म्हणजे मीच,' असा ऐक्याचा अनुभव आला पाहिजे. तो आला म्हणजेच देव–भक्तांचें पूर्ण ऐक्य होतें. तरी मुद्दा हा, कीं साधकाला जीं जीं रूपें दिसतात, जे जे आत्मानुभव येतात, ते ते त्याच्या आध्यात्मिक प्रगतीचे अचूक निदर्शक असतात." (भगवद्गीता : साक्षात्कारदर्शन; पृ. ६३–६४)

**उपनिषदांतील स्वरूपसाक्षात्कार :** गुरुदेव रानडे यांनीं आपल्या सर्व ग्रंथांत अशा प्रकारच्या साक्षात्काराचीं उपनिषत्कालीन ऋषींपासून वर्तमानकालीन संतांपर्यंत अनेक साक्षात्कारी पुरुषांचीं संस्कृत, मराठी, हिंदी व कानडी वचनें उद्धृत केलीं आहेत; त्यांतील विविधता, सौंदर्य व भव्योदात्तता चिंतनीय आहेत. त्यांत आत्मस्वरूपदर्शन हें फार महत्त्वाचें

असल्यानें " भगवद्गीता : साक्षात्कारदर्शन " या ग्रंथांत उपनिषदांतील चार वचनांच्या आधारें त्यांचें सुंदर विवेचन केलें आहे. त्यांच्या इतर ग्रंथांतहि स्वरूपसाक्षात्काराचें वर्णन आलें आहेच. भगवद्गीतेंत स्वरूपसाक्षात्काराचें वर्णन मुख्यतः एकाच श्लोकांत, म्हणजे ' यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया । यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ।। ' ( ६।२० ) यांत आलेलें आहे असें सांगून, त्यांनीं इतर दोन-तीन ठिकाणीं येणाऱ्या स्वरूपसाक्षात्काराचा उल्लेख केला आहे. ' तदा द्रष्टुः स्वरूपेऽ-वस्थानम् ' या योगसूत्रा (१–३) मध्यें, त्याचप्रमाणें ' संपद्याविर्भावः स्वेन शब्दात् ' (४४.१) या ब्रह्मसूत्रांत व ज्ञानेश्वरीच्या अ. १५·२६६–२८३ या ओव्यांत वर्णिलेल्या स्वरूपसाक्षात्काराचें ते उल्लेख होत. विस्तारभयास्तव त्यांचें अधिक स्पष्टीकरण करीत नाहीं. स्वरूपसाक्षात्कार आंत, अंतर्यामीं व बाहेरहि होतो, हें खालील वचनें उद्धृत करून गुरुदेव रानडे यांनीं दाखविलें आहे. तो भाग मुळांतच देत आहें :

( १ ) **अंतर्यामीं होणारें आत्मदर्शन** : " अथ य एष संप्रसादोऽ-स्माच्छरीरात्समुत्थाय परं ज्योतिरुपसंपद्य स्वेन रूपेणाभिनिष्पद्यते इत्येष आत्मेति होवाच । एतदमृतमभयमेतद् ब्रह्मेति ।। ( मै. २-२ ) जें तेजोमय तत्त्व, आनंदसमाधीच्या काळीं आपल्या शरीरांतून बाहेर येतें व आपल्या स्वतःच्या स्वरूपांत दृष्टीस पडतें त्यालाच आत्मा म्हणावें...काडीच्या आवरणांतून ज्याप्रमाणें गवताचों काडी बाहेर काढतात, त्याचप्रमाणें साक्षात्कारेच्छु पुरुषानें मोठ्या धैर्यानें आत्मस्वरूप बाहेर काढिलें पाहिजे, असें कठोपनिषदांत म्हटलें आहे :

" तं स्वाच्छरीरात्प्रवृहेन्मुंजादिवेषिकां धैर्येण ।। "

( २ ) **बाह्य विश्वांतील आत्मदर्शन** : पुढील दोन वचनांत बाहेर विश्वांत दिसणाऱ्या देवाच्या स्वरूपाचें वर्णन आहे : " य एषोऽन्तरादित्ये हिरण्मयः पुरुषो दृश्यते, हिरण्यश्मश्रुर्हिरण्यकेश अप्रणखात्सर्व एव सुवर्णः।" छां. ६–६. सुवर्णासारखें तेजस्वी, सोन्याच्या मिशा व सोन्याचे केस असलेलें, अगदीं नखापर्यंत सुवर्णासारखें तेजस्वी दिसणारें देवाचें संपूर्ण स्वरूप बाहेर, उदाहरणार्थ, सूर्यावर दृष्टीस पडतें. या वचनास पूरक, असें दुसरें वचन ईशोपनिषदांत आहे. हा सूर्यावर दिसणारा पुरुष तो

मीच, असें त्या वचनांत म्हटलें आहे : योऽसावसौ पुरुषः सोऽहमस्मि " (ईश. १६.) येथें आपल्यामधील पुरुष व बाहेर, उदाहरणार्थ सूर्यावर दिसणारा पुरुष, हे एकच आहेत, हें साधकाच्या अनुभवाला येतें. " (भ. गी. सा. द., पृ. २४३–२४४). चांगदेवपासष्टीमध्यें ज्ञानेश्वरांनीं स्वरूपदर्शन आणि त्यामुळें भेदबुद्धीचा नाश हा सिद्धान्त प्रतिपादिला आहे.

नुसधें मुख जैसें । दर्पणीं देखिजत असें दर्शनमिसें ।
वायांचि देखणें ऐसें । गमों लागे ।।
ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोन्ही डोळस आरिसे ।
परस्परें पाहतां कैसें । मुकले भेदा (चां. पा.)

"पाहती जे डोळे । रूप आपुलें तें खेळें ।।", "मीच मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ।।" या वचनांत तुकारामांनींहि स्वरूपदर्शनच वर्णिलें आहे.

**स्वरूपानुसंधान म्हणजे गंगासागर-भक्ति :** उच्च साक्षात्कारांत आरशांत पाहिल्याप्रमाणें परंतु आरशावांचून चिन्मय आत्मस्वरूपाचें दर्शन होतें व त्यामुळें भेदबुद्धि नष्ट होते. आत्मस्वरूप म्हणजे ईश्वरच होय, म्हणून जीवशिव यांमध्यें ऐक्य होतें, असें स्वरूपदर्शनाचें माहात्म्य वर सांगितलें. आतां, प्रथम अल्प प्रमाणांत रूपाचा अगर नादाच अनुभव येऊं लागतो व त्याच्या अनुसंधानानें साधक वरील उच्च दर्शनाच्या पदाला पोहोंचतो, स्वरूपानुसंधान हें एक वैशिष्ट्यपूर्ण साधन आहे, या सिद्धान्ताचा विचार करूं. योगतारावलींत, रेचक-पूरक-कुंभक या प्रक्रियांनीं सर्व नाडी शुद्ध झाल्यावर, साधकाच्या अंतर्यामीं 'अनाहत' नांवाचा अनेक प्रकारचा नाद सुरू होतो, असें सांगून श्रीशंकराचार्य म्हणतात :

नादानुसंधान नमोऽस्तु तुभ्यं ।
त्वां साधनं तत्त्वपदस्य मन्ये ।
भवत्प्रसादात्पवनेन साकं ।
विलीयते विष्णुपदे मनो मे ।।

भावार्थ :—नादानुसंधानाला नमस्कार असो; तेंच ब्रह्मैक्यपदाला पोचविणारें साधन आहे. त्याच्या कृपेनें प्राणासह मन विष्णुपदीं, ब्रह्मांत, लय पावतें.

दुसऱ्या एका वचनांत, स्वस्वरूपानुसंधान म्हणजे भक्ति असें सांगून श्रीशंकराचार्य म्हणतात, कीं ही भक्तिच मोक्षाचें श्रेष्ठ साधन आहे.

मोक्षसाधनसामग्र्यां भक्तिरेव विशिष्यते ।
स्वस्वरूपानुसंधाने भक्तिरित्यभिधीयते ।।

हीं आचार्यांचीं वचनें व ‘ सकळ धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ’ हें समर्थांचें वचन अगदीं समानार्थी आहेत. कापराला अग्नि लावला म्हणजे हळूहळू कापूर अग्निरूप होऊन शेवटीं कापूर पण पूर्णपणें नष्ट होतो, त्याप्रमाणेंच स्वरूपाचा अल्पसा स्पर्शहि जीवाला झाला म्हणजे हळूहळू तो स्वरूपच होऊं लागतो व अंतीं जीवभाव पूर्णपणें नष्ट होतो. कल्याणस्वामींनीं एका पदांत म्हटल्याप्रमाणें, स्वरूपाची बत्ती एकदां जीवाला लागली, कीं ती विझवितां येणार नाहीं; ती जीवभाव जाळून टाकील, रतिमात्रहि उरूं देणार नाहीं :

बत्ती लाविली कापुरा । ज्योतिस्वरूप झाला सारा ।
आला मुळींचीया घरा । न राहे रति ।।
सद्‌गुरु रामदास माउली । बत्ती कल्याणीं लाविली ।
निजवस्तु ते दाविली । स्वयं ज्योति ।।

याला वैशिष्ट्यपूर्ण साधन म्हटलें आहे, याचें कारण असें, कीं आत्म-स्वरूपाच्या अनुभवापासूनच या स्वधर्माच्या आचरणाला सुरुवात होते व तोच अनुभव वाढत वाढत त्यांत साधक विलीन होतो. सुरुवातीपासूनच “ विभक्त नव्हे तो भक्त ” व “ शिवो भूत्वा शिवं यजेत् ” ही भक्ताची व्याख्या त्याला लागू पडते. तो स्वरूपाचें अनुसंधान करतो, अर्थात् विभक्त राहत नाहीं; अनुभवाच्या प्रमाणांत शिवरूप होतो. कारण “ आत्मविदात्मैव भवति ”. गंगासागरांच्या संगमाच्या सार्थ रूपकानें या भक्ताचें उत्कृष्ट वर्णन केलेलें सांपडतें. सागराला मिळून गंगा पुनः मिळतच राहते; तेव्हां, वेगानें सागरांत शिरणारें पाणी ती गंगा व आंत जाऊन स्थिर झालेलें पाणी तो सागर, येवढाच भेद उरतो.

“ सागरींहि पाणी वेगें । संचरें तें रूप गंगे ।
येर निश्चळ जें उगें । तें समुद्र जैसा ।।

**आत्मानुभूतींची प्रक्रिया :** स्वरूपाचे प्राथमिक अनुभव कसे येऊं लागतात या प्रश्नाचा थोडा विचार करणें इष्ट आहे. कारण अनुसंधान करण्याला, मग तें नादाचें वा ज्योतीचें असो, प्रथम नाद वा ज्योति अंतरीं वा बाहेर प्रगट झाली पाहिजे. आत्मदर्शी सद्गुरूंच्या कडून मिळालेल्या सबीज नामाच्या स्मरणानें असे अनुभव येऊं लागतात, असें संतांनीं सांगितलें आहे. हाच अनेक साधकांचा अनुभव आहे. याला प्रत्यक्ष योगाच्या प्राणायामादि क्रिया करण्याची आवश्यकता नाहीं. नामस्मरणाच्या प्रक्रियेंत योगाचीं अष्टांगें सामावलेलीं आहेत, असें श्री गुलाबराव महाराजांनीं एका उत्कृष्ट अभंगांत स्पष्ट करून सांगितलें आहे. नामस्मरणांत मधून मधून केवल कुंभक सहज होतो व तो ध्यानाला उपकारक ठरतो असें गुरुदेव रानडे यांनीं म्हटलें आहे. केवल कुंभक मुद्दाम करतां येत नाहीं, तो सहज होतो, असेंहि त्यांचें सांगणें आहे. अशा रीतीनें खऱ्या साधनाला सुरुवात सबीज नामाच्या स्मरणानें होते. सबीज नाम म्हणजे ईश्वरशक्तीनें भरलेलें नाम. श्रेष्ठ आत्मसाक्षात्कारी पुरुष असें नाम देऊं शकतात. त्यांत ईश्वरबीजरूपी शक्ति असते व तें अंतःकरणांत पेरून, त्याच्यावर स्मरणाचें पाणी घातलें, अंतःकरणाचें क्षेत्र स्वच्छ राखलें, म्हणजे त्यांत ईश्वर हेंच पीक उगवतें, असें सबीज नामाच्या स्मरणाचें रूपकात्मक वर्णन गुरुदेव रानडे करीत असत. येथें सर्व संतांनीं प्रतिपादिलेली सद्गुरूंची आवश्यकता स्पष्ट होते. सद्गुरुविना मोक्ष नाहीं; कारण ही बीजशक्ति बाहेरूनच आणावी लागते. क्षेत्र उत्कृष्ट कसलें, पाणी घालण्याची तयारी केली, तरी त्यांत पेरण्यासाठीं बीज बाहेरून आणावें लागतें; ज्या क्षेत्रांत तें पूर्णपणें पक्व झालें असेल तेथून तें आणावें लागतें. त्याचप्रमाणें पूर्ण साक्षात्कारी सद्गुरू-कडून सबीज नाम मिळवावें लागतें. तेल-वात तयार केल्यावर दिवा पेटवा-वयाला ज्योति दुसरीकडूनच आणावी लागते. अग्निरूप होण्याची शक्ति तेल-वातींत आहे; पण ती प्रगट करण्यासाठीं प्रगट अग्नीचें साहाय्य लागतें. मनुष्याच्या अंतःकरणांत आत्मतत्त्व आहे, परंतु तें तेलवातीमधील अग्नीच्या स्वरूपाचें आहे. प्रगट आत्मतत्त्वाच्या स्पर्शानंतरच तें प्रगट होऊं शकतें व प्रगट आत्मतत्त्व आत्मदर्शी सद्गुरूंकडून सबीज नामाच्या रूपानें प्राप्त होतें. नामाची ही दिव्य शक्ति त्या अक्षरांत नसून तें देणाऱ्या सद्गुरूंत आहे. गुरुदेव

रानडे नामाच्या अक्षरांना आत्मशक्तीचें वाहक (Conduit) असें म्हणत असत. असें सबीज नाम म्हणजे ईश्वराचें दिव्यशक्तियुक्त प्रतीक असून नाम-स्मरण म्हणजे सतत ईश्वराशीं एकरूप होण्याची प्रक्रिया, असें नामस्मरणाचें विवेचन ते करीत असत. ( Name is the symbol of God carrying spiritual power and नामस्मरण is the process of constant identification with God. ) या दृष्टीनें सबीज नाम हेंहि एक प्रकारें स्वरूपच होय व स्वरूपानुसंधानाच्या साधनाची सुरुवात नामस्मरणापासून होते, असें म्हणण्यास हरकत नाहीं. नामस्मरणाच्या महतीचें रहस्य असें आहे; यासाठीं नामस्मरणाचें माहात्म्य सर्व संतांनीं एकमुखानें गाइलें आहे. नामस्मरण म्हणजे ब्रह्मरूप असणें, त्याचें विस्मरण म्हणजे मायेंत अडकणें, असें त्याचें सार्थ वर्णन एकनाथांनीं केलें आहे: “आठव तो ब्रह्म, नाठव तो भवभ्रम ।...स्मरण ते निजमुक्ति । विस्मरण ते अधोगति ॥”

**स्वरूपानुसंधानानें सख्यभक्ति :** सद्गुरूकडून सबीज नामाची प्राप्ति, त्याचें निष्ठेनें स्मरण, त्यामुळें तेज–नाद इत्यादि प्राथमिक अनुभव व त्याचें अनुसंधान–स्वरूपानुसंधान–आणि त्यापासून शेवटीं स्वरूपप्राप्ति, असा साधकाच्या जीवनाचा विकास वर दाखविला. या पायऱ्यांचा आतां मानसशास्त्राच्या दृष्टीनें विचार करून त्या विकासांतील सूत्र शोधण्याचा प्रयत्न करूं. गुरुदेव रानडे यांचे (व माझेहि) सद्गुरु श्रीभाऊसाहेब महाराज उमदीकर यांनीं आपल्या एका शिष्याला लिहिलेल्या पत्रांत या विकासाचें स्पष्टीकरण सूत्ररूपानें केलें आहे. ते लिहितात, “ तत्त्वाकडे दृष्टि दिल्यानें...डोळ्यांत वस्तूकडे माया झाल्यानें, वस्तूकडे लक्ष होत चाललें म्हणजे वस्तु दिसत आहे; नंतर अंत:करणांत प्रेम वाटून सख्यता घडत आहे; म्हणजे जाहलें.” महाराजांची मातृभाषा कानडी असल्यानें वरील वाक्याचा अर्थ सहज समजत नाहीं. नामस्मरण केलें म्हणजे वस्तु ( तेज-ज्योति-रूप वगैरेंना वस्तु हा शब्द संतांनीं लाविला आहे ) अनुभवाला येऊं लागते, वस्तुदर्शनानें आनंद होतो व तिच्याबद्दल माया किंवा प्रेम वाटूं लागतें व प्रेमयुक्त, भावयुक्त अनुसंधान किंवा ध्यान होतें. याचा परिणाम म्हणजे सख्यभक्ति. वस्तु म्हणजे आत्मा, देव; त्याच्याबद्दल

चढतेंवाढतें प्रेम हीच सख्यभक्ति. मला वस्तुदर्शन, ईश्वरदर्शन पाहिजे, दुसरें कांहीं नको, त्यासाठीं मी सर्वस्वाचा त्याग करावयाला तयार आहें, हीच सख्यभक्ति. वस्तुदर्शनाच्या चढत्या वाढत्या आनंदानें त्या आनंदाची ओढ लागते व अशा प्रकारची सख्यभक्ति वाढते. ही सतत वाढवीत राहणें येवढेंच साधकाच्या हातीं आहे. शेवटीं आत्मनिवेदन—ईश्वराशीं एकरूप होऊन त्यांत विलीन होणें—हें वाढत्या सख्यभक्तीनें ईश्वरकृपेनें होईल तेव्हां होईल. तेथें साधकाचे प्रयत्न पोहोंचूं शकत नाहींत. म्हणून सख्यता झाली म्हणजे झालें, असें महाराजांनीं म्हटलें आहे. समर्थांची सख्यभक्ति म्हणजे वस्तुतः संपूर्ण शरणागतिच आहे, हें पुढील ओव्यांवरून सहज ध्यानांत येईल:—

“ देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें ।
अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंहि वेचावें ॥...
देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसीं तुटी ।
सर्व अर्पावें शेवटीं । प्राण तोहि वेचावा ॥
आपुलें सर्व जावें । परी देवासीं सख्य राहावें ।
ऐसी प्रीति जीवेंभावें । भगवंतीं लागावी ॥...
देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ।...
देवाचें इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।”

दा. ४.८,६.८.९.२२.२३.

अशा शरणागतीनें, अनन्यभक्तीनें भक्ताचा जीवभाव पूर्णपणें नष्ट होतो व शिवाशीं एकरूप होण्याची योग्यता त्याला येते. ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणें, “ मजहि शरण रिघिजे । आणि जीवित्वेंचि असिजे । धिग्बोली इया न लजे । प्रज्ञा केवि ॥” ज्ञा. १८।१४०२. म्हणून पूर्ण शरणागतीवांचून आत्मनिवेदन, जीवाशिवांचें ऐक्य होऊं शकणार नाहीं. ती शरणागतीची अवस्था स्वरूपानुसंधानानें, त्याच्या चढत्या वाढत्या आनंदामुळें व त्यापासून वाढणाऱ्या प्रेमभक्तीमुळें कशी उत्पन्न होते, तें महाराजांच्या पत्रांतील वरील उताऱ्यांत सांगितलें आहे. या शरणागतीनें साधकावर ईश्वराची कृपा होते व भक्त ईश्वराशीं एकरूप होऊन त्याला परा शांति व शाश्वत पद प्राप्त होतें. गुरुदेव रानडे सांगतात : “ आपल्या भक्तींत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक 26311 दि: ...

शरणागतीची भावना उत्पन्न झाल्यावांचून, आपलें [illegible] सर्वस्वीं ईश्वरावर टाकल्यावांचून, परमार्थांत विशेष यश मिळणार नाहीं असें गीतेनें बजाविलें आहे.

“ तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ” ( १८.६२ )

शेवटीं गीता सांगते, कीं केवळ अनन्यभक्तीनेंच ईश्वराला जाणणें, पाहणें आणि त्याच्याशीं एकरूप होणें शक्य आहे :

“ भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ” ( ११.५४ )

आपल्या भक्तीनें देवाचें अंतःकरण हाललें पाहिजे; तें हाललें म्हणजे देव सर्व विश्व हालवील...शेवटीं साधकाच्या प्रयत्नावर ईश्वर आपल्या पूर्ण कृपादानाचा मुगुटमणि चढवितो :

“ तत्प्रसादात्परां शांतिं, स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् । ”
१८।६२. ( भ. गी. सा. द., पृ. २३९ )

**सर्वत्र तदीक्षण** : वस्तु किंवा स्वरूप म्हणजे एखादी उत्कृष्ट कलाकृति आणि केवळ तिच्या दर्शनानें होणाऱ्या आनंदानें अनन्यभक्ति निर्माण होते असें नाहीं; तर स्वरूपदर्शनानें त्यांतील सामर्थ्य, दयालुत्व, वत्सलता इत्यादि थोर गुणांचा अनुभव येतो व त्यामुळें वस्तु ( स्वरूप ) व साधक यांमध्यें देव–भक्त, गुरु–शिष्य, पिता–पुत्र अशासारखा जिव्हाळ्याचा संबंध उत्पन्न होतो. केवळ सौंदर्यदर्शनानें असा संबंध निर्माण होणार नाहीं. त्यापेक्षां उच्च आणि उदात्त, विशाल शक्तीचा अनुभव आला पाहिजे. याविषयीं ‘ भगवद्गीता : साक्षात्कारदर्शन ’ या ग्रंथांत गुरुदेव रानडे लिहितात : “ नैतिक मूल्यांच्या दृष्टीनें साक्षात्कारी पुरुषाचा त्यानें पाहिलेल्या आत्म्याशीं ( स्वरूपाशीं ) कसा संबंध येतो तें पाहूं.

“ आत्मानं चेद्विजानीयादयमस्मीति पूरुष : ।
किमिच्छन्कस्य कामाय शरीरमनुसंज्वरेत् ॥

( बृ. उ. ४–४.१२ )

मी पाहिलेला आत्मा म्हणजे वस्तुतः मीच आहें, असा अनुभव ज्याला आला, त्याचें शरीर व मन कोणत्या इच्छेनें किंवा वासनेनें संतप्त किंवा प्रक्षुब्ध होऊन कार्य करूं लागेल ? आत्मदर्शनानें अशा संतापाचा किंवा

प्रक्षोभाचा शेवट होईल. त्याचप्रमाणें "आत्मानमन्तत उपसृत्य स्तुवीत कामं। ध्यायन्नप्रमत्तोऽभ्याशोह यदस्मै स कामः समृध्येत यत्कामः स्तुवीतेति" (छां. १–३.१२). यावरून भक्तीच्या रक्षणासाठीं ईश्वर धांवून येतो व त्याचे सर्व मनोरथ पूर्ण करून त्याला मनःस्वास्थ्य देतो, असें उपनिषदांवरून स्पष्ट दिसून येतें." (पृ. २४६). प्रक्षोभ व मनोरथ दूर करण्याचें सामर्थ्य आणि दयालुत्व व वत्सलता या शक्ति, हे गुण अनुभवाला आले म्हणजे स्वरूप किंवा आत्मा हाच ईश्वर अशी भक्ताची खात्री होते व त्याबद्दल अनन्यभाव आणि शरणागति या भावना उत्पन्न होतात. मग आत्मा व ईश्वर असा भेद राहत नाहीं, आणि स्वरूप-दर्शन व ईश्वरदर्शन वा रामदर्शन असे शब्द भेद न करतां वापरले जातात. या दृष्टीनें समर्थांचा पुढील अभंग विचार करण्यासारखा आहे. त्यांत स्वरूप या शब्दाऐवजीं वस्तु व देव या शब्दांचा उपयोग केला आहे; तरी, हे शब्द स्वरूप या अर्थींच योजिले आहेत, यांत शंका नाहीं. स्वरूप-दर्शनाचीं सर्व लक्षणें या अभंगांत दृष्टीस पडतात :

अलभ्याचा लाभ अकस्मात झाला। देव हा वोळला एकाएकीं ॥
येकायेकीं सुख झालेसें एकट। वेर्थ खटपट साधनाचीं ॥
साधनाची चिंता तुटली पाहतां। वस्तुरूप होतां वेळ नाहीं ॥
वेळ नाहीं मज देवदरुशणा। सन्मुखाचि जाणा चहूंकडे ॥
चहूंकडे मज देवाचें स्वरूप। तेथें माझें रूप हारपलें ॥
हारपलें चित्त देवासी चिंतितां। दास म्हणे आतां कोठें जावें ॥

देवाचें एकाएकीं दर्शन, त्याचें अनुपम सुख, मग सर्वत्र तदीक्षण (आत्मदर्शन), त्यामुळें चित्त हारपणें (उन्मनी अवस्था) व वस्तुरूप होणें, या पायऱ्या लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. दा. १०.२१ यांतील विमलब्रह्माच्या वर्णनांतहि कांहीं अशींच लक्षणें दिलीं आहेत :

जिकडे तिकडे जेथें तेथें। विन्मुख होतां सन्मुख होतें।
सन्मुखपण चुकेना तें। कांहीं केल्या ॥
जिकडे जिकडे प्राणी पाहे। तिकडे तें सन्मुखाचि आहे।... ॥
पक्षी अंतराळीं उडाला। भोवतें आकाशाचि तयाला।
तैसें ब्रह्म प्राणियाला। व्यापूनि असे ॥

विज्ञानीं पाहतां उन्मन । सहजचि होतें...॥
झालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ ।
निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ॥

शेवटीं, स्वरूपानुसंधानाच्या साधनानें अद्वैतसाक्षात्कार व जीवब्रह्मांचें ऐक्य या अवस्थेला साधक कसा पोहोंचतों याचें विवेचन करणारा समर्थांच्या ' स्वरूपानुसंधान ' या प्रकरणांतील एक उतारा देऊन हा लेख संपवूं. यांत नवविधाभक्तीच्या योगानें शुद्ध ज्ञानाची प्राप्ति, पुढें स्वरूपदर्शन, त्याचें अनुसंधान आणि अनुसंधानानें विश्रांति अशा चढत्या पायऱ्या प्रथम सांगितल्या आहेत. या विश्रांतीमध्यें मन तद्रूप, वस्तुरूप होतें, मन पांगुळतें, स्वरूपसाक्षात्कारानें स्वतःला विसरून जातें, या पुढील अवस्था वर्णिल्या आहेत. या अनुभवाच्या आनंदानें व समाधानानें, पुनः पुनः एकान्तांत जाऊन याचाच उपभोग घ्यावा अशी ओढ लागते, हा मानसशास्त्राच्या दृष्टीनें महत्त्वाचा विचार सांगितला आहे. " मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक विषयीं घेईल ॥...तैसें भोगाआंतूनि निघतां । चित्त मजमाजीं रिघतां । हळुं हळुं पंडुसुता । मीचि होशील ॥" (ज्ञा. १२.१०६-१०९). विषयोन्मुख चित्त ईश्वरोन्मुख होऊन शेवटीं ईश्वरस्वरूप कसें होतें हें दाखविणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या वरील वचनाची आठवण येथें होते. या अभ्यासानें शेवटीं गुरुशिष्य अनुभवडोहीं बुडून जातात, दोघेहि ब्रह्मांत लीन होतात, केवलाद्वैताच्या अवस्थेला पोहोचतात व जन्ममृत्यूच्या चक्रांतून मुक्त होऊन साधक कृतार्थ होतो. अशा रीतीनें साधन सफल होतें, जीवन सफल होतें. अशी स्वरूपानुसंधान या साधनाची भव्योदात्त फलश्रुति समर्थांनीं सांगितली आहे. ही पाहिल्यावर ' स्वरूपीं राहणें ' या साधनाला त्यांनीं ' सकल धर्मामध्यें धर्म ' हें महान् पद कां दिलें हें स्पष्ट समजतें आणि नवविधा भक्ति व स्वरूपानुसंधानरूप साधन यांचा संबंधहि ध्यानांत येतो. तरी त्याचें थोडें अधिक विवेचन करणें उपयुक्त होईल. नवविधाभक्तीमध्यें साधनाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे अखंड नामस्मरण; इतर कांहीं भक्ति त्याला पोषक, उपकारक अशा आहेत. नामस्मरणानें तेज-नाद-इत्यादि अनुभव येऊं लागल्यावर त्यांचें अनुसंधान करूं लागल्यावरहि हें नामस्मरण सोडावयाचें नाहीं. कारण

अनुसंधान किंवा नाम यांपैकीं कशांतहि मन पूर्ण एकाग्र होत नाहीं. त्याला चिंतनाला जितक्या गोष्टी असतील ( अर्थात् ईश्वरविषयक ) तितक्या चांगल्या. पुनः स्वरूप सतत दिसेलच असें नाहीं; म्हणून अनुसंधानाच्या बाबतींत साधक स्वतंत्र नाहीं; नामस्मरणासंबंधीं तो स्वतंत्र आहे. म्हणून नामस्मरण केव्हांहि सोडावयाचें नाहीं. एक थोर सत्पुरुष सांगत असत त्याप्रमाणें ( ईश्वरविषयक रूप व नाद यांना अनुलक्षून ) " दिसेल तें पाहावें, ऐकूं येईल तें ऐकावें व उगीच नाम घ्यावें. " या साधनानें स्वरूपाचा आनंद व त्याचे इतर थोर गुण अनुभवाला येतात, स्वरूपच देव हें समजतें व अनन्यभक्ति वाढूं लागते. शरणागति येते म्हणजेच सख्य-भक्ति होते. नामस्मरण व सख्यभक्ति यांना जोडणारें सूत्र म्हणजे स्वरूपा-नुसंधान. त्याचें विवरण मागें आलेंच आहे. सख्यभक्तीनंतर ईश्वरकृपेनें तद्रूपता, जीवनाची आनंदमय अवस्था, कृतार्थता. असा ' स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ' भव्योदात्त, मोक्षदायी आहे.

हें नवविधाभजन । सायुज्यमुक्तिसाधन ।
तेणें करितां शुद्ध ज्ञान । प्राण्यासि होये ॥
शुद्ध ज्ञानाचें बळें । अंतरीं वैराग्य प्रबळे ।
तेणें लिंगदेह मोकळें । होय वासनेसीं ॥
लागे स्वरूपानुसंधान । नाठवे देहाभिमान ।
विश्रांतीतें देखें मन । तद्रूप होय ॥
आदिपुरुष एकला । नाहीं द्वैताचा गलबला ।
संगत्यागें अवलंबिला । शुद्ध एकांत ॥
तेणें मन पांगुळलें । आपणांस विसरलें ।
आपणांस भुलोनि गेलें । स्वरूपबोधें ॥
मी कोण हें न कळे । अवघा आत्मा प्रबळे ।
तेणें बळें मन मावळें । कर्पूरन्यायें ॥
तेणें शब्द कुंठित झाला । अनुभव अनुभवीं बुडाला ।
आतां असो हा गलबला । कोणीं करावा ॥
वाटे एकांतासी जावें । पुन्हां हेंचि अनुभवावें ।
उगें निवांत असावें । कल्पकोटी ॥

नको वक्तृत्व उपाधी । पांगुळली स्वरूपीं बुद्धि ।
लागली सहजसमाधि । हेतुरहित ॥
गुरुशिष्य एक झाले । अनुभवबोधीं बुडाले ।
त्यांचे शुद्धीस जे गेले । त्यांची तीच गति ॥
तुटला संसारसंबंधु । आटोनि गेला भवसिंधु ।
बुडाला बोधीं प्रबोधु । विवेकबळें ॥
ज्ञानाग्नि प्रगट झाला । मायाकर्पूर जळाला ।
विवेकें अविवेक ग्रासिला । तयें ठायीं ॥
झालें साधनाचें फळ । चुकलें जन्माचें मूळ ।
निष्कलंक आणि निर्मळ । तोचि आत्मा ॥ (पंचसमासी, ४।१८-३०)

**क्रममुक्ति :** गुरुदेव रानडे यांच्या साक्षात्कार–सोपानाचा मागोवा घेत, समर्थांच्या स्वरूपानुसंधानाविषयीं हे विचार वाचकांना सादर करीत आहें. यांतून आणखी दोन महत्त्वाचे मुद्दे उपस्थित झालेले दिसतात : ( १ ) जीवभाव हा आनंदांतच विरून जाऊं शकतो, तो नष्ट होण्याला श्रेष्ठ आत्मानंदाशिवाय दुसरा मार्ग नाहीं. " आनंद नाहाया, बंदा–खुदा दोनो बिसर गया । बे नामका नाम हुवा रहटाना राहा ॥ " ( २ ) बिंदु, तेज, घंटानाद इत्यादि प्राथमिक अनुभवांची वाढ होत होत उच्चतम असा आत्मसाक्षात्कार, स्वरूपसाक्षात्कार होतो. त्याच्या आनंदांत जीवभाव मुरला, विरला म्हणजे आत्मा ब्रह्मरूप होतो. तेव्हां बिंदु, तेज, घंटानाद या परमार्थपथावरील केवळ खुणा, मैलाचे दगड किंवा स्टेशनें होत हें त्यांचें वर्णन बरोबर नाहीं. खुणा किंवा मैलाचे दगड प्रवासाला अवश्य आहेतच असें नाहीं; परंतु हे अनुभव अवश्य आहेत. त्यांना उपमा द्यावयाची तर परमार्थसरितेचा उगम किंवा परमार्थतरूचा पहिला मोड, पहिलीं पानें, क्रमशः अधिक पानें, फुलें, फळें, अशी देतां येईल. ही सजीव ( organic ) वाढ आहे व याच्याच पूर्णतेंत, तुकाराम म्हणतात त्याप्रमाणें, " तुका म्हणे बीजें बीज दाखविलें । फूल फळ आलें गेलें वायां ॥ " ही पूर्णावस्था आहे.

( जीवन–विकास, जानेवारी, १९६० )

# ७. समर्थांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान

## ‘ जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ’

श्रीसमर्थांचें तत्त्वज्ञान परिस्थितिनिरपेक्ष शाश्वत जीवनमूल्यांना प्रेरणा देणारें आहे काय, या दृष्टीनें त्यांच्या तत्त्वज्ञानाचें विवेचन करणारा लेख पाठवावा, अशी प्रस्तुत विशेषाङ्काच्या संपादकांची सूचना आल्यावरून हा लेख लिहिला आहे. कारण, समर्थांच्या तत्त्वज्ञानांतून अशी प्रेरणा उत्कटतेनें मिळते आणि हीच त्या तत्त्वज्ञानाची थोरवी आहे, असें माझें मतच नव्हे तर, श्रद्धा आहे. माझे गुरुतुल्य गुरुबंधु गुरुदेव रानडे यांनींहि, “ रामदास-वचनामृत ” व “ महाराष्ट्रीय संतांचा साक्षात्कार ” ( Mysticism in Maharashtra ) या आपल्या ग्रंथांतील रामदासविषयक भागांत हेंच मत प्रतिपादिलेलें दिसून येईल.

### श्रीसमर्थांचें धर्माचें तत्त्वज्ञान

आधिभौतिक शास्त्रें एकेका मर्यादित क्षेत्रांतील घटनांचा अभ्यास करून त्यासंबंधीं सर्व ज्ञान तर्कशुद्ध पद्धतीनें मांडतात. या सर्व शास्त्रांचें ज्ञान व त्याबरोबरच मानवतेचे नैतिक, धार्मिक, कलाविषयक अनुभव या सर्वांचा विचार तत्त्वज्ञान करतें. या रीतीनें अखिल मानवी जीवन, त्या जीवनाचा हेतु, त्याचीं शाश्वत मूल्यें यांचें ज्ञान करून घेणें, हें तत्त्वज्ञानाचें कार्य आहे. प्लेटो म्हणतो त्याप्रमाणें, “ सर्व कालाकडे व सर्व विश्वाकडे पाहून, तत्त्वज्ञ त्याचें चिंतन करतो; त्याचें लक्ष परम सत्य तत्त्वाकडे लागलेलें असतें.” या दृष्टीनें सर्व तत्त्वज्ञान शाश्वत मूल्यांचा विचार करणारेंच असलें पाहिजे; परंतु अशाश्वत मूल्यांनाच शाश्वत म्हणणारें तत्त्वज्ञानीहि थोडे नाहींत. म्हणून, समर्थांचें तत्त्वज्ञान हें तत्त्वज्ञानाच्या वरील व्याख्येप्रमाणें खरें, उच्च तत्त्वज्ञान कसें आहे, हें आपल्याला येथें पहावयाचें आहे. आधिभौतिक शास्त्रांपेक्षांच

नव्हे, तर परतत्त्वज्ञान ( Metaphysics ) आणि नीतिशास्त्र यांपेक्षांहि तत्त्वज्ञानाचें क्षेत्र विशाल आहे. परतत्त्वज्ञानांत ईश्वर, विश्व व जीव यांच्या स्वरूपाचा विचार होतो; तत्त्वज्ञानांत नीति, कला, तर्कशास्त्र यांच्या सिद्धांतांचेहि विवेचन करावें लागतें. चांगलें काय व वाईट काय, कर्म काय व अकर्म काय, याचा विचार नीतिशास्त्र करतें, तर तत्त्वज्ञान निस्त्रैगुण्याचा व नैष्कर्म्याचाहि शोध घेऊं पाहतें. तत्त्वज्ञानाचा व्याप इतका विशाल आहे.

परंतु समर्थांचें जीवनतत्त्वज्ञान हें निधर्मी नसून, धर्माधिष्ठित आहे; किंबहुना तें धर्माचें तत्त्वज्ञान आहे. त्यामुळें एका दृष्टीनें तें अधिक विशाल आणि जिव्हाळ्याचेंहि होतें. ईश्वराचें बौद्धिक ज्ञान येवढाच तत्त्वज्ञानाचा विषय आहे, तर ईश्वराची प्राप्ति हा धर्माचा विषय आहे. हा अत्यंत महत्त्वाचा फरक लक्षांत ठेविला पाहिजे. म्हणूनच संतांनीं नुसत्या बौद्धिक ज्ञानानें स्वतःला ज्ञानी समजणाऱ्या पुरुषांना धोक्याच्या सूचना दिल्या आहेत. ज्ञान म्हणजे काय हें सांगण्यापूर्वी, समर्थांनीं कशाकशाला ज्ञान समजूं नये, हें विस्तारानें सांगितलें आहे (दा. ५.५). नंतर पुढच्या समासांत "ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ।" (दा. ५।६:१) असें ज्ञानाचें लक्षण केलें आहे; म्हणून, समर्थांच्या धर्माच्या तत्त्वज्ञानांत नीति, नामस्मरणप्रधान परमार्थसाधन, भक्तिभाव, साधकांच्या अडचणी या सर्व गोष्टींचा अंतर्भाव झाला आहे. गुरुदेव रानडे यांनीं आपल्या उपनिषद्रहस्यांत म्हटल्याप्रमाणें "मनुष्य प्रथम परतत्त्वाचें—ईश्वराचें किंवा ब्रह्माचें—स्वरूप बुद्धीनें शक्य तितकें निश्चित करण्याचा प्रयत्न करतो; नंतर, त्याची प्राप्ति करून घेण्यासाठीं आपलें आचरण कसें असावें याचा तो विचार करतो, व नैतिक पूर्णता साक्षात्काराशिवाय येणार नाहीं हें जाणून, तो परमार्थमार्गाचा शोध करूं लागतो." याप्रमाणें परतत्त्वज्ञानांतून नीतिशास्त्राकडे, नीतिशास्त्राकडून साक्षात्कारशास्त्राकडे मनुष्याची प्रगति होते. या सर्वांचें मिळून जीवनाचें तत्त्वज्ञान तयार होतें. बुद्धीनें परतत्त्वाचें बौद्धिक ज्ञान होतें आणि त्यामुळें त्याच्या प्राप्तीची इच्छा ही भावना उत्पन्न होतें. त्यानंतर क्रियाशक्ति ( Will ) त्याच्या प्राप्तीसाठीं कार्यप्रवृत्त होते व कार्याची दिशा ठरविण्यासाठीं साक्षात्काराकडे वळावें लागतें. परतत्त्वाच्या प्राप्तीच्या प्रयत्नांत

प्रतिभाशक्ति ( Intuition ) या मनुष्याच्या चौथ्या शक्तीची आवश्यकता असते.

शिवाजी महाराजांना मराठी साम्राज्य स्थापण्याची स्फूर्ति देऊन, तें कार्य यशस्वी करण्यासाठीं सर्व प्रकारचें साह्य देणारे महान् पुरुष म्हणून, अखिल महाराष्ट्रच नव्हे, तर भारतहि समर्थांना वंदन करीत आला आहे आणि करीत राहील. ते केवळ परमार्थाचा उपदेश करणारे संत नाहींत. अनेक देशभक्तांना त्यांच्या ग्रंथांतून स्फूर्ति मिळत आलेली आहे. कर्मप्रधान प्रकृतीच्या अनेक थोर पुरुषांना स्वातंत्र्यप्राप्ति हेंच त्यांचें मुख्य कार्य वाटतें; त्यांच्या पारमार्थिक कार्याला ते गौण लेखतात. प्रवृत्तीचा, देशसेवेचा, लोक-सेवेचा कटाक्षानें उपदेश करणारा एकमेव संत म्हणजे समर्थ, असें म्हटलें जातें. त्यामुळें, समर्थ हे प्रवृत्तिवादी कीं निवृत्तिवादी, हा वाद अद्याप सुरूच आहे. परंतु त्यांना मुख्यत्वेंकरून परमार्थ सांगावयाचा होता कीं राजकारण सांगावयाचें होतें, या वादांत येथें शिरावयाचें नाहीं. त्यांनीं परमार्थाचें तत्त्वज्ञान सांगितलें आहे यांत अर्थात्, कांहींच शंका नाहीं. त्या तत्त्व-ज्ञानांत शाश्वत, परिस्थितिनिरपेक्ष मूल्यांचें दर्शन होतें का व तें मनाला त्या मूल्यांकडे आकर्षित करण्याइतकें प्रभावी, स्फूर्तिदायक आहे का, येवढाच विचार येथें करावयाचा आहे.

या विषयाचा विचार आधुनिक पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या पद्धतीनें व त्याच्या पार्श्वभूमीवरून केला पाहिजे. नाहीं तर ईश्वरप्राप्ति, मोक्ष, कैवल्य हें उच्चतम शाश्वत मूल्य व त्याच्या प्राप्तीचा मार्ग समर्थांनीं सांगितलाच आहे, इतकेंच नव्हे तर, अनेक संतांना त्यांची प्राप्ति झाली आहे, स्वतः समर्थांनीं तें मिळविलें आणि मगच त्याचा उपदेश केला—आधीं केलें, मग सांगितलें—हा त्यांच्या ग्रंथाचा निष्कर्ष सर्वांनाच माहीत आहे. मग त्यांचें तत्त्वज्ञान शाश्वत मूल्यांना प्रेरणा देणारें आहे का, या प्रश्नाची चर्चा करण्याचें कारणच उरत नाहीं. परंतु ईश्वरप्राप्ति किंवा मोक्ष म्हणजे शाश्वत मूल्य हा शब्दप्रामाण्याचा सिद्धान्त आहे. आधुनिक तत्त्वज्ञानास आणि बुद्धिप्रधान पुरुषांना तो मान्य होणार नाहीं. तर्कशुद्ध पद्धतीनें त्या सिद्धान्ताची सत्यता पटवून दिली तरच ते तो मान्य करतील. तशी ती पटवून देणें आज अवश्य आहे. "उपनिषदें, भगवद्गीता इत्यादि आपल्या थोर ग्रंथांतील

सिद्धान्तावरील आपल्या श्रद्धेला तर्काचें अधिष्ठान आहे, ती तर्कसिद्ध आहे हें आधुनिक तत्त्वज्ञानाच्या पद्धतीनें दाखविणें हें आजच्या भारताचें कर्तव्य आहे," असें गुरुदेव रानडे यांनीं आपल्या उपनिषद्रहस्याच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे; यासाठींच त्यांनीं आपले आध्यात्मिक ग्रंथ लिहिले.

## उच्चतम आध्यात्मिक मूल्यें व 'तीन' वाद

पाश्चात्य तत्त्वज्ञान ज्ञाताकडून पुढें जाऊन अज्ञाताचा शोध घेण्याचा प्रयत्न करतें. मानवी मनबुद्धीला ईश्वराचें ज्ञान होऊं शकत नाहीं; तेव्हां मानवी बुद्धीला ईश्वराच्या जवळ असलेलें जें कांहीं समजतें, त्याच्या आधारानें ईश्वराची कल्पना मांडण्याचा तें कांहीं प्रयत्न करतें. ईश्वर हें जीवनांतील न समजणारें उच्चतम मूल्य मानलें तर, आपणाला समजलेलीं मूल्यें व ईश्वर यांचा कांहीं संबंध दिसून येतो का, हा विचार ते तत्त्वज्ञ करतात. त्यापूर्वीं ज्ञात मूल्यांची गुणानुक्रमें ते मांडणी करतात व यांतील उच्चतम मूल्यापलीकडे आपल्याला जातां येत नाहीं, बुद्धि येथें थांबते, हें मान्य करतात. आतां त्यांनीं मान्य केलेल्या सर्व मूल्यश्रेणींची प्राप्ति ईश्वर-प्राप्तीनें होते,—यापेक्षां आणखी कांहीं मिळतें असें संत एकमुखानें सांगतात, पण तें सोडून देऊं—येवढें सिद्ध केलें तर ईश्वरप्राप्ति हें अत्युच्च मूल्य आहे, हेंहि त्यांना मान्य होईल. शिक्षणापासून होणारे सर्व लाभ ज्याला कळणें शक्य नाहीं अशा बालकाला खाऊ, बक्षीस, नवा पोशाख, शाबासकी या प्रलोभनांनीं अभ्यासाला प्रवृत्त करावें लागतें. त्याच मार्गानें संतमहात्मे आपल्यासारख्या अप्रबुद्धांना ज्ञात मूल्यांचें प्रलोभन दाखवून ईश्वरोन्मुख करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या अत्यानंदाचें वैभव व ऐश्वर्य स्वानुभवावांचून, केवळ शब्दांनीं, कसें कळणार ?

शरीराचें सुख, संपत्ति, सत्ता यांचें महत्त्व मनुष्याच्या सहज ध्यानांत येतें; यांनाहि जीवनांतील मूल्यें असें एका अर्थानें म्हणतां येईल आणि चार्वाक असें म्हणत आले आहेतच. परंतु त्यांचें क्षणभंगुरत्व, त्यांच्या-पासून मिळणाऱ्या सुखाची क्षुद्रता व अपूर्णता विचारी पुरुषाच्या सहज लक्षांत येतें. "अपूर्ण कामीं मन हें विटेना" आणि "श्वोभोगा-ह्यस्तन यदन्तकैतद्" असें त्यांचें अर्थपूर्ण वर्णन थोर पुरुषांनीं केलें

आहे. उच्च मूल्यें यांच्या पलीकडे आहेत. आजच्या यंत्रयुगांत आणि लोकसत्तेच्या कालांत शास्त्रीय संशोधन, कारखाने व उद्योगधंदे यांचा विकास, समाजसुधारणा, सामाजिक संघटना इत्यादि नवीन मूल्यांकडे मनुष्य आशेनें पाहत आहे; परंतु एका लेखकानें म्हटल्याप्रमाणें "हे नवे देव मानवाला शांति, समाधान व सुख प्राप्त करून देतील कीं नाहीं, याविषयीं विचारी लोक, विशेषतः मागील महायुद्धानंतर, अत्यंत साशंक झाले आहेत." "सा विद्या या विमुक्तये" किंवा "ना दे चित्ता शांति ऐसी विद्या कशाला," असेंच वरील मूल्यासंबंधींहि विचारावें लागेल. शास्त्रीय प्रगति सुखाचीं साधनें उत्पन्न करते, सुखें उत्पन्न करीत नाहीं. सुख ही मानसिक अनुभूति आहे, हें विसरून चालणार नाहीं. तें नुसत्या साधनांवर अवलंबून नाहीं. साधन उत्पन्न करणारीं मूल्यें समाधानकारक ठरतात, म्हणून आध्यात्मिक मूल्यांचा विचार करावा लागतो. यांनाच तत्त्वज्ञान उच्चतम मूल्यें म्हणतें. यांना सद्गुणविषक मूल्यें किंवा शीलविषयक मूल्यें हें नांव देतां येईल. संयम, धैर्य, विवेक, समता, न्यायबुद्धि, अनासक्ति, सत्य, अहिंसा इत्यादि भगवद्गीतेच्या तेराव्या व सोळाव्या अध्यायांत सांगितलेल्या सद्गुणांसारख्या सद्गुणांचा त्यांत अंतर्भाव होतो. यांमध्येंहि समाजकल्याणाला आवश्यक आणि उपयुक्त अशा गुणांना आजच्या सामाजिक जीवनांत फार महत्त्व आलेलें आहे; त्यांच्याकडे मनुष्याचें मन विशेष वेधलें जातें. शिस्त, आत्मसंयमन, आत्मविनिग्रह, कायद्याबद्दल आदर, सहकार, शिक्षण, बंधुभाव या गुणांना सामाजिकदृष्ट्या फार महत्त्व आहे. म्हणून यांना उच्चतम आध्यात्मिक मूल्यें असें मानलें जातें.

वरील सर्व सद्गुण व्यक्तींच्या व समाजाच्या कल्याणाला आवश्यक आहेत, यांत कांहीं शंका नाहीं व याबद्दल मतभेद होण्याचेंहि कारण नाहीं; परंतु, यांना मूल्यें कां म्हणावें व विशेषतः यांत असें कोणतें तत्त्व आहे कीं ज्याच्या तरतमभावामुळें जीवनांतील या व इतर मूल्यांत नीच-उच्चभाव उत्पन्न होतो, द्रव्य आणि शरीरसुख यांपेक्षां संयम आणि सत्य हीं मूल्यें उच्चतर कां मानावयाचीं, हा प्रश्न उत्पन्न होतो. याचा विचार थोर तत्त्वज्ञ अनेक शतकें करीत आले आहेत, तरी त्याचें समाधानकारक उत्तर मिळालेलें नाहीं. समर्थांसारख्या साक्षात्कारी संतांनींच त्याचें पूर्णपणें समाधानकारक

उत्तर दिलें आहे, हें पुढें सांगावयाचें आहे. त्यापूर्वी, आतांपर्यंत नुसत्या बौद्धिक तत्त्वज्ञानानें त्यासंबंधीं काय म्हटलें आहे तें पाहणें अवश्य आहे. यासंबंधीं तीन उपपत्ति सांगणारीं तीन मतें किंवा 'वाद' आहेत.

(१) **सुखवाद** (Hedonism) : सुख हेंच नैतिक ध्येय किंवा उच्चतम मूल्य होय, असें सुखवादी मानतात. शारीरिक–बौद्धिक, क्षणभंगुर-शाश्वत, आतांच मिळणारें व पुढें मिळणारें, असे सुखाचे अनेक प्रकार असल्यामुळें, सुखवादांतहि अनेक उपमतें आहेत. स्वतःच्या शरीरसुखालाच सर्वस्व मानण्यापासून समाजाचें बौद्धिक, शाश्वत सुख म्हणजे उच्चतम मूल्य मानण्यापर्यंत या मताची उत्क्रांति झाली आहे. तरी अनेक प्रकारच्या सुखांपैकीं कोणत्या सुखाला उच्चतम म्हणावयाचें व उच्चतम मूल्य हें पद अर्पण करावयाचें हा प्रश्न अनिर्णितच राहिला आहे.

(२) **सर्वांगीण विकासवाद** (Functional view) : या मताप्रमाणें मनुष्याच्या सर्व शक्तींचा संवादी विकास हें उच्चतम जीवनमूल्य होय. बुद्धि, क्रियाशक्ति आणि भावना (Intellect, Will and Feeling) या तीनहि शक्तींची परस्परांच्या आड न येतां, संवादी, पूर्ण वाढ झाली कीं जीवन कृतार्थ झालें असें प्लेटोचें मत आहे. येथेंहि अशा पूर्ण वाढीचें स्वरूप किंवा लक्षणें स्पष्टपणें सांगतां येत नाहींत.

(३) **नियतकर्तव्यतावाद** (Intuitionism) : आपली सदसद्विवेकबुद्धि चांगलें काय व वाईट काय, हें आपल्याला अचूक सांगूं शकते; तिचा आदेश हा देवाचा आदेश आहे. तेव्हां ती सांगेल तेंच कर्तव्य किंवा सदाचरण अशा पूर्ण श्रद्धेनें वागणें हेंच जीवनांतील उच्चतम मूल्य असें या मताचे तत्त्वज्ञ सांगतात. सदसद्विवेकबुद्धीचा व्यावहारिक उपयोग फार मोठा आहे व सामान्यतः तिचा आदेश योग्य ठरतो हें खरें; पण तिच्या मार्गदर्शनाला मर्यादा आहेत. परिस्थितिनिरपेक्ष सदसद्विवेकबुद्धि दाखविणें कठिण होईल. थोर क्रांति घडवून आणतांना मुख्यतः अज्ञ सदसद्विवेकबुद्धीलाच धक्के द्यावे लागतात. सतीच्या चालीला कठोर विरोध करणारे लोक निर्दय किंवा पूर्ण अविवेकी नव्हते. त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीचा या गोष्टीपुरता विकास झाला नव्हता. आजच्या प्रमाणभूत विवेकाला पन्नास वर्षांनंतरची

पिढी खचित हंसेल. तेव्हां, सदसद्विवेकबुद्धि हाहि मूल्याचा प्रमाणभूत, शास्त्रीय निकष ठरत नाहीं.

## समर्थांचा निकष

साक्षात्कारी पुरुषांचा शाश्वत मूल्याला लावावयाचा निकष या सर्वांपेक्षां निराळा, पण या सर्वांना सामावून घेऊन, त्यांच्या फार पुढें जाणारा आहे. समर्थांचा निकष पहा :

नाना सुखें देवें केलीं । लोकें तयास चुकलीं ।
ऐसीं चुकतचि गेलीं । जन्मवरी ।।
सर्व सांडून शोधा मजला । ऐसें देवाचि बोलिला ।
लोकीं शब्द अमान्य केला । भगवंताचा ।।
उदंड सुख जया लागलें । तयास वेडे चुकले ।
सुख सुख म्हणताचि मेले । दुःख भोगितां ।।(दा. १३।७।२१-२५)

या प्रभावी शब्दांत समर्थांनीं जीवनाचें एकमेव ध्येयभूत मूल्य सांगितलें आहे. इतर सर्व साधनरूप मूल्यें आहेत. वरील वचनांचा, विशेषतः त्यांतील ( १ ) देव, ( २ ) सुख, व ( ३ ) शोधा मजला, या शब्दांचा मागोवा घेत आतां पुढें जावयाचें आहे.

( १ ) **देव** : देव शब्दाचा अर्थ काय ? समर्थ म्हणतात, "नाना प्रकारच्या मूर्ति देव या नांवास पात्र नाहींत; एक अंतरात्माच देव. जगांत चार प्रकारचे देव प्रसिद्ध आहेत; एक प्रतिमादेव, दुसरा अवतारदेव, तिसरा अंतरात्मादेव, चौथा निर्विकारी देव. त्यांतील निर्मळ, निर्विकारी, निश्चळ देव तोच खरा. त्याचें ध्यान करील तो निर्मळ होईल, निश्चळ होईल; उलट चंचळाचें ध्यान करील तो चंचळ होईल."

येक नाना प्रतिमा । दुसरा अवतार महिमा ।
तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी ।।
ऐसे चत्वार देव । सृष्टीमधील स्वभाव ।
यावेगळा अंतर्भाव । कोठेंचि नाहीं ।।
जो निर्मळास ध्याईल । तो निर्मळचि होईल ।
जो जयास भजेल । तो तद्रूप जाणावा ।।

अरे जो चंचळासि ध्याईल । तो सहजचि चळेल ।
जो निश्चळास भजेल । तो निश्चळाचि ॥ (दा. ११।८।३३-३९)

या अंतर्देवाला चुकतात व तीर्थाला जातात त्यांना जेथें तेथें धोंडा-पाणीच दिसतें; तेथें देव कसा मिळणार ?

तो अंतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती ।
प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ॥
मग विचारिती अंतःकरणीं । जेथें तेथें धोंडापाणी ।
उगाच वणवण हिंडोनी । काय होतें ॥ (दा. १८।८।११-१२)

समर्थांच्या परतत्त्वज्ञानांत हा देवाविषयीं सिद्धान्त झाला. परंतु, परतत्त्वज्ञानांत ईश्वर, आत्मा व विश्व या सर्वांचा विचार करावयाचा असतो. कारण या तीन गोष्टी मनाला दिसतात. त्या सर्वांच्या सत्यस्वरूपाचा बुद्धीनें निश्चय करण्याचा प्रयत्न परतत्त्वज्ञान करतें. त्याचे निष्कर्ष कितपत सत्य आहेत, हें पाहण्याचा निकष म्हणजे संतांनीं स्वानुभवानें सांगितलेले सिद्धान्त. विश्व, आत्मा, ईश्वर किंवा ब्रह्म यांनाच समर्थांनीं अनुक्रमें जड, चंचळ, निश्चळ, हीं नांवें दिलीं आहेत. यांत जड हें नाशवंत आहे, त्याचा नाश होतो, चंचळ निघून जातें व एक निश्चळ उरतें; हें पिंडांत दिसतें; तेंच ब्रह्मांडांतहि आहे. दृश्य विश्व तें जड; त्याचा महाप्रलयकालीं नाश होतो. विश्वात्मा निघून जातो व केवळ ब्रह्म उरतें. अर्थात् ब्रह्म हें एकच अविनाशी, शाश्वत सत्य तत्त्व आहे; इतर सर्व दृश्य जग क्षणभंगुर म्हणून असत्य होय.

जड देह भूतांचा । चंचळ गुण आत्मयाचा ।
निश्चळ ब्रह्मावेगळा ठाव कैचा । जेथें तेथें ॥
जड तितुकें पडलें । चंचळ तितुकें निघोनि गेलें ।
जडचंचळाचें रूप आलें । प्रत्ययासी ॥
निश्चळ आहे सकळां ठायीं । हें तों पाहणें नलगे कांहीं ।
गुणविकार तेथें नाहीं । निश्चळासी ॥
ब्रह्मव्यापकता अखंड । वरकड व्यापकता खंड ।
शोधून पाहतां जड । कांहींच नाहीं ॥ ( दा. २०।७।१२-२० )

एक ब्रह्मच खरें तर आत्म्याचें स्वरूप काय ? समर्थ सांगतात : “ जीवात्मा, शिवात्मा, परमात्मा आणि निर्मळात्मा हे चारी मिळून एकच, म्हणजे ब्रह्मच आहेत. केवळ उपाधीमुळें–खोट्या उपाधीमुळें–त्यांचीं स्वरूपें भिन्न वाटतात. पिंडीं व्यापक ब्रह्मांश तो जीवात्मा, ब्रह्मांडीं व्यापक तो शिवात्मा, ब्रह्मांडाबाहेरील तो परमात्मा आणि या सर्व उपाधीवेगळें ब्रह्म तोच निर्मळात्मा. ” ( दा. ८।७।४९–५२ ). या नाशवंत उपाधि नष्ट झाल्या कीं, केवळ ब्रह्मच उरतें. “ एकमेवाद्वितीयं ब्रह्म ” हें एकच सत्य आहे. समर्थांच्या परतत्त्वाचा येथें अधिक विस्तार करावयाचा नाहीं. मानवी जीवनाशीं त्याचा कसा संबंध आहे, हें दाखविण्याला अवश्य तेवढ्याच सिद्धान्ताचा वर उल्लेख केला आहे.

( २ ) **सुख** : सुख म्हणजे काय ? सुखाचा वरील विवेचनाशीं कांहीं संबंध येतो का ? समर्थ सांगतात कीं, आपला आत्माच ब्रह्म आहे, आपण आत्मा आहों, देह नाहीं, हें न समजल्यामुळें मनुष्य वासनेंत सांपडतो व दुःखी होतो. त्यांतून सुटण्याचा एकच मार्ग म्हणजे आत्मज्ञान, ‘ मी ब्रह्म आहे ’ हा अनुभव.

संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें वोसणती जन ।
माझी कांता, माझें धन । कन्यापुत्र माझे ॥
ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला ।
अंधकारें पूर्ण जाला । ब्रह्मगोळ आवघा ॥
नाहीं सत्त्वाचें चांदिणें । कांहीं मार्ग दिसे जेणें ।
सर्व भ्रांतीचेनि गुणें । आपेंआप न दिसे ॥
देहबुद्धि अहंकारें । निजेले घोरती घोरें ।
दुःखें आक्रंदती थोरें । विषयसुखाकारणें ॥
निदसुरपणेंचि सैरा । बहुतीं केल्या येरझारा ॥
नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट ॥
तया कष्टाचें निर्शन । व्हावया पाहिजे आत्मज्ञान ।...॥

( दा. ७।१।२०–२६ )

विषयवासनेनें दुःख, ईश्वरप्राप्तीनें सुख :

जयास वाटे सीण व्हावा । तेणें विषयो चिंतीत जावा ।
विषयो न मिळतां जीवा । तगबग सुटे ॥
सांडून राम आनंदघन । ज्याचें मनीं विषयचिंतन ।
त्यासी कैचें समाधान । लोलंगतासी ॥
जयासि वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें ।
(दा. ३।१०-६१-६३)

ईश्वरप्राप्तीचा, ब्रह्मरूप होण्याचा आनंद ही जीवनाची इतिकर्तव्यता, एकमेव ध्येय व मूल्य, असें समर्थ सांगतात. उपनिषदांत या आनंदाचें फार बहारीचें वर्णन आहे. गुरुदेव रानडे यांच्या उपनिषद्‌रहस्यांतून त्याचा भावार्थ येथें देत आहें : "सुदृढ, तरुण, धनाढ्य, सुकुलोत्पन्न, विद्यावान् अशा पुरुषाचा आनंद तो एक आनंद; अशा आनंदाच्या शंभरपट आनंद म्हणजे मनुष्यगंधर्वांचा एक आनंद; त्याच्या शंभरपट आनंद म्हणजे गंधर्वांचा एक आनंद,...; असें शतपटीनें चढत जाणारें आनंदाचें कोष्टक अनुक्रमें पितर, जन्मदेव, कर्मदेव, इंद्र, बृहस्पति इत्यादिकांच्या आनंदाचें प्रमाण दाखवितें. वासनाक्षय झालेल्या आत्मदर्शी पुरुषाला हे सर्व आनंद लाभतात" (तै. २।८). त्याचप्रमाणें छां. ७।२२।२५ मध्यें सांगितलें आहे, "सर्वव्यापी ब्रह्माचा साक्षात्कार झाला व 'मी', आत्मा व ब्रह्म यांचें ऐक्य अनुभवाला आलें म्हणजे येणारी अवस्था याचेंच नांव सुख." येथें नैतिक साध्य जें सुख त्याचें व साक्षात्काराचें मीलन होतें. साक्षात्काराशिवाय खरा आनंद नाहीं. सुखवादापेक्षां हा आत्मानंदवाद किती उच्च, भव्योदात्त, स्फूर्तिदायक आहे, त्याचा विचार वाचकांनीं करावा. पुनः हा आनंद म्हणजे कविकल्पना नसून समर्थांसारख्या अनेक साक्षात्कारी पुरुषांचा अनुभव आहे. या सर्वांनींच समर्थांप्रमाणें, "आधीं केलें मग सांगितलें।" आहे. आत्मज्ञानानें दुःखाचा नाश होईल असें वर एका उताऱ्यांत म्हटलें आहे. तेथें ज्ञान म्हणजे साक्षात्कार असा अर्थ आहे; "पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान ॥" सुख या शब्दानें

आत्मानंद समर्थांना अभिप्रेत आहे. त्यांत सर्व आनंदांचा वा सुखांचा सहज अंतर्भाव होतो.

( ३ ) **शोधा मजला** : देवाला सकळ सुखें लागलीं आहेत, त्याच्या प्राप्तीनें तीं मिळतील; म्हणून देवाला शोधणें हें कर्तव्य ठरतें. सर्व टाकून म्हणजे इतर सर्व मूल्यें जीवनाला कृतार्थता प्राप्त करून देण्याला असमर्थ आहेत, तीं क्षणभंगुर, दुःखपरिणामी आहेत, हें जाणून त्यांच्याकडे पाठ फिरवून ईश्वरप्राप्तीचा मार्ग धरला पाहिजे. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणें समर्थांचें तत्त्वज्ञान हें केवळ बौद्धिक समाधानासाठीं किंवा चर्चेसाठीं नाहीं. भारताचें आध्यात्मिक तत्त्वज्ञान केवळ बुद्धिनिष्ठ नाहीं; बुद्धीनें अस्पष्टपणें दाखविलेलें ध्येय, परतत्त्व, साधनानें आत्मसात् करून, त्याच्याशीं एकरूप होण्यासाठीं आहे. आत्मानंद हें प्राप्तव्य म्हणून त्यानें प्रतिपादिलें आहे आणि आत्मसाक्षात्कारावांचून तें साध्य होत नाहीं; म्हणून नीतिशास्त्र व साक्षात्कारशास्त्र यांचा त्यांत संयोग झाला आहे. निधर्मी ( Secular ) नीति समर्थांना संमत नाहीं. "सा विद्या या विमुक्तये" या वचनांत ज्याप्रमाणें निधर्मी विद्येला गौण स्थान दिलें आहे त्याचप्रमाणें समर्थांनीं साक्षात्कारविरहित नीतीलाहि गौण लेखलें आहे.

दृश्य पाप वोसरलें । पुण्य परब्रह्म उरलें ।
अनन्य होतां जालें । नामातीत ॥

आपण वस्तु स्वतःसिद्ध । तेथें नाहीं देहसंबंध ।
पापरासी होती दग्ध । येणें प्रकारें ॥

येरवीं ब्रह्मज्ञानेंवीण । जें जें साधन तो तो सीण ।
नाना दोषांचें क्षाळण । होईल कैसें ॥

पापाचें वळलें शरीर । पापचि घडे तदनंतर ।...॥

नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटणें ।
सर्वांहुनी कोटिगुणें । महिमा आत्मज्ञानाचा ॥

आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाहीं मर्यादा ।
दुष्ट पातकाची बाधा । निरसोन गेली ॥

( दा. १०।१०।५६–६५ )

अशा पुण्यप्राप्तीचा एकच उपाय म्हणजे साक्षात्कार, ही समर्थांची मुख्य शिकवण होय. त्यांतील तत्त्वज्ञान हें या मार्गाला उपकारक म्हणून सांगितलें आहे. 'दासबोधां'त आपण भक्तिमार्ग विशदपणें सांगितला आहे, असेंच सुरुवातीला सांगून, त्याचा तपशील समर्थांनीं नंतर दिला आहे.

भक्तिचेनि योगें देव । निश्चयें पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्राव । इये ग्रंथीं ॥ ( दा. १।१–४ )

## सद्गुरुकृपा व स्वरूपानुसंधान

हा देवशोधनमार्ग पुष्कळांना सर्वसाधारणपणें परिचित आहे आणि त्याचें विस्तारानें विवेचन करणें येथें शक्य नाहीं. दुर्गुणांचा त्याग करून, सद्गुण संपादून, सत्संगांत सद्गुरुकृपेनें मिळालेल्या नामाचें भक्तिभावयुक्त अखंड स्मरण करणें हा त्यांतील सारभूत भाग आहे. ईश्वरप्राप्तीला "सद्गुरुकृपा हेचि किली" असें बजावून समर्थांनीं सद्गुरूची आवश्यकता प्रतिपादिली आहे याची उपपत्ति गुरुदेव रानडे यांनीं आपल्या ग्रंथांत तर्कशुद्ध पद्धतीनें मांडली आहे. ती येथें देणें उपयुक्त होईल. बुद्धि, भावना व क्रियाशक्ति या मनुष्याच्या तीन शक्ति सर्वांच्या परिचयाच्या आहेत; परंतु मनुष्याला प्रतिभा ( Intuition ) नांवाची आणखी एक चौथी शक्ति आहे हें पुष्कळांना माहीत नाहीं. बहुतेकांमध्यें हिचा विकास झालेला नसतो. तिचा विकास करण्याचें साधन म्हणजे आत्मसाक्षात्कारी सद्गुरूंकडून मिळालेलें ज्ञान. अशा नामाच्या स्मरणावांचून प्रतिभेचा विकास होत नाहीं. ईश्वराचें ज्ञान करून देण्याला बुद्धि-मन-इंद्रियें असमर्थ आहेत; परंतु प्रतिभेला तें ज्ञान—साक्षात्कार—होऊं शकतें. प्रतिभेचा विकास नामस्मरणानें होत जातो आणि त्याबरोबरच आत्मसाक्षात्कारहि हळूहळू वाढतो. म्हणून ईश्वराच्या दर्शनाला 'सद्गुरुकृपा हेचि किली' असें समर्थांनीं म्हटलें आहे. बुद्धि, भावना व इच्छाशक्ति यांचा पुष्कळ विकास झालेले, अनुक्रमें प्राध्यापक, कलावंत व कार्यकर्ते पुरुष हेच सामान्य जनांच्या या शक्तींचा विकास करूं शकतात. त्यांच्या साहाय्याशिवाय इतरांच्या या शक्तींचा विकास होणें अशक्यप्राय आहे. तीच गोष्ट प्रतिभेची आहे. परमार्थांत सद्गुरूंची कृपा पाहिजेच, त्यांनीं दिलेल्या नामावांचून परमार्थ शक्य नाहीं. हें

पुष्कळांना पटत नाहीं; परंतु विद्यार्थ्यांना प्राध्यापकांची मदत पाहिजेच, यापेक्षां हें निराळें नाहीं. ध्येय जितकें उच्च व अवघड तितका साह्यकर्ताहि श्रेष्ठ लागतो व असे पुरुष अत्यंत दुर्मिळ असतात, इतकेंच.

साधनासंबंधीं समर्थांनीं दुसरी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे; ती म्हणजे स्वरूपानुसंधान. "सकळ धर्मांमध्यें धर्म। स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ॥" (दा. ८।९–५४) इतकें स्वरूपीं राहणें म्हणजे स्वरूपानुसंधान, या साधनाला त्यांनीं गौरविलें आहे. यांत साक्षात्काराचें मर्म सांठविलेलें आहे. स्वरूपानुसंधान आणि नामस्मरण यांचा फार निकट संबंध आहे. हीं दोन भिन्न साधनें नाहींत. गुरुकृपेनें मिळालेल्या नामाला सबीज, साक्षात्काराचें पीक येणारें नाम असें म्हणतात. ही बीजशक्ति म्हणजे ईश्वरी शक्ति. या दृष्टीनें सबीज नाम व देव यांत भेद नाहीं. "नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम। नामरूपा भिन्न नाहीं नाहीं ॥" (नामदेव) या नामस्मरणानें तेज, बिंदु, नाद असे अनुभव येऊं लागतात व वाढत वाढत, भाग्य असेल तर, पूर्ण 'स्वरूपदर्शन' होतें. वरील अनुभवांनाच 'नादरूप-ज्योतिरूप' (दा. ७।३–४७; १६।८–८) ब्रह्म किंवा आत्मा म्हटलें आहे. "भगवद्गीता म्हणजे साक्षात्काराचें तत्त्वज्ञान" या आपल्या ग्रंथांत गुरुदेव रानडे यांनीं सांगितलें आहे कीं, "बिंदूपासून किंवा प्राथमिक नादापासून साधकाला ज्या ज्या स्वरूपाचा अनुभव येतो, तें तें रूप वा नाद हें त्या साधकाचेंच स्वरूप असतें; मात्र त्याला तें माहीत नसतें. साक्षात्काराची वाढ होत, आरशांत दिसावें तसें, पण आरशावांचून, त्याचें स्वतःचें स्वरूप त्याला दिसतें, तेव्हां "हेंच माझें खरें स्वरूप" हा अनुभव त्यास येतो आणि मग साधकाचें व देवाचें पूर्ण ऐक्य होतें. पुढील वचनांत अशा आत्मदर्शनाचा उल्लेख आहे.

तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्। (यो. सू. १. ३)
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति (भ. गी. ६–२०)
नुसधें मुख जैसें। देखत असे दर्शनमिसें।
वायांचि देखणें ऐसें। गमों लागे ॥
ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे। दोन्ही डोळस आरसे।
परस्परें पाहतां कैसे। मुकले भेदा ॥ (चां. पासष्टी)

मीच मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ॥ ( तुकाराम )

पाहती जें डोळे । रूप आपुलें तें खेळे ॥ ( तुकाराम )

" पाहावें आपणासी आपण । या नांव ज्ञान " हें समर्थांचें वचन मागें दिलेंच आहे.

असे ज्योतिनादाचे अनुभव येऊं लागले म्हणजे नामस्मरण करतांना किंवा एरवींहि त्यांचें अनुसंधान करणें म्हणजे स्वरूपानुसंधान. नामस्मरण हेंहि स्वरूपानुसंधानच आहे, कारण त्यांतहि दैवी शक्तिच आहे. या स्वरूपानुसंधानांत आनंद आहे; रूप थोडें असेल, तर आनंद थोडा वाटेल, पण आनंद खास असतो. त्यामुळें, " मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख । तेतुलें अरोचक । विषयीं घेईल ॥ " ( ज्ञा. १२–१०६ ) या वचनाप्रमाणें विषयासक्ति कमी कमी होते, नामस्मरणांत व अनुसंधानांत एकाग्रता वाढते व त्यामुळें साक्षात्कारहि वाढत जातो. शेवटीं क्रमानें, तितकें भाग्य व उत्कटता हीं असतील तर, मनाचा स्वरूपांत लय होतो, असें संत सांगतात. स्वरूपानुसंधान समर्थांनीं उपदेशिलें आहे, तसेंच ' योगतारावलीं ' त शंकराचार्यांनीं नादानुसंधान प्रतिपादिलें आहे. सहज-कुंभकाच्या अभ्यासानें देहांत अनेक प्रकारचा अनाहतनाद उत्पन्न होतो, हें सांगून ते म्हणतात :

नादानुसंधान नमोस्तुभ्यं त्वां साधनं तत्त्वपदस्य मन्ये ।
भवत्प्रसादात्पवनेन सार्धं विलीयते विष्णुपदे मनो मे ॥

भावार्थ : 'नादानुसंधाना, तुला नमस्कार असो. तूं तत्त्वपद प्राप्त करून देणारें साधन आहेस. तुझ्या कृपेनें प्राणांसमवेत माझें मन विष्णुपदीं ( ब्रह्मांत ) लीन होतें. '

## हा पंथराज–विश्वधर्म

नामस्मरणयुक्त स्वरूपानुसंधानाच्या साधनानें स्वरूपसाक्षात्कार हळूहळू कसा वाढतो व शेवटीं प्रत्यक्ष स्वस्वरूपदर्शन होऊन, ' मीच ब्रह्म ' हा अनुभव कसा येतो, हें " दासबोधाचा सोलीव अर्थ " या प्रकरणांत समर्थांनीं वर्णिलें आहे. त्यांतील महत्त्वाच्या ओंव्या मुळांतच देतों.

धैर्याचें आसन बळकट । आणि इंद्रियें वोढुनी सधट ।
धरे ऊर्ध्वपंथें वाट नीट । अढळपदीं लक्ष लावी ॥
तैं मार्गाची करूं नव्हाळी । प्रथम घंटानादाची नवाळी ।
मग किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहत कोल्हाळ ॥
अंतीं अग्रीं लक्ष लावी । काय दिसेल तें न्याहाळीं ।
चंद्रज्योती प्रकाशली । विभु बांधिला बळकट ॥
तें सुख अंतरीं घेउनी । पुढें चाल करी संगमीं ।
तेथें विजु ऐशा कामिनी । चमकताती सुवर्ण रंग ॥
तेंहि जाणोनि मागें सारी । पुढें सूर्यबिंब अवधारी ।
ज्वाळा निघती परोपरी । दंडळूं नको कल्पांतीं ॥
अनंत भानु तेज अद्भुत । खदिरांगार ज्वाळा उसळत ।
धारिष्ट तेथें न निभत । दुर्घट विभु तेथींचा ॥
तेथें हुशारीचें काम । अग्रीं लक्ष घालूनि नेम ।
तीर लावून सुगम । मागें सारी सूर्यातें ॥
पुढें दिसेल जें नवल । तें पाही हंसमेळ ।
चंद्रकिरण शीतळ । मग पाहसी तूं वत्सा ॥
तेव्हां मागील दाह शमेल । सीतळाई सर्वांग होईल ।
चंद्राची प्रभा सुढाळ । फडफडीत चांदणें ॥
तोचि डोळियाचा डोळा पाही । देहातीत वर्म विदेही ।
चिन्मय सुखाची नवाई । भोगी आपुलें कीं गा ॥
अनुभवाची शीग भरली । अग्रावरी उसळली ।
भूमंडळीं प्रभा पडली । कर्पूरवर्ण नभ झालें ॥
तया मध्यभागीं सघन । अढळपद दैदीप्यमान ।
उर्वरित ब्रह्म जाण । ध्रुव बैसला अढळतें ॥
तें तुझें स्वरूप नेटेंबोटें । जेथें समस्त जाणणें आटे ।
ऐकें झालासि धिटें । बळकटपणें बलाढ्य ॥
ऐसें सुख योगिया लाधलें । तेव्हां देहाचें स्मरण गेलें ।
सांगणें ऐकणें मुरालें । एकत्वपणें एकचि ॥

(सोलीव अर्थ, १५–३०

यांत, दृढ आसन घालून, अढळपदीं (सहस्रदल कमलावर) लक्ष लावून नामस्मरण केल्यानें येणाऱ्या घंटा–किंकिणी–कोल्हाळादि नाद आणि चंद्रज्योति, विजेसारख्या कामिनी, सूर्यबिंब, हंसमेळ, चंद्रकिरण, डोळ्याचा डोळा, भूमि व आकाशभर पसरलेली कर्पूरवर्ण प्रभा इत्यादि अनुभवांचें अद्‌भुत, स्फूर्तिदायक वर्णन आहे. असा स्वरूपानुसंधान हा ज्ञान, ध्यान, भक्ति, कर्म या चारी मार्गांचा बनलेला ' पंथराज ' आहे. त्यांत ईश्वराचें चढतें–वाढतें ज्ञान म्हणजे अनुभव आहे. तो अनुभव आनंदमय आहे. जेथून आनंद तेथें प्रेमभक्ति; म्हणून तेथें भक्ति आहे. या दृष्टीनेंच " स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते । " अशी भक्तीची व्याख्या आचार्यांनीं केली आहे. स्वरूपीं राहणें–स्वरूपानुसंधान–म्हणजे स्वधर्म : तेव्हां हें सत्कर्महि आहे; हें कर्म मानसिक आहे, इतकेंच. ध्यान तर आहेच, हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. हा पंथराज विश्वधर्म आहे; येथें जाति, धर्मपंथ, भाषा, देश, काल असे भेद नाहींत; अखिल मानवतेचा हा धर्म आहे, असें गुरुदेव रानडे सांगतात.

स्वरूपानुसंधानानें केवलाद्वैताचा अनुभव कसा येतो, हें सांगणाऱ्या ' पंचसमासी ' मधील ओव्या मागें उद्धृत केल्याच आहेत.

देवाचा शोध घेण्याचें साधन कोणतें व त्यापासून पूर्ण साक्षात्कार कसा होतो, याचें थोडक्यांत विवेचन झालें. आतां साक्षात्काराच्या नैतिक परिणामांचा विचार करावयाचा आहे; कारण जीवनमूल्यांच्या दृष्टीनें ते परिणामच महत्त्वाचे आहेत. साक्षात्काराचा अनुभव नसलेल्या आपल्यासारख्या अज्ञ जनांना त्याचें वैभव, आनंद आणि भव्योदात्तत्व कसें कळणार? आपल्या मनबुद्धीला कळणाऱ्या त्याच्या नैतिक परिणामावरून आपण त्याच्या भव्योदात्ततेची कल्पना करणार. दसऱ्याला निघणारी सम्राटाची स्वारी पाहून त्याच्या अगणित संपत्तीचा कयास बांधला तर तो जितका बरोबर येईल, तितकीच नैतिक परिणामावरून केलेली साक्षात्काराच्या भव्योदात्ततेची कल्पना बरोबर ठरेल! पण अंतरंग ज्यांना कळत नाहीं, त्यांना बाह्यरंगावरच संतुष्ट राहिलें पाहिजे. येथेंहि समर्थांच्या ओव्या मुळांतच देत आहें. हे उतारे फार लांब आहेत खरे; परंतु इतके तेजस्वी

विचार समर्थांच्या ओजस्वी भाषेंतच वाचकांच्या पुढें ठेवणें योग्य होय असें वाटल्यावरून विस्ताराचा दोष पत्करून ते दिले आहेत.

अंतरीं गेलिया अमृत । बाह्य काया लखलखित ।
अंतरस्थिति बाणतां संत । लक्षणें कैसीं ॥
सदा स्वरूपानुसंधान । मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोनि आपण । जनावेगळा ॥
बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं ।
सिद्धलक्षण हें चतुरीं । जाणिजे ऐसें ॥
संदेहरहित साधन । तेंचि सिद्धाचें लक्षण ।
अंतर्बाह्य सामाधान । चळेना ऐसें ॥
बाह्य भलतैसें असावें । परी अंतर स्वरूपीं लागावें ।
लक्षणें दिसतीं स्वभावें । साधुआंगीं ॥
येरव्हीं अभ्यास करितां । हातां न चढेती सर्वथा ।
स्वरूपीं राहावें तत्त्वता । स्वरूप होउनी ॥
ऐसीं लक्षणें बरवीं । स्वरूपाकारें अभ्यासावीं ।
स्वरूप सोडितां गोसावी । भांबावती ॥
स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैंची उरेल कामना ।
म्हणौनियां साधुजना । कामचि नाहीं ॥
कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा ।
साधुजनाचा अक्षै ठेवा । जाणार नाहीं ॥
ह्मणोनि ते क्रोधरहित । जाणती स्वरूप संत ।...॥
आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद ।...॥
साधु स्वरूप निर्विकार । तेथें कैचा तिरस्कार ।
आपला आपण मत्सर । कोणावरी करावा ॥
साधु वस्तु अनायासें । याकारणें मत्सर नसे ।
मदमत्सराचें पिसें । साधूसि नाहीं ॥
साधु स्वरूप स्वयंभ । तेथें कैचा असेल दंभ ।...॥
अवघें ब्रह्मांड त्याचें घर । पंचभूतिक हा जोजार ।
मिथ्या जाणोन सत्वर । त्याग केला ॥

या कारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे ।...॥
दृश्य सांडूनि नाशवंत । स्वरूप सेविलें शाश्वत ।
या कारणें शोकरहित । साधु जाणावा ॥
शोकें दुखवावी वृत्ति । तरी ते जाहली निवृत्ति ।
म्हणौनि साधु आदिअंतीं । शोकरहित ॥
मोहें झळंबावें मन । तरी तें जाहलें उन्मन ।...॥
सत्य स्वरूपें अमर झाला । भये कैंचें वाटेल त्याला ।...॥
आशा धरतां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची ।...॥
मृदपणें जैसें गगन । तैसें साधूचें लक्षण ।...॥
स्थिति बाणतां स्वरूपाची । चिंता सोडिली देहाची ।...॥
अलक्ष्यासी लावी लक्ष । म्हणोन साधु परमदक्ष ।...॥
स्वरूपीं न साहे मळ । म्हणोन साधु तो निर्मळ ।...॥
सकळ धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणाचें ॥ (दा. ८।९।१-५४)

## ईश्वरप्राप्ति या मूल्याचें मूल्य

समर्थांनीं आपल्यापुढें ठेविलेल्या ईश्वरप्राप्ति किंवा साक्षात्कार या ध्येयाच्या उज्ज्वल, उन्नत, आनंदमय, पुण्यमय, बोधमय स्वरूपाचें दर्शन थोडक्यांत घेतलें. त्यापूर्वी आधुनिक तत्त्वज्ञानांत प्रतिपादिलेलीं मूल्यें व त्यांतील नैतिक मूल्यांचे निकष, यांचाहि विचार केला. आतां या दोहोंची तुलना करून, ईश्वरप्राप्ति या मूल्याचें मूल्य ठरवावयाचें, एवढेंच काम उरलें आहे, त्याकडे वळूं.

नीति, सद्गुण किंवा मूल्य कशाला म्हणावें, यासंबंधीं तीन भिन्न मतें मागें सांगितलीं आहेत. (१) सुखवाद (२) सर्वांगीण विकासवाद, (३) नियतकर्तव्यतावाद हे तीनहि निकष कसे असमाधानकारक आहेत, हेंहि तेथें पाहिलें आहे. साक्षात्काराला हे निकष लाविले तर काय दिसून येतें, हें क्रमशः पाहूं.

(१) आत्मानंदवाद या स्वरूपांत साक्षात्कारामध्यें सुखवाद दृष्टीस पडतो. त्यांत सुख व नीति यांत विरोध नाहींच; परंतु आत्मानंद हा सर्व

सद्गुणांची जन्मभूमि आहे, हें आतांच दिलेल्या दा. ८ । ९ मधील उताऱ्यावरून दिसून येईल. आत्मानंदापुढें बौद्धिक सुख देखील तुच्छ आहे, हें सांगतांना गुरुदेव रानडे म्हणतात, "पशूच्या सुखापेक्षां सॉक्रेटिसाचें बौद्धिक सुख अति श्रेष्ठ. त्याचप्रमाणें, असें म्हणतां येईल कीं, पशूच्या शरीरसुखापेक्षां सॉक्रेटिसाचें बौद्धिक सुख जितकें उच्चतर, तितकाच संतांचा आत्मानंद सॉक्रेटिसाचा बौद्धिक सुखापेक्षां उच्चतर आहे." अशा आत्मानंदाचें ध्येय समर्थांनीं प्रतिपादिलें आहे.

(२) सर्वांगीण विकास साक्षात्कारांत होतो का? परमार्थ शेवटाला गेला हें कशावरून ओळखावें हें सांगतांना समर्थांनीं तीनच ओव्या लिहिल्या आहेत. त्यांत या प्रश्नाचें उत्कृष्ट उत्तर सांपडतें.

पापाची खंडणा जाली । जन्मयातना चुकली ।
ऐसी स्वयें प्रचीत आली । म्हणिजे बरें ॥
परमेश्वरास वोळखलें । आपण कोणसें कळलें ।
आत्मनिवेदन झालें । म्हणिजे बरें ॥
ब्रह्मांड कोणें केलें । कासयाचें उभारिलें ।
मुख्य कर्त्यास वोळखिलें । म्हणजे बरें ॥

(दा. १० ।८।२१–२३)

या अर्थपूर्ण, अमोल ओव्या आहेत. बुद्धि, भावना व क्रियाशक्ति या मनुष्याच्या तीन शक्ति असून, सत्यशोधन ही बुद्धीची, सुखशोधन ही भावनेची व सद्गुणशोधन ही क्रियाशक्तीची उच्चतम प्रवृत्ति आहे. पापाचा पूर्ण नाश व सर्व सद्गुणांची प्राप्ति झाली म्हणजे क्रियाशक्तीचें समाधान होतें; दुःखाचा पूर्ण नाश आणि परमानंदप्राप्ति यांनीं भावनांचें समाधान होतें; आणि ईश्वर, 'मी' आणि विश्व यांचें स्वरूप समजलें कीं बुद्धीचें समाधान होतें. साक्षात्कारानें या तीनहि गोष्टी होतात, हें साक्षात्काराच्या परिणामांचें वरील वर्णन वाचल्यावर दिसून येतें. साक्षात्काराच्या आत्मानंदानें देहभावच जातो; मग दुःखें व पाप रहातील कोठून? त्याचप्रमाणें एक ब्रह्मच खरें, 'मी' व 'विश्व' खोटें हा अनुभव येतो. असा तीनहि शक्तींचा विकास होतो. तत्त्वज्ञानांत प्रतिभा (Intuition) या शक्तीचा विचार झालेला नाहीं. ती विकसित झाल्यावांचून मनुष्याचा

सर्वांगीण विकास होणें शक्य नाहीं. साक्षात्कारांत प्रतिभेचा विकास व्हावा लागतो आणि प्रतिभेच्या विकासानें इतर तीनहि शक्तींचा पूर्ण विकास होतो. तेव्हां या निकषाच्या दृष्टीनेंहि साक्षात्कार हें मूल्य शिरोभागीं आहे.

( ३ ) नियतकर्तव्यतावादाचा आधार म्हणजे सदसद्विवेकबुद्धि; परंतु व्यक्तिमात्रांत तिचें स्वरूप पालटतें म्हणून तिला प्रमाण मानतां येत नाहीं. एका खोंचक टीकाकारानें म्हटल्याप्रमाणें, "सदसद्विवेकबुद्धि गर्दभराजाची असेल तर कसें ?" सत्य-असत्य, चांगलें-वाईट, याला प्रमाण साक्षात्कारी पुरुषाचें मन. यालाच गुरुदेव रानड्यांनीं उपनिषद्रहस्यांत 'नैतिक स्वायत्तता' हें नांव दिलें आहे. खरा Intuitionism साक्षात्कारांतच दृष्टीस पडतो.

हे सर्व निकष लावले तरी साक्षात्कार हें उच्चतम मूल्य ठरतेंच; त्याबरोबर, साक्षात्कारानें सर्व सद्गुणहि पूर्णत्वानें अंगीं येतात, हेंहि आपण पाहिलें. साक्षात्कारानंतर दिसून येणारे सद्गुण तर श्रेष्ठ आहेतच; परंतु साधनमार्गांत आवश्यक असणारे, व म्हणून संपादन करावे लागणारे अपूर्ण अवस्थेंतील सद्गुण देखील अत्यंत स्फूर्तिदायक आहेत. आधुनिक तत्त्वज्ञानाला अभिप्रेत असलेल्या सद्गुणांपैकीं कांहींचा उल्लेख मागें आला आहे. 'दासबोधां'तील सत्त्वगुणलक्षण (२–७) साधकलक्षण (५–९) शिष्य-लक्षण (५–३) येवढ्याच समासांचा विचार केला तरी समर्थांचें नीति-शास्त्र किती प्रगल्भ आणि खोल आहे, हें सहज ध्यानांत येईल. कोणतेंहि आधुनिक तत्त्वज्ञान वैयक्तिक सद्गुणांच्या विचारांत त्यापेक्षां पुढें गेलेलें नसावें.

कला किंवा सौंदर्य हें आधुनिक तत्त्वज्ञानांत एक मोठें मूल्य मानलेलें आहे. मला कलाशास्त्राची (Aesthetics) किंवा कोणत्याहि कलेची मुळींच माहिती नाहीं; परंतु कलेच्या अनुभवाचें मानसशास्त्राच्या दृष्टीनें केलेलें विश्लेषण कोणालाहि समजण्यासारखें आहे. त्या अनुभवाची संतांच्या साक्षात्काराच्या अनुभवाशीं तुलना करून काय निष्कर्ष निघतो, तेंहि पाहूं या. कलेच्या अनुभवासंबंधीं कॅलेन म्हणतो, "कलावस्तूच्या दर्शनानें एकदम मनांत आणि देहांत कांहीं प्रक्रिया सुरू होतात. त्या पूर्णपणें संवादी

असतात; त्यांत संघर्ष, त्रस्तता, परकेपणा यांचा अंशहि नसतो; मन बाह्य विश्वाला विसरून कलावस्तूशीं तात्पुरतें एकरूप होतें; त्या एकरूपतेंत पूर्ण समाधान, आनंद असतो. भोंवतालीं ऐक्य, चैतन्य आणि कालाचें अनंतत्व प्रकट होतें; त्यामुळें आत्म्याचें जीवन विशाल आणि समृद्ध होतें. " हा आनंद आणि त्याचे सर्व अनुभव त्या वेळेपुरतेच असतात, शाश्वत नाहींत. साक्षात्कारानें आलेल्या ब्रह्मरूपतेचें वर्णन आतांपर्यंत आलें आहे; त्याच्याशीं वरील अनुभवाची तुलना सहज करतां येण्यासारखी आहे; म्हणून आणखी एकच अभंग येथें तुलनेसाठीं उद्धृत करतों. त्यांत ईश्वरदर्शनानें आलेल्या शाश्वत अवस्थेचें वर्णन समर्थांनीं केलें आहे. ईश्वरसाक्षात्कारानें सर्व सुख झालें, चिंता, खटपट, कष्ट हीं संपलीं, देव चहूंकडे व सदासन्मुख दिसूं लागला, त्यांत रामदासांचें चित्त व रूप हरपलें आणि वस्तुरूप, ईश्वररूप झालें, ही अवस्था निश्चित भव्योदात्त आहे. हिची कलानुभवाशीं तुलना करून काय निष्कर्ष निघतो, तें वाचकांनींच पाहावें :

अलभ्याचा लाभ अकस्मात झाला । देव हा बोळला येकायेकीं ।।
येकायेकीं सुख जाहलें एकट । वेर्थ खटपट साधनाची ।।
साधनाची चिंता तुटली पाहातां । वस्तुरूप होतां वेळ नाहीं ।।
वेळ नाहीं मज देवदरुशणा । सन्मुखाचि जाणा चहूंकडे ।।
चहूंकडे मज देवाचें स्वरूप । तेथें माझें रूप हारपलें ।।
हारपलें चित्त देवासी चिंतितां । दास म्हणे आतां कोठें आहे ।।

आध्यात्मिक तत्त्वज्ञानांत सामाजिक सद्‌गुणांवर विशेष भर दिला जात नाहीं, असा एक सार्वत्रिक आक्षेप आहे. परमार्थ हा थोडा उच्च, पण स्वार्थच आहे. भक्त आपल्या आनंदाकडे पहातो; दुसऱ्यांच्या सुखदु:खाकडे पाहत नाहीं; सामाजिक कर्तव्यांची त्याला मुळींच जाणीव नसते, असें नेहमीं म्हटलें जातें. समर्थांच्यापुरता तरी हा आक्षेप मुळींच टिकण्यासारखा नाहीं. त्यांनीं स्वतः कर्मयोगाचें उत्कृष्ट आचरण केलेंच; पण " करावें–करवावें, शिकावें–शिकवावें " असाच उपदेश जगाला केला आहे. तथापि परमार्थ व परमार्थाचा उपदेश, हेंच समर्थांच्या जीवनाचें मुख्य कार्य, राजकारण हें " प्रकृतिस्त्वां नियोक्षति " या नियमानें सहज

घडलेलें, असें माझ्याप्रमाणें ज्यांचें मत आहे, त्यांनीं साक्षात्कार व समाजधारणा यांचा संबंध काय आहे, तें पाहिलें पाहिजे. समाजविघातक प्रवृत्ति स्वार्थापासून, विषय–धन–कीर्ति या ईषणात्रयापासून, उत्पन्न होतात. मनुष्याच्या अंतःकरणांत स्वभावतः असणारी भूतदया व सहानुभूति यांचा नाश ईषणात्रयांतून जन्मणाऱ्या कामक्रोधमत्सरांमुळें होतो. विषयवासना ओसरली कीं, भूतदयादि सद्भावना जागृत होऊन, आपलें कार्य करूं लागतील. विषयवासना उपदेशानें कमी होत नाहींत किंवा उपदेशानें बंधुभावहि वाढत नाहीं, हें आपण पाहतच आहोंत. सध्यां उपदेशाची संतत धार सुरू आहे. ईश्वरप्राप्तीबद्दल प्रेम आणि उत्साह उत्पन्न करतां आला तर वासना कमी होतील, बंधुभाव वाढेल; कारण मग ‘ दुसऱ्यासाठीं त्याग ’ ही भावना न राहतां, ‘ माझ्या ध्येयासाठीं त्याग ’ ही वृत्ति जागृत होऊन त्याग सोपा होईल, अहंकारशून्य होईल. एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें, परमार्थांत स्वार्थ व परोपकार यांचा संगम होतो, परोपकार हाच परमार्थाला उपकारक म्हणून खरा स्वार्थ ठरतो. निधर्मी तत्त्वज्ञानांत, ज्याला प्रत्यक्ष दुर्गुण म्हणत नाहींत अशा सर्व सुखांचा उपभोग घे, असें प्रतिपादितात व त्याबरोबरच, समाजासाठीं स्वार्थत्याग कर, असेंहि सांगतात. सुखलालसा उत्पन्न करून ती मर्यादित करणें अवघड आहे. तत्त्वज्ञान त्यागाधिष्ठित पाहिजे. तुझ्या उच्च हितासाठीं त्याग अवश्य आहे, असें परमार्थ सांगतो. परमार्थ त्यागाधिष्ठित आहे; म्हणून त्यांतूनच समाजोपकारक प्रवृत्ति निर्माण होतील. हीच शिकवण संत देत आले आहेत–स्वतःच्या उदाहरणांनीं देत आले आहेत; आणि हेंच त्यांचें मुख्य समाजकार्य. रूमीनें म्हटल्याप्रमाणें “ They are the salt of the earth. ”– त्यांच्यावांचून जगांत खरी गोडीहि नाहीं आणि सद्गुणांचें पीकहि नाहीं. “ आपणामागें जगदीशासी भजत जावें ” याशिवाय शिष्याजवळ कांहींहि मागावयाचें नाहीं. “ रामकथा ब्रह्मांड भेदून पलीकडे न्यावी, आपण मेल्यावर भक्ति चालली पाहिजे म्हणून भक्तमंडळ्या मेळवाव्या, देव डोक्यावर घेऊन अवघा हलकल्लोळ करावा, ” असा समर्थांनीं अट्टाहासानें उपदेश केला आहे. त्याचें कारण हेंच कीं, विश्वाचें मंगल

करणाऱ्या परमार्थाची परंपरा अखंड चालावी, हेंच त्यांना अभिप्रेत होतें.

## साक्षात्कार – सर्वमूल्यसमावेशक उच्चतम मूल्य

साक्षात्कार हें उच्चतम मूल्य आहे, असें सर्व संतांप्रमाणें समर्थांनींहि स्वानुभवानें बाहु उभारून सांगितलें आहे आणि तें प्राप्त करून घेण्याचा मार्गहि दाखविला आहे, हें त्यांच्या तत्त्वज्ञानांतील वैशिष्ट्य आहे. तेथें अनुमान नाहीं, संदेह नाहीं, अनिश्चितता नाहीं. तें रोकडें धन आहे, उधार नाहीं. इच्छा असेल त्यानें प्रत्यय घेऊन पहावा. इतर तत्त्वज्ञानांतील मूल्यें अनुमानावर आधारलेलीं असतात. ज्यांना उच्च मूल्यें असें नांव देतां येईल त्या दर्जाच्या सत्य, अहिंसा, सुख, सदसद्विवेकबुद्धीचे आदेश इत्यादि गोष्टींचा अनुभव मीं घेतला आहे, असें कोणी सांगत नाहीं; हीं मूल्यें प्राप्त करून घेण्याचा निश्चित मार्गहि संतांवांचून कोणींच सांगितलेला नाहीं. संतच केवळ सांगतात, कीं आम्ही सांगितलेल्या मार्गानें आत्मानुभव वाढवीत जा; त्यांतून सर्व मंगल जन्माला येईल.

सर्वांवडिल अंतरात्मा । जेथें चेतला तेथें महिमा ॥

(दा. १५।३।१९)

आत्मप्रकाश वाढत गेला, कीं सर्व प्रकारचा नैतिक, बौद्धिक, कार्य-प्रवर्तक महिमा वाढेल, दुसरा मार्ग नाहीं. या दृष्टीनें साक्षात्कार हें सर्व मूल्यांचा समावेश करणारें उच्चतम मूल्य आहे. इतकेंच नव्हे, तर इतर सर्व मूल्यांचा जन्म त्यांतूनच होणारा आहे. साक्षात्कार म्हणजे ईश्वर-दर्शनानें ईश्वर होणें, अर्थात् साक्षात्कार म्हणजेच ईश्वर आणि इतर मूल्यें म्हणजे विभूति. गीतेंत कीर्ति, श्री या सद्‌गुणांनाहि विभूति म्हटलें आहे. तेव्हां,

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥

(गी. १०–४१)

या श्लोकानें साक्षात्कार आणि इतर शाश्वत जीवनमूल्यें यांच्यासंबंधाचें वर्णन करणें सर्वथा योग्य होईल. साक्षात्कार हें एकमेव जीवनमूल्य प्राप्त

करून घेतल्यानंतरच त्याचा उपदेश करणाऱ्या समर्थांचें तत्त्वज्ञान निश्चितपणें शाश्वत मूल्यांची प्रेरणा देणारें आहे. अंतःकरणें तितकीं संस्कारक्षम आणि ध्येयवादी मात्र असलीं पाहिजेत. चंद्रकिरणांनीं सोमकान्त मणीच द्रवतील, मृत्पिंडांवर त्यांचा काय परिणाम होणार ?

( सज्जनगड पत्रिका : जन्ममहोत्सव विशेषांक )

# ८. समर्थांचा आदर्श पुरुष

पाहतां अवघे उत्तम गुण । तयास वाईट म्हणेल कोण ।
जैसा आत्मा संपूर्ण । सर्वां घटीं ॥ दा. १९.४.२१.

**प्रास्ताविक**—गुरुदेव रानडे यांनीं आपल्या उपनिषद्रहस्यांत 'उपनिषदांतील आदर्श ऋषीचीं' लक्षणें सांगितलीं आहेत. म. गांधी व महादेवभाई देसाई यांनीं आपल्या गीतेच्या प्रस्तावनेंत आदर्श भक्त व आदर्श ऋषि यांचीं वर्णनें केलीं आहेत. त्यावरून समर्थांचा आदर्श पुरुष कसा आहे याविषयीं लेख लिहावा ही कल्पना मला आली. प्रत्येकाच्या आदर्श पुरुषामधील कांहीं गुण सारखेच असले तरी कांहीं लक्षणांत, प्रत्येकाचा जीवनाकडे पाहण्याचा व ध्येयाचा दृष्टिकोन भिन्न असल्यामुळें, फरक झालेला दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, गुरुदेव रानडे यांनीं अनेक नैतिक सद्गुण हे साक्षात्काराचा परिणाम म्हणून मनुष्याच्या अंगीं येतात, या गोष्टीवर भर दिला आहे. म. गांधींनीं अहिंसा, सत्य, निर्मत्सरत्व, द्वंद्वातीतता, कर्मापासून अलिप्तता, सर्वभूतीं प्रेम, निर्भयता इत्यादि गुणांना महत्त्व दिलें आहे; तर प्राणपणानें, निधड्या छातीनें, संकटांना न जुमानतां अविचलितपणें ध्येयाकडे वाटचाल करीत राहणें याला महादेवभाईंनीं अग्रस्थान दिलें आहे. समर्थांच्या आदर्श पुरुषाच्या किंवा महापुरुषांच्या लक्षणांत कोणत्या गुणांना प्राधान्य दिलेलें आहे, हें पुढें दिसेलच. असा फरक पडण्याचें कारण प्रत्येकाचें जीवन-ध्येय होय, हें वर सांगितलेंच आहे. किंबहुना असेंहि म्हणतां येईल, कीं थोर लेखकानें केलेल्या आदर्श पुरुषाच्या वर्णनांत त्याचें आत्मचरित्रच त्यानें समजून किंवा न समजून दिलेलें असतें. नामदेव-तुकाराम यांच्या संतपर अभंगांत त्यांच्या भक्तिमय गुणांचें दर्शन घडलें तर त्यांत आश्चर्य काय? या दृष्टीनें, एक निष्ठावंत समर्थ-भक्त, वैद्यदास पांडुरंग रामचंद्र कुलकर्णी, यांनीं 'सज्जनगड'

मासिकाच्या ऑगस्ट महिन्याच्या अंकांत दासबोधावरून समर्थांचें चरित्र लिहिण्यास आरंभ केला आहे. हा प्रयत्न प्रशंसनीय आहे.

आदर्श पुरुषाशीं आमचा काय संबंध, इतके उच्च, ध्येयभूत गुण सामान्य माणसाच्या बुद्धीलाहि अगम्यप्राय आहेत, मग ते अंगीं आणण्याचा प्रयत्न तो कसा करूं शकेल ? अशा प्रकारची कल्पना येणें साहजिक आहे. परंतु, संतांनीं थोर पुरुषांचीं लक्षणें मुद्दाम सांगितलेलीं असतात, तीं सामान्य मनुष्यानेंहि अंशतः तरी अंगीं आणावीं या दृष्टीनें होत; उच्च करमणुकीचें साधन म्हणून नव्हे. आपणालाहि थोर होतां येईल असें थोर पुरुषांचीं चरित्रें आपणाला सांगतात, हें इंग्रजी वचन प्रसिद्धच आहे. आदर्श पुरुष म्हणजे शंभर मार्कांची प्रश्नपत्रिका आहे; ती जीवनांत प्रत्येक मनुष्यानें सोडविण्याचा प्रयत्न करून त्यांत मिळतील तितके, पांच दहा तरी मार्क मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या प्रयत्नानें जीवन उदात्त होईल, अंशतः तरी सफल होईल. फार मार्क मिळाले नाहींत तरी वैषम्य वाटण्याचें कारण नाहीं. " स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ " असें गीता सांगते.

**त्रिविध लक्षणें** :—समर्थांच्या आदर्श पुरुषाचा विचार करतांना, त्यांत तीन प्रकारचीं लक्षणें आपल्या दृष्टीस पडतात. त्या लक्षणांचें तीन दृष्टींनीं विवेचन करतां येईल : ( १ ) सर्वसामान्य नीति, ( २ ) भक्ति किंवा परमार्थ, आणि ( ३ ) सामाजिक कर्तव्य. मानवी जीवनाचे हे तीन पैलू असल्यामुळें ते अर्थात् परस्परापासून अगदीं अलग असणें शक्य नाहीं. त्यांमध्यें अत्यंत निकट असा संबंध आहे. ' उपनिषद्रहस्यांत ' गुरुदेव रानडे यांनीं म्हटल्याप्रमाणें केवळ सद्गुण वाढविण्याच्या प्रयत्नानें नैतिक पूर्णता प्राप्त होत नाहीं; सद्गुणांची पूर्ण वाढ होण्यासाठीं परमार्थाची कांस धरावी लागते; साक्षात्कारानंतरच नैतिक पूर्णता प्राप्त होते. त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे, कीं कांहीं प्रमाणांत नैतिक गुण संपादन केल्याशिवाय परमार्थपथ आक्रमण्यास सुरुवातच करतां येत नाहीं; सद्गुण हा परमार्थाचा पाया आहे. याप्रमाणें, अपूर्णावस्थेंतील सद्गुण ही परमार्थमार्गावरील शिदोरी व नैतिक पूर्णता हें साक्षात्काराचें फल, असा नीति

व साक्षात्कार यांचा द्विविध संबंध आहे. साक्षात्कारानंतर जगदुद्धार हा संतांचा सिद्धान्त आहे व तो त्यांच्या आचरणांत दृष्टीस पडतो. " तुम्ही तरोनि विश्व तारा ॥" (मुक्ताबाई), " आपण तरेल नव्हे हें नवल, कुळें उद्धरील सर्वांचीं तो ॥" (तुकाराम), "सहपरिवार तरे" (कबीर), इत्यादि वचनांत हाच विचार प्रतिपादिला आहे. समर्थ म्हणतात :

" तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनासी सांगावें ।
तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ॥" दा. १२.१०.२

याप्रमाणें, आत्मज्ञान प्राप्त करून घेतल्यावर जगदुद्धाराचें सामाजिक कार्य, असा या दोघांचा संबंध आहे. या तीन भागांतील लक्षणांचा आतां अनुक्रमानें विचार करावयाचा आहे.

**सामान्य सद्गुणः**—दया, क्षमा, शांति हे गुण प्रत्येकालाच आवश्यक आहेत. दुःखिताचें दुःख दूर करण्याची तयारी, कोणीं आपलें कांहीं वाईट केल्यास तिकडे दुर्लक्ष करण्याची सिद्धता, या सामान्य माणुसकीच्या गोष्टी आहेत. निरभिमानता, निष्कामता, तितिक्षा आणि धैर्य हे गुण असल्याशिवाय दया-क्षमा प्रभावी ठरूं शकत नाहींत; शांति तर शक्यच नाहीं. असे सद्गुण परस्परावलंबी व परस्परांना पोषक असतात. विवेक तर सर्व गुणांचा प्रकाश आहे. त्या प्रकाशानें चांगलें वाईट पारखून, त्यांतून चांगलें घेऊन वाईट टाकावयाचें असतें. निर्मत्सरताहि दया-क्षमा-शांति या थोर गुणांच्या वाढीला अवश्य आहे. आदर्श पुरुषाच्या अंगीं हे सर्व गुण उत्कटतेनें असणें जरूर आहे. त्यावांचून उत्कट भक्ति व उत्कट परोपकार हीं त्याला करतां येणार नाहींत. याशिवाय ज्यांना साधारणपणें नैतिक गुणांत गणीत नाहींत असे गुणहि आदर्श पुरुषांत उत्कटतेनें दिसून येतात. ते सद्गुण म्हणजे उद्योगशीलता, निरलसता, एकान्तवास, सखोल अभ्यास, नेमकपण आणि सावधानता. या सर्व गुणांवांचून थोर कार्यें करतां येणार नाहींत. या गुणांनीं अंतःकरण शृंगारावें, तो खरा शृंगार; बाह्य शृंगार काय कामाचा ? वेषभूषण म्हणजे वस्तुतः दूषणच होय असें समर्थ बजावितात :

" शांति क्षमा दया । निश्चय उपजे जया ।
सत्त्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥

जयास अहंकार नसे । नैराशता विलसे ।
जयापासीं कृपा वसे । तो सत्त्वगुण ॥
शरीरें घीस साहणें । दुर्जनासी मिळोनि जाणें ।
निंदकासी उपकार करणें । तो सत्त्वगुण ॥
देहाभिमान गळे । विषयीं वैराग्य प्रबळे ।...॥
आघातीं उपजे धारिष्ट । तो सत्त्वगुण ॥
विषयीं धांवे वासना । परी तो कदा डळमळेना ।
ज्याचें धारिष्ट चळेना । तो सत्त्वगुण ॥
देह आपदेनें पीडिला । क्षुधेतृषेनें वोसावला ।
तरी निश्चयो राहिला । तो सत्त्वगुण ॥
(२.७.५२;६२;६९;४२;४६;५९;६०.)

" आलस्य अवघाचि दवडावा । येत्न उदंडचि करावा ।
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ॥
बहुतांचे अन्याय क्षमावे । बहुतांचे कार्यभाग करावे ।...॥
परंतु हीं विवेकाचीं कामें । विवेकी करील नेमें ॥
(१२.१०.११;८;४२)

" विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख ।...॥
कर्तयासी वोळखावें । यास विवेक म्हणावें ॥"
(१३.७.२८–२९)

" जो एकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर ।
अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भींचें ॥" (११.६.९)
अखंड एकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ॥
(११.१०.१७)
एकांतेंवीण प्राणियासी । बुद्धि कैसी ॥ (१९.६.२९)
विवेकामध्यें सांपडेना । ऐसें कांहींच असेना ।
येकांतीं विवेक अनुमाना । आणोनि सोडी ॥ (१९.६.२८)
वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण (१०.१०.७)

देह नेटकें श्रृंगारिलें । परी चातुर्येंवीण नासलें ।...॥
अंतर्कळा श्रृंगारावी । नानापरी उमजावी ॥"

(१४.६.९,१०)

याशिवाय आर्जव, सत्याचा अभिमान, न्यायाचा अभिमान, निःस्पृहता इत्यादि वैयक्तिक सद्गुणहि समर्थांनीं सांगितले आहेत. परंतु या विषयाचा अधिक विस्तार करावयाचा नाहीं. या सद्गुणांच्या पायावर आदर्श पुरुष आपल्या परमार्थाचें व लोकोद्धाराचें मंदिर उभारतो. त्या मंदिराचा विशेष विचार करावयाचा आहे. कारण तेंच आदर्श पुरुषाचें वैशिष्ट्य होय, त्याचें आदर्शत्व या दोन मंदिरांमध्यें व्यक्त होतें.

**परमार्थ**—मानवी जीवनाची कृतार्थता साक्षात्कारांत आहे, म्हणून ईश्वराची भक्ति हेंच मनुष्याचें मुख्य कर्तव्य आहे, असें समर्थांनीं अनेक ठिकाणीं सांगितलें आहे. ज्याच्या श्रवणानें अज्ञान, दुःख, भ्रांति, संशय, देहबुद्धि व संसार-चिंता नष्ट होतील, वैराग्य, चातुर्य, विवेक, विश्रांति व समाधान लाभतील, पतित ते पावन होतील अशी प्रतिज्ञा समर्थांनीं केली आहे, त्या ग्रंथराज दासबोधाचा मुख्य अभिप्रायच हा, कीं

'भक्तीचेनि योगें देव । निश्चयें पावती मानव' (१-१-४)

देव शोधण्याचा मार्ग म्हणजेच परमार्थ. त्याची महती वर्णन करतांना समर्थ म्हणतात,

"परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।...॥
अनंत जन्मींचें पुण्य जोडे । तरीच हा परमार्थ घडे ।...॥
जेणें परमार्थ वोळखिला । तेणें जन्म सार्थक केला ।
येर तो पापी जन्मला । कुलक्षयाकारणें ॥
असो भगवत्प्राप्तीविण । करी संसाराचा शीण ।
तया मूर्खांचें मुखावलोकन । करूंचि नये ॥
भल्यानें परमार्थीं भरावें । शरीर सार्थक करावें । (१.९.२३–२७)

यत्न, बुद्धिवाद, देवशोधन, चळाचळनिरूपण इत्यादि अनेक समासांत त्यांनीं परमार्थाची व भक्ताची महती मुक्तकंठानें वर्णिली आहे.

"भक्ति ज्ञान वैराग्य योग । नाना साधनांचे प्रयोग ।
जेणें तुटे भवरोग । मननमात्रें ॥...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि:
क्रमांक ........ नों: दि: ........

हृदयीं चिंतावें समर्थी । रघुनाथासी ॥
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥
१२.९.२२–२५–२६

अखंड हरिकथेचा छंदु । सकळांसी लागे नामवेधु ।...॥
उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट योग अनुष्ठान ।...॥
उत्कट भक्तीनें निवाली । जनमंडळी ॥ १८.६.१८–२२–२३
देव ठायीं पडेना । तरी यमयातना चुकेना ।...।
म्हणोनि देव वोळखावा । जन्म सार्थकचि करावा ।...॥
६.१.१३–१५

आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यासी नाहीं मर्यादा ।...॥
वेदशास्त्रीं सत्य स्वरूप । तेंचि ज्ञानियाचें सरूप ।
पुण्य झालें अमूप । सुकृतें सीमा सांडिली ॥”
१०.१०.६५–६६

एक निश्चळ, निर्मळ, निर्विकारी देव तोच खरा देव, असें त्याचें स्वरूप सांगून समर्थ बजावतात :

“ अरे जो निर्मळासि ध्याईल । तो निर्मळाचि होईल ।
जो निश्चळासी भजेल । तो निश्चळाचि ॥” ११.२.३८–३९

ईश्वरप्राप्ति हेंच समर्थांच्या मतें मानवाचें एकमेव कर्तव्य होय, ही गोष्ट निःसंदिग्धपणें सिद्ध करण्यास अशीं किंवा यापेक्षांहि प्रभावी वचनें उद्धृत करतां येतील. पण त्याची आवश्यकता नाहीं. हें ध्येय ठरल्यावर पारमार्थिक गुण समर्थांच्या आदर्श पुरुषांमध्यें केवळ महत्त्वाचेच नव्हेत, तर अगदीं प्रमुख असले पाहिजेत हें उघड आहे. सामान्य सद्गुण हे परमार्थप्राप्तीला उपकारक साधन, आणि लोकसेवेसाठीं व लोकोद्धारासाठीं लागणारे गुण हे परमार्थप्राप्तीचे परिणाम असा परमार्थाचा या दोन निरनिराळ्या क्षेत्रांतील गुणसंग्रहांशीं संबंध आहे. अर्थात्, सामान्य सद्गुणहि लोकोद्धाराला उपयुक्त आहेतच; ते चांगल्या जीवनाचा पायाच होत. असो.

**पारमार्थिक लक्षणें**–या दृष्टीनें आतां महापुरुषाचे पारमार्थिक गुण समर्थांनीं कोणते सांगितले आहेत तें पाहूं. यांत मुख्यत्वेंकरून साधुलक्षणें आणि त्याबरोबरच सत्त्वगुणलक्षणें, साधकलक्षणें व शिष्यलक्षणें यांचाहि

विचार केला पाहिजे. आदर्श पुरुष सिद्धच असणार, पण सिद्ध व साधक यांच्या मर्यादा अगदीं स्पष्ट असूं शकत नाहींत. दिवस व रात्र यांमध्यें संध्याकाल असतो, तसाच सिद्ध व साधक यांमध्यें असतो. किंबहुना, पूर्ण सिद्ध कोणी नसतोच. प्रत्येकाची, गुरुदेव रानडे म्हणतात त्याप्रमाणें, सिद्धावस्थेकडे अखंड वाटचाल ( approximation ) सुरू असते. समर्थ म्हणतात :

" स्वरूपीं दृष्टी पडतां । तुटोनि गेली संसारचिंता ।
पुढें लागली ममता । निरूपणाची ॥
हें साधकाचें लक्षण । परि सिद्धाअंगीं असे जाण ।
सिद्धलक्षण साधकेंविण । बोलोंचि नये ॥
बाह्य साधकाचे परी । परी स्वरूपाकार अंतरीं ।...॥
संदेहरहित साधन । हेंचि सिद्धाचें लक्षण । ८.९.१०-१३

परमार्थांत सत्त्वगुणाचें सामर्थ्य फार; भक्त हा ' नित्यसत्त्वस्थ ' असला पाहिजे; म्हणून सत्त्वगुण, साधक व शिष्य या दृष्टीनें महापुरुषाचीं लक्षणें पाहूं. समर्थ सांगतात, " अशा पुरुषाला ईश्वरविषयीं अत्यंत प्रेम वाटतें. प्रातकर्म म्हणून तो प्रपंच करतो. तो विवेकी असून संसारदुःखाचें त्याला स्मरण होत नाहीं. त्याला निरूपणाची व हरिकथेची फार आवड असते. निरभिमान व निष्काम होऊन तो कीर्तन करूं लागला कीं त्याच्या ठिकाणीं अष्ट सात्त्विक भाव उत्पन्न होतात; देहाचें विस्मरण होतें. रामावर प्रेम बसल्यामुळें सर्व गोष्टींचा त्याला निर्वेद येतो, वीट येतो. आणि परमार्थ-प्रेमानें तो सर्व आघात धैर्यानें सहन करून आपला मार्ग सोडीत नाहीं. या सर्व गुणांमुळें भक्ति, ज्ञान व मुक्ति प्राप्त होतात. "

" ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लौकिक ।
सदा संनिध विवेक । तो सत्त्वगुण ॥
संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमल दावी ।...॥
परमार्थाची आवडी । उठे भावार्थाची गोडी ।...॥
सांड्रनिया अभिमान । निःकाम करी कीर्तन ।
स्वेद रोमांच स्फुरण । तो सत्त्वगुण ॥

अंतरीं देवाचें ध्यान । तेणें निडारले नयन ।
पडे देहाचें विस्मरण । तो सत्त्वगुण ॥
सदा प्रीति लागे रामीं । तो सत्त्वगुण ॥ ..॥
सकळांचा आला वीट । परमार्थी जो निकट ।
आघातीं उपजे धारिष्ट । तो सत्त्वगुण ॥
सत्त्वगुणें भगवद्भक्ति । सत्त्वगुणें ज्ञानप्राप्ति ।
सत्त्वगुणें सायोज्यमुक्ति । पाविजेते ॥

२.७.९–११; १४; १८; ४५; ४६; ८७.

असा सत्त्वगुणी साधक व शिष्य उपाधि दूर सारून आत्मप्राप्ति करून घेतो व उन्मनीच्या शेवटीं त्याची त्याला अखंड भेट होते. हें झाल्यावर त्याच्या सर्व दुर्गुणांचा नाश होतो. सायुज्यमुक्ति त्यासाठीं राखून ठेवलेली असते :

“ परती सारूनि उपाधि । असाध्य वस्तु साधनें साधी ।
स्वरूपीं करी दृढ बुद्धि । या नांव साधक ॥...
पुढें उन्मनीच्या शेवटीं । आपुलीं आपणा अखंड भेटी ।
अखंड अनुभवीं ज्याची दृष्टि । या नांव साधक ॥...
भवभयासी भडकावलें । काळाचें टांगें मोडलें ।
मस्तक हाणोनि फोडिलें । जन्ममृत्यूचें ॥
गर्वावरी गर्व केला । स्वार्थ अनर्थीं घातला ।...॥
मोहासि मध्येंचि तोडिलें । दुःखासी दुधड केलें ।
शोकासि खंडूनि सांडिलें । येकीकडे ॥”

५.९.२३; २७; ४१; ४५

सारांश :

“ ज्ञानाविवेक माजला । तेणें निश्चयो बळावला ।
अवगुणांचा संहार केला । वैराग्यबळें ॥
कोपावरी घालणें घातलें । कापट्य अंतरीं कुटिलें ।
सख्य आपुलें मानिलें । विश्वजनीं ।।” ५.९.४७–५०

“ जो सद्गुरुवचनें निवाला । तो सायोज्यतेचा आंखिला ।
संसारसंगें पांगिला । न वचे कदा ॥ ” ५.३.३९

हीं सर्व लक्षणं सिद्ध पुरुषाच्या लक्षणासारखींच दिसत नाहींत का? परंतु हीं सर्व प्रयत्नसाध्य आहेत. सिद्धाच्या गुणांत सहजता असते. त्यांचे थोडें दिग्दर्शन करावयाचें आहे. या गुणांचें वैशिष्ट्य हें, कीं आत्मानंदानें अंतःकरण भरून गेलें, त्या आत्मानंदाकडेच सतत वृत्तीची ओढ लागली, म्हणजे हे सर्व गुण आपोआप प्रगट होतात. एरवीं अन्य प्रकारचा अभ्यास किंवा प्रयत्न करून हीं लक्षणें हातीं येत नाहींत. नैतिक, बौद्धिक किंवा मानसिक प्रयत्न उपयोगीं पडत नाहींत; आध्यात्मिक प्रयत्नांनीं आत्म-प्राप्ति झाल्यावरच हीं लक्षणें दिसूं लागतात. साक्षात्कार व सद्गुण यांचें नातें दाखविणारा हा सिद्धान्त नीतिशास्त्राच्या दृष्टीनेंहि अत्यंत महत्त्वाचा आहे आणि व्यक्तीमध्यें किंवा समाजामध्यें सद्गुणसंवर्धन करण्याचें कार्य करणारांनीं त्याचा विचार करणें अवश्य आहे :

> " राज्यीं बैसतां अवलीळा । आंगीं बाणे राजकळा ।
> स्वरूपीं लागतां जिव्हाळा । लक्षणें बाणती ॥
> येरव्हीं अभ्यास करितां । हातां न चढती सर्वथा ।...॥
> अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ति राहावी निर्गुणीं ।
> संतसंगें निरूपणीं । स्थिति बाणे ॥ " ८।९।१९–२१

मन स्वरूपांत रंगल्यामुळें साधूला वासनाच उरत नाहीं, म्हणून त्याला काम नाहीं. अविनाशी आत्मस्वरूपाचा लाभ झाल्यानें कशाचा नाश होईल ही भीति, चिंता, असमाधान आणि तन्मूलक क्रोध उत्पन्न होण्याची शक्यताच नाहीं. 'मी आत्मा, अर्थात् अमर' हा अनुभव आल्यानें पूर्ण निर्भयता बाणली. सर्वात्मभाव झाल्यामुळें दुसरें असें कोणी राहिलें नाहीं; मग मदमत्सर कोणाविषयीं दाखवावयाचा? अवघें ब्रह्मांड त्याचें घर—किंबहुना तोच अवघें ब्रह्मांड—मग लोभ कशाचा करावयाचा? याप्रमाणें सिद्धाचे अनेक भव्योदात्त सद्गुण दासबोध द. ८, स. ९ मध्यें वर्णिले आहेत आणि ते सर्व स्वरूपप्राप्तीपासून निर्माण होतात असें सांगून, साधूचा मुख्य धर्महि प्रतिपादिला आहे :

> " सकल धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ।
> हें जाणिजे मुख्य वर्म । साधुलक्षणांचें ॥ " ८.९.५४

या विषयाचें विस्तृत विवेचन मागील एका लेखांत केलेंच आहे; म्हणून तो वाढवीत नाहीं किंवा मूळ ओव्याहि देत नाहीं. वरील गुण हे समर्थांच्या आदर्श पुरुषाचें मुख्य अंग आहे, येवढें मात्र ध्यानांत ठेविलें पाहिजे.

स्वरूपीं राहणें या धर्माला आवश्यक व पोषक अशा नामस्मरण व सख्य या दोन भक्ति-साधनांचाहि येथें थोडा परामर्श घेतला पाहिजे. हीं साधनें केल्यावांचून उच्च आध्यात्मिक पदवी प्राप्त होणार नाहीं आणि हीं साधनें चढत्यावाढत्या उत्कटतेनें आमरणान्त ठेवावीं लागतात. नाहीं तर

" साधन सोडितां होय । मुक्तपणें बद्ध ॥
साधन करितांच सिद्धपण । हातींचें जाईल निघोन ।
तेणें गुणें साधन । करूंच नावडे ॥...
पण, " साधन करिती ब्रह्मादिक । हें ठाउकें नाहीं ॥"
(७.७.६९–७१)

असा इशारा समर्थांनीं देऊन ठेविलाच आहे. " जेणें जाळिला काम तो राम ध्यातो ॥" मग सामान्यांची काय कथा ! म्हणून नामस्मरण व शरणागति हेंहि महापुरुषानें आत्मसात् केलेंच पाहिजे.

" स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें । समाधान ॥
सुखदुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां ।
नामस्मरणेंवीण सर्वथा । राहोंचि नये ॥...
आधीं अवदसा मग दसा । अथवा दसेउपरी अवदसा ।
प्रसंग असो भलतैसा । परी नाम सोडूं नये ॥...
नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्य शरीर ।...॥
(४.३.२;४;१०;२२)

नामस्मरणाच्या साधनानें सख्यभक्ति, शरणागति वाढत जाते. पूर्ण शरणागति ही साधकाला अत्यंत अवश्य आहे. ती प्राप्त झाली, कीं ईश्वरप्राप्ति हातीं आलीच. तीं लक्षणें अशीं :

" देवाच्या सख्यत्वाकारणें । आपुलें सौख्य सोडून देणें ।
अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंहि वेचावें ॥

देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्वस्व अर्पावें शेवटीं । प्राण तोहि वेचावा ॥
आपलें अवघेंचि जावें । परि देवासी सख्य राहावें ।
ऐसी प्रीति जीवेंभावें । भगवंतीं राखावी॥...
आपुलिया मनोगताकारणें । देवावरी रागासि येणें ।
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सख्यभक्तीचीं ॥
देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ।
इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ॥...
देवाचें इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।"
(४।८।६;८;९;२१-२३)

**समाजकार्यः**—याप्रमाणें पूर्ण आत्मज्ञान आणि सद्‌गुण यांची प्राप्ति करून घेतल्यावर आदर्श पुरुषाच्या तिसऱ्या, म्हणजे सामाजिक कार्याला सुरुवात होते. तेथें त्याचें स्वरूप जगाला स्पष्ट दिसतें, त्याच्या थोर व्यक्तित्वाचें तेज लोकांच्या दृष्टीपुढें विलसतें व तेवढ्याच गुणाचा विशेष उल्लेख व जयजयकार केला जातो. परंतु हें आदर्श पुरुषाच्या जीवनाचें मंदिर आहे. सद्‌गुण व साक्षात्कार किंवा आत्मज्ञान यांच्या पायावर तें उभारलेलें आहे; किंबहुना आत्मसाक्षात्काराचा तो एक सहज परिणाम आहे. तुकारामांनीं म्हटल्याप्रमाणें "नवनीत तें सार । ताकें घडे परउपकार ॥" म्हणून कार्यांत दिसणारे गुण महत्त्वाचे व साक्षात्कार हें कार्याचें साधन असा गैरसमज मात्र करून घेऊं नये. साक्षात्कार हें लोणी व समाजकार्य हें संतांच्या दृष्टीनें तरी ताक आहे. पुढच्या कार्याची रूपरेषा सांगतांना समर्थहि लिहितातः—

"आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वांटणें ।
परंतु वायां दवडणें । हा धर्म नव्हे ॥
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें ॥
तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ॥
उत्तम गुण स्वयें घ्यावें । ते बहुतांस सांगावे । १२.१०.१-३

बौद्धिक, पारमार्थिक व नैतिक क्षेत्रांत आपण यथेष्ट जेवल्यावरच इतरांना कांहीं वांटतां येतें; सर्व जेवण देतां येतच नाहीं. आपण तरून नंतरच

इतरांना तरण्याला मदत करतां येते; तारतां येईलच असें नाहीं. विषयांचा उपभोग स्वतः न घेतां ते लोकांना देतां येतील, पण वरील तीन क्षेत्रांत तें शक्य नाहीं.

परोपकारावर समर्थांनीं फार भर दिला आहे. सर्व प्रकारें दुसऱ्याला सुखी करणें हें सज्जनाचें कर्तव्य आहे. सर्वांशीं प्रेमानें वागावें, विरोध करूं नये, दुसऱ्याचें दुःख जाणून, तें वांटून घ्यावें.

" सकळ जनांसी आर्जव । नाहीं विरोधासी ठाव ।
परोपकारीं वेची जीव । तो सत्त्वगुण ॥ " २.७.६४
" दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोनि तरी वांटोनि घ्यावें ।...॥
सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ॥" ११.५.१४-१५
दुसऱ्याचे दुःखें दुःखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।...
आपल्यापरीस व्हावें । पारखे जन ॥
आपलें अथवा परावें । कार्य अवघेंच करावें॥" २.१०.७-८-२१

हें सर्व करीत असतां परान्तर राखलें पाहिजे, दुसऱ्याचें अंतःकरण जाणून त्याचें आकर्षण केलें पाहिजे. म्हणजे समुदाय वाढवितां येतो, लोकसंग्रह होतो. समुदाय, लोकसंग्रह, हा थोर कार्याला अवश्य आहे; त्याशिवाय मोठीं कामें होणार नाहींत. परमार्थ किंवा राजकारण, दोन्हीं कार्यांना समुदाय पाहिजे. म्हणून परोपकार करून लोकांना सुखी व शहाणे करावें, व लोकसंग्रह करण्याकडेहि त्याचा उपयोग व्हावा, असा ध्येयवाद व्यवहारांत उतरविण्यासाठीं समर्थांचा उपदेश व आदेश आहे.

" जाणावें परांचें अंतर । उदासीनता निरंतर ।...॥
संकेतें लोक वेधावा । येकून येक बोधावा । १५.५.६-७
दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसाराचि वर्तावें ।...॥
आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।...॥
तया महापुरुषाकारणें । धुंडीत येती ॥...
ऐसा जो कां महानुभाव । तेणें करावा समुदाव ॥
१२.१०.९-२७-३१-३२
जीवांत जीव घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ।...॥
तैसेंचि हें मनासी मन । विवेकें जावें मिळोन ।...॥

जो जगदांतरें मिळाला । तो जगदांतरचि झाला ।
अरत्रीं परत्रीं तयाला । काय उणें ॥ ” १५.१.४-६-१४

लोकांचें जें कार्य अडलेलें असेल तें ज्याच्या साहाय्यानें पुरें होईल, त्याच्याकडे लोक येऊं लागतील. समुदाय वाढविण्याचा हाच उपाय आहे. त्यासाठीं स्वत: दु:खकष्ट सोसून परोपकार केला पाहिजे.

तनें मनें झिजावें । तेणें भले म्हणोनि घ्यावें ।...॥
लोकीं कार्यभाग आडे । तो कार्यभाग जेथें घडे ।
लोक सहजचि वोढे । कामाकडे ॥ १४.६.२१-२२

आपल्यापासून ज्यांना ज्ञान मिळतें ते आपले मित्र होतात. ज्याला जें पाहिजे तें दिलें म्हणजे देणारा सर्वांना मान्य होतो. तसें वागावें व समुदाय करावा.

“ जैसें जयासी पाहिजे । तैसें तयासी दीजे ।
तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळा मान्ये ॥
भूमंडळीं सकळासी मान्य । तो म्हणूं नये सामान्य ।
कित्येक लोक अनन्य । तया पुरुषासी ॥ १५.६.२८-२९
“ आधीं शिकोनि जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ।
गुंतल्या लोकांसी उगवी । विवेकबळें ॥
“ सकळिकांचें राखों जाणें । समाधान ॥
आपणाकरितां शाहणें होती । ते सहजचि सोये धरती ।
११.६.१०;५;१७

याप्रमाणें नानाप्रकारें उपकार करून लोकांना सुखी करावें, त्यांचें दु:ख दूर करावें, त्यांना सद्‌गुण व ज्ञान सांगावें, हें महत्पुरुषाचें काम व कर्तव्य आहे. सारांश, त्यानें आत्म्यासारखें असावें, रघुनाथाचे गुण अंगीं आणून त्याप्रमाणें सर्वांना आत्मवत् लेखून सर्वांशीं वागावें.

“ ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा ।
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ॥ ११.६.१९
तोचि अंतरात्मा महंत । तो कां होईल संकोचित ।
प्रशस्त जाणता समस्त । विख्यात योगी ॥

कर्ता भोक्ता तत्त्वता । भूमंडळीं सर्व सत्ता ।
त्यावेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवणु ॥
ऐसें महंतें असावें । सर्व सार शोधून घ्यावें ।...॥
बहुतीं शोधूनि पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ।
तरी मग जाणावें साधलें । महत्कृत्य ॥
अखंड कामाची लगबग । उपासनेसी लावावें जग ।
लोक समजोनी मग । आज्ञा इच्छिती ॥

११.१०.२ ते ४;१६;१९

"पाहतां अवघे उत्तम गुण । तयासी वाईट म्हणेल कोण ।
जैसा आत्मा संपूर्ण । सर्वां घटीं" १९.४.२१

स्वतःच्या देहाला सुख देण्याला मनुष्य तत्परतेनें, कळवळ्यानें, निरलसपणें आणि दक्षतेनें झटतो; परंतु हें करण्यांत त्याला अहंकार वाटत नाहीं, कोणावर उपकार केल्याचा गर्व होत नाहीं, किंवा प्रत्युपकाराची अपेक्षा राहत नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्यमात्राशीं वागणें, म्हणजेच प्रत्येकाला आत्मवत् लेखणें हा आदर्श पुरुषाचा फार मोठा गुण आहे आणि तो आत्मसाक्षात्काराचा परिणाम आहे. कारण आत्मसाक्षात्कारानंतर सर्वात्मभाव उत्पन्न होतो. खरा साक्षात्कारी पुरुषच सत्य अर्थानें निरपेक्ष सेवा करूं शकेल.

**लोकोद्धार**—अशी सर्वांना आत्मवत् लेखून सर्वथा निष्कामपणें सेवा करणें येवढेंच आदर्श पुरुषाच्या सेवेचें वैशिष्ट्य आहे, कीं सेवेनें समाजाला ज्या ध्येयबिंदूकडे न्यावयाचें आहे या दृष्टीनेंहि त्या सेवेंत कांहीं वैशिष्ट्य आहे ? आज समाजकल्याणकारी राज्यव्यवस्था लोकांना अन्न-वस्त्र, आरोग्य, शिक्षण, कला, संस्कृति इत्यादि गोष्टींचा लाभ करून देण्याचें ध्येय पुढें ठेवून कार्य करीत आहे, या ध्येयबिंदूकडे समाजाला न्यावयाचें आहे. हें सर्व प्राप्त करून देण्याचा प्रयत्न समर्थांचा आदर्श पुरुष करीलच; पण त्याचा ध्येयबिंदु मात्र मनुष्यमात्राला भक्तिप्रवण करणें हा आहे. समर्थांच्या राजकारणाकडे विशेष आकर्षित झालेल्या लोकांचे या गोष्टीकडे विशेष लक्ष जात नाहीं. कांहीं विद्वान् तर समर्थांचें धर्मकारण हें राजकारण गुप्त राखण्यासाठीं घेतलेलें सोंग होतें किंवा प्रथम तपस्या करून

तो मार्ग चुकीचा व निरर्थक आहे हें समजून आल्यावर तो टाकून ते राजकारणाकडे वळले, अशी त्यांच्या जीवनावर भाष्यें करतात. दासबोधांतील आचारविषयक समासांतील त्यांच्या वचनांचा विचार केला तर उपासना व ईश्वरप्राप्ति हेंच त्यांचें स्वतःसाठीं व समाजासाठीं ठरलेलें ध्येय होतें यासंबंधीं शंका राहण्याचें कारण दिसत नाहीं. समर्थ सांगतात, विरक्तानें भजन लावावें, ब्रह्मज्ञान प्रगट करावें, भक्ति वाढवावी, निवृत्ति विस्तारावी, परमार्थ उजळावा, मोडला परमार्थ उभारावा, शुद्ध मार्ग सांगावा व मुमुक्षूंना जागृत करावें. हरिकथानिरूपण हें सर्वांत महत्त्वाचें; त्यानंतर राजकारण. उपासना करून ती पुढें चोहोंकडे पुरविली पाहिजे. आपणाला होईल तितकें आपण करावें, इतर दुसऱ्याकडून करवावें, पण भगवद्भजनांत खंड पडूं देऊं नये. प्रपंच नासकाच आहे; तो विवेकानें नेटका करावा; तो नेटका झाल्याची खूण म्हणजे तो फिका झाला पाहिजे, त्याची नीरसता कळल्यानें तो फिका, नीरस वाटूं लागला पाहिजे. पतितांना पावन करावें, सृष्टीमध्यें भगवद्भजन वाढवावें, विवेकबळानें लोक भजनाकडे लावावे. सर्वांना नामस्मरणाचा वेध लागेल असा सदा हरिकथेचा छंद असावा. उत्कट भक्ति, उत्कट ज्ञान, उत्कट अनुष्ठान यांनीं भक्तजनांना निववावें. याप्रमाणें भगवत्कीर्तीनें भूमंडळ भरून टाकावें. उत्तम गुणांनीं अलंकृत व अंतःकरणापासून भक्ति करणाऱ्या पुरुषाला लोक धुंडीत येतात. अशा पुरुषानें समुदाय वाढवून भक्तिमार्गाचा प्रसार करावा व देव आपुलासा करावा. आपण मरून गेल्यावर मागें भक्ति कोण करील ? तेव्हां भक्तींत खंड पडूं नये म्हणून भक्तसमुदाय मिळवावे, महोत्सव करावे; म्हणजे ईश्वरप्राप्ति होईल. अशी पुष्कळांना भक्ति घडावी यासाठीं महापुरुषांत प्रबोधशक्ति पाहिजे. सारांश, रघुनाथाचें चिंतन करून आपल्या सद्गुणांनीं लोकांना आकर्षून घेऊन रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड न्यावी.

...'विरक्तें लावावें भजन । विरक्तें विशेषें ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ॥ विरक्तें भक्ति वाढवावी ।...विरक्तें निवृत्ति विस्तारावी ।...विरक्तें परमार्थ उजळावा ।...विरक्तें वक्तृत्वें उभारावा । मोडला परमार्थ ॥ विरक्तें शुद्धमार्ग सांगावा ।...विरक्तें बद्ध चेववावें । मुमुक्षु निरूपणें ॥" (२.९.८–१०; १२; १५; ३७; ३८) "मुख्य हरिकथानिरूपण ।

दुसरें तें राजकारण ॥" ( ११.५.४ ) "उपासना करूनि पुढें । पुरविलें पाहिजे चहूंकडे ।...होईल तें आपण करावें । न होतां जनाकरवीं करवावें। भगवद्भजन राहावें । हा धर्म नव्हे ॥ संसार मुळींच नासका । विवेकें करावा नेटका । नेटका करितां फिका । होत जातो ॥ " ( १९.१०.८; १६; २८ ) शाहाणें करावें जन । पतित करावें पावन । सृष्टीमध्यें भगवद्भजन वाढवावें ॥ " ( १४.६.३३ )..." भगवद्भजन वाढवावें । विवेकबळें जन लावावें । भजनाकडे ॥" अखंड हरिकथेचा छंदु । सकळांसी लागे नामवेधु ॥ उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य उत्कट भजन ।...उत्कट भक्तीनें निवाली । जनमंडळी ॥ भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥" ( १९.६.११;१८;२२–२३; २६ ) "मनापासूनि भक्ति करणें । उत्तम गुण अवश्य घेणें । तया महापुरुषाकारणें । धुंडीत येती ॥ ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव । भक्तियोगें देवाधिदेव । आपुलासा करावा ॥ आपण अवचितें मरोनि जावें । मग भजन कोणें करावें । या कारणें भजनासी लावावे । बहुत जन ॥ आमुची प्रतिज्ञा ऐसी । कांहीं न मागावें शिष्यासी । आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥ या कारणें समुदाव । झाला पाहिजे महोत्साव । हातोंपातीं देवाधिदेव । वोळेसा करावा ॥...जेणें बहुतासी घडे भक्ति । ते हे रोकडी प्रबोधशक्ति ॥" ( १२.१०.३१ ते ३७ ) "बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें।...॥हृदयीं चिंतावें समर्था । रघुनाथासी ॥... उदासवृत्तीस मानवे जन । विशेष हरिकथानिरूपण । रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥" ( १२.९.२०;२५;२६. )

असा भक्तांचा समुदाय वाढविण्यासाठीं महंतांनीं महंत निर्माण करावे, विरक्तांनीं विरक्त धुंडून त्यांच्याकडून हें कार्य करवावें, असा नेते तयार करण्याचा आदेशहि समर्थांनीं दिला आहे. नेत्यांच्या परंपरेंत खंड पडला तर संस्था नष्ट होतील हें जाणून त्यांनीं ही सूचना दिली आहे. अशा रीतीनें भक्तमंडळ्या एकत्र करण्याचें कार्य सतत सुरू राहण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

"महंतें महंत करावे । युक्तीबुद्धीनें भरावे । जाणते करून विखरावे। नाना देशीं ॥" ( ११.१०.२५ ) "विरक्तें विरक्त धुंडावे । विरक्तें

साधु वोळखावे । विरक्तें मित्र करावे । संत साधु सज्जन ।।...विश्वजन उद्धरावा । संसर्गमात्रें करोनी ।।" ( २.९.२४, २१ ) " ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या । संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ।।"

**तो वडिल जेथें चेतला । तोचि भाग्यपुरुष झाला** :–समाजाला, मनुष्यमात्राला भक्तिमार्गाला लावणें हेंच ध्येय समर्थांनीं प्रतिपादिलें व तेंच स्वतः स्वीकारलें, याचें कारण त्यांच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानांत सांपडेल. आपला अनुभव, पूर्वापार आध्यात्मिक शिकवण व खोल विचार यांच्या पायावर हें ध्येय आधारलेलें आहे. सर्वसामान्य सुख, विवेक, जाणतेंपण, पुण्य हे सर्व ईश्वरापासून मिळतें, ईश्वरकृपेशिवाय कोणत्याच इष्ट व मंगल गोष्टीची प्राप्ति होऊं शकत नाहीं असें समर्थांनीं बजाविलें आहे. कर्ता ईश्वर आहे हें ओळखणें म्हणजेच विवेक; हा विवेक जागृत झाल्यावर कांहींहि मिळवावयाचें असेल तर मनुष्य स्वतःच्या प्रयत्नावर अवलंबून न राहतां कर्त्याची कृपा प्राप्त करून घेण्याच्या उद्योगाला लागेल. हा दैववाद नसून उत्कट प्रयत्नवाद आहे. प्रयत्नाची दिशा मात्र विवेकानें बदलावयाची आहे.

" या कारणें सर्व सांडावें । एक देवास धुंडावें ।...।। नाना सुखें देवें केलीं । लोकें तयासी चुकलीं ।...।। सर्व सांडूनि शोधा मजला । ऐसें देवाचि बोलला । लोकीं शब्द अमान्य केला । भगवंताचा ।। म्हणोनि दुःख भोगिती । सर्व काळ कष्टी होती ...।। उदंड सुख जयास लागलें । वेडें तयास चुकलें ।...।। शहाण्यानें ऐसें न करावें । सुख होयें तेंचि करावें । देवास धुंडीत जावें । ब्रह्मांडापरतें ...।। मुख्य देवाचि ठायीं पडिला । मग काय उणें तयाला ।...।। विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख ।...।। कर्तयासी वोळखावें । त्यास विवेक म्हणावें ।।"

१३.७.२१ ते २९

अंतरात्मा म्हणजे देव, सर्व गुण अंतरात्म्याचेच आहेत, तोच ब्रह्मा-विष्णुमहेशांपेक्षां वडील, त्याचें ध्यान करावें म्हणजे सर्व कांहीं प्राप्त होईल, त्याचें स्मरण करून त्याला ' चेतवावा ', अंतःकरणांत त्याचा अधिकाधिक प्रकाश करून घ्यावा, म्हणजे भाग्य लाभेल. हें भाग्य म्हणजे अर्थात् केवळ ऐहिक वैभव नव्हे; सर्व मूल्यांचा या भाग्यांत अंतर्भाव आहे.

अंतरात्मा हा सर्वांपेक्षां, वायूपेक्षांहि वडील देव आहे, असें सांगून समर्थ म्हणतात :

" सकळां वडिल अंतरात्मा । त्यासी नेणे तो दुरात्मा ।...॥ म्हणोनि सकळां वडील देव । त्यासी होता अनन्यभाव । मग प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ॥ करी आपुला व्यासंग । कदापि नव्हे ध्यानभंग ।...॥ तो वडील जेथें चेतला । तोचि भाग्यपुरुष झाला । अल्पचेतनें तयाला । अल्प भाग्य ॥ तया नारायणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं ।..."

१५.९.१८–२४

ही भक्ति एकट्या व्यक्तीकरितां नाहीं; विश्वाचें संरक्षण करण्याचें सामर्थ्य भक्तींत, उपासनेंतच आहे. म्हणून समर्थांनी समाजाला उपासनेला लावण्याचें ध्येय कटाक्षानें प्रतिपादिलें आहे. एक उपासना केली म्हणजे इतर सर्व कांहीं प्राप्त होईल. " एरवीं उदंड केलें तरी जय होणार नाहीं. समर्थांची पाठी नसेल त्याला भलताच कुटील. "

" उपासना शोधूनि पाहिली । तों ती विश्वपाळिती झाली ।...॥ उपासना सर्वांठायीं । आत्माराम कोठें नाहीं ।...॥ ऐसी माझी उपासना । आणितां नये अनुमाना । नेऊनि घाली निरंजना । पैलीकडे ॥ देवाकरितां कर्में चालती । देवाकरितां कर्में होतीं । देवाकरितां ज्ञानी असती । किती येक ॥ "

**राम कर्ता**—कार्य मनुष्यानेंच करावयाचें असतें. भक्ति व कार्य यांत मुळींच विरोध नाहीं. कर्म हें देहाला लागलेलेंच आहे. कर्म उपासनेच्या आश्रयानें करावयाचें येवढाच, पण महत्त्वाचा, फरक. मुख्य उपासना व नंतर कर्म याप्रमाणें कर्म केलें म्हणजे ' मी कर्ता ' हा अभिमान राहत नाहीं. कर्मांतील अहंकार, अभिनिवेश, स्वार्थ, आग्रह हे दोष कमी होऊन कर्म सात्त्विक, समाजाला उपकारक, असें होतें व अशा सत्यसंकल्पाला देवाचें पाठबळ असल्यानें त्यांत यशहि येतें.

" मनीं धरावें तें होतें । विघ्न अवघेंचि नासोनि जातें ।...॥
रघुनाथ स्मरोनी कार्य करावें । तें तात्काळचि सिद्धि पावें ।
कर्ता राम हें असावें । अभ्यंतरीं ॥

कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुणनिवेदन ।...॥
मी कर्ता ऐसें म्हणतां । कांहींच न घडे तत्त्वता।...॥
मी कर्ता ऐसें म्हणसी । तरी तूं कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणतां पावसी । यश कीर्ति प्रताप ॥

६.७.३०;३३-३६

**संतच आदर्श पुरुष**—समर्थांच्या आदर्श पुरुषाचें स्वरूप सारांशरूपानें असें मांडतां येईल: दुर्गुणांचा कटाक्षानें त्याग करून उत्साहानें थोर सद्गुण अंगीं बाणवून, अखंड नामस्मरण व स्वरूपानुसंधान या भक्तिसाधनानें महापुरुष आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेतो; या साक्षात्कारानें अंतरीं सर्वात्मभाव उत्पन्न झाल्यानें, सर्वांना आत्मवत् लेखून त्यांना सर्व प्रकारें सुखी करण्यासाठीं मातेच्या कळवळ्यानें तो सदा झटतो व सर्व सुखाचें आगर जो परमेश्वर त्याच्या भक्तीकडे लोक वळावे असा प्रयत्न करतो. भक्तिमार्गात खंड पडूं नये, कारण मानवतेच्या कल्याणाचा तो एकच मार्ग आहे, या निश्चयानें महंत भक्तसमुदाय वाढवून भगवत्कीर्तीनें भूमंडळ भरून टाकतो. असें महापुरुषाचें दर्शन आहे. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे जगावर सकळ मंगळाचा वर्षाव करणारे संतच समर्थांचे आदर्श पुरुष होत, यांत शंका राहत नाहीं. अशा संतांचें समर्थांनीं अत्यंत प्रेमादरपूर्वक स्फूर्तिदायक वैभव गाइलें आहे. तें त्यांच्याच शब्दांत देतों, म्हणजे आदर्श पुरुषाचें आणखी वर्णन करण्याचें कारण नाहीं.

" संत आनंदाचें स्थळ । संत सुखाचि केवळ । नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ॥ संत विश्रांतीची विश्रांति । संत तृप्तीची निजतृप्ती ।...॥ संत धर्माचें धर्म-क्षेत्र ।...नातरी पुण्याची पवित्र । पुण्यभूमी ॥ संत समाधीचें मंदिर । संत विवेकाचें भांडार ।...॥ मोक्षश्रिया अलंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपति केले ॥...जें त्रैलोक्यीं नाहीं दान । तें करिती संत सज्जन । तया संतांचें महिमान । काय म्हणोनि वर्णावें ॥ १.५.१५ ते २१;२४

( जीवन-विकास, ऑगस्ट, १९६० )

# १. गुरुदेव रानडे

" सुखसागर आपण व्हावें । जग बोधें निववावें ॥"

( मुक्ताबाई )

आपण सुखसागर होऊन जगाला आत्मप्राप्तीच्या मार्गाचा बोध करणाऱ्या, आपण तरून विश्वाला तारणाऱ्या, सकल मंगलांचा भूतलावर सतत वर्षाव करणाऱ्या श्रेष्ठ साक्षात्कारी संतांमध्यें गुरुदेव रानडे यांना मानाचें स्थान आहे. इ. स. १९०१ पासून १९२० पर्यंत नेमानें, निष्ठेनें, निश्चयानें आत्मसाधनेचें कठोर तप करून त्यांनीं उच्च साक्षात्कार प्राप्त करून घेतला व ते गुरुपदाचे अधिकारी झाले; पण त्यांचे ज्येष्ठ गुरुबंधु श्री अंबुराव महाराज हयात होते तोंपर्यंत त्यांनीं गुरुपद स्वीकारलें नाहीं. या कामीं स्वतः श्री अंबुराव महाराजांचा प्रेमाचा आग्रहहि मानण्याचें त्यांनीं नम्रपणें नाकारलें. नंतर इ. स. १९३४ ते १९५७ पर्यंत त्यांनीं अनेक लोकांना नाम दिलें, त्यांच्यावर अनुग्रह केला; म्हणजेच सद्गुरूंनीं करावयाचें तें लोकोद्धाराचें कार्य भूतदयेनें व ईश्वराचा आदेश म्हणून केलें. तरी त्यांचें साधन अव्याहत सुरूच होतें.

" संशयरहित साधन । हेंचि सिद्धाचें लक्षण ।
सिद्धलक्षण साधकेंविण । बोलोंचि नये ॥"

आणि "बाह्य साधकाचे परी । परि स्वरूपाकार अंतरीं ॥" या समर्थांच्या आदेशाप्रमाणें शेवटपर्यंत त्यांचें जीवन होतें. अशा थोर सत्पुरुषाचें लौकिक चरित्र, आध्यात्मिक चरित्र व थोडें तत्त्वज्ञान याचा ' पुरुषार्थी ' च्या वाचकांना अल्प परिचय करून देण्याचें योजिलें आहे.

## लौकिक चरित्र :

(अ) **जन्म व बाल्य**—रानडे घराणें मूळचें कोंकणांतील जामसंडें या गांवचें असून, इ. स. १७४० च्या सुमारास पेशव्यांचे वकील म्हणून

त्या कुलांतील एक पुरुष रामदुर्ग व नरगुंद या भागांत आले. ते जाऊन येऊन कर्नाटकांत व कोंकणांत राहत. पुढें गुरुदेवांचे पणजे बापूजी हे कायमचे रामदुर्गास राहावयास आले व त्यांनींच हें घराणें उदयाला आणलें. त्यांचा रामदुर्गच्या राजघराण्याशीं आप्तसंबंध होता व तेथें बापूजींची खाजगी सल्लागार म्हणून नेमणूक झाली. गुर्लहोसूरचे चिदंबर दीक्षित या सत्पुरुषांचे बापूजी शिष्य होते. त्यांनीं दीक्षितांनीं केलेल्या एका यज्ञांत अत्यंत शरीरकष्ट केले. त्यांना संतति नव्हती. त्यांच्या कष्टामुळें प्रसन्न होऊन दीक्षितांनीं त्यांच्यावर कृपा केली व त्यांच्या कुलाचा विस्तार झाला. त्या कृपेचें श्रेष्ठ फळ म्हणजे श्री गुरुदेवांचा त्या कुलांत झालेला जन्म होय. गुरुदेवांचे वडील दत्तोपंत हे कांहीं कारणानें रामदुर्ग सोडून जमखंडीस येऊन राहिले व त्या संस्थानांत मामलतदार, खाजगी कारभारी अशा हुद्यांवर त्यांची नेमणूक झाली होती. गुरुदेवांचा जन्म जमखंडीस ता. ३ जुलै १८८६ स झाला. त्यांच्या मातोश्रींचें नांव पार्वतीबाई. पुत्रप्राप्तीसाठीं त्यांनींहि अनेक व्रतवैकल्यें केलीं होतीं. गुरुदेवांच्या जन्माच्या वेळीं त्यांना बराच त्रास झाला. त्या वेळचे जमखंडी संस्थानचे अधिपति श्री. रामचंद्रराव यांनीं रामेश्वर या आपल्या आराध्यदेवतेचें तीर्थ दिलें म्हणजे बाळंतिणीची सुटका होते, असा त्या गांवात समज होता. पार्वतीबाईनाहि तें तीर्थ देण्यांत आलें व त्या सुखरूप प्रसूत झाल्या. रामेश्वराचे कृपेनें झालेल्या या बालकाचें नांव, रामचंद्ररावांच्या सूचनेवरून 'रामचंद्र' असें ठेवण्यांत आलें.

**( आ ) शिक्षण**—गुरुदेवांचें शिक्षण जमखंडीसच झालें. त्यांच्या बुद्धीची विशेष चमक इंग्रजी सहावींत दिसून आली. सातवीचा संस्कृतचा पेपर त्यांनीं सहावींतच सोडविला आणि त्यांत सातवीच्या सर्व मुलांपेक्षां अधिक मार्क मिळविले. इ. स. १९०२ सालीं त्यांची मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाली; त्या परीक्षेंत त्यांना पहिली जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलरशिप मिळाली व सर्व विद्यार्थ्यांमध्यें त्यांचा क्रमांक दुसरा आला. पुढील शिक्षणासाठीं त्यांनीं पुणें येथील सुप्रसिद्ध डेक्कन कॉलेजमध्यें प्रवेश केला. कॉलेजमध्यें एक अभ्यासू, चौकस बुद्धीचा, स्वतंत्रपणें विचार करणारा अत्यंत बुद्धिमान, तरीहि साधा व नम्र विद्यार्थी, असा त्यांचा

सार्थ लौकिक होता. सर्व देशी व विदेशी प्राध्यापकांना त्यांच्याबद्दल अत्यंत प्रेमादर वाटे. तरी, प्रि. बेन यांची बुद्धिमत्ता, वक्तृत्व, दिलदारपणा व गाढ विद्वत्ता यांमुळें त्यांच्या व्यक्तित्वाचा गुरुदेवांच्या मनावर फार प्रभाव पडला. थिऑसाफिस्ट, सौम्य स्वभावाचे, सात्त्विक प्राध्यापक वुडहाऊस यांच्याबद्दलहि त्यांचीं प्रेमादराची भावना होती. १९०३ व १९०४ मध्यें ते प्रीव्हियस व इंटरमीजिएट या परीक्षांत पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले व दोन्ही वर्षीं त्यांना संस्कृतचीं बक्षिसें व स्कॉलरशिपहि मिळाली. इंटरमीजिएट परीक्षेमध्यें संस्कृतची स्कॉलरशिप गुरुदेव व मुंबई प्रांताचे माजी पंतप्रधान कै. बाळासाहेब खेर यांमध्यें वांटली गेली. याच वर्षीं ( इ. स. १९०४ मध्यें ) त्यांचे वडील वारले व ते पोरके झाले. बी. ए. साठीं त्यांनीं गणित हा ऐच्छिक विषय घेतला आणि १९०६ मध्यें त्या परीक्षेला न बसतां, १९०७ सालीं ते बी. ए. झाले. परंतु या परीक्षेंत ते दुसऱ्या वर्गांत आले. संस्कृतचें भाऊदाजी पारितोषिक मात्र त्यांना मिळालें. त्यामुळें त्यांची निराशा झालीच, पण त्यांच्या सर्व प्राध्यापकांचीहि तितकीच निराशा झाली. गुरुदेवांचा आय्. सी. एस्. परीक्षेसाठीं इंग्लंडला जाण्याचा विचार होता; परंतु वडिलांचा मृत्यु व बी. ए. तील सेकंड क्लास यांमुळें तो बेत सोडावा लागला. कलेक्टर होण्यापेक्षां अनेक पटींनीं मोठें असें कार्य त्यांच्याकडून व्हावयाचें होतें म्हणूनच ईश्वरानें ही घटना घडवून आणिली असावी. असो. १९०८ मध्यें ते डेक्कन कॉलेजमध्यें फेलो झाले; प्रीव्हियसच्या विद्यार्थ्यांना संस्कृत काव्य ( जानकी-हरण ) शिकविण्याचें वर्गांतील काम त्यांना देण्यांत आलें होतें. याच वर्षीं मीं डेक्कन कॉलेजमध्यें प्रवेश केला व गुरुदेवांपाशीं संस्कृत शिकण्याचें भाग्य मला लाभलें. हा येथें जोडलेला गुरुशिष्यसंबंध अन्य क्षेत्रांत गुरुदेवांच्या निर्याणापर्यंत अखंड अबाधित राहिला, ही ईश्वराची माझ्यावर सर्वांत मोठी कृपा. गुरुदेवांनीं पुढें तीस वर्षें अलौकिक प्राध्यापक म्हणून जें यश संपादन केलें, त्याची वानगी आम्हांला १९०८ मध्येंच मिळाली. प्रि. बेनशिवाय दुसऱ्या कोणत्याहि प्राध्यापकाचें त्यांच्यापुढें तेज पडूं शकलें नाहीं.

( इ ) **अभ्यासांत खंड व नौकरी; एम्. ए. त अपूर्व यश**—इ. स. १९०९ मध्यें गुरुदेव एम्. ए. ला बसावयाचे, परंतु त्यांच्या उदयोन्मुख जीवनांत मोठें विघ्न आलें. या वर्षाच्या सुरुवातीलाच ते क्षयानें आजारी पडले व त्यांची स्थिति चिंताजनक झाली. खरोखर सर्व विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना दुःख झालें. कॉलेजमध्यें राहणें अशक्य झाल्यानें ते पुण्यास गांवांत राहण्यास आले. तेथें मातेची शुश्रूषा व वैद्याचें औषध सतत सुरू होतें, पण आजार कमी होईना. सर्व शून्य भासूं लागलें. परंतु हीच त्यांच्या पारमार्थिक उत्कर्षाची वेळ होती. केवळ ईश्वरी कृपेनें या आजारांतून ते कसे बरे झाले, याचा उल्लेख त्यांच्या आध्यात्मिक चरित्रांत येईल. १९१०–११ पर्यंत त्यांची प्रकृति बरीच सुधारली. चरितार्थासाठीं कांहीं तरी उद्योग करणें आवश्यक होतेंच; म्हणून १९११ मध्यें त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें इंग्रजीचे ट्यूटर म्हणून नौकरी धरली. पुढें १९१३ मध्यें डेक्कन कॉलेजमध्यें संस्कृत हस्तलिखितांच्या ग्रंथालयाचे क्युरेटर म्हणून त्यांची नेमणूक झाली व ते पुन्हां डेक्कन कॉलेजमध्यें येऊन राहिले. त्यांचा एम्. ए. चा अभ्यास त्यांनीं पुन्हां सुरू केला होता, पण अद्याप ते परीक्षेला बसले नव्हते. प्रकृति नीट राहिल्यास १९१४ च्या नोव्हेंबरमध्यें परीक्षेला बसण्याच्या विचारानें त्यांची तयारी चालू होती. १९१४ मध्यें एम्. ए. होण्याची अट न ठेवितां, आपल्या संस्थेचे आजीव सभासद होण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें त्यांना आग्रहाची विनंति केली व त्याप्रमाणें ते फर्ग्युसन कॉलेजमध्यें तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून काम करूं लागले. त्याच वर्षी तत्त्वज्ञान विषयांत ते एम्. ए. च्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिले आले व चॅन्सेलर्स मेडल् व तेलंग मेडल् हीं सुवर्णपदकें त्यांना मिळालीं. या परीक्षेंतील त्यांचें यश इतकें उज्ज्वल होतें, कीं त्यांचीं उत्तरें वाचून 'परीक्षकापेक्षां या विद्यार्थ्यालाच तत्त्वज्ञानाचें अधिक ज्ञान आहे' असें परीक्षकांनीं आपल्या अहवालांत लिहिलें होतें. फर्ग्युसन कॉलेजमध्यें त्यांनीं १९२० पर्यंत काम केलें; परंतु त्या वर्षी त्यांची प्रकृति पुन्हां बिघडली व प्रकृति सुधारण्यासाठीं ते इंचगेरीस, आपल्या गुरूंच्या समाधीच्या स्थानीं येऊन राहिले. या दुखण्यांत बरें होण्याची त्यांना मुळींच आशा वाटत नव्हती. परंतु या वेळींहि ईश्वरकृपेनेंच ते वांचले व

हा आजारहि त्यांच्या श्रेष्ठ पारमार्थिक उत्कर्षाला कारणीभूत झाला. या आजारांत विशेष उच्च आत्मानुभव येऊन ते दुसऱ्यांना आध्यात्मिक मार्गदर्शन करण्याला अधिकारी झाले. मागें १९१०–११ सालीं व आतांहि प्रकृति सुधारली, तरी ते चांगले धट्टेकट्टे कधींच झाले नाहींत. साधारण काम करण्याइतकी शक्ति आली, इतकेंच. इ. स. १९२२ मध्यें हवा-पालट व्हावी म्हणून त्यांनीं सांगलीस बदली करून घेतली, कारण पुण्याची हवा त्यांना मुळींच मानवेना. सांगलीसहि त्यांना सतत राहणें शक्य झालें नाहीं. ते वरचेवर आजारी पडून इंचगेरीला जात. यामुळें कॉलेजमध्यें शिकविण्यांत खंड पडे. अर्थात् ते विद्यार्थ्यांचें नुकसान होऊं देत नसत. सांगलीस राहतां येईल तेवढ्या दिवसांत विद्यार्थ्यांचा मागें पडलेला सर्व विषय शिकवून ते पुरा करून घेत असत. परंतु, संस्थेच्या नियमांच्या व शिस्तीच्या दृष्टीनें ही व्यवस्था पुष्कळ आजीव सभासदांना योग्य वाटली नाहीं व म्हणून १९२४ मध्यें गुरुदेवांनीं डेक्कन एज्युकेशन सोसायटींतील आपल्या जागेचा राजीनामा दिला.

(उ) **ॲकॅडमी व तत्त्वज्ञान मासिक**– यानंतर, पुढें काय करावयाचें हा प्रश्न उभा राहिला. 'ईश्वरविषयक प्रश्नांचें तात्त्विकदृष्ट्या संशोधन करण्याची ज्याना आस्था आहे अशा सर्वांना एकत्र आणणें,' या उद्दिष्टानें एखादी संस्था काढावी अशी कल्पना त्यांच्या मनांत पुष्कळ दिवस होती; परंतु आजार व कॉलेजांतील कामाचा व्याप, यांमुळें ती सुप्तच राहिली. आतां मोकळीक मिळाल्यानें त्यांनीं 'ॲकॅडेमी ऑफ् फिलॉसफी अँड रिलिजन' ही संस्था स्थापिली. भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास सोळा खंडांत प्रसिद्ध करणें ही या संस्थेपुढें गुरुदेवांनींच ठेविलेली योजना होती. परंतु द्रव्यसाहाय्याच्या अभावीं ती यशस्वी झाली नाहीं. यांपैकीं दोन-तीन खंडच प्रकाशित झाले. तत्त्वज्ञानविषयक त्रैमासिकहि त्यांनीं कांहीं वर्षें चालविलें; परंतु तेंहि कांहीं वर्षांनीं बंद पडलें.

(ऊ) **अलाहाबाद**–इ. स. १९२६ मध्यें गुरुदेवांचा 'उपनिषद्रहस्य' हा इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध झाला व त्यामुळें त्यांची कीर्ति इंग्रजी भाषा जाणणाऱ्या सर्व तत्त्वज्ञांत पसरली. 'हा ग्रंथ म्हणजे तुमचें चिरंतन स्मारकच होय' असा अभिप्राय जर्मन संस्कृत पंडित गार्बे यांनीं दिला. हा ग्रंथ

वाचल्यावर अलाहाबाद विद्यापीठाचे उपकुलगुरु सर गंगानाथ झा यांनीं अत्यंत गौरवानें त्या विद्यापीठांत तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून येण्याची त्यांना अति आग्रहाची विनंति केली आणि ता. १–१२–१९२७ या दिवशीं गुरुदेव तेथें प्राध्यापक म्हणून विराजमान झाले. तेथें त्यांनीं सुमारें वीस वर्षें काम केलें. कांहीं वर्षें ते डीनहि होते आणि शेवटीं ॲक्टिंग व्हाइस चॅन्सेलर म्हणून इ. स. १९४६ मध्यें ते निवृत्त झाले. त्यानंतर तेथेंच त्यांना 'सन्मान्य प्राध्यापक' म्हणून नेमून त्या संस्थेनें त्यांच्या-संबंधींचा आदर व्यक्त केला. १९४७ मध्यें त्याच विद्यापीठानें 'डी. लिट्.' ही उच्च सन्मानाची मानपदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा गौरव केला. यानंतर त्यांचा विद्यापीठाशीं संबंध संपला; तरी तेथें त्यांनीं बंगला बांधला होता व थंडींत तेथील हवा त्यांना चांगली वाटे, म्हणून बहुधा प्रतिवर्षी थंडींत ते अलाहाबादेस जात. श्रीमंत राजेसाहेब, सांगली, यांनीं उदार देणगी देऊन परमार्थप्रसारासाठीं स्थापलेल्या 'अध्यात्म-मंदिरा'ची शाखाहि त्यांनीं तेथें उघडली होती. वरील संस्थेच्या विद्यमानें त्यांनीं हिंदी संत आणि भगवद्गीता या विषयावर बरींच व्याख्यानें दिलीं. त्यांचा अनुक्रमें 'हिंदी संतांचा ईश्वरप्राप्तीचा मार्ग' आणि 'भगवद्गीता म्हणजे ईश्वरसाक्षात्काराचें तत्त्वज्ञान' या त्यांच्या इंग्रजी ग्रंथांत अंतर्भाव झाला आहे. अशा रीतीनें अलाहाबादेशीं त्यांचा संबंध शेवटपर्यंत कायम राहिला.

(ए) **ग्रंथरचना**– गुरुदेवांचें सर्व महत्त्वाचे ग्रंथ साक्षात्कार या विषयावरच लिहिलेले आहेत. त्यांत त्यांच्या 'बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवादाचें' भव्योदात्त दर्शन घडतें. त्यांनीं आपलें तत्त्वज्ञान स्वतंत्रपणें सांगण्यासाठीं एकहि ग्रंथ लिहिला नाहीं. उपनिषदें, मराठी, हिंदी व कन्नड संतकवि, आणि भगवद्गीता या ग्रंथांतील तत्त्वज्ञानाचें यथार्थ दर्शन घडविण्यासाठीं त्यांनीं आपले ग्रंथ लिहिले; परंतु त्यांत त्यांचें स्वतःचें तत्त्वज्ञान प्रकट झालें आहे. त्यांनीं आपल्या उपनिषद्रहस्यांत लिहिल्याप्रमाणें, 'उपनिषदां-तील तत्त्वज्ञानांत आलेल्या विषयासंबंधी माझे स्वतःचे विचार मीं स्वतंत्र-पणें सांगितलेले नाहींत. परंतु या ग्रंथांतील विचारप्रणालीचा जे सूक्ष्म अभ्यास करतील त्यांना माझें तत्त्वज्ञान काय आहे तें कळूं शकेल.' हे विधान त्यांच्या सर्व ग्रंथांना लागूं आहे. 'माझे विचार मी इतरांकडून

वदवितों ' ( I make others speak for me. ) असें ते म्हणत असत. त्यांच्या ग्रंथांचें दुसरें एक वैशिष्ट्य म्हणजे, ते प्रथम त्या त्या विषयावर कांहीं व्याख्यानें देत आणि त्यांतून पुढें ग्रंथ निर्माण होई. " मराठी संतांचा साक्षात्कार " हा एकच ग्रंथ त्याला अपवाद आहे. याप्रमाणें १९२६ मध्यें ' उपनिषद्–रहस्य ', १९३२ मध्यें ' मराठी संतांचा साक्षात्कार ' आणि १९५४ सालीं ' हिंदी संतांचा–सोपान ' व ' हिंदी संतांचा ईश्वरप्राप्तीचा मार्ग ' हे मुख्य ग्रंथ प्रसिद्ध झाले. १९२६ सालीं त्यांचीं वचनामृतें निर्माण झालीं, त्यांत ' मराठी संतांचा साक्षात्कार ' या ग्रंथाला आधारभूत वचनें असून प्रत्येक वचनामृताला लहानच पण अत्यंत उद्बोधक प्रस्तावनाहि लिहिलेली आहे. ' केवळ परमार्थासाठींच ज्यांना वाचन करावयाचें, त्यांना तेवढीं वचनामृतें पुरीं आहेत, ' असें ते म्हणत. १९२७ मध्यें त्यांनीं व डॉ. बेलवलकरांनीं मिळून लिहिलेल्या 'Creative Period' या ग्रंथांतील उपनिषदांसंबंधी लिखाण गुरुदेवांच्या हातचें आहे. १९५६मध्यें ' म. गांधी व हिंदी संत यांची आध्यात्मिक जीवनासंबंधीं कल्पना ' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. ' भगवद्गीता म्हणजे साक्षात्काराचें तत्त्वज्ञान ' व ' कन्नड संतांचा साक्षात्कार ' हे ग्रंथ लवकरच बाहेर पडतील.[1] या शिवाय निरनिराळ्या नियतकालिकांत आलेले त्यांचे अनेक स्फुट निबंध आहेत. त्यांपैकीं कांहीं निवडक, महत्त्वाचे लेख ' तत्त्वज्ञानपर निबंध ' या नांवानें त्यांच्या अमृतमहोत्सवाच्या प्रसंगीं १९५६ मध्यें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. ' वेदान्त म्हणजे भारतीय तात्त्विक विचारांचा उच्चतम बिंदु ' या नावाचें एक पुस्तक ते लिहिणार होते; त्यावर त्यांनीं लिहिलेली विस्तृत टिपणें तयार आहेत. परंतु, दुर्दैवानें तें पुस्तक लिहून झालें नाहीं. ती टिपणें व त्यांचें इतर अप्रसिद्ध साहित्य छापून काढण्याचा निंबाळ आश्रमाचा विचार आहे.

**आध्यात्मिक चरित्रः**—गुरुदेवांची विशाल बुद्धि, गाढ व्यासंग, थोर विद्वत्ता, आदर्श सदाचरण, विद्यार्थी व प्राध्यापक म्हणून त्यांनीं मिळविलेलें असाधारण यश, प्रतिभासंपन्न, सिद्धहस्त, स्वतंत्र प्रज्ञेचे ग्रंथकार

१. हे दोन्ही ग्रंथ नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत.

व तत्त्वज्ञानी म्हणून त्यांची विद्वज्जनांत पसरलेली थोर कीर्ति, या सर्व गोष्टींमुळें त्यांचें लौकिक चरित्र उज्ज्वल झालें आहे, यांत शंकाच नाहीं. तरी संतांचें आध्यात्मिक चरित्र, आंतरिक जीवन, हाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा होय. गुरुदेवहि या नियमाला अपवाद नाहींत. त्यांच्या लौकिक जीवनाची उज्ज्वलता व तेजस्विता हा त्यांच्या आध्यात्मिक अनुभवाच्या चित्सूर्याचा जगाला दिसणारा प्रकाश होय.

अंतरीं गेलिया अमृत । बाह्य काया लखलखीत ।
अंतरस्थिति बाणतां संत- । लक्षणें कैसी ॥

असें दासबोधांत एक वचन आहे. संतांचे बाहेर दिसणारे सर्व गुण त्यांच्या अंतःस्थितीचें, आत्मप्रचीतीचे किरण होत. म्हणून गुरुदेवांचें आध्यात्मिक चरित्र अत्यंत महत्त्वाचें आहे.

( अ ) **गुरुकृपा**–गुरुदेव लहानपणापासूनच भाविक, आस्तिक, सत्त्वगुणी, व कांहींसे भोळे होते. रस्त्यावरून जातांना दिसणाऱ्या प्रत्येक देवाचें दर्शन घेणें, शाळेंत यश मिळावें म्हणून आणि मिळेल या श्रद्धेनें देवाला नमस्कार करणें, या गोष्टी ते नेहमीं करीत. त्यांच्या मातोश्रीहि भाविक, भक्तिप्रवण स्वभावाच्या होत्या. त्यांचा बराच काळ देवदेव करण्यांत जाई. त्या वेळच्या स्त्रियांचा साधारणपणें असाच स्वभाव असे. त्याचाहि गुरुदेवांच्यावर साहजिक परिणाम झाला होता. या त्यांच्या भाविकपणाला खऱ्या परमार्थाकडे वळविण्याचा योग १९०१ मध्यें आला. विजापूर जिल्ह्यापैकीं इंडी तालुक्यामधील इंचगेरी गांवचे सुप्रसिद्ध संत श्री भाऊसाहेब महाराज उमदीकर हे बरींच वर्षें नियमानें दिवाळीच्या सुमारास आपल्या शिष्यांच्या बोलावण्यांवरून जमखिंडीस जात असत व तेथें आठवडाभर भक्तीचा मोठा सोहळा होई. तेव्हां गुरुदेव हे महाराजांच्या भजनाला जात. १९०१ मध्यें त्यांच्या वर्गातील एका मुलानें महाराजांच्याकडून याच वेळीं नाम घेतलें व अगदीं थोड्या अवधींत त्याला थोडीशी आध्यात्मिक प्रचीति आली. बालसुलभ मोकळेपणानें ती त्यानें गुरुदेवांना सांगितली आणि त्याचा मनावर परिणाम होऊन त्यांनींहि नाम घेतलें. याप्रमाणें सद्गुरूंकडून नाम मिळणें यालाच गुरुकृपा किंवा अनुग्रह असें म्हणतात. या वेळीं गुरुदेवांचें वय सोळा वर्षांचें होतें. अनुग्रह घेतला तरी

ग्रंथ संग्रहालय, ठा. स्थळप्रत
अनुक्रम ... वि: ...

या लहान वयांत साधनास, म्हणजेच नामस्मरणास (दिवसाला) नियमित-पणें सुरुवात झाली नाहीं. या वेळची भक्तीहि सकामच होती. महाराज एकदां पोथी सांगतांना म्हणाले, “नेम केला म्हणजे परीक्षाहि चांगल्या रीतीनें पास होते.” याचा प्रत्यय पाहण्याचें गुरुदेवांनीं ठरविलें. १९०२ सालीं मॅट्रिकची परीक्षा झाल्यावर रोज ते न चुकतां एक तास नेम करीत व या नेमानें आपणाला संस्कृत स्कॉलरशिप मिळाली तर महाराजांचें म्हणणें खरें असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें त्यांना स्कॉलर-शिप मिळाली व त्यामुळें महाराजांच्यावर आणि परमार्थावर त्यांची श्रद्धा वाढली. पुढेंहि प्रत्येक परीक्षा झाल्यावर याप्रमाणेंच ते नेम करीत व परीक्षेंत यशहि येई. या कालांत त्यांना पारमार्थिक अनुभवहि थोडेथोडे येऊं लागले होते. तरीहि नियमानें नामस्मरण करण्यास सुरुवात १९०८ सालीं डेक्कन कॉलेजमध्यें फेलो असतांना झाली. अनुभवहि वाढले. हें अनुभव त्यांनीं प्रो. वुडहाऊस यांना सांगितले. ते थिऑसाफिस्ट होते. ते त्यांना डॉ. बेझंटबाईकडे बनारसला घेऊन गेले. गुरुदेवांच्या अनुभवांची हकीकत ऐकल्यावर “तुमच्यावर गुरुकृपा झाली आहे का? असल्यास सद्गुरुंचा फोटो आहे का?” असा प्रश्न बेझंटबाईनीं त्यांना विचारला. त्याचें होकारार्थी उत्तर देऊन गुरुदेवांनीं महाराजांचा फोटो त्यांना दाखविला. तो पाहून “तुम्हांला अधिकारी सद्गुरुंची कृपा लाभली आहे. (You are in safe hands) तुमचे आध्यात्मिक अनुभव चांगले आहेत; सत्त्वशुद्धि होत असल्याचें तें लक्षण आहे;” असें आश्वासन बेझंटबाईनीं त्यांना दिलें. त्यामुळें गुरुदेवांना फार आनंद झाला. जमखंडीस परत आल्यावर त्यांनीं ही सर्व हकीगत महाराजांना सांगितली. त्यांनीं बेझंटबाईचा फोटो पाहण्यास मागितला व तो पाहून ते म्हणाले, “बाईनीं योग केलेला दिसतो.”

**(आ) ‘आपदः सन्तु नः शश्वत् यासु संस्मर्यते हरिः’**

गुरुदेवांच्या खऱ्याखुऱ्या तळमळीच्या साधनाला सुरुवात त्यांच्या १९०९ मधील आजारापासून झाली. त्या आजाराचा उल्लेख मागें आलाच आहे. यांतून वांचणें कठिण असें स्पष्ट दिसत होतें. ते डेक्कन कॉलेज सोडून गांवांत राहण्यास जाणार होते. त्यावेळीं त्यांच्या एका मित्रानें त्यांना गीता वाचून दाखविली. त्यांत अ. १८ मधील ‘मच्चित्तः सर्वदुर्गाणि

मत्प्रसादात्तरिष्यसि ’ या वचनावर त्यांचें मन खिळून राहिलें, आणि भगवंताच्या या प्रतिज्ञेवर विश्वास ठेवून नामस्मरण करण्याचा त्यांनीं निश्चय केला. त्याचें प्रत्यंतरहि त्यांना लवकरच आलें. त्यांना अनाहत नादाचा अनुभव येऊं लागला आणि त्याच वेळीं ‘ नादानुसंधान नमोऽस्तु तुभ्यं। त्वां साधनं तत्त्वपदस्य मन्ये। भवत्प्रसादात्पवनेन सार्धम् विलीयते विष्णु-पदे मनो मे।’ या श्रीशंकराचार्यांच्या योगतारावलींतील श्लोकहि त्यांच्या.वाचनांत आला. प्रकृति सुधारूं लागली. त्यानंतर महाराजांच्या सान्निध्यांत त्यांनीं कांहीं काळ घालविला. महासंकट नष्ट झालें. महाराजांच्यावर व नेमावर श्रद्धा पूर्ण बसली. सकाम भक्ति निष्काम होऊं लागली आणि नामस्मरण करून साक्षात्कार करून घेणें हें एकच जीवनांतील कर्तव्य आहे, असा त्यांचा निश्चय झाला. “ भक्ति प्रथम निष्काम होऊं शकत नाहीं; आधीं ती सकाम–निष्काम, सकामच अधिक, अशी असते, व तसें असण्यांत अयोग्य असेंहि कांहीं नाहीं. मात्र भक्ति केवळ सकाम नसावी व तिची गति निष्कामतेकडे असावी,” असें ते सांगत. भक्ति सकामतेकडून निष्कामतेकडे जाण्याची ही प्रक्रिया वर त्यांच्या जीवनांत दृष्टीस पडते. १९१४ मध्यें ते एम्. ए. झाले; त्या प्रत्यक्ष परीक्षेच्या दिवसांतहि त्यांचा नेम चुकला नाहीं, असें त्यांच्याबरोबर एम्. ए. ला बसलेल्या एका गुरुबंधूंनीं सांगितलें आहे. असो. १९१४ मध्यें महाराजांनीं देह ठेविला. त्या प्रसंगीं गुरुदेवांना अपरिमित दुःख झालें. रात्रीं अश्रूंनीं उशी भिजून जाई,असें ते सांगत. याचा परिणाम म्हणजे त्यांचें साधन चढतवाढत चाललें, परमार्थाचा व गुरुभक्तीचा त्यांना ध्यास लागला. गुरुदेवांच्या गुरुभक्तीला उपमा म्हणजे ज्ञानेश्वरांच्या निवृत्तिनाथांविषयीं किंवा एकनाथांच्या जनार्दनस्वामींविषयींच्या भक्तीचीच होय. ज्ञानेश्वरींतील १३ व्या अध्यायामधील ‘ आचार्योपासने ’ चें वर्णन म्हणजे गुरुदेवांच्या गुरुभक्तीचें वर्णन एवढें सांगितलें म्हणजे पुरे. अधिक विस्तार करण्याला येथें जागा नाहीं.

( इ ) **कौटुंबिक आपत्ति, दुसरा आजार व गुरुपदाची प्राप्ति**– दुःखांतूनच देवाकडे जावें लागतें, सूळ हाच देवाच्या मंदिरांत जाण्याचा जिना आहे, या नियमाला गुरुदेव तरी अपवाद कसे ठरतील ? १९१६

ते १९३३ पर्यंत त्यांच्यावर अनेक आपत्ति आल्या. १९१६ मध्यें एकुलता एक मुलगा एक वर्षाचा होण्यापूर्वींच गेला. १९१८ च्या इन्फ्लुएंझांत मातोश्री व पत्नी यांचा अंत झाला व गुरुदेव अगदीं एकाकी झाले. प्रकृति सदांची अशक्त; त्यांत प्रेमानें शुश्रूषा करणारी माता सोडून गेली. १९२० मध्यें मागील आजारानें पुनः जोर केला. कॉलेजचें काम टाकून गुरुदेव आपल्या सद्गुरूंच्या समाधीजवळ, इंचगेरीस येऊन राहिले. प्रकृति सुधारण्याचें लक्षण दिसेना. त्यांनीं मृत्युपत्र तयार केलें. या सर्व अंधकारांत परमार्थावरील व सद्गुरूंवरील श्रद्धेचा व आत्मानुभूतीचा सूर्य मात्र तेजानें तळपत होता, साधनांत विलक्षण तीव्रता आली होती. महाराज म्हणत असत, "देहाला कष्ट, जगांत फजिती आणि मृत्यूचें स्मरण, या तीन गोष्टी असल्या म्हणजे साधन उत्तम होतें." या तीनहि गोष्टी गुरुदेवांच्या जवळ पूर्णतः होत्या. पडत्या काळांत जगाकडून उपेक्षा सोसावी लागतेच. त्यांचे ज्येष्ठ गुरुबंधु श्री अंबुरावमहाराज यांनीं मात्र आशा मुळींच सोडली नाहीं. "तुम्हांला ६० वर्षें भीति नाहीं असें महाराजांनीं सांगितलें आहे, तें खरें ठरलेंच पाहिजे. मग डॉक्टर कांहींहि म्हणोत. मी तुमच्या मृत्युपत्रावर साक्ष घालणार नाहीं," असें आश्वासक प्रेमळ शब्द त्यांनीं गुरुदेवांपुढें उच्चारिले. गुरुदेवांनीं आपल्या गुरुबंधूंच्या सत्संगतीचा पूर्ण लाभ घेतला. हाच दुःखाचा व निराशेचा काळ त्यांच्या अत्युच्च पारमार्थिक उत्कर्षाचा ठरला. गुरुदेवांनीं लिहिलें आहे त्याप्रमाणें, अत्यंत काळोख्या मध्यरात्रीनंतर प्रभातकाल दूर नसतो. १९२० च्या शेवटीं त्यांना एक अति उच्च असा अनुभव आला; तो त्यांनीं श्री अंबुराव महाराजांना सांगितला. तो ऐकून त्यांना फार आनंद झाला. आपल्या मागें परमार्थ चालविणारा सद्गुरु तयार झाला या जाणिवेचा तो आनंद होता. 'आतां तुम्ही नाम देऊं लागा,' असें त्यांनीं गुरुदेवांना सांगितलें. परंतु, 'तुम्ही असतांना नाम देण्याचें मला काय कारण?' असें आपल्या शालीनतेला शोभेल असें उत्तर गुरुदेवांनीं दिलें. 'गुरुपदाचा अधिकार आला आहे, पण तो वापरण्याला अवकाश आहे.' असा श्रीनिंबरगी महाराजांचा, गुरुदेवांच्या आजेगुरूंचा, दृष्टान्तहि याच सुमारास त्यांना झाला, असें एकदां ते म्हणाले. हें सर्व झाले, पण संकटें

संपलीं नाहींत. प्रकृतीला धोका उरला नाहीं, तरी तक्रार सुरूच होती. १९२२ मध्यें त्यांचा दुसरा विवाह झाला. पुण्याची हवा मानवेना म्हणून सांगलीस बदली करून घेतली. शेवटीं १९२४ मध्यें राजीनामा दिल्या-वर, पुढें काय हा प्रश्न उभा राहिला. १९२७ मध्यें अलाहाबादेस प्राध्यापकाची जागा मिळाल्यावर हा प्रश्न चांगल्या रीतीनें सुटला. पण १९२९ मध्यें प्रकृति पुन्हां बिघडली ती १९३३ च्या शेवटपर्यंत नीट सुधारली नाहीं. १९२०–२१ च्या आजारांत चहा तरी पोटांत जात असे. या दुखण्यांत तर कित्येक महिने चहाहि पोटांत जाईना. ते कसें जगत होते, तें ईश्वरालाच माहीत. या सर्व आपत्तींत नामसाधन, सद्‌गुरु व ईश्वर यांच्यावरील दृढ श्रद्धा, हें एकच आशास्थान होतें आणि तें इतकें बलिष्ठ होते, कीं त्याच्या सामर्थ्यापुढें त्यांना कलिकालाचें सामर्थ्यहि ठेंगणें वाटलें. महाराजांच्या मनांत असेल तोंपर्यंत परमार्थाच्या सेवेसाठीं हा देह जगेल, त्याचें कार्य संपलें कीं तो जाईल, अशी आत्मसमर्पणाची, शरणागतीची, वृत्तिहि बाणली होती. भक्तिभावाचा परमोच्च बिंदु म्हणजे शरणागति, असें त्यांनीं लिहिलें आहे. त्या बिंदूला पोचण्यासाठींच जणुं त्यांना या अनेक आपत्ति भोगाव्या लागल्या. इतके असून, त्यांचें प्राध्यापकाचें काम, गाढ अभ्यास व ग्रंथलेखन सर्व चालू होतेंच.

( ई ) **शाब्दे निष्णातः । साक्षात्कारवाद**—गुरुदेवांच्या ग्रंथांची माहिती वर आलीच आहे. त्यांतील साक्षात्कारवादाविषयीं चार शब्द लिहिणें आवश्य आहे. हा विषय इतका मोठा आहे, कीं या लहानशा लेखांत त्याची रूपरेषाहि देणें कठिण. पण गुरुदेवांचें आध्यात्मिक चरित्र त्यांच्या साक्षात्कारवादाची थोडी तरी माहिती दिली नाहीं तर अपूर्ण राहील म्हणून चार शब्द लिहीत आहे. ईश्वर आहे, त्याचा साक्षा-त्कार होणें शक्य आहे, इतकेंच नव्हे, तर ईश्वर–साक्षात्कार हें एकच सत्य ज्ञान आहे, इतर सर्व भ्रांति आहे, ईश्वर साक्षात्कारानें परमानंद होतो, त्यामुळें पाप–तापाचा नाश होतो, सर्व सद्‌गुण अंगीं येतात, मीच ईश्वर, सर्व कांहीं ईश्वरच आहे हा अनुभव येतो, त्या अनुभवाचा सहज परिणाम म्हणजे विश्वात्मभाव व विश्वबंधुत्व अंगीं येतात, हे त्यांचे कांहीं महत्त्वाचे सिद्धान्त आहेत. जीव व विश्व ईश्वराचींच स्वरूपें आहेत,

एक देवाशिवाय, ब्रह्माशिवाय दुसरें कांहीं नाहींच, हें अनुभवानें कळतें. गुरुदेवांचें तत्त्वज्ञान आचरणांत आणण्यासाठीं ( Practical ) आहे, साधन करून साक्षात्कार प्राप्त करून घ्यावा या ध्येयासाठीं लिहिलेलें आहे; नुसत्या बौद्धिक वावड्या उडविण्यासाठीं नाहीं. आपलें तत्त्वज्ञान अनुभवावर आधारलेलें असावें, नुसत्या बौद्धिक कल्पना काय उपयोगाच्या, असें ते म्हणत. वर प्रतिपादिलेले सर्व सिद्धान्त संतांच्या अनुभवांवर आधारलेले आहेत. सर्व देश, सर्व काल, सर्व धर्म, सर्व भाषा, यांमधील संतांचीं वचनें त्यांच्या सत्यतेचा निर्वाळा देत आहेत; तेव्हां त्यांच्या सत्यतेबद्दल संशय घेण्याचें कारण नाहीं. साक्षात्कार हें आधिभौतिक शास्त्रें ज्याला सत्याचें निकष मानतात त्या प्रत्यक्ष पुराव्याच्या निकषावर घासून सिद्ध झालेलें सत्य शास्त्र आहे. साक्षात्कारांतील आत्मानुभवाचीं शास्त्राला मान्य होणारीं आणखीहि कांहीं प्रमाणें आहेत. ते अनुभव आनंदमय, अतींद्रिय आणि वस्तुनिष्ठ (Objective) आहेत; मनाच्या कल्पना नाहींत. ते अखंड म्हणजे देश, काल, जागृति–स्वप्न–सुषुप्ति इत्यादि अवस्था यांनीं खंडित नाहींत. सर्व धर्मांचें ध्येय तेंच आहे. धर्माधर्मांतील भेद भ्रममूलक आहेत. साक्षात्कार हा विश्वधर्म आहे, धर्मभेदातीत आहे आणि त्या भूमिकेवरच्च मानवतेंत बंधुभाव व ऐक्य निर्माण होईल. 'एक ईश्वर, एक धर्म, तरच एक मानवता,' असें गुरुदेव म्हणत. साक्षात्काराच्या जीवनावर होणाऱ्या परिणामाचा विचार केला तर, त्यामुळें जीवनाला पूर्णता येते, जीवन आनंदमय, मंगलमय, कृतार्थ होतें. व्यक्ति व समाज दोघांचेंहि त्यांनीं कल्याण होतें, म्हणून हेंच मानवाचें परमश्रेष्ठ ध्येय असणें योग्य आहे, हेंच उच्चतम जीवनमूल्य होय, हें तत्त्वज्ञान मान्य करील. या सर्व गोष्टींवरून साक्षात्कार हें बुद्धीला पटणारें, तर्कमान्य शास्त्र आहे, असें गुरुदेव म्हणतात. म्हणूनच आपल्या तत्त्वज्ञानाला त्यांनीं "बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद" ( Rational Mysticism ) हें सार्थ नांव दिलें आहे. याला आनंदवाद ( Beatificism ) असेंहि म्हणतां येईल. कारण आत्मानंद हा साक्षात्काराचा गाभा आहे. हें ध्येय प्राप्त करून घेण्याचें साधन हें अर्थातच अत्यंत महत्त्वाचें ठरतें. वरील तत्त्वज्ञानाचा उपयोग मनुष्याला ईश्वरोन्मुख करण्यापुरताच आहे आणि त्यासाठींच गुरुदेवांनीं तें लिहिलें आहे. आधुनिक

सुशिक्षित लोकांच्या बुद्धीला एखादी गोष्ट पटवून देईपर्यंत, ती ते मान्य करीत नाहींत. तेव्हां, साक्षात्कारशास्त्र त्यांच्या बुद्धीला पटवून देऊन त्यांना ईश्वरप्रवण करणें, हा त्यांच्या ग्रंथलेखनाचा हेतु आहे. त्यांचा दुसरा हेतु भ्रामक कल्पनांचा निरास करणें हा होय. भाविक साधकांच्या मनांतहि अनेक भ्रामक कल्पना असतात. खरा भक्तिमार्ग कोणता हें नेमकें कळत नाहीं व ते कोठें तरी घरंगळत जातात; सार–असार, प्रधान–गौण यांतील भेद न कळल्यानें भलत्याच गोष्टींना महत्त्व देतात. हे सर्व दोष टाळण्याला तत्त्वज्ञानाचा उपयोग होतो. "तत्त्वज्ञान म्हणजे परमार्थाच्या शेतांत भ्रामक कल्पनांचीं मोकाट जनावरें शिरूं नयेत म्हणून त्या भोंवतीं घातलेलें कुंपण होय," या त्यांच्या व्याख्येंत तत्त्वज्ञान व परमार्थ यांचा परस्परसंबंध स्पष्ट होईल. त्यांचे सद्‌गुरु अत्यंत बुद्धिनिष्ठ होते; परंतु गुरुदेव प्रथम कांहींसे भोळे होते. ते एकदां म्हणाले, "ज्ञानेश्वरांनीं भिंत चालविली, रेडा बोलविला, या सर्व गोष्टींवर माझा पूर्ण विश्वास होता. महाराज या सर्व गोष्टी खोट्या असें सांगत. तें मला खटकूं लागलें. सद्‌गुरूकडून मिळालेल्या नामाच्या स्मरणानें साक्षात्कार होतो, हें मला स्वानुभवानें पटलें होतें. तत्त्वज्ञान वाचून ती श्रद्धा उत्पन्न करण्याचें कारण नव्हतें. परंतु भ्रामक समजुती दूर करण्याकरितां मीं तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. नंतर माझी खात्री झाली कीं, महाराज सांगतात तेंच सत्य आहे. परमार्थाला असलेलें तर्काचें अधिष्ठान शोधण्यासाठीं मी तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला." हेंच तर्काचें अधिष्ठान सुशिक्षित लोकांना दाखवून त्यांना ईश्वरोन्मुख करण्यासाठीं व त्यांच्या भ्रामक समजुती दूर करण्यासाठीं त्यांनीं आपले ग्रंथ लिहिले. उपनिषद्रहस्य व गीतेवरील ग्रंथ यांत साक्षात्कारशास्त्राबरोबर बरेंच तात्त्विक व ऐतिहासिक विवेचनहि आहे. परंतु 'मराठी संतांचा साक्षात्कार' या ग्रंथांत साधनमार्गावरच विशेष भर असून, 'हिंदी संतांचा ईश्वरप्राप्तीचा मार्ग' व 'कन्नड संतांचा साक्षात्कार' हे तर सर्वस्वीं साधनमार्ग व साक्षात्कार या विषयांनाच वाहिलेले आहेत. "विवेक–(ज्ञान)–मूलक, नीतिप्रधान, आत्मसाक्षात्कारपर्यवसायी, नामस्मरणात्मक भक्ति–योग" अशी या परमार्थ-साधनाची अत्यंत अर्थपूर्ण व सूत्रमय व्याख्या प्रा. न. ग. दामले यानीं केली आहे. सद्‌गुरूंनीं दिलेल्या सबीज नामाचें दीर्घकाल

म्हणजे मरेपर्यंत, अखंड म्हणजे एक श्वासहि फुकट जाऊं न देतां, सत्कार-युक्त म्हणजे भक्तिभावानें स्मरण, हें मुख्य साधन. त्यासाठीं आचरण शुद्ध असणें अवश्य आहे व सारासारविचारहि जागृत हवा. विवेक, वैराग्य, हीं त्याचीं प्रमुख उपांगें आहेत. हें साधन करीत असतां तेज, रूप, वर्ण, नाद, अमृत, रस इत्यादि आत्मानुभव येतात व शेवटीं तितका प्रयत्न व भाग्य असेल तर, स्वरूप – साक्षात्कार लाभून, ‘ अहं ब्रह्मास्मि ’ आणि ‘ सर्वं खलु इदं ब्रह्म ’ हे अनुभव येऊन साधक आनंद–स्वरूप ब्रह्माशीं एकरूप होतो. अगदीं थोडक्यांत, साधन आणि त्याचें फळ यांचें हें स्वरूप आहे. याप्रमाणें गुरुदेवांनीं परमार्थाचें तर्कनिष्ठ व्यवस्थापन केलें. प्रा. शं. गो. तुळपुळे यांनीं म्हटल्याप्रमाणें, “ त्यांना परमार्थाचे पाणिनि ही पदवी शोभून दिसते. पाणिनीच्या पूर्वीं भाषा होतीच. तिचें व्यवस्थापन करण्याचें महत्कार्य त्यानें केलें. तसेंच प्रो. रानडे यांच्या पूर्वींहि परमार्थ होताच; त्याचें तर्कशुद्ध व्यवस्थापन त्यांनीं करून दाखविलें.”

( उ ) **परे च निष्णातः । लोकोद्धाराचें कार्य**–डिसेंबर १९३३ मध्यें श्री अंबुराव महाराज ज्योतिरूप झाले. श्रीभाऊसाहेब महाराजांच्या मागें सुमारें तीस वर्षें त्यांनीं परमार्थाची ज्योत तेवत ठेविली. त्यांच्या निर्याणानें गुरुदेवांना फार दुःख झालें. परमार्थाची जबाबदारी गुरुदेवांच्यावर पडली. ती धुरा उचलण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला होताच. स्वतःचे आत्मा-नुभव, निंबरगीमहाराजांचा दृष्टान्त व गुरुबंधूंचें आश्वासन, हें सर्व सामर्थ्य त्यांच्यामागें उभें होतें. ती धुरा त्यांनीं उचलली. परमार्थप्रसाराचें केंद्र आतां निंबाळ हें गांव झालें. निंबाळ रेल्वे स्टेशन असून इंचेगेरी पासून सुमारें बारा मैलांवर आहे. ईश्वरी आदेशानें गुरुदेव १९२३ मध्येंच तेथें येऊन राहिले व तेथें त्यांनीं १९२५ मध्यें घरहि बांधलें होतें. विद्यापीठाला उन्हाळ्याची सुटी झाली म्हणजे मे ते जुलैपर्यंत दोन अडीच महिने ते तेथें राहण्यास येत असत. या अवधींत १९३४ पासून निंबाळास थोडी थोडी मंडळी येऊं लागली. अनुग्रह देण्याचें काम अगदीं सावकाश सुरू असे. १९४० पर्यंत नामधारकांची संख्या थोडी होती. पुढें प्रतिवर्षीं ती वाढूं लागली. संकटें त्यांच्या मागें होतींच. १९४१ मध्यें त्यांचा दुसरा

-मुलगाहि चार महिन्यांचा होऊन वारला; पत्नी मरतां मरतां वांचल्या. १९४६ मध्यें ते सेवानिवृत्त झाले आणि त्यांचा निंबाळास राहण्याचा काल वर्षांत दोन-अडीच महिने असे, तो सात-आठ महिन्यांपर्यंत वाढला. थंडींत अलाहाबादेस जाऊन ते एप्रिलमध्यें परत येत. त्यांचा कीर्तिसुगंध चारी दिशांना दरवळून अधिकाधिक मुमुक्षु प्रतिवर्षीं येऊन अनुग्रह मिळवून धन्यता पावूं लागले. इ. स. १९४६ पासून ते सांगलीस जात असत. तेथेंहि अनेक लोकांना अनुग्रह मिळे. ते जातील तेथें मुमुक्षु लोक त्यांच्याकडून नाम घेण्यास येत असत. निंबाळास वरचेवर जाऊन त्यांच्या संगतीचा लाभ घेण्यासाठीं अनेक साधक येऊन राहत. सारांश, निंबाळ हें एक पुण्यक्षेत्र बनलें. गुरुदेवांच्या शिष्यांत शब्दशः राजा–रंक, विद्वान्–धनगर, वृद्ध–तरुण, बालक–स्त्री-पुरुष, ब्राह्मण–हरिजन असे सर्व लोक व सर्व धर्मांतील आणि धर्मपंथांतील लोक आहेत. त्यांत कसलाच भेदभाव नाहीं. साक्षात्कार हा विश्वधर्म आहे. गुरुदेवांच्या साक्षात्काराची मंदाकिनी विस्तार पावत, आर्तांचे पापताप हरीत, तटावरील वृक्षांना पोषीत, सहस्रमुखांनीं ब्रह्मसागराला मिळण्यासाठीं चालली होती. तिच्यांत स्नानपान करून बद्धांचे मुमुक्षु झाले, मुमुक्षूंचे साधक झाले, साधकांचे श्रेष्ठ प्रतीचे सिद्ध मात्र कोणी झाले नाहींत, हेंच आज सर्वांना सलणारें शल्य आहे. परंतु, साक्षात्काराची गंगा अशीच फल्गू नदीप्रमाणें गुप्त होत असते, असें त्यांनीं आपल्या निर्याणापूर्वीं दहा दिवसच सांगितलें होतें! “सोऽयं कालेन महता योगो नष्टः परंतप।” या श्लोकावर बोलणें चालू असतां गुरुदेव म्हणाले, “ईश्वराच्या इच्छेनें परमार्थज्ञानाची गंगा कालाच्या वाळूंत गुप्त होते, कृष्णासारखा पुरुष जन्माला येऊन ती पुनः प्रगट करतो.” या वेळीं त्यांची प्रकृति अत्यंत क्षीण झाली होती. तरी, ही आपल्या निर्याणाची सूचना ते देत आहेत हें कोणाला कळलें नाहीं. याचेंच नांव माया. आतां ही गुप्त झालेली गंगा ईश्वरकृपेनें केव्हां प्रकट होईल ती होवो.

( ऊ ) **अमृतमहोत्सव**–जमखंडीच्या लोकांनीं गुरुदेवांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त ता. ३-७-१९५६ ला त्यांना तेथें बोलावून त्यांच्या अमृत-महोत्सवाचा अत्यंत हृदयस्पर्शी, भव्योदात्त,उत्साहपूर्ण सोहळा केला. जमखंडी

हें गुरुदेवांचें जन्मस्थान, येथेंच त्यांच्यावर गुरुकृपा झाली व या गांवाला महाराज भक्तीचे माहेरघर असें म्हणत असत. मग या वेळीं गुरुदेवांचा आनंद व उत्साह काय वर्णावा ! या दोन्ही भावना त्यांच्या देहामनांतून ओसंडत होत्या. लोकांच्या भक्तिप्रेममय आनंदोत्साहालाहि पूर आला होता. नागपूर ते बंगलोर या सर्व ठिकाणांहून लहान-थोर भक्तगण जमले होते. गुरुदेव तर तेथें एक महिनाभर राहिले. प्रत्येकजण समारंभ यशस्वी करण्यासाठीं अहमहमिकेनें झटत होता. असा हा आनंदाचा सोहळा पाहून सर्वांचीं अंतःकरणें भरून आलीं, डोळे निवले आणि सवडीप्रमाणें गुरुदेवांच्या संगतींत दिवस घालवून मंडळी आपापल्या गांवीं परतली. गुरुदेव निंबाळास परत आले.

(ए) **निर्याण**—हा अमृतोत्सव म्हणजे दिवा जाण्यापूर्वीं मोठा होतो तसाच ठरला. लोकांनीं केलेल्या त्यांच्या यशाच्या गौरवाचा तो उच्चबिंदु होता. त्यांचा अंतरींचा साक्षात्काराचा दीप सदा वर्धिष्णु--प्रभविष्णु असा होता. १९५७ मध्यें गुरुदेव उशीरांच, म्हणजे १२ मार्चला अलाहाबादेस गेले व दहा दिवसांत त्यांना तेथें भयंकर खोकला येऊं लागला. कशानेंहि उतार पडेना. ते औषध क्वचित्च घेत. शेवटीं निंबाळास येण्याचा निश्चय करून अशाच अवस्थेंत ते निंबाळास एप्रिलअखेर आले. त्यांना भेटण्यास सर्व भक्तमंडळी येऊं लागली. प्रकृति पाहून मन चरके, पण त्यांनीं अनेक मारक आजारांना तोंड दिलें होतें. १९५० सालीं क्षय झाला असून त्यांतूनहि ते बरे झाले. तेव्हां आतांहि ते या रोगावर मात करतील अशी खोटी आशा सर्वांना वाटत होती. आपल्या निर्याणाच्या सूचना त्यांच्या तोंडून बाहेर येत, पण त्या कोणास समजल्या नाहींत. शेवटीं, रविवार ता. २-६-१९५७ पासून त्यांनीं अन्नपाणी वर्ज्य केलें. त्यांच्या महाराजांनीं अकरा दिवस अन्नपाणी वर्ज्य केलें होतें व आंत नाममाला चालली होती. गुरुदेवांनी पांच दिवस अन्नपाणीं वर्ज्य करून आंत नाममाला चालविली व गुरुवार, ता. ६-६-१९५७ या दिवशीं रात्रीं साडेदहा वाजतां पार्थिव देह टाकला व त्यांची ज्योतींत ज्योत मिळून गेली. त्यांच्या साधकांना व भक्तांना किती दुःख झालें असेल त्याची कल्पनाच केलेली

बरी. तुकारामांच्या निर्याणानंतर झालेल्या आपल्या अस्वस्थतेचें कान्होबांनीं एका अभंगांत वर्णन केलें आहे. त्याचा अनुभव या वेळीं आला.

" दुःखें दुभागलें हृदयसंपुष्ट । गहिवरें कंठ दाटताहे ॥
ऐसें काय केलें सुमित्रा सखया ।दिलें टाकोनियां वनामाजीं ॥
आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी फुटों पाहे ॥
काय तें सामर्थ्य नव्हतें तुजपाशीं । संगें न्यावयासी अंगभूतां ॥
तुज ठावें आम्हां कोणी नाहीं सखा । उभयलोकीं तुका तुजवीण ॥
कान्हा म्हणे तुझ्या वियोगें पोरकीं । झालों ये रे भेटी बंधुराया ॥

त्यांच्या दृश्यरूपाच्या वियोगानें कांहीं काल असें दुःख झालें तरी, गुरुदेवांनीं आम्हांला नुसती सगुण भक्ति शिकविली नव्हती. साधन म्हणून ती अत्यंत उपयुक्त असली तरी 'गुप्तरूप' म्हणजे गुरु, हीच त्यांची शिकवण होती. सर्वांना गुप्त, परंतु साधकांना प्रकट असें ईश्वराचें रूप तेंच गुरु व त्याच्याशीं एकरूप झालेले साक्षात्कारी संत ते सद्गुरु. असे सद्गुरु लाख कोस दूर असले तरी शब्दावर (किंवा रूपावर) स्वार होऊन क्षणाक्षणाला त्यांना भेटतां येतें, असें त्यांनीं आम्हांला शिकविलें आहे. कबीर म्हणतो,

" लाख कोस जो गुरु बसै। दीजै सुरत पठाय ॥
सबद तुरय अवसार है । पलपल आवे जाय ॥ "

तेव्हां गुप्तरूपांत पूर्णपणें मिळालेल्या गुरुदेवांना स्वरूपानुसंधान व नादानुसंधान या मार्गांनीं सदा भेटूंच यांत शंका नाहीं.

—('पुरुषार्थ' मासिक, १९५७)

# १०. गुरुदेव रानडे : बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद

## प्रास्ताविक

'उपनिषद्रहस्य' या आपल्या पहिल्याच ग्रंथांत गुरुदेव रानडे यांनीं आपल्या ग्रंथलेखनाचा हेतु सांगितला आहे. साक्षात्कारवाद कोणत्या बौद्धिक किंवा तर्कशुद्ध पायावर आधारलेला आहे हें दाखविण्यासाठीं ते ग्रंथ लिहिण्यास प्रवृत्त झाले. आधुनिक तत्त्वज्ञानाच्या पद्धतीनें व त्याच्या परिभाषेंत साक्षात्कारशास्त्राची मांडणी करून तें शास्त्र बुद्धिनिष्ठ, तर्कमान्य आहे, तर्काला विरोधी असें त्यांत कांहीं नाहीं हें त्यांनीं दाखविलें आहे. "आज बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद हे परस्परविरोधी शब्द वाटतात; परंतु हा सर्वमान्य-सिद्धान्त झाला पाहिजे"* असें ते म्हणतात. हा सिद्धान्त सर्वमान्य होण्यासाठीं आधिभौतिक शास्त्रें, तत्त्वज्ञान आणि धर्म या सर्वांना हा सिद्धान्त मान्य होईल अशा तऱ्हेनें साक्षात्कारशास्त्राची मांडणी त्यांनीं आपल्या सर्व ग्रंथांत केली आहे. आधिभौतिक शास्त्रें, तत्त्वज्ञान व सर्व धर्म यांना मान्य होईल तें बुद्धिनिष्ठ (Rational) अशी त्यांची व्याख्या आहे.

गुरुदेव रानडे यांनीं आपल्या तत्त्वज्ञानाला "बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद" हें नांव दिलेलें नसलें तरी वरील कारणामुळें त्यांच्या तत्त्वज्ञानाला तें नांव देण्यांत आलेलें आहे. तसें पाहतां, त्यांनी आपलें स्वतंत्र तत्त्वज्ञान म्हणून लिहिलेलेंच नाहीं. उपनिषदें, हिंदी संत, मराठी संत, कानडी संत, गीता यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार करतांना त्यांनी आपले सिद्धान्त मांडले आहेत व त्यांत त्यांचें संपूर्ण तत्त्वज्ञान पाहावयास सापडतें. 'उपनिषद्रहस्यां'त

---

* Rational Mysticism, which has been hitherto regarded as a contradiction in terms, must now be a truism.

( उपनि. प्रस्ता., पृ. १५ )

ते म्हणतात, " स्वतंत्रपणें माझे सिद्धान्त या ग्रंथांत कोठेंच मांडलेले नाहींत; परंतु हें पुस्तक जो काळजीपूर्वक वाचील त्याला माझे सिद्धान्त सहज समजून येतील." अर्थात् उपनिषदादि त्यांच्या सर्व ग्रंथांतून त्यांचें तत्त्वज्ञान वेगळें काढून तें वाचकापुढें ठेवणें हें एक महत्त्वाचें व अत्यंत आवश्यक असें कार्य आहे. तत्त्वज्ञान व विशेषत: परमार्थ या विषयाची आवड असलेल्या वाचकांना असा ग्रंथ फार मोलाचा वाटेल. त्या दृष्टीने हळूहळू प्रयत्न होतीलच. या लहानशा लेखांत गुरुदेवांच्या बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवादाची संक्षिप्त रूपरेषा द्यावयाची आहे.

## बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवादाची व्याख्या

बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवाद या दोन पदांच्या विवरणापासून या विषयाला सुरवात करूं. ईश्वर आहे, तत्त्वज्ञान व धर्मशास्त्रें यांत जी ईश्वर ही कल्पना मांडलेली आहे तें एक परम सत्य तत्त्व आहे, ईश्वराचा साक्षात्कार होऊं शकतो, अर्थात् त्याच्या अस्तित्वाची अनुभूति येऊं शकते, अनेकांना अशी अनुभूति आलेली आहे व ही अनुभूति मिळविण्याचा एक निश्चित शास्त्रीय मार्ग आहे, हें प्रतिपादणारा वाद म्हणजे साक्षात्कारवाद. या अनुभूतीच्या स्वरूपाचें विवेचन पुढें यथाकाल येईल. तो बुद्धिनिष्ठ * आहे, म्हणजे आधुनिक शास्त्रें, तत्त्वज्ञान व धर्मशास्त्र यांना तो मान्य होण्यासारखा आहे, हें वर सांगितलेंच आहे; त्याचेंच थोडें अधिक स्पष्टीकरण करणें अवश्य आहे. तें करण्यापूर्वी एक गोष्ट सांगावयाची आहे. बुद्धिनिष्ठ म्हणजे काय याची प्रत्येक तत्त्वज्ञानी आपली स्वत:ची व्याख्या करतो.

---

* A view of reality which would satisfy the scientific, the philosophic, as well as the religious aspirations of man, . ....because it may be seen to be supported by a direct, first-hand, intuitive, mystical experience, which no science can impeach, which all philosophy may point to as the ultimate goal of its endeavour, and which may be seen at once to be the immanent truth in the various forms of religion. ( उपनि. प्रस्ता., पृ. २ )

चार्वाकांच्या मतें इंद्रियांना समजतें तें बुद्धिनिष्ठ सत्य, इतर सर्व असत्य. या व्याख्येमुळें ते आकाश मानीत नाहींत, इतर चार महाभूतेंच केवळ मानतात. सारांश, बुद्धिनिष्ठतेची सर्वांची कल्पना एकाच स्वरूपाची नाहीं. पुष्कळ वेळां स्वतःला बुद्धिनिष्ठ ( Rational ) म्हणविणाऱ्या व्यक्तीलाहि बुद्धिनिष्ठतेचें स्पष्ट स्वरूप अज्ञातच असतें. गुरुदेवांनीं निरनिराळ्या धर्मांतील ऐक्याबद्दल स्वतंत्रपणें विशेष लिहिलेलें नाहीं. मराठी व हिंदी संतांवरील आपल्या ग्रंथांच्या प्रस्तावनेंत या संतांची शिकवण व खिश्चन धर्मांची शिकवण साक्षात्काराच्या दृष्टीनें किती सारखी आहे हें त्यांनीं दाखविलें आहे. नाम, भक्ति, साक्षात्काराचें स्वरूप, त्याचे परिणाम इत्यादि गोष्टींत दोघांच्या मतांत विलक्षण साम्य आहे असें त्यांनीं सांगितलें आहे. सूफी साधु व भारतीय संत यांच्या शिकवणींतील साम्यहि क्वचित् स्पष्ट केलें आहे. यापेक्षा अधिक विस्तृत असें लिखाण त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत नाहीं. म्हणून, आधुनिक शास्त्रें व तत्त्वज्ञान यांना साक्षात्कार मान्य आहे, याविषयीं त्यांनीं काय म्हटलें आहे एवढेंच पाहूं.

## आधुनिक शास्त्रांची मान्यता

### ( १ ) सत्यतेचीं प्रमाणें :

( अ ) **संतांचे अनुभवः**—आधुनिक शास्त्रांचा असा सिद्धान्त आहे, कीं बळकट पुराव्यावांचून कांहींहि सत्य म्हणून मान्य करावयाचें नाहीं. कोणीं कोणतीहि उपपत्ति मांडली तरी ती पुराव्यानें सिद्ध झाली पाहिजे. प्रयोग करून तिची सत्यासत्यता पारखली जाते. मग ती कसाला उतरली तर सत्य म्हणून तिचा स्वीकार केला जातो; त्यापूर्वीं तिला केवळ गृहीत कृत्य ( Hypothesis ) मानतात. तें सत्य असेल किंवा नसेल. साक्षात्कार-वाद या सुदृढ पुराव्याच्या कसाला उतरला पाहिजे, तरच आधुनिक शास्त्रें त्याला मान्यता देतील. उपनिषत्कालीन ऋषि व संत यांच्या वचनांत असा अविवाद्य पुरावा सांपडतो असें गुरुदेवांचें म्हणणें आहे. आत्मानुभूती-संबंधीं सर्व धर्मांतील, सर्व कालांतील व सर्व भाषांमधील साक्षात्कारी पुरुषांनीं जीं वचनें लिहिलीं आहेत त्यांत विलक्षण एकरूपता ( Universality ) दिसून येते, हें त्या अनुभूतीच्या सत्यतेचें एक महत्त्वाचें प्रमाण आहे.

हे अनुभव म्हणजे मनाच्या कल्पना, काव्य, किंवा भ्रम नव्हेत; ते अनेकांचे अनेक असणार. त्यांत एकरूपता असणें शक्य नाहीं. सर्वांनीं एकाच सत्य वस्तूचा किंवा सत्य तत्त्वाचा अनुभव घेतला व त्याचें वर्णन केलें, म्हणून त्यांत एकरूपता दिसते. काशी-विश्वेश्वराच्या मंदिराचें, तें पाहून आलेल्या अनेकांनीं वर्णन लिहिलें तरी त्यांत एकरूपता दिसेल; अनेकांनीं केवळ कल्पनेनें वर्णन केलें तर अशी एकरूपता दिसणें शक्य नाहीं. आणखी एक महत्त्वाची गोष्ट ही कीं, ही एकरूपता अनुभवांच्या वर्णनांतच आहे असें नाहीं. त्या अनुभवांचे जीवनावर होणारे परिणाम व ते अनुभव प्राप्त करून घेण्याचा मार्ग, यांतहि अशीच विलक्षण एकरूपता आहे. कोणत्याहि आधुनिक शास्त्रज्ञाला हा पुरावा अमान्य करतां येणार नाहीं. शिवाय या मार्गानें जाऊन कोणत्याहि व्यक्तीला आजहि हे अनुभव प्राप्त करून घेतां येतील. आपल्या अहमदाबाद येथील व्याख्यानांत गुरुदेव म्हणतात, " साक्षात्कारवादी पुरुष कशावरहि विश्वास ठेवीत नाहीं. संतांचीं वचनें तो गृहीत कृत्य म्हणून स्वीकारतो. त्यांनीं प्रतिपादिलेल्या मार्गाचें आक्रमण तो प्रयोग म्हणून करतो व त्याची सत्यासत्यता ठरवितो. " असें हें प्रयोगाने सिद्ध होणारें तर्कशुद्ध शास्त्र आहे.

(आ) **परतत्त्वाचीं अनुभवाला येणारीं लक्षणें** : साक्षात्कारवादाला हा बाह्य पुरावा झाला. परतत्त्वाचे किंवा ईश्वराचे जे अनुभव येतात त्या अनुभवांचीं कांहीं लक्षणें गुरुदेवांनीं सांगितलीं आहेत व हीं लक्षणें त्याच्या सत्यतेचीं प्रमाणें आहेत, असें प्रतिपादिलें आहे. अखंडत्व, आनंद-रूपत्व व प्रातिभत्व हीं त्याचीं लक्षणें होत. प्रातिभत्वाचींच पर्याय नांवें अतींद्रियत्व व अंतःस्फूर्तत्व हीं आहेत. अखंडत्व म्हणजे सातत्य. त्या अनुभवाला कालानें खंड पडत नाहीं; आतां आहे, नंतर नाहीं; आज आहे, उद्या नाहीं; सकाळीं आहे, सायंकाळीं नाहीं; असा तो नाहीं. तो सतत टिकणारा आहे. त्याचप्रमाणें येथें आहे, तेथें नाहीं; या गांवीं आहे, त्या गांवीं नाहीं, असा स्थलभेदानें त्यांत खंड पडत नाहीं. इतकेंच काय, पण जागृतींत आहे, स्वप्नांत नाहीं असा जागृति-स्वप्न, सुषुप्ति-तुर्या या अवस्था-भेदांनींहि त्यांत खंड पडत नाहीं. " जागत राम सोवत राम, सपनमें देखे रामहि राम " असा तो अनुभव सर्व अवस्थांत भरलेला असतो.

" देशकाल वस्तुभेद हारपला । आत्मा निर्वाळला विश्वाकार " असा तुकारामांचा अनुभव आहे. आनंद हें आत्मानुभवाचें दुसरें लक्षण आहे. आत्मदर्शनानें झालेल्या आनंदाचें वर्णन सर्व संतांनीं केलें आहे. " आनंद नहाया ", " आनंद उर न समाय", " आनंदाचे पोटीं आनंदतरंग ", " तया वोळखीसरसें । सुखाच्या साम्राज्यीं बैसे," अशीं हजारों वचनें उद्धृत करतां येतील. साक्षात्काराच्या परिणामांचा विचार करतांना आनंदाचें विवेचन होणार आहे, म्हणून आतांच त्याचा विस्तार करण्याचें कारण नाहीं. शेवटीं प्रातिभ, अतींद्रिय, अंतःस्फूर्त म्हणजे काय ? बुद्धि, भावना व क्रियाशक्ति ( Intellect, Feeling and Will) या मनुष्याच्या शक्ति सर्वांना ठाऊक आहेत. यांपैकीं कोणत्याहि शक्तीला आत्मानुभव येऊं शकत नाहीं. तो अनुभव घेण्याला त्या असमर्थ आहेत. प्रतिभा (Intuition ) या नांवाची आणखी एक शक्ति मनुष्यामध्यें आहे. ती आत्मानुभव देण्यास समर्थ आहे. ती मनुष्यमात्रांत असते, पण तिचा विकास अत्यंत थोड्या व्यक्तींत झालेला असतो. परमार्थसाधन हें प्रतिभाशक्तीच्या विकासासाठीं आहे. प्रतिभाशक्तीला येणारे हे आत्मानुभव अतींद्रिय आहेत. " आंधळ्यानें देखिलें, बहिऱ्यानें ऐकिलें " यांसारख्या संत-वचनांवरून, ते अतींद्रिय आहेत तरी इंद्रियज्ञानासारखे असतात, हें दिसून येतें. येथें अंतःस्फूर्तत्वाचा संबंध येतो. दृश्य विश्वाचे अनुभव बहिःस्फूर्त असतात. उदाहरणार्थ, सूर्याचे किरण किंवा नादाच्या लाटा बाहेरून नेत्राच्या वा श्रवणाच्या मार्गें मेंदूंतील पाहण्याच्या किंवा ऐकण्याच्या केंद्राला पोहोचतात व तेथें दर्शनाचा किंवा श्रवणाचा अनुभव येतो. म्हणून हे अनुभव बहिःस्फूर्त होत. आत्मानुभवासाठीं बाहेरून कांहीं येत नाहीं. परमार्थसाधनानें अंतःकरणांत प्रकट झालेली प्रतिभाच मेंदूंतील ज्ञानकेंद्रांना ( दर्शन, श्रवण, गंध इत्यादि ) पोहोचते व तेथें हे अनुभव येतात म्हणून हे अंतःस्फूर्त होत. ज्ञानकेंद्रांत ते अनुभव येत असल्यानें ते अतींद्रिय असले तरी इंद्रियज्ञानासारखे वाटतात. यावरून प्रातिभत्व, अतींद्रियत्व व अंतःस्फूर्तत्व हें आत्मानुभवाचें स्वरूप स्पष्ट होईल.

(इ) **आत्मानुभवानें बुद्धि-भावना-क्रियाशक्ति यांची वाढः**—आत्मानुभव म्हणजे भ्रम किंवा कल्पना नव्हत, ते सत्यवस्तूचे अनुभव आहेत, याला गुरुदेवांनीं आणखी एक प्रमाण दिलें आहे. थोर साक्षात्कारी पुरुषांच्या बुद्धि. भावना व क्रियाशक्ति या शक्ति मोठ्या प्रमाणांत वाढलेल्या दिसतात. सर्वांच्या सर्व तीनहि शक्ति वाढतात असें नाहीं. तरी एका शक्तीचा पुष्कळ विकास होतो व इतर दोन कांहीं प्रमाणांत वाढतात असें दिसून येतें. ज्ञानेश्वरांची बुद्धि व भावनाशक्ति, तुकारामांची भावना, समर्थांची बुद्धि व क्रियाशक्ति या अति उच्च पदाला पोहोंचल्या होत्या. असे सुपरिणाम भ्रमानें किंवा कल्पनांमुळें होणार नाहींत. भव्योदात्त अशा सत्यवस्तुच्या अनुभूतींतूनच हे निर्माण होऊं शकतील. वरील सर्व प्रमाणांवरून साक्षात्कारवाद बळकट पुराव्यावर आधारलेला आहे हें आधुनिक शास्त्रज्ञांना मान्य करावें लागेल. या पुराव्यासंबंधीं शंका घेण्याला जागा नाहीं.

## तत्त्वज्ञानाची मान्यता

तत्त्वज्ञानाची मान्यता साक्षात्कारवादाला कशी मिळेल? "मी ज्याचा शोध करीत आहें तें साक्षात्कारांत अंतर्भूत आहे, साक्षात्कारानें त्याची प्राप्ति होतें" असें तत्त्वज्ञानानें मान्य केलें म्हणजे साक्षात्कारवाद त्याला संमत आहे असें म्हटलें पाहिजे. तत्त्वज्ञान सत्यतत्त्वाचा बुद्धीनें शोध करीत आहे व सत्यतत्त्वासंबंधीं अनेक तत्त्वज्ञांनीं अनेक उपपत्ति मांडल्या आहेत. या उपपत्तींचें मूल्य कसें ठरवावयाचें? गुरुदेव म्हणतात, "ज्या उपपत्तीनें जीवनाला दिव्यत्व प्राप्त होईल, जीवन जगण्यालायक होईल, ती तात्त्विक उपपत्ति सत्य व जीवंत होय." * बुद्धीनें परतत्त्वाचीं लक्षणें निश्चित करण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञान करतें. परतत्त्व हातीं देणें, त्याची प्राप्ति करून देणें, हें त्याचें कार्य नव्हे. कांहीं जीवनमूल्यें निश्चित करून, त्यांची प्राप्ति ज्यामुळें होईल तें परतत्त्व असें तत्त्वज्ञान सांगतें. हीं जीवनमूल्यें साक्षात्कारानें प्राप्त

* The veracity and virility of any metaphysical theory is to be gauged by its power of making life more divine, and therefore more worthwhile living

( उपनि. प्रस्ता., पृ. १४-१५ )

होतात, हें सिद्ध झालें तर साक्षात्कारवाद तत्त्वज्ञानाला मान्य होईल. जीवनमूल्यांची प्राप्ति म्हणजे जीवनसाफल्य; जीवनसाफल्याचा शोध तत्त्वज्ञान करीत असतें. तें साक्षात्कारानें होतें असें सिद्ध झालें म्हणजे तत्त्वज्ञान जीवनसाफल्यासाठीं साक्षात्काराचाच पुरस्कार करील, त्याला मान्यता देईल. या दृष्टीनें आतां जीवनमूल्यांचा विचार करून तीं साक्षात्कारानें प्राप्त होतात कां हें पाहावयाचें आहे.

## ( अ ) जीवनमूल्यें

मनुष्यमात्राला बुद्धि, क्रियाशक्ति व भावना या शक्ति आहेत, हें मागें सांगितलेंच आहे. बुद्धीला सत्यशोधनाची, अर्थात् ज्ञानप्राप्तीची ओढ आहे, क्रियाशक्तीला सत्कार्याची व भावनेला सौंदर्याची, कलेची, कलेच्या आनंदाची ओढ आहे. या तीन शक्ति व प्रत्येक शक्तीला असलेली विशिष्ट ओढ किंवा प्रवृत्ति ( urge ) यांच्या अनुरोधानें पाश्चात्य तत्त्वज्ञांनीं सत्य, शिव आणि सुंदर ( Truth, Goodness and Beauty ), अर्थात् ज्ञान, नीति व कला अशीं तीन जीवनमूल्यें ठरविलीं आहेत व तीं सहजमान्य होण्यासारखीं आहेत. सुसंस्कृत मनुष्याला या मूल्यांची जाणीव व ओढ थोड्याफार प्रमाणांत असतेच. हीं तीनहि मूल्यें तत्त्वज्ञानांत स्वतंत्र मानिलीं जातात. त्यांच्यामध्यें एकसूत्रतेचें कांहीं तत्त्व असावें, असें तत्त्वज्ञांना वाटतें; परंतु तें अद्याप सांपडलेलें नाहीं. हीं जीवनमूल्यें आत्मसात् करणें यांत जीवनाची कृतार्थता आहे, असें तत्त्वज्ञान सांगतें. जीवन दिव्य, सफल, आनंदमय कशानें होईल याचें तत्त्वज्ञानाच्या मतें उत्तर हें कीं, सत्य, शिव, सुंदर हीं मूल्यें ज्या प्रमाणांत जीवनांत उतरलेलीं दिसतील, त्या प्रमाणांत जीवन सफल झालें, असें म्हणतां येईल. मागील विवेचनावरून असें दिसून येईल, कीं साक्षात्कारानें हीं तिन्हीं मूल्यें जीवनांत उतरतात हें सिद्ध झालें तर तत्त्वज्ञान साक्षात्कारवादाला मान्यता देईल. जीवनमूल्यें अनेक आहेत; " असतो मा सद्गमय, तमसो मा ज्योतिर्गमय, मृत्योर्मा अमृतं गमय " या प्रार्थनेंतील सत्, ज्योति ( ज्ञान ) व अमृतत्व हींहि जीवनमूल्यें आहेत; त्यांचा अंतर्भाव सत्य, शिव, सुंदर यांत करतां येईल. अमृतत्व कांहींसें निराळें आहे; त्याची प्राप्ति हें तर साक्षात्काराचें मुख्य फळ आहे. सत्य, शिव, सुंदर हीं मूल्यें आजच्या परमार्थविरहित प्रयत्नानें

पूर्णपणें साध्य होऊं शकत नाहींत, ही गोष्ट सर्वांना मान्य आहे. ज्ञान व नीति यांची अवस्था अत्यंत अपूर्ण अशीच आहे. याचा थोडा विचार करूं.

### ( आ ) जीवनमूल्यांची पूर्णत्वानें प्राप्ति शक्य आहे काय ?

भौतिकशास्त्राचें ज्ञान आणि तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, इत्यादिकांचा अंतर्भाव " सत्य " या मूल्यांत होतो. हीं सर्व अपूर्णावस्थेंत आहेत; इतकेंच नव्हे तर, सध्याच्या पद्धतीनें " येन एकेन ज्ञातेन सर्वं ज्ञातं भवति, तद्वद " ( जें एक जाणल्यानें सर्व जाणलें जाईल तें ज्ञान सांग ) ही उपनिषदांतील पृच्छा केव्हांहि पूर्ण होणार नाहीं, हें शास्त्रज्ञांनाहि मान्य आहे. पंचेंद्रियांना होणाऱ्या ज्ञानाची वाढ होईल, पण पंचेंद्रियांना ज्याचें ज्ञान होतें तें ( The Thing in itself ) काय आहे हें सध्याच्या संशोधनाच्या पद्धतीनें समजणार नाहीं. ज्ञानाची यापेक्षां उच्चतर व्याख्या करून " तज्ज्ञानं प्रशमकरं यदिंद्रियाणाम् " ( इंद्रियामध्यें प्रशम उत्पन्न करतें त्याला ज्ञान म्हणावें ) असें ठरविलें तर, आजच्या ज्ञानाला ज्ञानच म्हणतां येणार नाहीं. सर्व जीवनाचा समन्वय करून बुद्धि, क्रियाशक्ति व भावना यांत संवाद उत्पन्न करण्याचें सामर्थ्य या ज्ञानांत नाहीं. या तीन शक्तींत संवाद नाहीं, विसंवाद आहे; म्हणून सत्य, शिव, सुंदर किंवा ज्ञान, नीति व कला यांतहि विसंवाद आहे. कला व नीति यांची बरेच वेळां विरोधी भक्ति असते. ज्ञान व नीति यांचाहि सुखाचा संसार चालेलच असें नाहीं. ज्ञान व कला यांतहि विशेष मेळ दिसत नाहीं. म्हणून सत्य-शिव-सुंदर या मूल्यांची जी अस्पष्ट कल्पना आपल्याला आहे, त्या कल्पनेप्रमाणें विचार केल्यास हीं जीवनमूल्यें मानवी जीवन कृतार्थ, सफल, संपूर्ण करूं शकणार नाहींत.

### ( इ ) जीवनमूल्यांचा साक्षात्काराच्या दृष्टीनें विचार

( १ ) **कला व आनंद**—साक्षात्काराच्या दृष्टीनें सत्य-शिव-सुंदर यांचा विचार करतांना " सुंदर " किंवा " कला " याऐवजीं त्यांत अंतर्भूत असलेली " आनंद " ही कल्पना ध्यानीं घेऊं. पाश्चात्य तत्त्वज्ञानांत कलेला फार महत्त्वाचें स्थान आहे; याचें कारण, कलेपासून स्वार्थनिरपेक्ष

आनंद प्राप्त होतो. कलाविषयांशीं मन एकरूप होऊन “ मी—माझें ” यांचा विसर पडतो, दिक्कालांच्या मर्यादा नष्ट होतात व मनुष्य तात्पुरता अनंतांत विलीन होतो, त्याला परमानंद होतो, हें कलेचें वैशिष्ट्य सांगितलें आहे. अत्यंत निराशावादी तत्त्वज्ञानी शॉपेनहर यानेंहि दुःखमय जीवनांतून बाहेर पडण्यासाठीं कलेची उपासना सांगितली आहे, ती यासाठीं कीं दुःखाचें मूळ कारण जें “ मी-माझें ”, त्याचा कलानंदांत विसर पडून मनुष्य तात्पुरता आनंद भोगूं शकतो. या दृष्टीनें आनंद हें कलेचें मुख्य लक्षण; आणि परमार्थांत किंवा साक्षात्कारशास्त्रांत आनद ही कल्पना नेहमी येते. आनंदांत कलेचा विचार अंतर्भूत असला तरी तो पृथक्पणें केला जात नाहीं; म्हणून कलेऐवजीं आनंदाचें विवेचन करावयाचें आहे. “ सुख सुखाचें मंडण ” असें स्वरूप, अत्यंत मधुर असा अनाहत नाद, यांत कलेची कल्पना आहेच, पण त्यावर भर दिलेला नाहीं; भर त्यापासून होणाऱ्या आनंदावर आहे.

( २ ) **साक्षात्काराचें स्वरूप**—साक्षात्काराचें स्वरूप काय याची कल्पना कांहीं वाचकांना नसेल. म्हणून त्याचें थोडें विवेचन करणें इष्ट होईल. वर ज्यांना अतींद्रिय परंतु इंद्रियज्ञानासारखे म्हटलें आहे असे इंद्रियांना येणारे ईश्वराचे अनुभव म्हणजे साक्षात्कार. असे अनुभव उपनिषत्कालीन ऋषींपासून आधुनिक संतांपर्यंत सर्वांना आलेले आहेत. आपल्या सर्व ग्रंथांत गुरुदेव रानडे यांनीं या अनुभवांचें वर्णन करणाऱ्या वचनांचा संग्रह केला आहे. तीं वचनें वाचकांनीं अवश्य पाहावीं. अनुभव अनेक, अनंत आहेत; त्यांत पायऱ्या आहेत, विकास आहे. हा विकास साधकाच्या आध्यात्मिक विकासाचा द्योतक असतो. कांहीं प्राथमिक अनुभवांचें उपनिषदांत पुढील वर्णन आहे.

“ नीहारधूमार्कानिलानलानां खद्योतविद्युत्स्फटिकशशीनाम् ।
एतानि रूपाणि पुरःसराणि, ब्रह्मण्यभिव्यक्तिकराणि योगे ॥ ”

( ब्रह्माचा उच्च अनुभव येण्यापूर्वी धुकें,धूर, सूर्य, वारा, अग्नि, काजवा, वीज, स्फटिक व चंद्र यांचीं रूपें दिसतात. ) आत्म्यावर एकाग्रता केली असतांना येणाऱ्या अनुभवांचें वर्णन एका पातंजल योगसूत्रांत आहे.

" ततः प्रातिभश्रावणवेदनादर्शास्वादवार्ता जायंते ।" त्यानंतर प्रतिभाशक्तीला येणारे नाद, स्पर्श, रूप, प्रकाश, रुचि व गंध यांचे अनुभव येतात. कबीरांच्या खालील पदांत नाद, रूप, तेज, अमृतरस यांचे अनुभव दृष्टीस पडतात:—

" रस गगनगुफामें अजर झरै ॥ टेर ॥
बिनबाजा झनकार उठै जहँ,
समुझि परै जब ध्यान धरै ॥१॥
बिना ताल जहँ कमल फुलाने,
तेहि चढि हंसा केलि करै ॥२॥
बिन चंदा उजियारी दरसै,
जहँ तहँ हंसा नजर परै ॥३॥
दसवें द्वारे ताली लागी,
अलख पुरुख ज्याको ध्यान धरै ॥४॥
काल कराल निकट नहि आवै,
काम, क्रोध, मद, लोभ जरै ॥५॥
जुगन जुगनकी तृषा बुझाती ।
करम, भरम, अघ, व्याधि टरै ॥६॥
कहै कबीर सुनो भई साधो ।
अमर होय कबहूँ न मरै ॥७॥

भावार्थ : जेथें वाद्याशिवाय झणत्कार उठत आहे, अशा गगनगुंफेंत (मस्तकांतील सहस्रदलकमलांत) अमृतरस झिरपत आहे. ध्यान करावें तेव्हांच हें सर्व समजतें. तळ्याशिवाय जेथें कमल फुलतें, तेथें त्या कमलावर चढून हंस क्रीडा करतो. तेथें चंद्रावांचून चांदणें असतें व जिकडे तिकडे हंस दृष्टीस पडतात. दहाव्या द्वाराला (सहस्रदलकमल) जेव्हां किल्ली लागते व तें उघडतें, तेव्हां तेथें एक अलक्ष पुरुष दिसतो. साधकानें त्याचें ध्यान करावें. मग कराल काल जवळ येत नाहीं; काम, क्रोध, लोभ व मद जळून जातात; जीवाला युगानुयुगें लागलेली तृष्णा शांत होते व कर्म, भ्रम, पाप व ताप दूर होतात. कबीर सांगतात, हे साधो, ऐक; असा साक्षात्कारी पुरुष अमर होतो; कधींहि मृत्यूच्या पाशांत पडत नाहीं.

या वर्णनाचा फार विस्तार करावयाचा नाहीं. परंतु " स्वरूपदर्शन " या महत्त्वाच्या अनुभवाचें थोडें विवेचन करणें अवश्य आहे. कारण साक्षात्कारशास्त्रांत त्याला फार महत्त्वाचें स्थान आहे. या दर्शनानंतर जीव-शिव यांतील भेद नष्ट होऊन, देवभक्तांचें ऐक्य होतें, असें संतांनीं सांगितलें आहे. यासंबंधीं उपनिषदांत खालील वचन आहे.

" य एषोंतरादित्ये हिरण्मयः पुरुषो दृश्यते हिरण्यकेशः हिरण्यश्मश्रूः आप्रणखात् सर्व एव सुवर्णः । "... " यो ऽ सौ असौ पुरुषः सो ऽ हमस्मि । " (सूर्यावर वगैरे सुवर्णासारखा तेजस्वी पुरुष दिसतो, तो मी आहें.) ज्ञानदेव चांगदेवपासष्टींत सांगतात, " ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोन्ही डोळस आरसे । परस्परें पाहतां कैसे । मुकले भेदा ॥ " आरशांत पाहिल्यासारखें परस्परांचें रूप पाहून, ज्ञानदेव व चांगदेव, गुरुशिष्य, देवभक्त, यांतील भेद नष्ट होतो. "पाहती जे डोळे । रूप आपुलें तें खेळें॥ " असें स्वतःचें रूप सर्वत्र पाहिल्याचा निर्वाळा तुकारामांनीं दिला आहे. ते आणखी म्हणतात, " मीच मज व्यालों । पोटा आपुलिया आलों ॥ " हे सर्व स्वरूपदर्शनाचे अनुभव आहेत. ज्ञानेश्वरींतहि कृष्णार्जुन हे दोन्ही उटलेले आरसे असून त्यांत परस्परांना परस्परांचें दर्शन झालें असा उल्लेख आहे.

### (३) साक्षात्कारानें जीवनमूल्यांची प्राप्ति

या अनुभवांचे परिणाम संतांच्या जीवनावर काय झाले हें त्यांनीं अनुभवांच्या वर्णनाबरोबरच सांगितलें आहे. त्यावरून सत्य-शिव-सुंदर, ज्ञान- नीति-आनंद यांची त्यांना पूर्णत्वानें प्राप्ति झाली होती, त्या अवस्थेंत या तिहींमध्यें संवाद होता, विवाद किंवा विरोध नव्हता हें दिसून आलें, तर " मी याचाच शोध करीत आहे, यानेंच मानवी जीवन पूर्ण, दिव्य, कृतार्थ होतें, " असा निर्वाळा तत्त्वज्ञान देईल. साक्षात्कारवाद बुद्धिनिष्ठ आहे हें सिद्ध करणारें हें दुसरें प्रमाण होय. साक्षात्काराच्या परिणामांचा विचार केला तर सत्य-शिव-सुंदर यांपेक्षांहि उच्चतर व उच्चतम मूल्यें प्राप्त झाल्याचें त्यावरून दिसून येईल. अमरत्वाची कल्पना तत्त्वज्ञानाच्या वरील ध्येयांत किंवा मूल्यांत नाहीं. अमरत्व हें तर साक्षात्काराचें उच्चतम फल, असें संत सांगतात. वरील तीन मूल्यांतील " शिव "

किंवा नीति यांची झेप फार तर विश्वबंधुत्वापर्यंत गेली असेल. साक्षात्कारानें आपल्याला विश्वात्मकत्व प्राप्त झालें असें संत बाहू उभारून सांगतात : " हें विश्वाचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपणचि जाहला ॥", " तो अहंकारातें दंडुनि । सकळ काम सांडुनी । विचरे विश्व होऊनी । विश्वामाजीं ॥" अमरत्व, ब्रह्मत्व, सर्वात्मकत्व या मूल्यांची कल्पनाहि तत्त्वज्ञानाला नाहीं तीं सर्व मूल्यें साक्षात्कारी पुरुषांना प्राप्त होतात. गुरुदेव रानड्यांनीं म्हटल्याप्रमाणें, सत्य-शिव-सुंदर हीं तत्त्वज्ञानानें, बुद्धीनें निश्चित केलेलीं मूल्यें बुद्धीला अगदीं अस्पष्टपणें कळलेलीं आहेत. त्यांचें खरें, भव्योदात्त स्वरूप साक्षात्काराशिवाय कळणें शक्य नाहीं.

**( ४ ) साक्षात्काराच्या दृष्टीनें सत्य-शिव-सुंदर यांचा संबंधः—** साक्षात्कारी संतांनीं आपणावर साक्षात्कारानें झालेले परिणाम म्हणून काय सांगितलें आहे, याचा विचार करण्यापूर्वीं साक्षात्कारशास्त्राच्या दृष्टीनें ज्ञान-नीति-आनंद यांचा संबंध व स्वरूप ज्ञानेश्वरादिकांनीं कशा प्रकारचें प्रतिपादिलें आहे तें पाहूं. विश्वाचें आदिकारण, त्याच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचें एकमेव कारण, विश्वांत असलेली एकच वस्तु, म्हणजे ब्रह्म किंवा आत्मतत्त्व, हा अद्वैत वेदान्ताचा सिद्धान्त प्रसिद्धच आहे. " ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥" या श्लोकार्धांत त्याचें सुंदर वर्णन आहे. " सर्वं खलु इदं ब्रह्म ॥" याचें ज्ञान, त्याचा साक्षात्कार, म्हणजे खरें ज्ञान. आत्मा व ब्रह्म एकच होत, "अयमात्मा ब्रह्म ॥" यापेक्षां सूक्ष्म वेदान्ताच्या विचारांत येथें शिरण्याचें कारण नाहीं. आत्म्याचा साक्षात्कार म्हणजे खरें ज्ञान, इतर ज्ञान हें ज्ञानच नव्हे, असें समर्थांनीं स्पष्ट म्हटलें आहे. सर्वांना तें मान्य आहे. " ज्ञान म्हणजे आत्मज्ञान । पाहावें आपणासी आपण । या नांव ज्ञान ॥" उपनिषदांत या ज्ञानाला "परा विद्या" हें नांव देऊन, इतर सर्व ज्ञानाला " अपरा विद्या " म्हटलें आहे. परा विद्येनें शाश्वत ब्रह्माची प्राप्ति होते, हें तिचें लक्षण आहे. ज्ञान-नीति-आनंद यांचा संबंध दाखविणारी एक सुंदर ओवी ज्ञानेश्वरींत स्थितप्रज्ञलक्षणें सांगतांना अ. २ मध्यें आली आहे. " ऐसा आत्मबोधें तोषला । परमानंदें पोखला । तोचि स्थितप्रज्ञु भला । जाण बापा ॥" आत्म्याचा

अनुक्रम ... दि: ... क्रमांक ... नों. दि. ...

साक्षात्कार झाला म्हणजे सत्य ज्ञान झालें; त्यानें परमानंद व परमानंदानें स्थितप्रज्ञता, असा कार्यकारणसंबंध या ओवींत दाखविला आहे. ज्ञान–आनंद-स्थितप्रज्ञा, हे साक्षात्काराचे परिणाम आहेत. परमानंद झाला म्हणजे सर्व वासना नष्ट होतात व स्थितप्रज्ञलक्षणें आपोआप प्रकट होतात.

" प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥"

परमानंदानें देहाचा विसर पडतो. मग द्वंद्वें व दुर्गुण कोठून उरणार? असा परमानंदाचा व स्थितप्रज्ञतेचा संबंध आहे. समर्थांनीं 'स्वरूप=सत्य=पुण्य=सुख,' असें समीकरण केलें आहे, तें ज्ञानेश्वरांच्या सिद्धान्तासारखेंच आहे." सत्याएवढें सुकृत नाहीं ।" " सत्य म्हणजे स्वरूप जाण ।" " पुण्याचें फळ तें सुख ।" या त्यांच्या वचनांत वरील समीकरण अंतर्भूत आहे. शेवटीं आपल्या गीतेवरील ग्रंथाच्या अंतिम वाक्यांत गुरुदेव म्हणतात : " नीतितत्त्व, भव्योदात्तता आणि दिव्यत्व हीं सर्व गीतेसारख्या पूर्णतेला पोहोंचलेल्या साक्षात्काराच्या तत्त्वज्ञानांत एकरूप होतात, तेथें त्यांचा त्रिवेणी संगम होतो, एवढें आपल्याला समजलें म्हणजे पुरें."* कान्टच्या व गीतेच्या तत्त्वज्ञानाचा तौलनिक विचार गुरुदेवांनीं येथें केला आहे; म्हणून सत्य व आनंद याऐवजीं दिव्यत्व व भव्योदात्तता, हे शब्द त्यांनीं वापरले आहेत. दोहींचा भावार्थ एकच आहे. या सर्व विवेचनावरून जीवनाला पूर्ण, कृतार्थ, दिव्य करण्याचें सामर्थ्य केवळ साक्षात्कारांत आहे, हें सहज दिसून येईल. अगदीं सामान्य मनुष्यालाहि समजावें अशा शब्दांत, परमार्थ पूर्णतेला गेला हें कशावरून समजावें याचें विवेचन करतांना समर्थांनीं हेच सत्य-शिव-सुंदराचे निकष प्रतिपादिले आहेत. पापनाश (शिव), दुःखनाश (सुंदर), आणि ईश्वर-जीव-विश्व यांचें ज्ञान ( सत्य ) हें सर्व घडून आल्याचा अनुभव आला तर परमार्थ पूर्णतेला गेला असें समजावें :

---

* It is enough for us to know that the Moral, the Sublime, and the Divine, all merge in one consummate philosophy of Spirit, like that of the Bhagavadgita.

—BG., p. 297.

" पापाची खंडना झाली । जन्मयातना चुकली ।
ऐसी स्वयें प्रचीती आली । म्हणजे बरें ॥
ईश्वरासी वोळखिलें । मी कोण हें जाणलें ।
आत्मनिवेदन झालें । म्हणजे बरें ॥
ब्रह्मांड कोठोनि आलें । कासयाचें उभारिलें ।
मुख्य कर्त्यासी वोळखिलें । म्हणजे बरें ॥ "

**(५) साक्षात्काराचे परिणाम** : उपनिषदांतील आदर्श ऋषि कसा आहे हें वर्णितांना उपनिषद्रहस्यांत गुरुदेव साक्षात्काराचे परिणाम सांगतात : " ज्याला सर्व भूतें आत्मरूप दिसतात, अशा सर्वत्र एकत्व पाहणाऱ्या पुरुषाला शोक व मोह कसें असूं शकतील ?... आत्मप्राप्तीची सर्वश्रेष्ठ कामना तृप्त झाल्यामुळें त्याच्या सर्व वासना नष्ट होतात...कमलपत्राला पाणी चिकटत नाहीं त्याप्रमाणें त्याला पापाचा लेप लागत नाहीं. आपण सत्कर्म कां केलें नाहीं, असत्कर्म कां केलें, असा पश्चात्ताप त्याला कधीहि होत नाहीं. परतत्त्वाचें स्वरूप जाणल्यामुळें तो या द्वंद्वांच्या पलीकडे जातो. ईश्वराची प्राप्ति करून घेतल्यामुळें त्याला अत्यंत शांति मिळते. आत्मसाक्षात्कार झालेल्या पुरुषांनाच शाश्वत सुख प्राप्त होतें; इतरांना तें मिळूं शकत नाहीं." साक्षात्काराचे आणखीहि कांहीं परिणाम त्या ग्रंथांत दिले आहेत ते असे : (१) मीच आत्मा हें अनुभवाला आल्यानें प्रक्षोभाचें व संतापाचें कारणच उरत नाहीं. (२) सर्वव्यापी ब्रह्माच्या दर्शनानें वासनाग्रंथि तुटते, संशय नष्ट होतात व कर्मांचा क्षय होतो. (३) सर्वांचा स्वामी जो ईश्वर त्याच्या दर्शनानें दुर्बलता नष्ट होऊन त्याचें सामर्थ्य अंगीं येतें. (४) परमानंदानें सर्व गोष्टींचा विसर पडून सर्वत्र आत्माच भरलेला दिसतो व असा पुरुष आप्तकाम म्हणून अकाम ( वासनारहित ) होतो. (५) ब्रह्मानंदाचें ज्ञान झाल्यानें त्याला कसलेंहि भय वाटत नाहीं. 'सत्य-शिव-सुंदर' असें वर्गीकरण केलें तरी या तीन मूल्यांपैकीं प्रत्येकाचीं अनेक स्वरूपें असतात. त्या भिन्न भिन्न स्वरूपांचे उल्लेख वरील साक्षात्काराच्या परिणामांत दिसतात. उदाहरणार्थ, सर्वत्र आत्मदर्शन, मीच आत्मा हा अनुभव, सर्वात्मभाव, ब्रह्मात्मभाव, संशय-निवृत्ति हे सत्याचे, ज्ञानाचे प्रकार आहेत; वासनानाश, प्रक्षोभाचा शेवट, भीतीचा अभाव, अकामत्व, द्वंद्वातीतता हे शिवाचे—नीतीचे प्रकार किंवा

अंगें आहेत; त्याचप्रमाणें शांति, शाश्वत सुख, आनंद हीं आनंदाचीं स्वरूपें होत. अशा स्वरूपांचीं हजारों वचनें आहेत. तीं पाहिलीं म्हणजे साक्षात्कारापासून जीवनाला कृतार्थता, पूर्णता लाभेल कीं नाही तें ठरवितां येईल. उपनिषदांत किंवा संतवचनांत सत्य--शिव-सुंदर हे शब्द सांपडणार नाहींत, या कल्पना सांपडतील हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

उपनिषदांतील अवतरणानंतर संतांचीं कांही वचनें उद्धृत करूं. त्यांनींहि उपनिषदांप्रमाणें आनंदावरच भर दिला आहे. गुरुदेव रानडे यांनीं साक्षात्कारी पुरुषाचें आनंद हेंच मुख्य लक्षण सांगितलें आहे. इतर नैतिक लक्षणें आनंदांतून निर्माण होतात. साक्षात्काराच्या आनंदाला त्यांनीं अत्यंत महत्त्व दिल्यामुळें कांहीं लोक त्यांच्या तत्त्वज्ञानाला " आनंदवाद " हें पर्याय नांव देतात. उपनिषदांतील तत्त्वज्ञानाला " निराशावादी " ( Pessimistic ) म्हणणाऱ्या पाश्चात्य तत्त्वज्ञांना ते विचारतात : "प्रत्येक तत्त्वज्ञानांत थोडासा निराशावाद असणारच. परंतु उपनिषदांतील हा निराशावाद ज्यांना दिसतो त्यांना त्या ग्रंथांत पसरलेल्या आत्मानंदाच्या महासागराचें दर्शन होत नाहीं का ?...असो. ज्यांना उपनिषदांत निराशावाद दिसत असेल त्यांनीं तो पाहावा, ज्यांना आत्मानंद दिसेल ते तो पाहतील." सहजसमाधीच्या व मोक्षाच्या लक्षणांतहि गुरुदेवांनीं आनंदालाच महत्त्व दिलें आहे. " सदा विलास, त्रास नहि मनमो ॥ " हें सहजसमाधीचें मुख्य लक्षण होय. त्याचप्रमाणें " कबीरा हम गुरुरस पीया।" ( साक्षात्काराचा आनंद भोगला ) याला मोक्षाच्या कल्पनेंत महत्त्व असून, " बाकी रही न छाक " ( त्यामुळें पूर्ण वासनाक्षय झाला ) या अभावात्मक कल्पनेला दुय्यम स्थान आहे. हा आनंद "ब्रह्मसंस्पर्शा"पासून, ब्रह्माच्या अपरोक्ष ज्ञानापासून होतो व तो आनंदच ब्रह्म आहे, असेंहि त्याचें स्पष्टीकरण गुरुदेवांनीं केलें आहे. आपले तेज, नाद, अमृतरस इ. अनुभव सांगून कबीर म्हणतात,

" जनम जनमकी तृषा बुझाती । करम भरम अघव्याधि टरै ॥
काल कराल निकट नहिं आवै । काम क्रोध मद लोभ जरै ॥
कहै कबीर सुनो भाई साधो । अमर होय कबहूँ न मरै ॥ "

येथें वासनांचा, भ्रांतीचा, पापाचा व दुःखाचा नाश, अमरत्वाची प्राप्ति हे साक्षात्काराचे परिणाम दिले आहेत. महिपति विचारतात, "अब क्या कहूँ अब क्या कहूँ । ज्याको वेद न जाने डेरा । सो मैंने नयन से हेरा ।। सच्चा साई, गुरु गोसाई, राहा बताई ।

मेरी सकल भरमना मिटी । दोरी जनन मरण की टुटी ।।
कोठडी करम की फुटी । लागी लगन मगन दिल हरखे ।।

" माझ्या अनुभवांचें कोठवर वर्णन करूं ? वेदांना ज्याच्या घराचा पत्ताहि माहीत नाहीं तो ईश्वर मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिला ईश्वर सत्य आहे, माझे गुरु श्रेष्ठ आहेत, त्यांनीं सांगितलेला इश्वरप्रातीचा मार्गहि श्रेष्ठ आहे. या साक्षात्कारानें माझा भ्रम नष्ट झाला, कर्माचें बंधन तुटलें आणि जन्म-मरणाचा फेरा संपला. मी ईश्वराशीं एकरूप झालों, त्यांत विलीन झालों, परमानंद झाला. " संत मौला सांगतात, " आनंद नहाया, बंदा खुदा दोनो बिसराया । बेनामका नाम हुवा रहटाना राहा ।। "—" मी आनंदानें नाहून निवालों, त्या आनंदांत देवभक्त दोघांचाहि विसर पडला, या दोन नांवांचें एक नांव झालें, पूर्ण अद्वैताचा अनुभव आला आणि जन्ममरणाचें चक्र बंद पडलें. " यापेक्षां मानवी जीवनाच्या कृतार्थतेचें अधिक भव्योदात्त चित्र कल्पनेनें तरी रेखाटतां येईल का ? साक्षात्काराच्या वरील परिणामांच्या तुलनेनें, ज्यांना आपण सत्य-शिव-सुंदर म्हणतों तीं मूल्यें अगदीं फिकीं, अपूर्ण, क्षुद्र ठरतात. अमरत्व, परमानंद, जीवब्रह्मैक्य व सर्वात्मभाव यांचा विचारहि सत्य-शिव-सुंदर या मूल्यांत आढळत नाहीं. संतांनीं तर हे सर्व परिणाम आपण अनुभवले, असें बाहू उभारून सांगितलें आहे. हीं वर्णनें वाचून " हीच मानव-जन्माची कृतार्थता, हेंच दिव्य मानवी जीवन, हेंच मी शोधीत आहें " अशी मान्यता तत्त्वज्ञान निश्चित देईल. हें साक्षात्कारवादाच्या बुद्धिनिष्ठतेचें महत्त्वाचें प्रमाण म्हणून गुरुदेवांनीं प्रतिपादिलें आहे.

## संत व समाज

आतां शेवटीं समाजहिताच्या दृष्टीनें साक्षात्काराचा विचार करावयाचा आहे. समाजहिताच्या विचारांत एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आदर्श समा-

जाचें स्वरूप ठरविणें. थोर तत्त्वज्ञानी पुरुष आपल्या मतानें आदर्श समाजाचें स्वरूप ठरवितात व त्या दिशेनें समाजाची प्रगति व्हावी असा प्रयत्न करतात. समाजवादी समाजरचना ( Socialistic Pattern of Society ) हें आजच्या सरकारचें ध्येय आहे. गुरुदेव सांगतात, प्लेटोच्या दृष्टीनें आदर्श समाज म्हणजे तेथें तत्त्वज्ञ राजा असावा किंवा राजा तत्त्वज्ञ असावा. कांटच्या मतें जेथें प्रत्येक व्यक्ति शुद्ध तर्काला धरून विचार करते व वागते आणि प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र आहे, ती कशाचेंहि किंवा कोणाचेंहि साधन नाहीं, तो उत्कृष्ट समाज ( Kingdom of Ends ) होय. एकाच ध्येयाची जेथें प्रत्येक व्यक्तीला जाणीव आहे तो आदर्श समाज असा ग्रीनचा थोर सिद्धान्त आहे. सर्व धर्मांची व संतांची आदर्श समाजाची कल्पना ईश्वराधिष्ठित आहे. " Kingdom of God " किंवा " Theopolis " हें त्यांचें ध्येय आहे. ईश्वराची भक्ति हें एकच ध्येय मानून भक्तींत मग्न झालेला, ईश्वराची आज्ञा शिरीं धरणारा व ईश्वराच्या प्रेमानें परस्परांबद्दल समभाव व बंधुभाव वाटणारा समाज त्यांना घडवावयाचा आहे. एक देव, एक धर्म, तरच एक मानवता असें गुरुदेव म्हणत असत. विश्वबंधुत्व निर्माण करण्याला दुसरा मार्ग नाहीं. यापेक्षां उच्च सामाजिक ध्येय कल्पितां येईल का ? असा समाज निर्माण कर हें पसायदान ज्ञानेश्वरांनीं देवाजवळ मागितलें आहे. साक्षात्कारी पुरुषाकडूनच अशा समाजाच्या निर्मितीला मदत होऊं शकेल. " आपण तरूनि विश्व तारा । " किंवा " आधी केलें । मग सांगितलें ॥ " असे संतच समाजाला पूज्य वाटून समाज त्यांच्या मागें जाईल. म्हणून ज्ञानेश्वर देवाला विनवितात :

" वर्षत सकळ मंगळीं । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूतळीं । भेटोतु भूतां ॥
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुषीं । अखंडित ॥ "

पसायदानाचें सार हेंच आहे.

# ११. गुरुदेव रानडे यांचा सद्गुरुविचार

गुरुदेव रानडे यांनीं एका ठिकाणीं आपले (व माझेहि) सद्गुरु श्री भाऊसाहेबमहाराज उमदीकर यांचेसंबंधीं लिहिलें आहे, " दासबोधांतर्गत निस्पृह-वर्तणूक (११·१०), निस्पृह-लक्षण (१४·१), निःस्पृहव्याप-लक्षण वगैरे जे आचारबोधक समास आहेत, त्यांतील प्रत्येक ओवीप्रमाणें त्यांनीं आपलें वर्तन ठेवलें आहे." समर्थ रामदासांचे एक सज्जन व भाविक भक्त मला एकदां म्हणाले, " दासबोधांत व मनाच्या श्लोकांत समर्थांनीं आपलें आत्मचरित्रच सांगितलें आहे. त्यांच्या या व इतर ग्रंथांचा अभ्यास करून, त्यांतून त्यांचें आत्मचरित्र कोणीं लिहिलें तर परमार्थप्रेमी लोकांना तें उद्बोधक व स्फूर्तिदायक होईल." तुकारामांनीं लिहिलेल्या संतपर अभंगांत त्यांच्या स्वतःच्या अनेक महान् सद्गुणांचें प्रतिबिंब आपल्या दृष्टीस पडतें. कारण " साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपीं मिळाले ॥ " आत्मस्वरूपाचा साक्षात्कार झाल्यानें स्वरूपाकार झालेल्या सर्व संतांच्या नैतिक, आध्यात्मिक व आचारात्मक सद्गुणांत विलक्षण साम्य दिसून येतें. मग ते कोणत्याहि वर्णाचे, धर्माचे अगर देशाचे असोत. तुकारामांनीं किंवा समर्थांनीं मुद्दाम आत्मवर्णनपर अभंग व श्लोक लिहिले नाहींत. तरी ते या श्रेष्ठ संतमंडळींतील शिरोमणि असल्यानें त्यांच्या संतवर्णनांत साहजिकच त्यांच्याहि सद्गुणांचें प्रतिबिंब दृष्टीस पडतें. " महाराष्ट्रांतील संतांचा साक्षात्कार " या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत गुरुदेव रानडे लिहितात,

It is this combined character of mystical experience, its ineffable character which has served to make all God-aspiring humanity a common hidden society. There are no racial, no communal, no national prejudices amongst

them Time and space have nothing to do with the eternal infinite character of their mystical experience It is thus for this reason that the mystics (of Maharashtra), who form but a cross-section of that divine society, yet represent the reality of the mystic assembly completely and to the fullest extent

भावार्थः—आध्यात्मिक अनुभव शब्दातीत असतो; त्याचें वर्णन करतां येत नाहीं व तो प्रतिभाशक्तीलाच (Intuition) येऊं शकतो. त्या अनुभवाच्या अशा द्विविध स्वरूपामुळें, ईश्वरप्राप्तीचा प्रयत्न करणाऱ्या पुरुषांचें एक अज्ञात संतकुल बनलें आहे. अशा रीतीनें जगांतील सर्व साक्षात्कारी पुरुषांचें एक शाश्वत, दिव्य संतकुल तयार होतें. जाति, धर्म, राष्ट्र यांच्यामुळें त्यांच्यामध्यें कांहींही विकृत पूर्वग्रह उत्पन्न होत नाहींत. त्यांचे आध्यात्मिक अनुभव सनातन शाश्वत, अनंत असतात; दिक्कालांचे त्या अनुभवांवर कांहींही परिणाम होऊं शकत नाहींत. महाराष्ट्रांतील संत म्हणजे या संतकुलाचा एक अगदीं लहान असा प्रातिनिधिक भाग आहे. तरी मूठभर साखरेवरून पोत्यांतील सर्व साखरेची गोडी पूर्णतः कळते, त्याप्रमाणें या दिव्य संतकुलाचें सत्स्वरूप त्यांच्यामध्यें अगदीं पूर्णतया, सविस्तर पहावयास सांपडतें." असा एकविध साक्षात्कार हें संतांच्या सद्गुणांचें मूळ असल्यामुळें त्यांच्या गुणांतही एकविधता असणें साहजिकच आहे. म्हणूनच वर सांगितल्याप्रमाणें साक्षात्कारी पुरुषांनीं लिहिलेल्या, किंवा प्रवचनांत प्रतिपादलेल्या संतांच्या लक्षणांत त्या लेखकाचें किंवा प्रवक्त्याचें आत्मचरित्र पहावयास मिळतें.

गुरुदेव रानडे यांच्या दुःखद निर्याणानंतर वरील विचारांचा प्रत्यय अधिक स्पष्टपणें येऊं लागला. त्यापूर्वींही या सत्याची जाणीव होतीच; परंतु आतां ती स्पष्टतर झाली. कारण, आतां गुरुदेव व त्यांचे गुण यांचा वेगवेगळा विचार मनांत येतो; पूर्वीं त्यांची मूर्ति दृष्टीसमोर असल्यामुळें दोन्ही एकरूप होते. कोणत्याही संतपर अभंगांच्या सहाय्यानें गुरुदेवांच्या वर्णनपर प्रवचन केलें किंवा ऐकलें म्हणजे असें वाटतें, कीं हे अभंग जणुं कांहीं त्यांच्यावरच लिहिले आहेत. या परिस्थितींत " माउली "कडून गुरु-

देवासंबंधीं लेख लिहिण्याचें पत्र आलें तेव्हां असें वाटलें कीं, गुरुदेवांनीं लिहिलेल्या संतांच्या वर्णनांत त्यांचें स्वतःचें गुणवर्णन अभावित येईलच; तेव्हां त्याच विषयावर " माउली " साठीं लेख लिहावा. त्यांनीं दिलेलें संतांचें वर्णन फार विस्तृत. तें सर्व एका लेखांत ग्रथित करतां येणार नाहीं. म्हणून त्यांतील उत्तम भाग तेवढा घेतला पाहिजे. " गुरु हा संतकुळींचा राजा." मग सद्गुरुवर्णनपर भाग घेऊन त्यावर लेख लिहावा असें ठरवून हा लेख लिहीत आहें.

सद्गुरु-वर्णन सर्व थोर संतांनीं केलें आहे व प्रत्येक संताच्या वर्णनांत त्यांचें वैयक्तिक वैशिष्ट्य आहेच. सर्व वर्णनें एकाच ठोकळ साच्याचीं नाहींत. " नातुडे मुख्य परमात्मा। म्हणोनि करावी लागे प्रतिमा। तैसें मायायोगें महिमा। वर्णीन सद्गुरूचा ॥ आपल्या भावासरखा मनीं । देव आठवावा ध्यानीं ॥ तैसा सद्गुरु हा स्तवनीं । स्तऊं आतां ॥ (दासबोध १।४।६·७) वरील ओव्यांत समर्थांनीं हेंच सांगितलें आहे. गुरुदेव रानडे यांच्यासारख्या " शाब्देपरे च निष्णात " अशा साक्षात्कारी तत्त्वज्ञान्यानें केलेल्या सद्गुरुवर्णनांत मार्मिक अपूर्वता असणार हें उघडच आहे. या अपूर्वतेंत त्यांच्या गुणांची अपूर्वताही दृष्टीस पडणार आहे. यासाठीं हिंदी साहित्यांतील ईश्वरप्राप्तीचा मार्ग (Pathway to God in Hindi Literature) या त्यांच्या अलौकिक ग्रंथांतील सद्गुरुलक्षणांचा येथें विचार करावयाचा आहे. गुरुदेवांनीं कबीराचीं दोन पदें व कांहीं दोहे याच्या आधारानें हा भाग लिहिला आहे. परंतु हें वरील पदांचें व दोह्यांचें केवळ भाषांतर नाहीं; तर आपल्या साक्षात्काराच्या श्रेष्ठ अनुभवांतून व तत्त्वज्ञानाच्या खोल अभ्यासांतून काढलेलें हें त्यांचें तात्त्विक सार आहे. यांत गुरुदेवांच्या विवेचनाचें वैशिष्ट्य आहे हें विसरतां कामा नये. कबीरांचें निमित्त करून त्यांनीं स्वतःचे सिद्धांत विशद केले आहेत. " माझे विचार मी दुसऱ्याकडून वदवितों " (I make others speak for me) असें ते म्हणत असत व त्यांचे सर्व ग्रंथ याच पद्धतीनें लिहिलेले आहेत.

आतां मुख्य विषयाकडे वळूं. सद्गुरूंच्या लक्षणांचे, अर्थात् सद्गुणांचे चार विभाग करून त्याचें विवेचन गुरुदेवांनीं केलें आहे. (१) नैतिक लक्षणें,

(२) शारीरिक लक्षणें, (३) आध्यात्मिक लक्षणें व (४) सामाजिक लक्षणें हे चार भाग होत. यावरून खरे सद्‌गुरु व खोटे सद्‌गुरु यांतील भेद कळून येईल. आध्यात्मिक दृष्ट्या जगाच्या उद्धारकार्यावरून मुख्यत्वेंकरून खरे सद्‌गुरु कोण हें स्पष्ट समजतें. आतां या चार भागांतील लक्षणांचा अनुक्रमानें विचार करूं.

**सद्‌गुरूंची नैतिक लक्षणें**:—आनंद हें सद्‌गुरूचें मुख्य लक्षण आहे. "सदाविलास त्रास नहीं मनमें" असें कबीर सांगतात. ग्लानि, थकवा, हयगय, असमाधान हे दोष त्यांच्या जीवनांत कधींच दिसणार नाहींत. "भोगमें जोग जगावे"—प्रपंचांतच ते आपला योग जागृत ठेवितात. त्यांचें दुसरें लक्षण म्हणजे कर्म करीत असतांनाहि त्यांच्या ठिकाणीं नैष्कर्म्य असतें, ते कर्म करून अकर्ते असतात. हेंच गीतेच्या नैतिक शिकवणीचें सार होय, हाच कर्मयोग. जो आपलीं सर्व कर्में देवाकरतां करतो व तीं देवालाच अर्पण करतो तो अकर्ता होय. तिसरें लक्षण निर्भयता. "निरभय-पद सरसावै"—तो निर्भयपदाला पोंचतो व त्यामुळें पहिल्या लक्षणांत सांगितलेला त्याचा आनंद वृद्धिंगत होतो. निर्भयता व आनद हे परस्परोपकारी आहेत. निर्भयतेपासून आनंद होतो व आनंदापासून उप-निषदांत सांगितल्याप्रमाणें निर्भयता प्राप्त होते; "आनंद ब्रह्मणो विद्वान् कदाचन न बिभेति न बिभेति कुतश्चन ।'

**शारीरिक लक्षणें**:-सद्‌गुरु एकाग्रतेसाठीं इंद्रियांचीं द्वारें बंद करीत नाहींत किंवा प्राणनिरोधही करत नाहींत. "द्वार न रूंधै, पवन न रोकै ।" त्यांच्या आध्यात्मिक आनंदामुळें त्यांच्या ज्ञानेन्द्रियांचें व कर्मेंद्रियांचें आपो-आप प्रयत्नावांचून नियमन होतें; ते डोलले तरी त्यांच्यांत चलन होत नाहीं किंवा बोलले तरी त्यांचें अनुसंधान तुटत नाहीं. "डोलत डिगै न बोलत बिसरै" बेकन म्हणतो त्याप्रमाणें शरीर हाललें तरी मन चंचल होत नाहीं. आपल्याला प्राप्त झालेल्या साक्षात्काराच्या आध्यात्मिक आनंदांत त्यांचें मन सदाच निमग्न असतें. कार्यें करीत असतांनाहि ते निश्चल, स्वस्थचित्त असतात. दुसरें शारीरिक लक्षण म्हणजे ते सदा सहजसमाधि भोगीत असतात. नुसती दृष्टि टाकल्याबरोबर ईश्वरदर्शन होणें याचें नांव सहजसमाधि. ही समाधि व कुंभक केल्यानें लागणारी

समाधि या अगदीं भिन्न आहेत हें सहज ध्यानांत येईल. " प्राण पूज्य किरियासे न्यारा । सहज समाधि सिखावै ।।" शेवटचें शारीरिक लक्षण म्हणजे केवलकुंभक. त्याचें अलंकारिक वर्णन कबीरांनीं केलें आहे. " धरती त्यागि अकास हुँ त्यागै अधर मडैया छावै " याचा शब्दशः अर्थ असा, कीं तो आकाश व पृथ्वी यांच्यामध्यें निराधार झोंपडी बांधतो; पण गूढ अर्थ हा, कीं साक्षात्कारी पुरुष मूलाधारचक्र ( पृथ्वी ) व सहस्रार-चक्र ( आकाश ) यांच्यामध्यें केवलकुंभक करून राहतो. हा केवल-कुंभक दुसऱ्या दोन—अधः व ऊर्ध्व—कुंभकांहून निराळा आहे. "सहस्रशः संतु हतेषु कुंभाः । संभाव्यते केवल कुंभ एव ।।"( हठयोगांत हजारों कुंभक सांगितलेलें असले तरी केवलकुंभच त्यांत श्रेष्ठ आहे ) असें योगतारावलींत शंकराचार्यांनीं त्याचें वर्णन केलें आहे. हा प्रयत्नांनीं साध्य होत नाहीं, आपोआप साध्य होतो. त्यावेळीं श्वासोच्छ्वास चालला आहे कीं नाहीं तें कळत नाहीं व त्यामुळें शरीर व मन अगदीं शांत होतात.

**साक्षात्कारविषयक लक्षणें**:—यासंबंधीं सद्गुरूंचें पहिलें लक्षण म्हणजे ते आपला आत्मा शब्दाला जोडतात, अनाहत नादाचें अनुसंधान करतात. याचा अर्थ काय हें नादाचा अनुभव असलेल्या साधकासच समजेल. दुसरें लक्षण हें, कीं ते जिकडे दृष्टि टाकतील तिकडे त्यांना देवच दिसतो; दुसरें कांहींहि दिसत नाहीं. जनाबाईनीं म्हटल्याप्रमाणें,

वामसव्य दोहीकडें । दिसें देवाचें रूपडें ।।
खालीं पाहें अथवा वरी । जिकडे पाहे तिकडे हरि ।।
अणुरेणु चक्रपाणि । खूण झाली दासी जनी ।।

सर्वत्र देव असल्यामुळें तो दुसरा कोणताच पदार्थ दृष्टीस पडूं देत नाहीं. प्रत्येक पदार्थाच्या व सद्गुरूंच्यामध्यें देव भरलेला असतो. " मावळवीत विश्वाभास । नवल उदेला चंडांश " अशी स्थिति असते. आंत जसें रूप दिसतें तसेंच बाहेर दिसतें हें तिसरें लक्षण होय. आंत व बाहेर डोळे झांकून व उघडून होणाऱ्या साक्षात्काराचें स्वरूप अगदीं एकच असतें. " भीतर रहा सो बाहर देखै । बाहर रहा सो भीतर देखै । दूजा दृष्टि न आवै ।।","डोळे झांकूनियां पाहे । पुढें विठ्ठल उभा राहे ।।" हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे. सद्गुरूंना आंत जें ईश्वराचें रूप

दिसतें तेंच बाहेर दिसतें. हीं दोन्हीं रूपें अगदीं सारखीं असलीं पाहिजेत. आंत दिसतें तसेंच बाहेर दिसलें नाहीं तर आंतील दर्शनही कल्पना, आभास किंवा भ्रम असूं शकेल. बाहेर दिसतें तें आंत दिसलें पाहिजे; नाहीं तर त्या बाह्यदर्शनाला साक्षात्कार म्हणतां येणार नाहीं,तें कांहीं तरी पांचभौतिक दर्शन असेल .

आतां शिष्यांचा उद्धारकर्ता या दृष्टीनें सद्गुरूंच्या (सामाजिक) लक्षणांचा विचार करूं. गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणें पाणी ज्याप्रमाणें वरच्या पातळीवरून खालच्या पातळीवर वाहतें, त्याचप्रमाणें आध्यात्मिक गुरुत्वाकर्षणाच्या नियमानें उच्चतम साक्षात्कारी सद्गुरूंचा आत्मानुभव शिष्यामध्यें उतरला पाहिजे;अर्थात् त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणें साधन करणाऱ्या शिष्यांना त्यांच्या साधनाच्या मानानें तसेच आत्मानुभव आले पाहिजेत. सद्गुरुच एकटे अमृतरस पितात असें नाहीं, तर शिष्यांनाही पाजतात. " आप पिये मोही प्यावै' सद्गुरूंचा अमृत-रसाचा अनुभव साधन केल्यावर शिष्यांनाही येऊं लागतो. तसेंच, सद्गुरु अलक्ष वस्तूचें पूर्ण एकाग्रतेनें ध्यान करूं शकत असतील, अलक्ष वस्तूशीं ध्यानाच्या वेळीं एकरूप होत असतील, तर शिष्यांनाही अलक्ष वस्तूचें दर्शन होऊं शकेल. "नैन न अलख लखावै." डोळ्यावरील पडदा दूर करून ते शिष्यांना परमात्मा दाखवितात. "परदा दूर करे आँखिनका । परमातम दरसावै ॥" त्याचप्रमाणें अनाहत नादांत आत्मलय करण्यांत ते निष्णात असतील तर शिष्यांनाही अनाहत नाद ऐकूं येईल व ते नादानुसंधान करूं शकतील. स्वरूप, प्रकाश, अनाहत नाद हे सर्व ईश्वराचेच आविष्कार आहेत; शिष्याला यांतील कशाचाही अनुभव आला म्हणजे पुरे. परंतु या प्रकारचे अत्युच्च अनुभव आलेल्या सद्गुरूपासून मिळालेल्या सबीज नामाच्या स्मरणानेंच ते येऊं शकतात. म्हणून " बिकट यमघाटांतून वाट एक सद्गुरुच दाखवूं शकतात, इतर कोणीहि दाखवूं शकत नाहीं, " अशी परमार्थांत सद्गुरूंची आवश्यकता कबीरांनीं सांगितली आहे.

शेवटीं सद्गुरूंचें अत्यंत महत्त्वाचें लक्षण कबीरांनीं सांगितलें आहे. त्यांच्या कृपेनें शिष्याला आत्मानुभव येत येत शेवटीं ईश्वरस्वरूपांत अवस्थित होतां येतें, " तदा द्रष्टु: स्वरूपेऽवस्थानम् " ही पातंजलयोगांत

सांगितलेली पदवी प्राप्त होते. “ कहत कबीर बसावै हंसा आवागमन मिटावै.” मग हंस: व सोऽहम्, (मी तो, व तो मी) यांत भेद उरत नाहीं व पुनः जन्म येत नाहीं, जन्ममृत्यूचें चक्र थांबतें. कबीर म्हणतात, “ अशा पुरुषाचें दर्शन म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचेंच दर्शन होय ”— “ जाके दरसन साहब दरसै ”. असा सद्गुरु म्हणजे प्रत्यक्ष ईश्वरच होय आणि ज्या आदरभक्तीच्या भावना किंवा अपेक्षा ईश्वरासंबंधीं आपल्या अंतःकरणांत असतात, त्या अशा पुरुषासंबंधींहि बाळगाव्या. कारण तो म्हणजे इहलोकीं वावरणारी ईश्वराची प्रतिमाच होय. हाच सिद्धांत रामदासांनीं सांगितला आहे:—

“ जैसा देव तैसा गुरु । शास्त्रीं बोलिला हा विचारु ।
म्हणोन सख्यत्वाचा प्रकारु । सद्गुरूसी असावा ॥ (दा.४·८·२२)

कबीरांच्या दोन पदांतील सद्गुरुलक्षणांचा येथपर्यंत विचार झाला. आतां दोह्यांकडे वळूं. तीन सुंदर उपमा देऊन, सद्गुरु शिष्यासाठीं काय करतात हें येथें प्रथम विशद केलें आहे. पहिला दोहा :–

“ क्षीररूप सतनाम है, नीररूप बेवहार ।
हंसरूप कोई साध है तत्का छाननहार ”

सत्नाम हा कबीरांचा महत्त्वाचा शब्द आहे. “ सतनामका भरभर प्याला, पिये मोहि प्यावै ” हें त्यांचें वचन वर आलेंच आहे. सत्नाम म्हणजे परमअर्थ, परतत्त्व. संत हे हंस असून, पाणी व दूध वेगळें काढावें त्याप्रमाणें, ते प्रपंच व परमार्थ, जड व चैतन्य यांस वेगळे करतात; जडांतून चैतन्य बाहेर आणतात. शिष्यांचा उद्धार करण्याचें हें कार्य फक्त सद्गुरुच करूं शकतात. गुरु म्हणविणारा प्रत्येक पुरुष तें करूं शकत नाहीं. दुसरी उपमा सिकलगाराची आहे.

“ गुरु तो वही सराहिए जो सिकलींगर होय ।
जनम जनमका मोरचा, छन में डाले धोय ”

गंजलेल्या हत्यारांवरचा गंज काढून त्यांना धार लावणें हें सिकलगारांचें काम असतें. त्याचप्रमाणें सद्गुरुहि शिष्यांचें अंतःकरण तीक्ष्ण, तेजस्वी करतात, परमार्थाच्या आड येणारा कामक्रोधादि गंज एका क्षणांत

दूर करून शिष्याला मोक्ष, अमृतत्व प्राप्त करून देतात. यासंबंधीं दोन मतें आहेत. शिष्याला आत्मशुद्धीसाठीं दीर्घकाल साधन करावें लागतें व मगच मोक्षप्राप्ति होते हें एक मत; सद्गुरूच्या कृपेनें एका क्षणांत मोक्ष मिळतो हें दुसरें मत. रामदास म्हणतात, " जेचि क्षणीं अनुग्रह झाला। तेचि क्षणीं मुक्त झाला। बंधन कांहीं आत्मयाला। बोलोंचि नये ॥" कबीराचेंहि हेंच मत दिसतें. या सिद्धांताचा खरा अर्थ काय याचा विचार पुन्हां केव्हां तरी करूं. तिसरी उपमा कुंभाराची:—

" गुरु कुम्हार सिख कुंभ है, गढ गढ काढै खोट।
अंतर हाथ सहार दै बाहर बाहै चोट॥ "

कुंभार मडकें थापटण्यानें थापटून त्याचे खाचखळगे काढून टाकतात व आंतून हात फिरवून आंतील पोकळी वाढवितात, आपल्याला पाहिजे तो आकार त्याला देतात. त्याचप्रमाणें सद्गुरु शिष्यांतील दोष व अवगुण काढून टाकतात, व आपल्याला पाहिजे तें पारमार्थिक कार्य करण्याची योग्यता त्याच्या ठिकाणीं आणतात. पुन्हां कुंभार बाहेरून मडकें थापटीत असतां, तें फुटूं नये म्हणून, आंतून त्याला आपल्या हाताचा आधार देतो. त्याचप्रमाणें परमार्थपथ आक्रमीत असतां शिष्यावर कांहीं संकट अथवा आपत्ति आल्या तर सद्गुरु त्याला सदैव आंतून आधार देतात व त्यामुळें आपलीं दुःखें व कष्ट शिष्य धैर्यानें सहन करूं शकतो. संकटांच्या व विपत्तीच्या प्रत्येक कृष्णमेघांतून त्याला आशेचे किरण दिसतात; त्या कृष्ण-मेघांमुळें थोडावेळ त्याच्या पारमार्थिक जीवनांत निराशेचा अंधार उत्पन्न झाल्याप्रमाणें वाटलें तरी त्यांच्यामधूनही सद्गुरुकृपेच्या सूर्याचें उज्ज्वल तेज शिष्याला स्पष्ट दिसत असतें; त्यामुळें त्याचें धैर्य कधींच खचत नाहीं.

एका दोह्यांत खरे सद्गुरु व नाममात्र सद्गुरु ह्यांतील फरक सांगितला आहे. खरे सद्गुरु असाधारण, अनंताला पोहोंचलेले असतात; नाममात्र गुरु साधारण, मर्यादित क्षेत्रांतील असतात.

" कनफूँका गुरु हदका, बेहदका गुरु और।
बेहदका गुरु जब मिलै, लहै ठिकाना ठौर॥ "

मर्यादित, साधारण गुरु शिष्याला कानांत मंत्र सांगतात; तेथें त्यांचें कार्य संपलें. अनंतान्ती, असाधारण गुरु केवळ मंत्र सांगून थांबत नाहींत;

तर शिष्यास प्रत्यक्ष देवाचें दर्शन घडवितात. त्यांच्या उच्च साक्षात्काराच्या प्रभावानें त्यांनीं दिलेल्या मंत्रास सामर्थ्य असतें, तो मंत्र, तें नाम सबीज असतें, त्याच्या जपानें शिष्यालाही साक्षात्कार होऊं शकतो. नामांत असें सामर्थ्य नसेल, असें देव दाखविणारें शक्तिशाली नाम देतां येत नसेल, तर नुसता मंत्र सांगून काय उपयोग! ज्याच्या मार्गदर्शनाखालीं परमार्थपथ आक्रमून शिष्यजन, वाटेंत लागणाऱ्या खाणाखुणांचें निरीक्षण करीत, आपल्या मूळ ठिकाणाला पोहोंचलेलें दिसून येतात तेच खरे सद्गुरु. मूळ ठिकाण म्हणजे बादरायणांच्या ब्रह्मसूत्रांच्या शेवटीं सांगितलेली "अनावृत्ति" किंवा मुक्ति. अशा सद्गुरूंना शिष्यानें देवापेक्षां श्रेष्ठ मानलें तर त्यांत आश्चर्य तें काय? कबीर म्हणतात,

"गुरु गोविंद दोऊ खडे किसके लागूँ पाय।
बलिहारी गुरु आपकी गोविंद दिया दिखाय॥"

या दोह्यासंबंधीं अशी एक कथा रूढ आहे, कीं कबीरांना एकदां सद्गुरु व देव या दोघांचेंही एकदम दर्शन झालें. साक्षात्कारांत असें दोघांचें दर्शन होऊं शकेल किंवा नाहीं, अथवा दोघे एकरूप होऊन दिसतील हा प्रश्न अयोग्य नाहीं. पण तो क्षणभर बाजूला ठेवूं. यावेळीं कबीरांना प्रश्न पडला, कीं प्रथम नमस्कार कोणाला करावा? शेवटीं सद्गुरूंच्या कृपेनें देवाचें दर्शन झालें म्हणून त्यांनीं सद्गुरूंना पहिल्या नमस्काराचा मान दिला. ही कथा अर्थात् साक्षात्कारावर केलेलें रूपक आहे. दोघांचें एकदम दर्शन होण्याऐवजीं देव व सद्गुरु यांपैकीं कोणाही एकाचें दर्शन झालें म्हणजे पुरे; मग त्याला सद्गुरु म्हणा अगर देव म्हणा. दोन्ही एकच आहेत.

गु. रानडे यांनीं सांगितलेल्या वरील सद्गुरूंच्या लक्षणांत त्यांची मूर्ति आपल्याला दिसेल. हीं सद्गुरूंचीं लक्षणें त्यांच्या ठिकाणीं विराजत होतीं याची साक्ष त्यांचे शेकडों शिष्य व भक्त कृतज्ञता, आदर, भक्ति या भावनांनीं भरलेल्या अंतःकरणानें देतील. असा थोर पुरुष आपल्यामधून देहानें तरी गेला. आतां असा मार्गदर्शक सद्गुरु दृष्टीस पडणार नाहीं. परमार्थांतील सूर्य नाहींसा झाला हेंच सर्वांच्या अंतःकरणांत सलणारें दुःखाचें शल्य आहे. गुरुदेवांच्या निर्याणानें उत्पन्न झालेली ही पोकळी आतां

त्यांच्या उपदेशाप्रमाणें परमार्थसाधन करणें, त्यांच्या तत्त्वज्ञानाचें वाचन-चिंतन करणें, त्यांचें कार्य पुढें चालू ठेवण्याचे यथाशक्ति प्रयत्न करणें, त्यांचें पुण्यस्मरण जागृत ठेवणें व या सर्व कार्यासाठीं त्यांच्या सर्व साधकांनीं वरचेवर त्यांच्या पुण्यक्षेत्रीं अगर अन्यत्र एकत्र जमणें, या गोष्टींनीं भरून काढण्याचा शक्य तितका अट्टाहास केला पाहिजे. असें केलें तरच त्यांच्या सान्निध्यांत मिळालेल्या ज्ञानाचें सार्थक होऊन परमकल्याण होईल व त्यांच्या प्रेमाला व कृपेला आम्ही पात्र होतों असें ठरेल.

—( 'माउली' मासिक )

# १२. गुरुदेव रानडे यांचा साध्य–साधन विचार

## ( १ ) साध्यविचार

सुमारें तीस वर्षांपूर्वी, एक दिवस संध्याकाळीं निंबाळाश्रमाच्या आसपास गुरुदेवांबरोबर फिरत असतांना, " साक्षात्कार झाला हें कशावरून ओळखावें ? " असा प्रश्न मीं त्यांना विचारला. त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें तत्क्षणीं उत्तर मिळालें व तें समर्थांच्या खालील ओव्यांच्या शब्दांत आलें:—

पापाची खंडना जाली । जन्मयातना चुकली ।
ऐसी स्वयें प्रचीत आली । म्हणजे बरें ॥
परमेश्वरास वोळखिलें । आपण कोणसें कळलें ।
आत्मनिवेदन जालें । म्हणजे बरें ॥
ब्रह्मांड कोणें केलें । कासयाचें उभारिलें ।
मुख्य कर्त्यास वोळखिलें । म्हणजे बरें ॥ दा. १०,८,२१–२३.

परमार्थसाधनानें प्राप्त होणाऱ्या अवस्थेचें इतकें भव्य दर्शन बुद्धीनेंहि मला यापूर्वी कधींच झालें नव्हतें. या भव्य दर्शनाचें स्मरण ठेविलें तर आपल्या अल्पस्वल्प आत्मानुभवामुळें अभिमान खात्रीनें उत्पन्न होणार नाहीं, असेंहि मला वाटलें. या प्रसंगाचा माझ्या मनावर फार खोल परिणाम झाला हें सांगण्याचें कारण नाहीं. " माझ्या पारमार्थिक श्रद्धेला कांहीं बौद्धिक आधार सांपडतो का, हें पाहण्यासाठीं मीं तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला, " असें गुरुदेव एकदां म्हणाले होते. 'आधुनिक भारताचें तत्त्वज्ञान' ( Contemporary Indian Philosophy ) या पुस्तकांतील आपल्या लेखांत पृ. ५६२ वर त्यांनीं असाच विचार प्रदर्शित केला आहे : "माझ्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाची सुरुवात माझ्या आध्यात्मिक जीवनांतून झाली; व त्याची पूर्णताहि आध्यात्मिक जीवनांतच होईल, अशी आशा मी बाळगतों. "

ही त्यांची आशा पूर्णतःसफल झाली आहे,हें सर्वांना ठाऊकच आहे.श्रद्धा मिळविण्यासाठीं गुरुदेवांनीं तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला नाहीं. आपल्या सद्‌गुरूंचा उपदेश, त्यांच्या जीवनाचें सूक्ष्म निरीक्षण व स्वतःचे आध्यात्मिक अनुभव यांवर त्यांची आध्यात्मिक श्रद्धा आधारलेली होती; त्यांतून ती जन्माला आली, वाढली, दृढ झाली. हीं श्रद्धा तर्काधिष्ठित आहे अशी खात्री करून घेण्यासाठीं त्यांनीं तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. तत्त्वज्ञानाचे ग्रंथ लिहिण्याचें कारण त्यांनीं हेंच दिलें आहे; " भगवद्‌गीता, उपनिषदें इत्यादि ग्रंथांतील परमार्थावर नवभारताची दृढ श्रद्धा आहे. त्या श्रद्धेला आधुनिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें बौद्धिक, वैचारिक आधार आहे, त्यांतील सिद्धान्तं तर्काधिष्ठित आहेत, हें नवभारतानें जगाला दाखवावें अशी या ग्रंथांची अपेक्षा आहे." ( उ. प्र. १४ ) * अर्थात्, या ग्रंथासंबंधीं नवभारताचें हें कर्तव्य आहे. " उपनिषदांतील तत्त्वज्ञानांत आलेल्या विषयांसंबंधीं माझे स्वतःचे विचार मीं स्वतंत्रपणें सांगितलेले नाहींत. परंतु, या ग्रंथांतील विचारप्रणालीचा जे सूक्ष्म अभ्यास करतील त्यांना माझें तत्त्वज्ञान काय आहे तें कळूं शकेल," ( उ. प्र. २१-२२ ) असेंहि त्यांनीं म्हटलें आहे. तेव्हां, साध्यासंबंधीं, ध्येयासंबंधीं, गुरुदेवांचे काय विचार आहेत ते त्यांच्या ग्रंथांवरून पाहूं. कारण, आपलें ध्येय त्यांनीं सद्‌गुरूंची शिकवण व आपले आध्यात्मिक अनुभव यांवरून निश्चित केलें होतें; त्यावर त्यांची दृढ श्रद्धा होती. तरी, उपनिषदांतील तत्त्वज्ञान सांगतांना नवभारताला, किंबहुना सर्व जगाला, मानवाच्या ध्येयाचें, साध्याचें स्वरूप सांगणेंहि अवश्य होतें. तें प्रथम सांगून नंतर त्यावरील श्रद्धा तर्काधिष्ठित आहे हें त्यांना सिद्ध करावयाचें होतें.

---

* या लेखांत पुढीलप्रमाणें संक्षेप वापरले आहेत:-उ.=A Constructive Survey of Upanishadic Philosophy; उ. प्र.=Ibid, Preface; म.=Mysticism in Maharashtra; म. प्र. =Ibid. Preface; पा.=Pathway to God in Hindi Literature; पा. प्र. Ibid, Preface.

"नीतीची परिणति साक्षात्कारप्रवृत्तींत झाली पाहिजे; साक्षात्कार हेंच मानवी जीवनाचें ध्येय व साध्य आहे;" (उ. २८७) "साक्षात्कार, ईश्वराचें भक्तिपूर्वक चिंतन, हें मनुष्याला प्राप्त करून घेतां येण्यासारखें उच्चतम ध्येय आहे;" (म. प्र. २) "साक्षात्कारवाद म्हणजे ईश्वराचा प्रत्यक्ष, अपरोक्ष, प्रातिभ साक्षात्कार; त्याचें दर्शन होऊं शकेल ही श्रद्धा;" (म. प्र. १) "या ग्रंथाचा प्रधान हेतु आध्यात्मिक आहे; इतर सर्व हेतु गौण आहेत." (उ. प्र. १२). "भगवद्-गीता, म्हणजेच साक्षात्काराचें तत्त्वज्ञान" या ग्रंथांत त्यांनीं भगवद्-गीतेचा साक्षात्कारपर तात्पर्यार्थ उत्कृष्ट रीतीनें विशद करून दाखविला आहे. जन्माला येऊन ईश्वराचा साक्षात्कार करून घेतला नाहीं तर जन्मल्याचा काय उपयोग, असेंहि त्यांनीं म्हटलें आहे. आपल्या एका प्रबंधांत उपनिषदांतील मुख्य सिद्धान्त त्यांनीं सूत्ररूपानें सांगितले आहेत : "आत्मा आहे, त्याचा साक्षात्कार होऊं शकतो; हें विश्व, देहाप्रमाणेंच, आत्म्याचें आवरण आहे; किंबहुना देह व विश्व आत्माच आहेत." येथेंहि साक्षात्कारावर भर आहे. वेदान्तांतील केवलाद्वैताच्या सिद्धान्ताचा विचार करतांना त्यांनीं पुढील विचार मांडले आहेत. "ही केवलाद्वैताची स्थिति केवळ बुद्धीनें समजून घ्यावयाची किंवा तिचा प्रातिभ साक्षात्कार करून घ्यावयाचा हे प्रत्येकाच्या प्रकृतिधर्मावर अवलंबून राहील. प्रकृतिधर्मानें केवळ दुरून वाट दाखविण्यासाठीं ज्यांचा जन्म आहे, ते बौद्धिक ज्ञानावर समाधान मानतील; प्रत्यक्ष यात्रा करण्याचा ज्यांचा प्रकृतिधर्म आहे, त्यांना साक्षात्काराशिवाय समाधान वाटणार नाहीं. साक्षात्कारासाठीं प्रयत्न करणेंच श्रेष्ठ हें या ग्रंथांतील शेवटचें प्रकरण वाचल्यावर दिसून येईल" (उ. २७८). ईश्वराचा साक्षात्कार हेंच ध्येय गुरुदेवांनीं प्रतिपादिलें आहे हें सिद्ध करण्याला अधिक अवतरणें देण्याचें कारण नाहीं.

'ईश्वर-साक्षात्काराच्या किंवा आत्मसाक्षात्काराच्या या पारमार्थिक ध्येयाला तर्काचें अधिष्ठान आहे का?'—या प्रश्नाचा विचार करतांना गुरुदेव लिहितात : "उपनिषदांत परमसत्यतत्त्वाचें असें स्वरूप सांपडेल, कीं त्याचा शास्त्र, तत्त्वज्ञान व धर्म यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें विचार केला तरी तें समाधानकारक, सर्वमान्य ठरेल. कारण, त्यांनीं प्रति-

पादिलेल्या परमसत्याला प्रत्यक्ष, अपरोक्ष, प्रातिभ अनुभव हें प्रमाण आहे; अशा अनुभवावर तें आधारलेलें आहे. या प्रकारच्या अनुभवाला कोणतेंहि शास्त्र असत्य म्हणूं शकत नाहीं. हेंच जीवनांतील प्राप्तव्य किंवा ध्येय म्हणून त्या परमसत्याकडेच सर्व तत्त्वज्ञान बोट दाखवितें व सर्व धर्मपंथांत तेंच परमसत्यतत्त्व भरलेलें आहे, हें सहज समजून येण्यासारखें आहे. त्या केंद्रीभूत सत्यतत्त्वाकडे धर्मपंथांची दृष्टि जात नाहीं, म्हणून त्यांत भांडणें माजतात "(उ. २)." उपनिषदांतील शिकवणीचा रोख साक्षात्कारा-कडेच आहे " (उ. १४). यावरून, उपनिषदांनीं प्रतिपादिलेल्या सत्यतत्त्वासंबंधीं वर जे विचार सांगितले आहेत, ते सामान्यतः साक्षात्कार-शास्त्रांत सांगितलेल्या सत्यतत्त्वाला लागूं पडतील. तेव्हां शास्त्र, तत्त्वज्ञान, व धर्म यांच्या दृष्टीनें या सत्यतत्त्वाचा अनुक्रमानें विचार करूं.

" सर्व देशांतील, धर्मांतील व कालांतील साक्षात्कारी पुरुष एकाच आध्यात्मिक जगांत राहणारे असल्यानें, आपल्या अनुभवासंबंधीं एकच भाषा बोलतात; त्यांच्या वर्णनांत एकरूपता दिसून येते. वंश, जाति, देश इत्यादि गोष्टींमुळें त्यांचीं मनें विकृत होत नाहींत, दूषित होत नाहींत. शाश्वत व मर्यादातीत असा त्यांचा आत्मानुभव दिक्कालातीत असतो; त्याचा देशकालांशीं कांहींहि संबंध नसतो " (पा. प्र. २). परंतु, शास्त्रीय दृष्टीनें सत्य ठरण्याला या संतांच्या आध्यात्मिक अनुभवाला प्रत्यक्ष प्रमाणाचा आधार पाहिजे. अशा प्रमाणाशिवाय शास्त्र त्यांना सत्य मानणार नाहीं. सर्व संतांच्या आध्यात्मिक अनुभवाची एकरूपता, हें त्यांच्या सत्यतेचें मुख्य प्रमाण आहे; इतर सर्व प्रमाणें या एकरूपतेंतूनच प्रसवतात. " पौर्वात्य व पाश्चिमात्य संतांच्या सर्व एकत्रित अनुभवांचा विचार केला तर त्यांच्या आध्यात्मिक अनुभवांत मोठ्या प्रमाणांत एकरूपता आहे असें दिसून येतें. ईश्वराचें नाम, उत्कट व अनन्य भक्ति, साक्षात्काराचें स्वरूप, इत्यादि विषयासंबंधीं त्यांची एकच शिकवण आहे. या एकरूपतेमुळेंच कान्ट म्हणतो त्याप्रमाणें, ते अनुभव वस्तुनिष्ठ, तर्कप्राप्त व तर्कमान्य ठरतात. आध्यात्मिक अनुभव दिव्य, ईश्वरी आहे. या ईश्वरस्वरूपत्वामुळें त्या अनु-भवाची सत्यता व्यावहारिक अनुभवांपेक्षा अधिक प्रभावीपणें व उत्कटतेनें ठसते; ती अमान्य करणें अशक्य होतें. " (पा. ८). आत्मानुभवाच्या

सत्यतेचीं आणखीहि प्रमाणें आहेत. "आत्मानुभवाच्या बरोबर तर्कशुद्ध विचार करण्याची शक्तिहि जागृत झालेली दिसते. साक्षात्कारामुळें व्यक्तीची व समाजाची निश्चित नैतिक उन्नति होते; ही उन्नति घडवून आणण्याची शक्ति हेंहि आत्मानुभवाच्या, साक्षात्काराच्या सत्यतेचें आणखी एक गमक आहे. साक्षात्कारी पुरुषांचे अनुभव आनंदमय असतात; त्यामुळें त्यांच्या आनंदाला पूर येतो. खरें पाहतां, आत्मानुभवाचा आनंद हा उच्चतम आनंद होय. त्याचप्रमाणें, साक्षात्कारी पुरुषांचें जीवन अत्यंत भावनाप्रधान असतें. मात्र भावनांना बुद्धीचा, विवेकाचा, लगाम घालावा लागतो " (पा. प्र. ५-७). बुद्धि, भावना, क्रियाशक्ति या मनुष्याच्या शक्तींचा इतका मोठा विकास व उच्चतम आनंदाची प्राप्ति हीं निश्चितपणें आत्मानुभवाच्या सत्यतेचीं गमकें आहेत. केवळ कल्पना, भ्रम किंवा आभास या स्वरूपाच्या अनुभवामुळें असा सर्वांगीण विकास होणें अशक्य आहे.

शास्त्राच्या दृष्टीनें हा विचार झाला. आतां, परमसत्यतत्त्वाकडे तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें पाहूं. " परतत्त्वज्ञानाच्या सिद्धांताच्या सत्यतेचें व मान्यतेचें माप कोणतें ?*जीवन दिव्य व स्पृहणीय करण्याचें त्या सिद्धांताचें सामर्थ्य हेंच त्याच्या सत्यतेचें व मान्यतेचें माप होय " ( उ. १४ ). जीवन दिव्य बनविण्याच्या कामीं ज्ञान, तत्त्वज्ञान किंवा परतत्त्वज्ञान ( Metaphysics ) हें नेमकें कोणतें कार्य करतें ? केवळ बुद्धीवर आधारलेलें ज्ञान जीवनांत दिव्यता आणूं शकेल काय ? केवळ ज्ञान हें कार्य करूं शकत नाहीं. आत्मा, विश्व व ईश्वर या मानवी जीवनांतील मूलभूत प्रश्नासंबंधीं केवळ बुद्धि काय तत्त्वज्ञान सांगूं शकेल ? ज्यांची प्राप्ति कधींच करून घेतां येणार नाहीं अशीं ध्येयें बौद्धिक तत्त्वज्ञानानें केवळ दृष्टीस पडतील " ( उ. प्र. ९ ). नीति व नैतिक मूल्यें यासंबंधींच्या विचारांनींच बौद्धिक सिद्धांतांना पूर्णता येऊं शकेल. म्हणून, " उपनिषदांतील तत्त्वज्ञानाची पूर्णता व परिणति साक्षात्कारवादांत झाली आहे. कोणत्याहि तत्त्वज्ञानाची परिणति साक्षात्कारवादांतच होत असते. उपनिषदांतील विश्वोत्पत्तिशास्त्र, मानसशास्त्र, परतत्त्वज्ञान व नीतिशास्त्र हे सर्व विषय त्यांतील साक्षात्कारविषयक सिद्धांतांची प्राथमिक मीमांसा किंवा पूर्वतयारी आहे " (उ.६५). तत्त्वज्ञानाची परिणति साक्षात्कारवादांत कशी होते हें गुरुदेवांनीं दाखविलें आहे. "परमसत्यतत्त्व काय आहे ? आत्मा

म्हणजे काय? बुद्धीनें त्याच्या स्वरूपासंबंधीं काय कल्पना ठरवितां येतात ? या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचें उत्तर उपनिषदांतील ऋषींना पाहिजे होतें. मनुष्य या प्रश्नाचें उत्तर शोधण्याचा प्रयत्न करूं लागला म्हणजे परतत्त्वज्ञानाचा गाभा त्याच्या हातीं येतो. आत्मा व त्याचें स्वरूप यासंबंधींचा प्रश्न बुद्धीनें कांहीं प्रमाणांत सोडविला म्हणजे या आत्म्याची,परतत्त्वाची प्राप्ति कशी होणार,त्याचें ज्ञान म्हणजे साक्षात्कार कसा होणार, त्याच्या साक्षात्कारासाठीं कोणता आचारधर्म पाळला पाहिजे, हा दुसरा प्रश्न उत्पन्न होतो. म्हणून, परतत्त्वज्ञानाकडून मनुष्य नीतिविचाराकडे वळतो. आचारधर्मांची पूर्तता साक्षात्कारानेंच होऊं शकते; पूर्ण साक्षात्कार झाल्यावरच नैतिक पूर्णता प्राप्त होऊं शकते. साक्षात्काराशिवाय नीति म्हणजे हॅम्लेट या पात्राशिवाय हॅम्लेट हें नाटक करणें होय ” ( उ. ६४-६५ ). याप्रमाणें, मनुष्य तत्त्वज्ञानावरून नीतिविचाराकडे वळतो व नीतीची परिणति साक्षात्कारांत होते. साक्षात्कार म्हणजेच दिव्य जीवन, स्पृहणीय जीवन; साक्षात्कार हेंच जीवनाचें ध्येय होय, हें दाखविणें एवढेंच तत्त्वज्ञानाचें कार्य आहे. तत्त्वज्ञान त्या ध्येयाकडे केवळ बोट दाखवूं शकतें, त्याची प्राप्ति करून देऊं शकत नाहीं.

तत्त्वज्ञानाच्या पुढची पायरी नीतिशास्त्र. म्हणून नीतिशास्त्राचा साक्षात्कारशास्त्राशीं कशा प्रकारचा संबंध आहे याचा विचार करून, नंतर धर्माच्या दृष्टीनेंहि साक्षात्कार हें ध्येय कसें समाधानकारक व सर्वमान्य ठरतें तें पाहूं. “ उपनिषदांतील नैतिक विचारांचा संबंध एका बाजूनें परतत्त्वज्ञानाशीं आहे व दुसऱ्या बाजूनें साक्षात्कारशास्त्राशीं आहे. मनुष्याचें मन, त्याची जाणीव अखंड, पूर्ण आहे हें ध्यानांत ठेविलें म्हणजे त्यांतील बौद्धिक प्रवृत्ति व नैतिक प्रवृत्ति, त्याचप्रमाणें नैतिक प्रवृत्ति व साक्षात्कार-प्रवृत्ति यांची फारकत करतां येणार नाहीं. तशी फारकत केली तर मनुष्याच्या मनाचा, जाणिवेचा, पूर्ण विकास होणार नाहीं. बुद्धीला नीतीचा जोरकस आधार नसेल तर ती केवळ शब्दच्छल, धूर्तता, लबाडी, या हीन स्वरूपाला पोहोचेल. त्याचप्रमाणें नीतिविहीन साक्षात्कारी पुरुष–असा पुरुष असणें शक्य असेल तर—म्हणजे अत्यंत तिरस्करणीय प्राणी होय; असा पुरुष पारमार्थिक विकासाला लांछनच म्हटला पाहिजे. नीति ही डोळस, विवेकयुक्त

होण्यासाठीं तिला बुद्धीची जोड दिली पाहिजे. त्याचप्रमाणें, साक्षात्कार हेंच मानवी जीवनाचें एक साध्य व ध्येय असल्यामुळें, नीतीला पूर्णत्व येण्यासाठीं तिची परिणति साक्षात्कारप्रवृत्तींत झाली पाहिजे. सारांश, मनुष्याच्या मनाच्या पूर्ण विकासाच्या दृष्टीनें ज्याप्रमाणें बुद्धि, भावना व क्रियाशक्ति यांची फारकत करतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें मनुष्याच्या उच्चतम आध्यात्मिक विकासाच्या दृष्टीनें परतत्त्वज्ञान, नीतिशास्त्र व साक्षात्कारशास्त्र यांचीहि फारकत करतां येणार नाहीं " ( उ. २८७–२८८ ). " ब्रह्म, आत्मा व जीव यांच्या ऐक्याचा साक्षात्कार हेंच साधकानें आपल्या एकविध, अनन्य साधनानें साधावयाचें ध्येय आहे; हा साक्षात्कारच उच्चतम नैतिक ध्येय ( Summum Bonum )—म्हणजे आनंद—होय " (उ. ३०५). " येथें आत्मसाक्षात्काराचें आध्यात्मिक स्वरूप, म्हणजे ब्रह्म, आत्मा व जीव यांचें ऐक्य, व त्याचें नैतिक स्वरूप म्हणजे आनंद, यांचा उत्कृष्ट संगम झाला आहे" (उ. ३०४). नीतीचें उच्चतम साध्य म्हणजे परमानंद; तो वरील साक्षात्कारानेंच प्राप्त होतो. म्हणून नीतीची पूर्णता साक्षात्कारावांचून होऊं शकत नाहीं; आपल्या पूर्णत्वासाठीं तिची साक्षात्कारप्रवृत्तींत परिणति व्हावी लागते, हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

साक्षात्कारानें नीतीला पूर्णत्व येऊं शकतें हें पाहिल्यावर, आतां स्वानुभवगम्य आत्मा म्हणजेच परतत्त्व, या दृष्टीनें विचार केला तर मनुष्याच्या धार्मिक अपेक्षांचेंहि समाधान होईल. साक्षात्कार हेंच ध्येय सर्व धर्मांनीं सांगितलें आहे, या विधानाचा विचार करूं. आत्मदर्शन, जीव व ईश्वर यांचें ऐक्य, विजयी साक्षात्कारी पुरुषाची ऐश्वर्ययुक्त मिरवणूक, आदर्शभूत ऋषि, पापी आत्मा व देवाच्या नामाचें महत्त्व या विषयांवरील पौर्वात्य व पाश्चात्य साक्षात्कारी पुरुषांच्या वचनांचा तौलनिक विचार गुरुदेव रानडे यांनीं " महाराष्ट्रीय संतांचा साक्षात्कार " या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत केला आहे. तेथें त्यांनीं वरील संतांच्या आध्यात्मिक अनुभवांतील साम्यस्थलेंहि दाखविलीं आहेत. ते म्हणतात, " पौर्वात्य व पाश्चात्य साक्षात्कारी पुरुषांच्या सिद्धांतांची तुलना केली तर, एकाचा दुसऱ्याच्या लिखाणावर कोणत्या तरी प्रकारानें परिणाम झाला म्हणून त्यांत एकरूपता आहे, असें

कारण देऊन त्यांमधील सारखेपणाची उपपत्ति लावितां येणार नाहीं. त्या सर्वांना एकाच प्रकारचा, अपरोक्ष, प्रातिभ आत्मानुभव आलेला आहे; त्यामुळें त्यांच्या शिकवणींत इतकें साम्य दिसून येतें. दुसरें कांहींहि कारण नाहीं. हेरॅक्लायटस् म्हणतो त्याप्रमाणें, " सर्व जाग्रत लोकांना एकच जग असतें; झोपलेल्यांना, प्रत्येकाला निराळें जग भासतें " (म. प्र. १६ ). " या कारणानें, जगांतील सर्व साक्षात्कारी पुरुषांचें एक शाश्वत, दिव्य, संतकुल तयार होतें " ( म. २ ). याप्रमाणें, आत्मानुभूतिरूपी ऐक्याचें सूत्र सर्व धर्मांमध्यें अनुस्यूत असलेलें दृष्टीस पडतें व हें सूत्रच मानवतेंत बंधुभाव उत्पन्न करूं शकेल. यावरूनच गुरुदेव रानडे म्हणत असत, "मला एक धर्म समजतो, अनेक धर्म या शब्दांचा अर्थ मला समजत नाहीं; एक ईश्वर, एक धर्म, या भूमिकेवरच मानवतेमध्यें बंधुभाव नांदूं शकेल. एक देव, एक धर्म, तरच एक मानवता. " ईश्वरसाक्षात्कार हेंच सर्व धर्मांचें ध्येय आहे व साक्षात्काराचें स्वरूपहि एकच आहे.

## (२) साधनविचार

आत्मसाक्षात्कार, म्हणजेच शांतपणें, आनंदमय असें ईश्वराचें चिंतन, हें गुरुदेवांच्या मतें मानवाचें एकमेव ध्येय व साध्य आहे. हें ध्येय प्राप्त करून घेण्याच्या साधनाच्या विचाराकडे वळण्यापूर्वीं, आत्म्याच्या किंवा ईश्वराच्या साक्षात्कारासंबंधीं दोन प्रश्नांचें विवेचन करूं. पहिला प्रश्न अगदीं मूलगामी आहे. आत्मा हा शाश्वत ज्ञाता आहे; मग ज्ञात्याचें ज्ञान कसें होऊं शकेल ? याचें उत्तर असें कीं, " स्वतः ज्ञेय व ज्ञाता, दोन्हीं बनण्याची अपूर्व शक्ति आत्म्यामध्यें आहे; म्हणून आत्मज्ञान होऊं शकतें. स्वसंवित् शक्य आहे " ( उ. २७४ ). " मानसशास्त्रांत जशी अंतर्निरीक्षणाची प्रक्रिया आहे, तसेंच आत्मज्ञान हें साक्षात्कारशास्त्रांतील सत्य तत्व आहे. अंतर्निरीक्षणाच्या प्रक्रियेंतूनच आत्मज्ञान होऊं शकतें ( उ. २७४). मनुष्याच्या कोणत्या शक्तीला ईश्वराचा किंवा आत्म्याचा साक्षात्कार होऊं शकतो, हा दुसरा प्रश्न आहे. बुद्धि, भावना व क्रियाशक्ति ,यांपेक्षां निराळी अशी प्रतिभा ( Intuition ) ही शक्ति साक्षात्कार होण्याला आवश्यक आहे. प्रतिभेनेंच ईश्वराचें, परतत्त्वाचें ज्ञान किंवा दर्शन होऊं

शकतें. “ बुद्धि, भावना व क्रियाशक्ति यांच्याशीं प्रतिभेचा विरोध नाहींच; उलट प्रतिभा या तीन शक्तींना व्यापून टाकते व त्यांच्यामागें उभी असते.” (पा. प्र. २)

आतां साक्षात्काराच्या साधनाचा विचार करूं. आत्मदर्शी सद्गुरूंकडून मिळालेल्या नामाचें स्मरण हें साधन होय. त्याची पूर्वतयारी म्हणून दुर्गुणांचा त्याग करून सद्गुण अंगीं आणिले पाहिजेत. शुद्ध नैतिक जीवन हा परमार्थाचा पाया आहे. “ आध्यात्मिक गुरुत्वाकर्षणाच्या नियमानें श्रेष्ठ साक्षात्कारी सद्गुरूंचे आत्मानुभव आपोआप साधन करणाऱ्या साधकांत उतरतात ” (पा. १४२ ). म्हणून अशा पुरुषांकडून मिळालेलें नामच प्रभावी ठरतें; त्या सबीज नामाच्या स्मरणानें साक्षात्कार होऊं शकतो. “ साक्षात्काराच्या उच्चतम पदाला पोंचलेल्या सद्गुरूंकडून शिष्याला मिळालेलें नामच परमार्थांत उपयोगीं पडतें ” (पा. ३४९ ). यालाच सबीज नाम म्हणतात. तें अंतःकरणांत पेरून त्याला स्मरणाचें पाणी घातलें व देहरूपी क्षेत्र शुद्ध राखलें म्हणजे अंतःकरणांत देवाचेंच पीक उगवतें, ईश्वराचा साक्षात्कार होतो.

या नामस्मरणाची विशिष्ट प्रक्रिया आहे. नामाचें स्मरण करावयाचें, वैखरीनें उच्चार करावयाचा नाहीं; मनोजप करावयाचा, वैखरीजप नव्हे. नामस्मरण अत्यंत एकाग्रतेनें केलें पाहिजे; पूर्ण एकाग्रता हा नामस्मरणाच्या साधनाचा प्राण आहे. त्याचप्रमाणें नामस्मरण दीर्घकाल म्हणजे मरेपर्यंत चालू ठेविलें पाहिजे. तसेंच तें निरंतर झालें पाहिजे; प्रत्येक श्वासाचा नामस्मरणाकडे उपयोग झाला पाहिजे; एक श्वासहि नामाशिवाय घालवूं नये. “ श्वास श्वासपर हरि भजो । वृथा श्वास मत खोय ।। ” शेवटीं, अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे नामस्मरण अनन्यभावानें, भक्तिपूर्वक केलें तरच तें प्रभावी ठरतें. “ दीर्घकाल-नैरंतर्य-सत्कारयुक्त नामस्मरण केलें तरच तें प्रभावी ठरतें. ” (पा. १३५ )

साधन-विचारांत साधकाला येणाऱ्या तीव्र निराशेच्या अवस्थेचा विचार करावा लागतो. या अवस्थेला ख्रिश्चन धर्मशास्त्रांत Dark Night of the Soul ( आत्म्याची अंधारी रात्र ) हें नांव देतात. “ साक्षात्कारी संतांचीं चरित्रें पाहिलीं तर असें दिसून येतें, कीं प्रायः प्रत्येक संताच्या

जीवनांत निराशेच्या अंधाराच्या मध्यरात्रीला अगदीं लागूनच साक्षात्काराचा उषःकाल असतो. ईश्वराच्या वैभवशाली, विशाल सामर्थ्यापुढें आपण सर्वस्वीं दुर्बल आहोंत, हें पूर्णपणें अनुभवाला आल्यावांचून ईश्वराच्या कृपेला आपण पात्र होत नाहीं, त्याची आपल्यावर कृपा होणें शक्य नाहीं'' (पा. १८१-८२). ही निराशेची तळमळ अनुभल्यानंतर साधकावर ईश्वराची कृपा होते व प्रकाश, वर्ण, रूप, नाद, अमृतरस, स्पर्श व गंध इत्यादि आध्यात्मिक अनुभव येण्याचें भाग्य साधकाला लाभतें. या आध्यात्मिक अनुभवांचें दिग्दर्शन पतंजलींनीं पुढील सूत्रांत केलें आहे : ''ततः प्रातिभश्रावणास्वादवेदनादर्शवार्ता जायन्ते'' (३,३७). उपनिषदें आणि मराठी, हिंदी व कन्नड संतकवींचे ग्रंथ यांतून उद्धृत केलेलीं आनंदमय, दिव्य साक्षात्काराच्या अनुभवाचीं अनेक वचनें गुरुदेवांच्या ग्रंथांत सांपडतील. त्यांपैकीं श्रेष्ठ साक्षात्कारी संत कबीर यांचें एकच पद येथें देतों. त्यांत आत्मानुभवाचें स्वरूप व त्याचे परिणाम या दोहींचेंहि वर्णन आलें आहे :

रस गगनगुफामें अजर झरै ॥ टे० ॥

बिन बाजा झनकार उठै जहँ,
समुझि परै जब ध्यान धरै
बिना ताल जहँ कमल फुलाने,
तेहि चढि हंसा केलि करै
बिन चंदा उजियारी दरसै,
जहँ तहँ हंसा नजर परै
दसवे द्वारे ताली लागी,
अलख पुरुख जाको ध्यान धरै
काल कराल निकट नहिं आवै,
काम क्रोध मद लोभ जरै
जुगन जुगन की तृषा बुझाती,
करम भरम अघ व्याधि टरै
कहै कबीर सुनो भाइ साधो,
अमर होय कबहूँ न मरै

अशा आत्मानुभूतीचीं अधिक वचनें उद्धृत करण्याचें कारण नाहीं; त्यांचा विशेष उपयोगहि होणार नाहीं. कारण, " ज्ञान आणि जीवन यांत जो फरक आहे तोच अनुभवाचें वर्णन व त्याचा उपभोग यांत आहे" (उ.३२६). मागें सांगितल्याप्रमाणें, जीवन दिव्य व स्पृहणीय करणें हाच खऱ्या मानवी ध्येयाचा हेतु आहे; हें ज्यानें साधतें त्यालाच ध्येय हें नांव शोभेल. आत्मानुभवानें जीवन दिव्य व स्पृहणीय होतें कीं नाहीं, हें त्याच्या परिणामांच्या वर्णनावरून कळेल; नुसत्या अनुभवाच्या वर्णनावरून कळणार नाहीं. " आपल्या समाधीच्या अनुभवानें जीवनावर उदात्त, भव्य असे मानसिक, नैतिक, बौद्धिक परिणाम झाले नाहींत, इतकेंच नव्हे तर मरणोत्तर अवस्थेवर त्यांचे परिणाम झाले नाहींत, तर त्या समाधीचा काय उपयोग ?" (पा. २२६). आत्मानुभवाच्या आनंदमयत्वाची व विशालतेची साक्ष त्याचे परिणामच देऊं शकतील. आत्मानुभवाचें किंवा ईश्वरसाक्षात्काराचें जीवनावर काय परिणाम होतात ? ते परिणाम अनेक आहेत; त्यांतील कांहींचा निर्देश येथें करूं. कबीरांच्या वर उद्धृत केलेल्या पदांत ते सांगतात :

" काल कराल निकट नहिं आवत,
काम क्रोध मद लोभ जरै ॥
जुगन जुगन की तृषा बुझाती,
करम भरम अघ व्याधि टरै ॥...
अमर होय कबहूँ न मरै ॥"

याचा अर्थ मागील लेखांत दिलाच आहे. आतां साक्षात्काराच्या आनंदाचे परिणाम पाहा. " संतानें ईश्वराच्या भक्तीची मदिरा सेविली म्हणजे तो मोह व संशय यांपासून मुक्त होतो आणि पूर्ण साम्यावस्थेला पोहोंचतो. हृदयांत त्याला ईश्वराचें दर्शन होत असतें; तें दुसऱ्यांना कळत नाहीं. तो एक आत्म्यालाच मानतो; म्हणून तो कोणाची पर्वा करीत नाहीं; सदा ईश्वराचिंतनांत, आत्मानंदांत, मग्न असतो " (पा. २३५).

" पियत पियाला प्रेमका...
बन्धन काट मोहका, बैठा निरशंका ॥...
वाके नजर न आवत, क्या राजा क्या रंका ॥"

या कबीरांच्या वचनावर वरील भाष्य गुरुदेवांनीं केलें आहे. "ईश्वराच्या दर्शनानें व प्राप्तीनें मन मस्त झालें म्हणजे पूर्ण साम्यावस्था प्राप्त होते. साक्षात्कारानंतर संत मौन स्वीकारतो; तो अगदीं देवासारखा होतो; आनंदमय असतो. ईश्वराचा आनंद मनसोक्त भोगण्याला त्याला कोण मना करणार ?" (पा. २४१).

> " मन मस्त हुआ तब क्यों बोले ॥ टे. ॥
> हलकी थी जब चढी तराजू,
> पुरी भई तब क्यों तोलै ॥...
> सुरत कलाली भइ मतवारी,
> मदवा पी गइ बित तोलै ॥ ( कबीर )

( एकदां मन मस्त झाल्यावर काय बोलणार ? तराजू हलकी होती, तेव्हां वर आली; आतां दोन्हीं पारडीं सम झाल्यावर काय तोलावयाचें ? जीवरूपी दारूच्या दुकानाची मालकीण झिंगली व बेमाप दारू पिऊं लागली. तिला कोण मना करणार ? )

गुरुदेवांच्या उपनिषदांवरील ग्रंथांत आलेल्या साक्षात्काराच्या परिणामांचा आतां विचार करूं. " ईश्वरसाक्षात्काराचे साक्षात्कारी पुरुषावर तात्काल होणारे परिणाम म्हणजे (१) त्याचे सर्व शारीरिक प्रक्षोभ थांबतात; (२) सर्व संशयांची निवृत्ति होते; (३) त्याला थोर सामर्थ्य प्राप्त होतें; (४) अमर्याद आनंद भोगावयाला मिळतो; (५) त्याचे सर्व संकल्प पूर्ण होतात " ( उ. ३५० ). त्याच ग्रंथांत आदर्शभूत साक्षात्कारी ऋषींचें पुण्यपावन प्रसन्न दर्शन वाचकांना घडविलें आहे. " ज्या साक्षात्कारी पुरुषाला सर्व कांहीं आत्मस्वरूपच दिसतें, त्याला शोक-मोह हे विकार कोठून उरणार ? कारण त्याला सर्वत्र ऐक्य, एकत्वच दिसतें. जोंपर्यंत वासनांच्या सूक्ष्म आवरणानें मनुष्य वेढलेला आहे, तोंपर्यंत ईश्वराचा साक्षात्कार न झाल्यामुळें त्याला दुःख होतें. परंतु आतां त्याला आत्मप्राप्ति झाली, म्हणून त्याची सर्वश्रेष्ठ वासना तृप्त झाली, इतर वासना नष्ट झाल्या; आतां त्याच्या दुःखाचाहि अंत झाला. ज्याप्रमाणें कमलपत्राला पाण्याचा स्पर्श होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें अशा पुरुषाला पापाचा स्पर्श कधींच होऊं शकत

नाहीं. मीं सत्कार्य कां केलें नाहीं, दुष्कर्म कां केलें असा पश्चात्ताप त्याला कधींहि होत नाहीं. आत्मस्वरूपाचा साक्षात्कार ज्याला झाला तो पुण्यपापातीत होतो. त्याचें वाईट करावें, त्याचा नाश करावा असें जर कोणीं मनांत आणिलें तर अशा दुष्टाची निराशा होईल. कारण साक्षात्कारी पुरुष हा अभेद्य खडक आहे; अशा खडकावर जो डोकें आपटील त्याचा कपाळमोक्ष झाल्यांवाचून राहणार नाहीं. ईश्वराची प्राप्ति करून घेतल्यामुळें त्याला आत्यंतिक शांतीचा लाभ होतो. योगमार्गानें ब्रह्मचिंतन केल्यामुळें त्याचीं इंद्रियें, मन व बुद्धि स्थिर होतात. आत्म्याचा साक्षात्कार झाल्यानें त्याला सर्वत्र शाश्वत सुख प्राप्त होतें" (उ. ३१५).

याच ग्रंथांतील आणखी एक उतारा घेऊन हा लेख संपवूं. "तैत्तिरीय उपनिषदांत परमश्रेष्ठ साक्षात्कारी पुरुषाचे समाधीच्या व्युत्थानानंतर परमानंदानें सहज बाहेर पडलेले स्वगत उद्गार सांपडतात. इतर उपनिषदांत किंवा उपनिषदांनंतर झालेल्या ग्रंथांतहि इतके उदात्त, स्फूर्तिदायक व भव्य उद्गार सांपडणार नाहींत. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय कोषांच्या पलीकडे गेल्यावर, 'एकमेवाद्वितीय' या केवलाद्वैताच्या अवस्थेंत, एकतेच्या सामाचें गुंजन करीत, आपण कसें पूर्ण एकांतांत बसून राहिलों हें तेथें सांगितलें आहे. "काय आश्चर्य! काय आश्चर्य! काय आश्चर्य! मीच अन्न आहें, मीच अन्न आहें! मीच अन्न खाणारा आहें, मीच अन्न खाणारा आहें, मीच अन्न खाणारा आहें! मीच त्यांचें ऐक्य करणारा आहें, मीच त्यांचें ऐक्य करणारा आहें, मीच त्यांचें ऐक्य करणारा आहें." याचा तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें अर्थ असा कीं, सर्व जड, सर्व चित् व त्या दोहोंना जोडणारें सूत्र मीच आहें. ज्ञानशास्त्राच्या दृष्टीनें त्याचा अर्थ हा, कीं ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान मीच आहें. या आध्यात्मिक अनुभवाचें, "येथें युद्धभूमि, युद्ध व योद्धा हा भेद नष्ट होतो," असें सुंदर वर्णन एका आधुनिक कल्पनावादी तत्त्वज्ञानें केलें आहे. या एकतेच्या किंवा केवलाद्वैताच्या ज्ञानाची परासीमा खालील शब्दांत सांगितली आहे. "ऋतापासून प्रथम माझा जन्म झालेला आहे; मी देवांच्याहि पूर्वीचा आहें. मी अमरत्वाचें केंद्र आहे. जो माझें दान करतो, तोच मला वस्तुतः आपल्यापाशीं ठेवितो; जो सर्व अन्न खातो, त्याचें मी अन्न म्हणून भक्षण करतों.

सूर्याच्या प्रकाशासारख्या तेजानें मी सर्व विश्व भरून टाकितों" (उ. ३५२–५३). उपनिषदांतील हीं वचनें खालीं मूळांतच देत आहों.

"स य एवंवित् । अस्माल्लोकात् प्रेत्य । एतमन्नमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं प्राणमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं मनोमयमात्मानमुपसंक्रम्य । एतं विज्ञानमयमात्मानमुपसंक्रम्य । एतमानंदमयमात्मानमुपसंक्रम्य । इमाँल्लोकान्कामान्नी कामरूप्यनुसंचरन् । एतत्साम गायन्नास्ते । हा३वु हा३वु हा३वु । अहमन्नमहमन्नमहमन्नम् । अहमन्नादो३ऽहमन्नादो३ऽहमन्नादः । अहं श्लोककृदहं श्लोककृदहं श्लोककृत् । अहमस्मि प्रथमजा ऋता३स्य । पूर्वं देवेभ्योऽमृतस्य ना३भायि । यो मा ददाति स इदेव मा३वाः । अहमन्नमन्नमदन्तमा३द्मि । अहं विश्वं भुवनमभ्यभवा३म् । सुवर्णज्योतीः । (तै. ३, १०. ५–६).

यापेक्षां अधिक आनंदमय, दिव्य, स्पृहणीय अशा जीवनाची कल्पना तरी करतां येणें शक्य आहे का ? गुरुदेव रानडे हे आपल्या साक्षात्काराच्या अनुभवानें देवत्व पावलेले साक्षात्कारी पुरुष होते, इतकेंच नव्हे तर त्याबरोबर ते थोर तत्त्वज्ञानीहि होते, ही परमेश्वराची आमच्यावर खरोखर कृपा होय. साक्षात्कार व तत्त्वज्ञान यांच्या या उज्ज्वल संगमामुळें, ते शाब्दे व परे निष्णात असल्यामुळें, बुद्धिप्रधान, विचारप्रधान लोकांना ईश्वरप्राप्तीच्या उच्च ध्येयाकडे वळविण्याला गुरुदेव रानडे समर्थ झाले. (म. ४९४).

(जीवन विकास, डिसेंबर १९५७, मे १९५८)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
९९५७३
अनुक्रमांक २८३११
वि: ५१८३
नों. दि: २१।२१

# आमचीं प्रकाशनें


## प्रो. ना. सी. फडके

स्मृती आणि संचार ...३·००

माझ्या साहित्यसेवेंतील स्मृती

भा. १ ला ...२·५०

भा. २ रा ...३·००

प्रतिभाविलास ...१·५०

## सौ. कमला फडके

दुसरा बहर ...३·००

## श्री. वि. वि. बोकील

ऐकावं तें नवलच ...३·००

माहेरघर ...१·५०

नवा जमाना २·००

थोर तुझे उपकार ३·५०

## श्री. पु. भा. भावे

अंतराळ ...६·००

बंगला ...३·००

फुलवा ...२·५०

ध्यास ...४·००

रूप ...२·५०

कुभांड ...३·००

अकुलिना ...३·००

स्वप्न ...३·५०

## श्री. र. वा. दिघे

पाणकळा ...५·००

लक्ष्मीपूजन ...३·००

रम्य रात्री ...२·००

## सौ. मालती दांडेकर

पऱ्यांची राणी ...०·७५

तरुणींचे प्रश्न ...४·००

दूर देशच्या प्रीतिकथा ...२·५०

## सौ. वसुंधरा पटवर्धन

आमचें स्त्रीजीवन ...३·००

प्रीतीची हांक ...२·००

## सौ. मालतीबाई बेडेकर

हदरलेलं घर ...०·७५

## प्रो. मा. का. देशपांडे

आधार ...५·००

धूम्रतरंग ...२·००

पहिला पगार ...३·००

## प्रो. रतनलाल डी. शहा

पेटती मशाल ...४·००

भाग्यलक्ष्मी ...१·००

## आचार्य अत्रे

निशिगंध ...१·५०

## प्रा. श्री. म. माटे

कर्तबगार स्त्रिया ...१·५०

सुगंधी फुलें ...१·२५

## प्रा. म. ना. अदवंत

नसते उपद्व्याप ...२·००

## श्री. द. का. काणे

चुकलेलं पांखरूं ...२·००

श्री. भालचंद्र खांडेकर

चंद्रप्रकाश ...२·००

कै. गो. ब. देवल

सं. शारदा ...२·००

कै. अण्णासाहेब किर्लोस्कर

सं. सौभद्र ...१·५०

श्री. वामन पंडित

नामसुधा, वेणुसुधा व वनसुधा...२·००

श्री. व्यंकटेश माडगुळकर

काळी आई ...३·००

पंडित महादेवशास्त्री जोशी

पुत्रवती ...३·००

कथासुगंध ...१·५०

प्रि. रा. प. सबनीस

मेघदूत ...२·००

प्रा. रा. कृ. लागू

साहित्यसुवर्ण ...३·००

प्रा. शांता ज. शेळके

ओढ ...४·००

कै. साने गुरुजी

अस्पृश्योद्धार ...०·७५

बालशंकर देशपांडे

श्रावणांतल्या विजा ...१·५०

प्रा. श्री. के. क्षीरसागर

तीन निबंध ...२·००

श्री. अप्टन सिंक्लेअर

जंगल ...५·००

श्री. इंदुमती पंडित

मानवयुग ...३·५०

विचार ...१·५०

भावी काल ...१·२५

श्री. माणिक परदेशी

धाडसी झुंझार ...१·००

विषारी बाण ...१·००

श्री. गो. ल. आपटे

विचित्र वाटमारी ...१·००

राजरत्न वा. वि. जोशी

बदसूर जोडपीं ...२·००

नरम गरम ...२·००

श्री. नलिनी मुळगांवकर

तृष्णा ...२·००

श्री. य. य. माळी

पुनर्जन्म ...०·५०

नवें क्षितिज ...०·५०

श्री. रामानंद सागर

आणि माणसाचा मुडदा पडला ...४·००

श्री. लक्ष्मणराव सरदेसाई

सागराच्या लाटा ...१·५०

श्री. शशिकांत पुनर्वसु

संध्याकाळच्या सांवल्या ...२·५०

डॉ. चिं. ग. कर्वे

नवविज्ञानाच्या परिसरांत ...२·००

## श्री. ग. वि. तुळपुळे यांचीं पुस्तकें

१. साक्षात्कार-पथावर तुकाराम रु. २·००

२. भगवद्गीता : साक्षात्कारदर्शन (गुरुदेव रानडे यांच्या "The Bhagawadgita as a Philosophy of God-realisation" या ग्रंथाचें रूपांतर ) रु. ६·२५

७. नामदेव : आध्यात्मिक चरित्र व ज्ञानदीप रु. २·५०

REFBK-0011583